अहवाल क्रमांक : १९७

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या वर्धा जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# चौथा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२६

# पंचायती राज समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या वर्धा जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# चौथा अहवाल

# पंचायती राज समिति

**(सन २०२४-२०२५)**

**समिति प्रमुख :**

(१) श्री. संतोष दानवे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. सुरेश धस, वि.स.स.
(३) श्री. महेश लांडगे, वि.स.स.
(४) श्री. प्रताप अडसड, वि.स.स.
(५) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स.
(६) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स.
(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(८) श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स.
(९) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स.
(१०) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.
(११) श्री. निलेश राणे, वि.स.स.
(१२) श्री. संजय गायकवाड, वि.स.स.
(१३) श्री. रमेश बोरनारे, वि.स.स.
(१४) श्री. किरण लहामटे, वि.स.स.
(१५) श्री. विजयसिंग पंडित, वि.स.स.
(१६) श्री. नितीन पवार, वि.स.स.
(१७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१८) श्री. नितीन देशमुख, वि.स.स.
(१९) श्री. संजय मेश्राम, वि.स.स.
(२०) श्री. संदिप क्षिरसागर, वि.स.स.
(२१) डॉ. परिणय फुके, वि.प.स.
(२२) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.
(२५) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. योगेश टिळेकर, वि.प.स.
(२७) *डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स.
(२८) **श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव (४)

(२) श्री. रविंद्र जगदाळे, उप सचिव

(३) श्री. सुरेश मोगल, अवर सचिव

(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी

(२७)* डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १९ मे, २०२५ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

(२८)** श्री. सदाशिव खोत, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक २१ मे, २०२५ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

## पंचायती राज समिती

**(सन २०२०-२०२१)**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. प्रदिप जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास पाटील (घाडगे) वि.स.स.

(४) डॉ. राहूल पाटील वि.स.स.

(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ बागडे, वि.स.स.

(१३) *रिक्त

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१६) **श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(२१) *** रिक्त

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३२) ****रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

* डॉ.विजयकुमार गावीत, वि.स.स. यांचा दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

** डॉ.संजय कुटे, वि.स.स. यांनी समिती सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि.स.स. यांची "समिती सदस्य" म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून नामनियुक्ती केली.

*** श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांची मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ०९ ऑगस्ट, २०२२ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद, विरोधी पक्ष नेते पदी निवड केल्यामुळे रिक्त.

**** श्री. सदाशिव खोत, वि.प.स. यांची विधानपरिषदेवरील सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी संपुष्टात आल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

**(सन २०१७-२०१८)**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) ***रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) *** रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) *श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

* श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ.सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा चौथा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता समिती दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningfull) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात येते. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत.

समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने वर्धा जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने वर्धा जिल्हा परिषदेस दिनांक ८, ९ व १० ऑगस्ट, २०१८ रोजी भेट देऊन श्री. अजय गुल्हाने, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

तसेच सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्द्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी आणि सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी जिल्हा परिषद, वर्धा संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी विभागाचे अपर मुख्य सचिव, जिल्ह्यातील संबंधित अधिकारी, मंत्रालयीन सह सचिव, उप सचिव व श्री. माधव नागरगोजे, संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या वर्धा जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२४-२०२५ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १८ मार्च, २०२६.

**संतोष दानवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | जिल्हा वार्षिक योजनांतर्गत जनसुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वितरणामधील अनियमितता. | ... | १ |
| (२) | दोन | निरंतर शिक्षण विभागातील कार्यरत कर्मचारी व योजनाबाबत | ... | ६ |
| (३) | तीन | शालेय पोषण आहार योजनेच्या अनुदान वाटपाबाबत व योजना राबविण्याबाबत | ... | १२ |
| (४) | चार | मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगांव (गो) रस्ता सर्फेस ड्रेसिंग करणेबाबत | ... | २० |
| (५) | पाच | १३वा वित्त आयोग जिल्हा परिषद स्तराचे कामाबाबत | ... | २७ |
| (६) | सहा | साठवण तलाव सोरटा तसेच साठवण बंधारा बेलगांव येथील बांधकामात आढळून आलेली अनियमितता | ... | ३३ |
| (७) | सात | १०० टक्के अनुदान तत्त्वावर पिको फॉल शिलाई मशीन पुरविण्याबाबत | ... | ४१ |
| (८) | आठ | थकित आगाऊ रक्कम (थकित अग्रिम) | ... | ४६ |
| (९) | नऊ | मागासवर्गीय विद्यार्थांना सायकल पुरवठा न केल्याबाबत | ... | ५२ |
| (१०) | दहा | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध केले नसलेबाबत | ... | ५७ |
| (११) | अकरा | सर्वसाधारण शिफारस | ... | ७९ |
| | | **परिशिष्ट - "अ"** शासन निर्णय व परिपत्रके | ... | ८१ |
| | | **परिशिष्ट - "ब"** समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ... | १०९ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, वर्धा

## जिल्हा वार्षिक योजनांतर्गत जनसुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वितरणामधील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.४४ (सन २०१३-२०१४)**

(१) मु.का.अ.जि.प. वर्धा यांचे आदेश दि.१३.११.२०१३ व दि. २०.१.२०१४ अन्वये शेड बांधकाम व दफनभूमी रस्त्याकरिता रुपये २०७४५०००/- इतके अनुदान वितरीत केले.

(२) मु.का.अ.जि.प.वर्धा यांचे आदेश दि. २१.११.२०१३ व २६.२.२०१४ अन्वये ग्रामपंचायत भवन बांधकामासाठी रुपये १८३५५०००/- एवढे अनुदान वितरीत केले.

(३) मु.का.अ.जि.प. वर्धा यांचे आदेश दि.९.६.२०१४ व १७.५.२०१४ अन्वये ग्रामपंचायत भवन बांधकामासाठी रुपये १५२३३०००/- एवढे अनुदान सन २०१४-२०१५ साठी वितरीत केले. सदरचे प्रकरणी लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

(१) सदर योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामाचा समावेश गाव नियोजन आराखड्यात असणे आवश्यक आहे. तशी तपासणी करता आली नाही.

(२) सदर योजनांतर्गत प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता ग्रामसभेने दिलेली असल्याचा अभिलेख उपलब्ध नाही.

(३) दि. १९ मार्च २०१२ च्या शासन निर्णयानुसार तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असतांना मान्यता घेतली नाही.

(४) बांधकामाचेबाबतीत जागा ही शासकीय असल्याची खात्री करता आली नाही.

(५) उपरोक्त काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र ग्रामपंचायतनिहाय गट विकास अधिकारी यांचे प्रतिस्वाक्षरीने सादर करणे आवश्यक आहे. तसेच स्मशानभुमी शेड बांधकामाचे प्राकलन जागेची उपलब्धता पाहून करणे व त्यास सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

(६) सदर योजनेसाठी सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षात ५४३३३०००/- इतकी तरतूद उपलब्ध असताना १५२३३०००/- सन २०१४-२०१५ करिता वितरीत केलेली आहे. म्हणजे तरतूद प्राप्त झाल्यानंतर रक्कम कोषागारातून आहरित करून विलंबाने पुढील वर्षी वितरीत केलेली आहे. यासाठी खुलासा होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-ददभु-२०१०/प्र.क्र.६२/पंरा-६, दि.१६ सप्टेंबर, २०१० नुसार कामाचा समावेश गाव नियोजन आराखडा ग्रामपंचायत स्तरावर असतो. त्याबाबतची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

(२) शासन निर्णय दि.१६ सप्टेंबर, २०१० नुसार कामाला ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायतीला प्रशासकीय मान्यता घेण्याचे अधिकार आहे. त्याबाबतचे ठराव सोबत जोडण्यात येत आहे.

(३) दि.१९ मार्च २०१२ नुसार प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादेत राहून सदर कामांना उप अभियंता/कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे. त्याबाबतची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

(४) सदर बांधकाम हे ग्रामपंचायतीचे शासकीय जागेवर करण्यात आले आहे. त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

(५) उपरोक्त काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध असून प्रमाणपत्र सोबत जोडण्यात येत आहे. तसेच स्मशानभूमी शेड बांधकामाचे प्राकलन जागेची उपलब्धता पाहून व त्यास सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी घेऊन काम करण्यात आले आहे.

(६) सदर निधी माहे मार्च मध्ये प्राप्त झालेला असून दिनांक ५.३.२०१४ ते दिनांक १७.५.२०१४ पर्यंत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे भारत निवडणूक आयोग यांचे आदेश दि. ७.१.२००७ मार्गदर्शक सूचनानुसार कल्याणकारी योजनेकरिता निधी वितरित करण्यात आली नाही. व आचारसंहिता संपल्यानंतर निधी वितरित करण्यात आला आहे.

तसेच वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/ अर्थोपाय, दि.६ जून २००८ नुसार सदर अखिंत निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षा अखेर पर्यंत खर्च करण्याची परवानगी असल्यामुळे सन २०१४-२०१५ मध्ये रु.१५२३३०००/- वितरीत करण्यात आला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखा आक्षेपातील उपलब्ध न केलेली कागदपत्रे हे निधी वितरित करण्यापूर्वी जिल्हा परिषदेकडे उपलब्ध असणे जरुरीचे असताना लेखापरीक्षणाच्यावेळी उपलब्ध नसल्याची कारणे काय आहेत? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, हा आक्षेप देखील २५ आक्षेपांमधील असून सदरचा आक्षेप वगळण्याबाबत शिफारस केली होती. यावर समितीने विचारणा केली की, जनसुविधेच्या सर्व कामांबाबत ग्रामपंचायतीमध्ये ठराव घेऊन तो विहित नमुन्यामध्ये पंचायत समितीच्या माध्यमातून जिल्हा परिषदेस सादर केला पाहिजे. त्यानंतर तो डीपीसीमध्ये आला पाहिजे. त्याप्रमाणे ठराव घेतला काय? यावर प्रशासकीय मान्यतेचे ठराव ग्रामसभेने दिलेले आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला उत्तर दिले असता संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, आपण स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे की, कृती आराखडा जिल्हा स्तरावर नसतो, तो ग्रामपंचायत स्तरावर असतो. आपण लेखापरीक्षणाच्या वेळी तो दाखववयास पाहिजे होता. ज्या आधारे मंजुरी दिली ती कागदपत्रे दाखववयास पाहिजे होती.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी विचारणा केली की, ग्रामपंचायत स्तरावर ठराव घेऊन ग्रामपंचायत तो ठराव पंचायत समितीला सादर करते, जिल्हा परिषदेला सादर करते. त्यानंतर तो ठराव जिल्हा नियोजन समितीकडे येऊन मंजूर होतो. त्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन तो विहित नमुन्यामध्ये पाठवावा लागतो. ती सर्व कागदपत्रे का दाखविली नाहीत? आपण परस्पर कागदपत्रे पाठविली का? निधीचा विनियोग कसा झाला हे देखील दाखविलेले नाही. लेखापरीक्षण होणार आहे हे आपणास अगोदर सांगितले जाते आणि लेखापरीक्षण साधारणतः पंधरा दिवस तरी चालू असते. जर आपणाकडे कागदपत्र उपलब्ध नसतील तर तालुक्याच्या ठिकाणी माणूस पाठवून आपण कागदपत्रे आणू शकता. पुढे समितीने असेही मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव प्राप्त झाल्याशिवाय जनसुविधेची कामे जिल्हा नियोजन समिती मंजूर करीत नाही. जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेली कामांची यादी उप मु.का.अ. यांचेकडे आल्यानंतर ते तुमच्याकडे शिफारस करतात. त्यांच्याकडे कागदपत्रांसहित सर्व प्रस्ताव होते म्हणून ग्रामपंचायतीला अनुदान देण्यासाठी शिफारस केली. त्या प्रस्तावाच्या आधारे जनसुविधेचे प्रस्ताव डीपीसीकडे गेले. मग ऑडीटच्यावेळी हे प्रस्ताव सादर का केले नाही? प्रस्तावाशिवाय जनसुविधेची कामे केली अशी त्यांची शंका आहे. लेखा आक्षेप आल्यानंतर त्याबाबतची पूर्तता करण्यासाठी तीन वेळा संधी देण्यात येते. आपणास तशी संधी देऊनही आक्षेपाची पुर्तता झालेली नाही आणि असे आक्षेप वारंवार येत असतील तर ते योग्य नाही. याबाबत समिती असे निर्देश देत आहे की, लेखापरीक्षणाच्यावेळी कागदपत्रे न सादर करणे याबाबत नियम ७ प्रमाणे दंडाची कारवाई करण्यात यावी. शासनाकडून देण्यात आलेल्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे होतो किंवा कसे याची पाहणी ही समिती करते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भातील कागदपत्रे आता उपलब्ध आहेत असे समितीला उत्तर दिले असता समितीने नाराजी व्यक्त करून निदेश दिले की, लेखापरीक्षणाच्यावेळी कागदपत्रे दाखविण्यात आली नाहीत. तसेच तीन वेळा संधी देऊनही त्याबाबत पूर्तता करण्यात आली नाही. तेव्हा नियम ७ प्रमाणे कारवाई करून २५ हजार रुपये दंड, एक वेतनवाढ रोखावी तसेच सेवा पुस्तिकेमध्ये नोंद घ्यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी करावी. यामध्ये असा काही प्रकार झाला असेल तर तात्काळ कारवाई करावी आणि केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा. तसेच आक्षेपामध्ये नमूद केलेले आहे की, सदर योजनेंतर्गत प्रत्येक प्रशासकीय मान्यता ग्रामसभेने दिली असल्याचा अभिलेख उपलब्ध नाही. तर स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे की, शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१० नुसार कामाला ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायतीला प्रशासकीय मान्यता घेण्याचे अधिकार आहेत. एकूण कामाची किंमत १ कोटी ५२ लाख ३३ हजार इतकी आहे. ग्रामपंचायतीने प्रशासकीय मान्यता दिल्याची यादी दाखवावी. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, ही सर्व छोटी छोटी कामे आहेत.

यानंतर समितीने विचारणा केली की, आपण ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिल्याची कागदपत्रे दाखवावीत. ग्रामपंचायत प्रशासकीय मान्यता देऊ शकते काय? प्रशासकीय मान्यता कोणी दिली? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला स्पष्टीकरण दिले की, शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१० मधील पृष्ठ क्रमांक ८ वर कामांना मंजुरी देणे या शिर्षकाखालील क्रमांक २ वर नमूद करण्यात आले आहे की, या योजनेंतर्गत प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता ग्रामपंचायतीच्या सहमतीने देण्यात येईल. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास पुढीलप्रमाणे आणून दिले की, सदरहू शासन निर्णयाविरुद्ध सन्माननीय सदस्य श्री.चरण वाघमारे यांनी माननीय उच्च न्यायालयामध्ये

सन २०१२ मध्ये याचिका दाखल केली होती, त्यावर माननीय उच्च न्यायालयाने सन २०१३ मध्ये निर्णय दिला आहे. तो सर्वोच्च न्यायालयानेही कायम केला आहे. ग्राम पंचायतीने प्रस्ताव दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याचा अंतिम अधिकार जिल्हा परिषदेला आहे. ग्राम पंचायतीने प्रशासकीय मान्यता देण्याची पद्धत केव्हापासून सुरू करण्यात आली आहे? सदरहू प्रकरणी जिल्हा परिषदेचे स्पष्टीकरण चुकीचे आहे. माननीय न्यायालयाच्या निर्णयानंतर शासनाने सुधारित परिपत्रक काढले नाही का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून समितीला उत्तर आले नाही. यासंदर्भात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, सदरहू कामे जनसुविधेच्या अनुषंगिक आहेत. जनसुविधेच्या कामांच्या संदर्भात सन २०१० मधील शासन निर्णय आहे, त्यामध्ये सुधारणा झाली नाही. यावर समितीने मत व्यक्त केले की, सदरहू प्रकरणी माननीय न्यायालयाने २ वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये स्वतंत्र निर्णय दिले आहेत. जिल्हा परिषदेने स्पष्टीकरणामध्ये सन २०१० च्या शासन निर्णयानुसार कामाला ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायतीला प्रशासकीय मान्यता घेण्याचे अधिकार आहेत. त्याबाबतचे ठराव सोबत जोडण्यात येत आहेत, असे नमूद केले आहे. परंतु ग्राम पंचायतीला प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आहे का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला उत्तर दिले की, सदरहू कामांना ग्रामपंचायतीने प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच जनसुविधेच्या कामांचा समावेश, ही पहिली अट आहे. समितीला मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने सदरहू कामांना ग्रामपंचायतीने मान्यता दिली असेल तर तो दस्तऐवज समितीला सादर करावा. असे समितीने निदेश दिले असता समितीला दस्तऐवज दाखविण्यात आला. त्यानुषंगाने समितीने मत व्यक्त करून विचारणा केली की, सदरहू दस्तऐवज हा ग्रामपंचायतीच्या ठरावाचा आहे, प्रशासकीय मान्यतेचा नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. ग्रामसभेला ठराव घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आहे का? ग्रामपंचायतीकडे तांत्रिक अधिकारी नाहीत. ग्रामविकास विभागाचे उप सचिव बैठकीस उपस्थित आहेत. त्यांनी सदरहू प्रकरणी माहिती द्यावी. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की. सदरहू प्रकरणी शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

समितीने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, सदरहू प्रकरणी माननीय न्यायालयाने २ वेगवेगळ्या याचिकेवर निर्णय दिलेला आहे. त्यानुसार डीपीडीसीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरहू प्रकरणी माननीय न्यायालयाच्या निर्णयानंतर सदरहू शासन निर्णयामध्ये अद्याप सुधारणा न झाल्यामुळे विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात येत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**जिल्हा वार्षिक योजनांतर्गत जनसुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वितरणामधील अनियमितता.—**जनसुविधेच्या कामाच्या संदर्भात मा.न्यायालयाने दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये स्वतंत्र निर्णय देवूनही जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जनसुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वितरणासंदर्भातील शासन निर्णयामध्ये अद्याप सुधारणा न करण्याची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर बाब शासनस्तरावरील आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (योजना-६).——**ग्रामविकास विभागाने शासन निर्णय क्र. ददभु-२०१०/प्र.क्र.६२/पंरा-६, दि. १६/९/ २०१० मधील मुद्या क्र.४ नुसार कामांना मंजुरी देताना प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत देईल, असे नमूद केले आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचीका क्र.१६९८/२०११ (श्री.चरणसिंह वाघमारे वि. महाराष्ट्र शासन व इतर) तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचीका क्र.४८३१/२०१३ (श्री.सुधीर सुर्यवंशी वि. महाराष्ट्र शासन व इतर) या २ न्यायालयीन प्रकरणी शासनास निदर्शनास आणलेल्या बाबी लक्षात घेऊन नियोजन विभागाने जिल्हा नियोजन समितीच्या कामकाजाबाबत शासन निर्णय क्र. डिएपी १०१४/प्र.क्र.२९५/का१४८१, दि. १७/१२/२०१४ नुसार मुद्या क्र.५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाकडील (जि.प., नगरपालिका, महानगरपालिका, नगरपंचायत) योजना/कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाना राहतील. असे स्पष्ट केले आहे. ग्रामविकास विभागाचा उपरोक्त नमूद दि. १६/०९/२०१० रोजीचा शासन निर्णय कामांना मंजुरी देताना प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत देईल. असे नमूद केले आहे. यामुळे ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयात नियोजन विभागाच्या शासन निर्णयामधील बाब अधोरेखित केलेली आहे. त्यामुळे नियोजन विभागाच्या १७/१२/२०१४ रोजीच्या शासन निर्णयात २ न्यायालयीन प्रकरणानुसार बाबी समाविष्ट असून त्यानुसार ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय स्पष्ट आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीने विचारणा केली की, जिल्हा वार्षिक योजनांतर्गत जनसुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वितरणामधील अनियमितता संदर्भात विभागीय सचिवांचे काय म्हणणे आहे? द्वयावर सचिवांनी समितीस विदित केले की, सदरहू विषय हा अनुदान वितरणातील अनियमिततेबाबतचा नव्हता. सदरहू विषय हा शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबतचा होता.

सचिवांकडून मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने मत व्यक्त केले की, या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार आवश्यक ती सुधारणा करावयास पाहिजे. यावर सचिवांनी यासंदर्भात स्पष्ट केले की, जनसुविधेच्या कामांना ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत प्रशासकीय मान्यता देईल, ही तरतूद विभागाने कायम ठेवलेली आहे. या संदर्भात सर्व जिल्हा परिषदांना सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. यावर समितीने होकारात्मक संमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्या दिनांक १३ नोव्हेंबर, २०१३ व २० जानेवारी, २०१४ च्या आदेशान्वये "शेड बांधकाम व दफन भूमी रस्त्या" करिता रु. २,०७,४५,०००/- तसेच दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३ व २६ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या आदेशान्वये रु. १,८३,५५,०००/- व दिनांक १७ मे, २०१४ व ०९ जून, २०१४ च्या आदेशान्वये रु. १,५२,३३,०००/- इतक्या रकमेचे अनुदान "ग्रामपंचायत भवन" बांधकामासाठी वितरीत करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत कामाचा समावेश गाव नियोजन आराखड्यासह प्रत्येक कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतल्याबाबतचे अभिलेख तसेच जागा शासकीय असल्याबाबत व काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र/उपयोगिता प्रमाणपत्र यासंदर्भातील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. या योजनेंतर्गत जनसुविधेच्या कामांना प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या संमती नंतर ग्रामपंचायतीने दिली अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली या माहितीसह ग्रामसभेला ठराव घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आहे काय, तसेच या विषयासंबंधित असलेल्या शासन निर्णयाविरूद्ध दाखल करण्यात आलेल्या दोन वेगवेगळ्या याचिकेवर **मा. उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय व त्याअनुषंगाने शासन निर्णयाची सद्य:स्थिती याबाबतची तपासणी करून सविस्तर अहवाल समितीस सादर करण्यासह केलेल्या कामांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले.**

या विषयासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा व ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागाचे सचिव यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, सदर बांधकाम ग्रामपंचायतीच्या शासकीय जागेत करण्यात आले असून कामाचा समावेश गाव नियोजन आराखडा यासह या कामांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. तसेच ग्रामविकास विभागाने शासन निर्णय क्र.ददभु-२०१०/प्र.क्र.६२/पंरा-६, दि.१६/९/२०१० मधील मुद्दा क्र.४ नुसार "कामांना मंजुरी देताना प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत देईल" असे नमूद केले आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचीका क्र.१६९८/२०११ व क्र.४८३१/२०१३ या २ न्यायालयीन प्रकरणी शासनास निदर्शनास आणलेल्या बाबी लक्षात घेऊन नियोजन विभागाचे जिल्हा नियोजन समितीच्या कामकाजाबाबत शासन निर्णय क्र.डिएपी १०१४/प्र.क्र.२९५/का१४८१, दि. १७/१२/२०१४ मधील मुद्दा क्र. ५ नुसार **"स्थानिक स्वराज्य संस्थाकडील (जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका व नगरपंचायत) योजना/कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाना राहतील". असे स्पष्ट केले आहे.**

**"ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान" या योजनेसाठी जिल्हा नियोजन समितीच्या मागणीच्या अनुषंगाने नियोजन विभागामार्फत जिल्हा योजनेतंर्गत निधी उपलब्ध करण्यात येतो. या योजनेचे आढावा व सनियंत्रण अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आहेत. या योजनेंतर्गत दहन/दफन भूसंपादन, चबुतऱ्याचे बांधकाम, शेडचे बांधकाम, पोहोच रस्ता व गरजेनुसार कुंपण वा भिंती घालून जागेची सुरक्षितता साधने तसेच नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम व इमारती अंतर्गत सुविधा, जुन्या ग्रामपंचायत इमारतीची पुनर्बांधणी/विस्तार व ग्रामपंचायतीच्या आवारामध्ये वृक्षारोपण, परिसर सुधारणा, परिसराला कुंपण घालणे इत्यादी कामे करताना सदरहू कामांचा समावेश गाव नियोजन आराखड्यात असणे आवश्यक असून सदर कामांची निवड जिल्हा नियोजन समितीमार्फत करणे गरजेचे आहे. सदरची कामे उपरोक्त नमूद असलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या तरतुदीनुसार प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायतीची घेणे अनिवार्य आहे. या कार्यपद्धतीबाबत सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात याव्यात**

**व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच "ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान" या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत करावयाच्या कामांबाबत ठराव ग्रामपंचायतीमध्ये घेऊन विहित नमुन्यामध्ये पंचायत समितीच्या माध्यमातून या कामांच्या महत्त्वांच्या कागदपत्रांसह जिल्हा परिषदेस सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर ठराव जिल्हा नियोजन समितीमध्ये मंजूर करण्यात येतो. यानुसार कार्यवाही केली असती तर संबंधित कामांना निधी वितरीत करण्यापुर्वी सर्व महत्वाची कागदपत्रे जिल्हा परिषदेकडे उपलब्ध झाली असती व सदरहू कागदपत्रे लेखापरीक्षणास सहजरित्या उपलब्ध करून देता आली असती. तसेच कृती आराखडा जिल्हास्तरावर नसून ग्रामपंचायत स्तरावर असतो. असे असतानाही लेखापरीक्षणास तो उपलब्ध करून देण्यात आला नाही. लेखापरीक्षणात आक्षेप आल्यानंतर तीन वेळा संधी देऊनही या आक्षेपाची पुर्तता झाली नसल्याने सदरहू प्रकरण समितीपुढे आले आहे. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भातील सर्व कागदपत्रे उपलब्ध असून समिती पुढे सादर केली. परंतु महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील कलम (३) व कलम ६ (१) नुसार लेखापरीक्षणास विहित वेळेत सर्व कागदपत्रांसह अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याने यावर समिती तीव्र नाराजी व्यक्त करत आहे. तसेच कलम ७ नुसार रु. २५,०००/- दंडाची शास्ती व एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात घेण्याची कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, वर्धा

## निरंतर शिक्षण विभागातील कार्यरत कर्मचारी व योजनाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.११६ (सन २०१३-२०१४)**

निरंतर शिक्षण विभागात कोणतीही योजना राबवित नसतांना वेतनावर निष्फळ खर्च करणे.

सन २०१३-१४ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कालावधीत शिक्षणाधिकारी (प्राथ), जि.प वर्धा यांचे अधिनस्त शिक्षणाधिकारी निरंतर शिक्षण विभागाचा वेतन या बाबीवर २६१५४८३/- एवढा खर्च झालेला आहे. त्याप्रकरणी अभिप्राय खालीलप्रमाणे.

(१) निरंतर शिक्षण विभागात एक लघुलेखक, दोन सहायक प्रकल्प अधिकारी, दोन कनिष्ठ लिपीक, एक शिपाई असे एकूण ०६ कर्मचारी कार्यरत आहे. त्यांचे वेतनावर सन २०१३-२०१४ मध्ये २६१५४८३/- एवढा खर्च झालेला आहे.

(२) अर्धसमास पत्र क्र. ०५ दिनांक १८/१०/२०१४ च्या अनुषंगाने सादर केलेल्या उत्तरामध्ये वर्धा जिल्ह्यात निरंतर शिक्षण योजना ही जुलै २००८ पासून बंद असल्याचे कळविलेले आहे. तसेच कार्यालयातील राबविल्या जाणाऱ्या योजना राबविल्या जात नसून फक्त वेतनावर २६१५४८३/- एवढा एका वर्षाचा खर्च असून निष्फळ खर्च झाल्याचे दिसून येते. करीता निरंतर शिक्षण विभागातील पदाचा आढावा घेवून सुधारित आकृतीबंधानुसार पदे मंजूर असल्यास त्या पदास शिक्षणाधिकारी (प्राथ), शिक्षणाधिकारी (माध्य) यांचेकडे अन्य योजनांचे कामासाठी अधिकारी त्यांच्या सेवेचा वापर करणे आवश्यक आहे.

करीता मुख्य कार्यकारी अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) व शिक्षणाधिकारी (माध्य) तथा शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी निरंतर शिक्षण विभागातील संपूर्ण पदास सुधारित आकृतिबंध सदरची पदे मंजूर असल्यास अन्य विभागाचे कामासाठी त्यांचे सेवेचा वापर करणे आवश्यक आहे.

(३) सुधारित आकृती बंधानुसार पद मंजुरीबाबतच्या शासन निर्णयाची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(४) निरंतर शिक्षण विभागातील जंगम मालमत्ता रजिस्टर लेखापरीक्षणास सादर केले नाही. त्यामुळे त्यांचेकडे असलेली जंगम मालमत्ता (stock register) तपासणी करता आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामध्ये निरंतर शिक्षण विभागातर्फे खालील दिलेल्या शासन निर्णयान्वये योजना राबविण्यात आलेल्या आहेत. तसेच खालील शासन निर्णयान्वये पदांना मंजुरी व मुदतवाढ देण्यात आलेली असून व योजनाची कामे आजपर्यंत सुरू असल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनावर निष्फळ खर्च झालेला नाही.

(१) (अ) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-१००२/(१५९/०२) /प्रशा-५ मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०००३२ दिनांक १७ मार्च २००३ अन्वये सुधारित आकृतीबंधानुसार पदांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

(ब) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात शासन निर्णय क्र. शिसंमा-२०१३/(१/१३) प्रशा -५ दि.१८ मार्च २०१३ अन्वये सदरील पदांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यासोबत वरील दोन्ही शासन निर्णयाच्या प्रती जोडण्यात येत आहे.

(क) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. आयडीएम-२००८/ (३७८/०८) / असंक दिनांक १० फेब्रुवारी २००९ अन्वये अल्पसंख्याक समाजाच्या संस्था/शाळांसाठी पायाभूत विकास योजना (Scheme for Infrastructure Development of Minority Instt./Schools (IDMI) तसेच

(ड) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. आयडीएम-२००८/(३४८/०८) /असंक दिनांक १० फेब्रुवारी २००९ अन्वये मदरसामधून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत योजना (Centrally sponsored scheme for providing quality education in Madrassas (SPQEM) अन्वये राबविण्यात आलेल्या असून सद्यःस्थितीत कार्यान्वित आहेत.

(२) सन २०१३-१४ या वित्तिय वर्षामध्ये या कार्यालयात एकूण १६ पदे मंजूर पदांपैकी ०६ पदे कार्यरत असून १० पदे रिक्त असून कार्यरत कर्मचाऱ्यांकडे असलेल्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(अ) **श्री. दि.फ.तडसे यांचेकडे.**——सहायक प्रकल्प अधिकारी यांच्याकडे कार्यक्रम सहायक व उपशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार.

(१) **IDMI योजना.**—अल्पसंख्याक समाजातील शाळेकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रस्ताव स्वीकारणे, प्रस्तावची छाननी करून जिल्हा छाननी समितीसमोर ठेवण्याकरिता बैठकीचे आयोजन करणे, जिल्हा छाननी समितीची मंजुरी प्राप्त करून मा.संचालक (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण) शिक्षण संचालनालयास सादर करणे.

(२) **SPQEM योजना.**—या योजनेतंर्गत मदरसा मधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सामान्य शाळेमध्ये शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रम शिकविण्याकरिता नियुक्त केलेल्या शिक्षकांचे प्रस्ताव इत्यादी स्वीकारणे, प्रस्तावाची छाननी करून जिल्हा छाननी समितीसमोर ठेवण्याकरिता बैठकीचे आयोजन करणे. जिल्हा छाननी समितीची मंजुरी प्राप्त करून मा.संचालक (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण) शिक्षण संचालनालयास सादर करणे.

(३) वरील योजनांवरील संनियत्रण ठेवणे (ज्यामध्ये पर्यवेक्षण, तपासणी इत्यादी नियमितपणे पार पाडणे.)

(४) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० व १२ वी चे परीक्षांचे संनियत्रण करण्याकरिता भरारी पथकाची स्थापना करून परीक्षा सुरळीत पार पाडणे.

(५) परीक्षा परिषद पुणे तर्फे आयोजित D.T.Ed. परीक्षेचे व टाईपिंग व शॉर्टहॅन्ड परीक्षेचे संनियंत्रण करणे.

(६) केंद्र शासनातर्फे आयोजीत NTS व MMNS परीक्षेचे संनियत्रण करणे.

(७) शासनातर्फे सोपविण्यात आलेल्या कर्तव्यांचे पालन करणे (ज्यामध्ये विविध पदांच्या भरती प्रक्रिया, निवडणूक, विविध कार्यक्रम इ.) तसेच या कार्यालयाशी संबंधित प्रशासकीय कामे इत्यादी.

(ब) **लघुलेखक श्री. डि. बी. हिरेखण.**—यांना अधिकाऱ्यांनी वेळोवेळी सांगितलेली कामे करणे, व कार्यालयातील इतर संगणकावरील विविध माहिती संकलीत करणे व तयार करून देणे, सभेची माहिती तयार करणे, अल्पसंख्याक समाजाच्या शाळा/संस्थासाठी पायाभूत विकास योजना व मदरसामधून गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यासाठी योजनतंर्गत प्राप्त प्रस्ताव छाननी व तयार करणे इत्यादी कामे.

(क) **सहा. प्रकल्प अधिकारी श्रीमती उषा तळवेकर यांचेकडे.**—यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , जि.प. वर्धा येथे प्रतिनियुक्तीवर असून त्याच्यांकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच त्याचेकडे राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान समन्वयक व विज्ञान पर्यवेक्षकाची कामे, अपंग समावेशक शिक्षण योजना (माध्यमिक स्तर), अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजने संबंधी इ. योजनांची कामे सुरू आहे.

(ड) **श्री. बी.डब्ल्यु.खेडेकर ,कनिष्ठ लिपीक यांचेकड.**—वरिष्ठ लिपीक पदाचा अतिरिक्त कार्यभार तसेच संचालनालय पुणे येथे अंदाजपत्रक सादर करणे, खर्चमेळाची कामे, वेळोवेळी सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांची निवृत्ती देयके तसेच वेतन देयके, रोकडवही, सेवापुस्तके, लेखाविषयक नोंदवहया, धनादेश नोंदवही व आस्थापनासंबंधी सर्व कामे व माहितीचा अधिकार संबंधित कामे व अधिकाऱ्यांनी वेळोवेळी सांगितलेली कामे.

(ई) **श्री. व्ही.एस.राठोड, कनिष्ठ लिपीक यांचेकडे.**——आवक-जावक, आस्थापना विषयक कामास मदत, कार्यालयीन व प्रवासभत्ता देयके तयार करणे व सादर करणे तसेच अधिकाऱ्यांनी वेळोवेळी सांगितलेली कामे.

(फ) **शिपाई श्री. डि.बी.राठोड.**—यांचेकडे कोषागार व बँकेची कामे व स्थानिक टपाल वाटप, कोषागार कार्यालय व वित्त विभाग जि.प.वर्धा व कोषागार वर्धा येथे देयके सादर करणे, धनादेश स्वीकारणे तसेच कार्यालय उघडणे व बंद करणे आणि अधिकाऱ्यांनी वेळोवेळी सांगितलेली इत्यादी कामे.

(३) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००२/(१५९/०२) /प्रशा-५ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ दिनांक १७ मार्च २००३ व सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात शासन निर्णय क्र.शिसंमा-२०१३/(१/१३) प्रशा -५ दि. १८ मार्च २०१३ च्या शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडण्यात आली आहे.

(४) अद्यावत जंगम मालमत्ता रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

शासनस्तरावर दरवर्षी पदांचा आढावा घेण्यात येवून पदांना मुदतवाढ देण्यात येते. वरीलप्रमाणे कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी योजनांची व कार्यालयीन कामे व कर्तव्ये पार पाडली असल्यामुळे वेतनावर निष्फळ खर्च झालेला नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०८ जुलै, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, निरंतर शिक्षण योजना सन २००८ पासून बंद झाली असताना सदर योजनेवरील पदांना मुदतवाढ देण्यात आली आहे का, सदर योजना बंद झाल्यानंतर सुधारित आकृतीबंध सादर करून त्यास शिक्षण उप संचालकांची मान्यता न घेण्याची कारणे काय आहेत, असे विचारून समितीने मत व्यक्त केले की, जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी असलेल्या किती निरक्षरांना ६०० रुपये दरमहा मानधन देण्यात येते याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेण्यात यावी. ज्येष्ठ नागरीक प्रमाणपत्र मिळवण्यासाठी वयाचे प्रमाणपत्र मिळविण्याकरिता निरक्षर आहे असे सांगून वयाचे प्रमाणपत्र प्राप्त करतात. त्यांना साक्षर करण्यासाठी जिल्ह्यामध्ये कार्यक्रम राबविण्यात यावा. सदरहू निरक्षरांना निरंतर शिक्षण विभागाने साक्षर करावे. सदर शिक्षणाधिकारी (निरंतर) यांनी समितीला होकारात्मक संमती दर्शविली असता असे दिसून आले की, ठीक आहे. जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण किती आहे? निरंतर शिक्षण योजनेचा हेतू सफल झाला असल्याने योजना बंद करण्याची चर्चा सुरू आहे. सदरहू विभाग बंद करून ज्या विभागामध्ये काम आहे तेथे संबंधीत कर्मचारी यांना समायोजित करून पद स्थापना देणे ही बाब महत्त्वाची आहे. सदरहू विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना प्रतिनियुक्तीवर न पाठवता नियमित पदस्थापना देण्यात यावी. त्यानंतरच सदरहू विभाग बंद करण्यात यावा. यावर शिक्षणाधिकारी (निरंतर) यांनी समितीला असे उत्तर दिले की, आता त्याच्याकडे उक्त आकडेवारी उपलब्ध नाही. यासंदर्भात संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी स्पष्ट केले की, निरंतर शिक्षण योजना बंद केली असे शिक्षण विभागाने ऑडिटच्यावेळी उत्तर दिलेले आहे. जुलै २००८ पासून ही योजना बंद असल्याचे कळविले म्हणून समितीने हा आक्षेप काढला आहे. तसेच जी योजना बंद आहे ती नियमित करून घ्यावी. यावर समितीने मत व्यक्त करून विचारणा केली की, आज निरंतर शिक्षणाचा फायदा कोठेही दिसत नाही. वर्धा जिल्ह्यात ८७.२२ टक्के लोक साक्षर असून १३ टक्के लोक निरक्षर आहेत. या १३ टक्के निरक्षर लोकांसाठी तुमचे काय नियोजन आहे? तद्नंतर समितीने पुढीलप्रमाणे शिक्षणाधिकारी (निरंतर) यांना निदेश दिले की, शिक्षण विभागामध्ये काम नसल्यामुळे यातील कर्मचारी वर्ग दुसऱ्या विभागात वर्ग करावा. राज्यस्तरावर हा विषय उपस्थित करून साक्ष घेऊन निकाली काढण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

निरंतर शिक्षण योजना माहे जुलै, २००८ पासून बंद असल्यामुळे निरंतर शिक्षण विभागामध्ये कार्यरत असणारा कर्मचारी वृंद दुसऱ्या विभागात वर्ग करण्याबाबत जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण- १००२/(१५९/०२)/प्रशा-५ दि. १७ मार्च २००३ अन्वये शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली क्षेत्रीय कार्यालयामधील पदाचा सन २००२-२००३ या वर्षाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र अ मधील अ.क्र. २७ वर शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) जिल्हा परिषद, वर्धा कार्यालयातील मंजूर पदांचा तपशील दिला आहे. तो सोबत सादर केलेला आहे. त्यानुसार एकूण १६ अस्थायी पदे मंजूर आहे.

**सद्यस्थितीत सदर १६ पदांपैकी ३ पदे भरलेली आहेत ती खालीलप्रमाणे :—**

लघुलेखक- गट क, कनिष्ठ लिपिक – गट क, शिपाई- गट ड, १६ पदांपैकी १३ पदे रिक्त आहेत.

सद्यस्थितीत निरंतर शिक्षण विभागात खालीलप्रमाणे योजना सुरू आहे.

(१) IDMI योजना (अल्पसंख्याक समाजाच्या संस्था/शाळासाठी पायाभूत योजना)

(२) SPQEM योजना (मदरसामधून गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यासाठी केंद्र शासन पूरस्कृत योजना)

(३) मराठी भाषा फाऊंडेशन योजना

(४) प्रि-मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना

(५) डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

(६) धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल संस्थामध्ये पायाभूत सोयी सुविधा योजना

(७) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे आदेश क्र. जिपव/साप्रवि/विसआ/वशि ५१/१८ दि. १/३/२०१८ अन्वये या कार्यालयातील श्रीमती एम.आर.मून, लघुलेखक यांची खाते प्रमुख व तालुकास्तरीय अधिकारी समन्वय सभेचे कार्यवृत्त लिहिण्याकरिता आदेश प्राप्त झाले. त्यामुळे श्रीमती मून प्रत्येक समन्वय सभेचे कार्यवृत्त लिहिण्याकरिता उपस्थित राहतात.

वरील १ ते ७ बाबींचा विचार करता सद्यस्थितीत कार्यरत कर्मचारी वृंदाकरिता निरंतर शिक्षण विभागात पुरेसे काम आहे.

वरिल प्रमाणे अनुपालन विनंती पूर्वक सादर केलेले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय : प्रौढ साक्षरता योजना बंद करण्यात आलेली आहे. तथापि, अल्पसंख्याक विभागातंर्गत सद्यस्थितीत काही योजना सुरू आहेत. निरंतर शिक्षण विभागामार्फत विविध योजना राबविण्याकरिता उपलब्ध कर्मचारी वृंद पुरेसा आहे. विभागाचा पदांबाबतचा आकृतीबंध निश्चित झाल्यानंतर त्यानुसार कर्मचारी वृंद उपलब्ध करून देण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीने अप्पर मुख्य सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांना विचारणा केली की, निरंतर शिक्षण विभागातील कार्यरत कर्मचारी व योजनांबाबत अधिक माहिती द्यावी, यावर अप्पर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, सदर मुद्दा शालेय शिक्षण विभाग आणि ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे. निरंतर शिक्षण म्हणजे अडल्ट एज्युकेशनसाठी जिल्हा परिषद स्तरावर वेगळी पदे आहेत. त्यांना आपण शिक्षणाधिकारी (निरंतर) असे म्हणतो. शिक्षणाधिकारी (अल्पसंख्याक व निरंतर) असा शब्दप्रयोग अपेक्षित होता कारण सदर पदावरील व्यक्तीला अल्पसंख्याक व निरंतर अशा दोहोंचेही काम दिले जाते. संचालक स्तरावरील पदाचे नावदेखील संचालक (अल्पसंख्याक व निरंतर) असे आहे. जिल्हा स्तरावर अल्पसंख्याक व निरंतर अशी दोन्ही कामे एकाच व्यक्तीमार्फत पाहिली जातात. याच्या १६ पदांपैकी केवळ ३ पदे भरलेली आहेत. ते अल्पसंख्याक विभागाचे काम पाहतात. सध्या निरंतरचे काम जवळजवळ संपलेले आहे. अल्पसंख्याकच्या काही योजना आणखी आहेत. उदाहरणार्थ, अल्पसंख्याक समाजाच्या शाळांसाठी पायाभूत सुविधा, मदरशांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण, मराठी भाषा फाउंडेशन योजना, इत्यादी. यावर समितीने अप्पर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांना विचारणा केली की, उमरेड जि.नागपूर मतदारसंघातील मदरशाबाबतची एक फाईल पाठविली होती. मदरशांना कोण परवानगी देते? मदरशांना अनुदान दिल्यानंतरही काही मुलांना मात्र १० वी च्या परीक्षा देता आल्या नाहीत ते परीक्षेपासून वंचित आहेत. यावर अप्पर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांनी विदित केले की, विभागाने तपासणी केली होती. काही मदरसे शासनाची मान्यता घेत नाहीत किंवा त्यांना शासनाची मान्यता नसते असे असले तरीही त्यातील विद्यार्थ्यांना बोर्डाची परीक्षा देता येते. कारण आपल्याकडे तशी दुसरी पर्यायी व्यवस्था उपलब्ध आहे.

समितीने मत व्यक्त केले की, आपल्याकडे आलेल्या विद्यार्थ्यांना तशी परवानगी दिली नाही व त्यामुळे त्यांना परीक्षा देता आली नाही. लोकांमध्ये याबाबत असंतोष आहे. काही विद्यार्थ्यांनी दुसऱ्या शाळेमधून परीक्षा देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनीही स्विकारले नाही. याबाबतच्या गाईडलाईन्स आपण सर्व मदरशांना निर्गमित केल्या पाहिजेत. अद्यापपर्यंत अशा गाईडलाईन्स निर्गमित झालेल्या नाहीत. त्यामुळे मदरशांशी संबंधित अल्पसंख्याक लोक आपल्याकडे धाव घेतात. विद्यार्थी परीक्षेस बसण्यापासून वंचित राहत आहेत. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीस विदित केले की, आम्ही अशा मुलांची व्यवस्था करु. आमच्याकडे १७ (सी) नावाचा एक फॉर्म असतो. विद्यार्थ्यांनी हा फॉर्म भरला तर त्यांना बोर्डाची परीक्षा देता येते. १७ (सी) च्या फॉर्मबाबत सर्वांना माहिती आहे परंतु तरीही विभागाकडून याला प्रसिद्धी देण्यात येईल. सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना सूचना देऊ की, विद्यार्थ्यांकडून हे फॉर्म भरून घ्या. हा फॉर्म भरणे देखील सोपे आहे, त्यामध्ये कठीण काही नाही. हा फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थी परीक्षा देऊ शकतात.

यावर समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, जिल्हा स्तरावरील शिक्षणाधिकारी (निरंतर) हे मदरशांना कधीही भेटी देत नाहीत. समितीने नागपूर जिल्हा परिषदेमध्ये याबाबत विचारणा केली परंतु ते म्हणाले की, "त्यांना मदरशे माहितीच नाहीत. त्यांनी कधी पाहिलेच नाहीत." शिक्षणाधिकारी (प्राथमिक) आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनाही विचारणा केली परंतु त्यांनी कधीही भेटी दिल्या नसल्याचे सांगितले.

यासंदर्भात तात्काळ गाईडलाईन्स जाणे तसेच संबंधित अधिकाऱ्यांना माहिती असणे गरजेचे आहे. काही लोक मदरशांची नोंदणी करतात. नोंदणी केली तर विभागातील अधिकाऱ्यांना त्याबाबत माहिती होते परंतु काही मदरसे असे देखील आहेत की जे नोंदणी करीत नाहीत. त्यांनी पुढे येऊन यू-डायसवर नोंदणी केली पाहिजे, अर्ज केले पाहिजेत. अन्यथा, त्यांचे काहीही स्टेटस नाही. ते मान्यताप्राप्त नाहीत. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीस विदित केले की, विभागातील अधिकाऱ्यांची देखील ही जबाबदारी आहे. जर अशा प्रकारचे अनधिकृत मदरसे असतील किंवा कोणत्याही शाळा असतील तर त्यांना संबंधित अधिकारी नोंदणी करून घेण्याबाबत नोटिसा बजावतात.

तद्नंतर समितीने अपर मुख्य सचिव यांना निदेश दिले की, अशा प्रकारच्या नोटिसा दिल्या गेल्या नसल्यामुळेच या अडचणी निर्माण झाल्या आहेत. अतः विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिले. याबाबत संस्थेचे लोक स्वतः आपल्याकडे भेटायला आले होते. तरी आपण याबाबत सचिव या नात्याने राज्यस्तरावरून सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांना या सर्व गाईडलाईन्स पाठविल्या पाहिजेत. तसेच त्यांनी ठिकठिकाणी भेटी देऊन पाहणी केली पाहिजे, तपासणी केली पाहिजे. परंतु ते तसे करीत नाहीत. त्यांच्याकडे विशेष असे काही कामही नाही. जर असे असेल तर शिक्षणाधिकारी (निरंतर) यांना इतर ठिकाणी वर्ग केले पाहिजे. आपण त्यांना इतर ठिकाणी वर्ग करीत नाहीत व ते केवळ एकाच ठिकाणी कायमचे राहतात, अशी जिल्हा पातळीवर स्थिती आहे. यावर अपर मुख्य सचिव यांनी याबाबत सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे किंवा इतर मार्गांनी सूचना देऊ असे सांगून समितीला आश्वासित केले. यावर सचिवांकडून मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने विचारणा केली की, ज्याप्रमाणे शाळांनी नोंदणी करणे किंवा शासनाची परवानगी घेणे अनिवार्य आहे त्याप्रमाणे मदरशांनीही परवानगी घेण्याची तरतूद आपल्या नियमामध्ये आहे की नाही? मदरशांच्या नावाखाली अल्पसंख्याकांच्या शाळा चालतात. हि मदरसे आपल्या नियमावलीमध्ये आलेले आहेत का, त्यांना आपण घेतले आहेत का? ही बाब देखील महत्त्वाची आहे. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, सर्वांनीच परवानगी घेणे अनिवार्य आहे. अल्पसंख्याक विभागामार्फत मदरशांना मान्यता दिली जाते. तसेच आमच्याकडे यू-डायसचा डेटाबेस आहे. यू-डायसच्या डेटाबेसमध्ये आम्ही त्यांची नोंद करतो. परंतु मान्यता मात्र अल्पसंख्याक विभागामार्फत दिली जाते.

समितीने मत व्यक्त करून सूचना केल्या की, मदरशांना मान्यता देण्याबाबतचा विषय अल्पसंख्याक विभागाकडे आहे. समितीने याबाबत अल्पसंख्याक विभागाच्या सचिवांची देखील भेट घेतली आहे. त्यांची भेट घेतल्यानंतरही आपल्या विभागाकडे येण्याचे कारण म्हणजे शिक्षणाधिकारी (निरंतर) यांच्याकडे वर्ग केला असल्यामुळे शिक्षण विभागाशी संबंधित आहे, असा अभिप्राय त्यांनी दिला. राज्यस्तरावर दोन्ही विभागांचे सचिव वेगळे आहेत. त्यामुळे दोघांमध्ये समन्वय ठेऊन काहीतरी तोडगा काढला पाहिजे. केवळ त्यांनी आपल्याकडे व आपण त्यांच्याकडे पाठवून हा विषय सुटणार नाही. याबाबत स्पष्ट गाईडलाईन्स निश्चित करणे गरजेचे आहे. दोघेही सचिव महोदय एकाच ठिकाणी असल्यामुळे त्यांनी या प्रश्नाबाबत बैठक आयोजित केली पाहिजे. दोघांमध्ये समन्वय ठेवला पाहिजे. खरे पाहता हा विषय पूर्ण राज्याचा आहे. दोन्ही विभागांनी स्पष्ट गाईडलाइन्स दिल्या तर त्याचा राज्यातील पूर्ण जिल्ह्यांना फायदा होईल. सदरहू मुद्यासंदर्भात दोन्ही सचिवांनी एकत्र चर्चा करून सदरहू माहिती समितीला सादर करावी. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीने व्यक्त केलेल्या सूचनांबाबत सहमती दर्शविली.

तद्नंतर समितीने विभागीय सचिवांना निदर्शनास आणून देत विचारणा केली की, उपरोक्त परिच्छेदातील महत्त्वाचा विषय हा रिक्त पदांचा आहे. वर्धा जिल्ह्याप्रमाणे राज्यातील सर्व जिल्हा परिषदेची अशीच स्थिती आहे. समितीने ज्या ज्या जिल्हा परिषदाना भेटी दिल्या त्या सर्व ठिकाणी रिक्त पदांचा विषय उपस्थित झालेला आहे. शिक्षण विभागामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. याबाबतची माहिती आता आपल्याकडे उपलब्ध नसेल. आता आपणाकडे रिक्त पदांबाबतची माहिती आहे काय? यावर अपर मुख्य सचिव यांनी विदित केले की, सदरहू माहिती आता उपलब्ध नाही. परंतु सदरहू आवश्यक माहिती घेण्यात येईल असे समितीला आश्वासन दिले.

तद्नंतर समितीने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, हा विषय अतिशय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. राज्यामध्ये शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी व अधीक्षक यांची किती पदे रिक्त आहेत, याबाबतची सर्व माहिती समितीला सादर करण्यात यावी. एकूण १६ पदांपैकी १३ पदे रिक्त आहेत. ही स्थिती वर्धा जिल्ह्याची आहे. अशीच स्थिती पूर्ण राज्यामध्ये आहे. उपस्थित केलेला रिक्त पदांबाबतचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. एका जिल्ह्याची रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. राज्यातील अन्य जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची किती पदे रिक्त आहेत, तसेच अल्पसंख्याक व शिक्षण विभागाने मदरसाबाबत स्वतंत्र गाईडलाइन्स तयार करून एक धोरण निश्चित करण्यात यावे. सदरहू धोरणाबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी, अशी समितीची सूचना आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

सन २०१३-२०१४ च्या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणास निदर्शनास आले की, अर्धसमास पत्र क्र. ०५ दिनांक १८/१०/२०१४ च्या अनुषंगाने सादर केलेल्या उत्तरामध्ये वर्धा जिल्ह्यात निरंतर शिक्षण योजना माहे जुलै, २००८ पासून बंद असल्याचे कळविण्यात आले असून या कार्यालयात उक्त योजना राबविल्या जात नसतानाही निरंतर या विभागातील एक लघुलेखक, दोन सहायक प्रकल्प अधिकारी, दोन कनिष्ठ लिपिक व एक शिपाई असे एकूण सहा अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनावर सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षात रु. २६,१५,४८३/- इतकी रक्कम निष्फळ खर्च करण्यात आली आहे. वास्तविक मुख्य कार्यकारी अधिकारी, उपसंचालक नागपूर, शिक्षणाधिकारी (माध्य) व शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी या विभागातील पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंधानुसार पदे मंजूर असल्यास या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवेचा वापर अन्य विभागांच्या कामांसाठी करणे आवश्यक होते. तसेच निरंतर शिक्षण विभागातील जंगम मालमत्ता रजिस्टर लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने जंगम मालमत्ताबाबतची तपासणी करता आली नाही.

या विषयासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा व ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागाचे सचिव यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, निरंतर शिक्षण विभागांतर्गत असलेली प्रौढ साक्षरता योजना बंद करण्यात आलेली आहे. तथापि, अल्पसंख्याक समाजाच्या संस्था/शाळांसाठी पायाभूत योजना, मदरसामधून गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यासाठी केंद्र शासन पूरस्कृत योजना, मराठी भाषा फाऊंडेशन योजना, प्रि-मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना, डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना व धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल संस्थामध्ये पायाभूत सोयी सुविधा योजना सद्यःस्थितीत सुरू आहेत. सध्या निरंतरचे काम जवळजवळ संपलेले असून अल्पसंख्यांक विभागाच्या योजनांसाठी १६ पदांपैकी केवळ ३ पदे कार्यरत आहेत.

राज्यातील काही मदरसे नोंदणी करून शासनाची मान्यता घेत नाहीत अथवा शासनाची त्यांना मान्यता मिळत नसल्याने या अनधीकृत मदरशांमधील अनेक १० वी च्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत बोर्डाची परीक्षा देता आली नसल्याचे व त्यांनी दुसऱ्या शाळेमधून प्रयत्न करूनही त्यांना स्वीकारण्यात आले नसल्याच्या तक्रारी समितीकडे प्राप्त झाल्या असल्याच्या, तसेच जिल्हा स्तरावरील शिक्षणाधिकारी (निरंतर) हे मदरशांना कधीही भेटी देत नसल्याने "त्यांना मदरशे माहीतच नाही व त्यांनी ते कधी पाहिलेच नसल्याचे" समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून याबाबत विभागाकडून मार्गदर्शक तत्वे अद्याप निर्गमित केली नसल्याने समितीने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

**राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या संस्था/शाळांना पायाभूत सुविधा देण्यासह मदरसामधून गुणवत्तापुर्ण शिक्षण देऊन त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी तसेच मदरशांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी कोणत्याही परीक्षांपासून वंचित राहू नये यासाठी शालेय शिक्षण व अल्पसंख्यांक विभाग यांच्या सचिवांनी समन्वयाने या विषयांसदर्भातील सविस्तर तपासणी करून धोरणात्मक निर्णय घेऊन याबाबतची स्पष्ट मार्गदर्शक तत्वे निश्चित करावी. सदरहू मार्गदर्शक तत्वे सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांना पाठवण्यात यावीत व त्यानुसार शिक्षणाधिकाऱ्यांनी मदरशांना नियमित भेटी देऊन त्यांची तपासणी केली पाहीजे. या तपासणीत निदर्शनास आलेल्या अनाधिकृत मदरशांना नोंदणी करण्याबाबत नोटीसेस निर्गमित करून त्यांना नोंदणी करणे अनिवार्य करावे. यासाठी सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासह व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे किंवा उपलब्ध असलेल्या मार्गाने त्यांना वेळोवेळी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना देण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

तसेच समितीने विभागीय सचिवांच्या असेही निदर्शनास आणले की, समितीने ज्या ज्या जिल्हा परिषदांना भेटी दिल्या त्या सर्व ठिकाणी रिक्त पदांचा विषय उपस्थित झाला होता. शालेय शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी, अधीक्षक, विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख यासह अनेक पदे रिक्त आहेत. **ग्रामिण स्तरावरील शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टिने सदरहू रिक्त पदांचा विषय महत्वाचा असल्याने या रिक्त पदांबाबतची माहिती व सदर पदे भरण्याबाबत करण्यात आलेली कार्यवाही याबाबतची सविस्तर माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

त्याचप्रमाणे निरंतर शिक्षण विभागातील जंगम मालमत्ता रजिस्टर लेखापरीक्षणास सादर केले नाही. त्यामुळे त्यांचेकडे असलेल्या जंगम मालमत्तेची तपासणी करता आलेली नाही. या आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या माहितीत नमूद करण्यात आले की, "अद्यावत जंगम मालमत्ता रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात येत आहे". **म्हणजेच लेखापरीक्षणाच्या वेळी जंगम मालमत्ता रजिस्टर लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यास पुरेसा कालावधी दिलेला असताना तसेच सदरचा आक्षेप समितीपुढे आलेला असतानाही अद्याप सदर रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्याने समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. तसेच याबाबतची चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर जबाबदरी निश्चित करून मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ अन्वये कारवाई करून याबाबतची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, वर्धा

## शालेय पोषण आहार योजनेच्या अनुदान वाटपाबाबत व योजना राबविण्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.११७/१४ (सन २०१३-२०१४) :**

(१) जि.प. शिक्षण विभाग वर्धा यांनी सन २०१३-१४ या वर्षात शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इ. १ ते ८ वी साठी लेखाशिर्ष निहाय प्राप्त अनुदान खालीलप्रमाणे लेखा शिर्ष : २२०२३८०६ रक्कम ७०२७५०००/- केंद्र हिस्सा २२०२३८१५ २४४७७०००/- राज्य हिस्सा अन्न शिजवणे, इंधन व भाजीपाला, स्वयंपाकी, व मदतनीस मानधन, मुख्याध्यापक व शिक्षक मानधन, डेटा ऑपरेटर मानधन व कार्यालयीन खर्च या बाबीवर तालुकानिहाय तरतूद वितरीत केली असून वितरीत केलेली तरतूद व प्रत्यक्ष झालेला खर्च याबाबतची तालुकानिहाय खर्चाची पडताळणी व खर्चमेळ याबाबतची लेखाशिर्षनिहाय पडताळणी करून अखर्चित रक्कम तात्काळ शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

(२) शाळांमध्ये शिजविलेल्या अन्नाचे चाचणी अहवाल प्राप्त केल्याचे दिसून आले नाही.

(३) प्रत्यक्ष विद्यार्थी उपस्थितीपत्रक अहवालासोबत जोडलेले नाही. त्यामुळे एकूण विद्यार्थ्यांची एवढीच पोषण आहार रक्कम अदा केल्याची खात्री होणे आवश्यक आहे.

(४) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. २० जून २००९ नुसार भरारी पथकाची निर्मिती, विद्यार्थ्यांची प्रत्यक्षात उपस्थिती, मागणी व त्याबाबतची पथकाने केलेली तपासणी याबाबत कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

(५) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय २५/०३/२०१४ नुसार शालेय पोषण आहार योजना केंद्रीय स्वयंपाकगृह तपासणीसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून यंत्रणेने १५ दिवसातून एकदा नियमितपणे भेट देणे व अन्नाचे नमुने तपासणीचे अहवाल प्राप्त केल्याचे आढळून आले नाही.

(६) शालेय पोषण आहार योजनेचा मासिक प्रगती अहवाल व वार्षिक फलनिष्पती अहवाल अर्धसमास पत्र क्र १५ दिनांक ११/११/२०१४ अन्वये मागणी केली असता प्राप्त झाला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेची प्रगती व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ झाली किवा नाही यांची तपासणी करता आली नाही

(७) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग परिपत्रक क्र.शापोआ/२००९/प्र.क्र/३८३/प्राशी -४ दिनांक २४ फेब्रुवारी २०१० मधील मुद्दा क्र. १ नुसार,—

(अ) अन्न शिजवून देणाऱ्या व्यक्तिने सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचे कडून आरोग्यविषयक तपासणी करून घ्यावी व वैद्यकीय प्रमाणपत्र शाळेमध्ये ठेवावे.

(ब) अन्न शिजवून देणाऱ्या प्रत्येक व्यक्तिकडे कायमस्वरुपाचे मुख्याध्यापकांनी दिलेले ओळखपत्र असावे.

(क) मुद्दा क्र. ई २ नुसार ग्रामीण भागातील शाळांसाठी ग्रामशिक्षण समितीमध्ये शालेय पोषण आहार योजने संदर्भात ५ लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रित सदस्य म्हणून घेवून त्याव्दारे ग्राम शिक्षण समितीने शाळेमध्ये उपलब्ध होणारे अन्न धान्यादी मालापासून विद्यार्थ्यांना आहार देण्याची व्यवस्था करावी. तथापि, अशी कार्यवाही झाल्याची माहिती नस्तीमध्ये आढळून आली नाही.

(८) दिनांक १/१/२०११ च्या करारनाम्यानुसार एकूण १८ वस्तुंचे दर निश्चित केलेले आहे. तथापि साखर, गुळ, हरभरा, चवळी, मुग या साहित्याचा पूरवठा केला नाही. यास्तव महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. २०१०/ प्र.क्र. १८ / प्राशी-४ दिनांक ०२/०२/२०११ नुसार पाककृती क्र. १ ते ४ तयार करून विद्यार्थ्यांना पूरविल्याचे दिसून येत नाही यांचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(९) दिनांक ६ मार्च २०१० च्या परिपत्रकानुसार केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आहाराचे मानक प्राथ. वर्गातील विद्यार्थ्यासाठी ४५० उष्मांक व १२ ग्राम प्रथिने आणि उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यासाठी ७०० उष्मांक व २० ग्राम प्रथिने पूरविल्याचे दिसून येत नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(१०) महाराष्ट्र शालेय शिक्षण विभाग परिपत्रक क्र. शापोआ/२००९/प्र.क्र ३८३/प्राशी-४ दिनांक २६ फेब्रुवारी २०१० मधील मुद्दा क्र. ड २ नुसार गटास प्राप्त झालेला माल योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे प्रमाणपत्र नोंदवून पूरवठादाराकडून सादर केलेले देयक शिक्षणाधिकारी प्राथ. जि.प. वर्धा यांना सादर करावयाचे आहे. परंतु सदर साहित्य योग्य दर्जाचे व वजनाचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर न केल्याने शहानिशा करता आली नाही.

(११) सदर शालेय पोषण आहार योजनेचा मूळ उद्देश शालेय पोषण आहार योजनान्वये शाळेतील विद्यार्थ्यांचे उपस्थिती वाढविणे हा आहे. सदर योजनेमुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली असल्याबाबतचे दस्तऐवज आढळून आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

| लेखाशीर्ष | अखर्चित निधी (रु) २०१२-१३ | प्राप्त तरतूद (रु) २०१३-१४ | एकुण तरतूद (रु) (२+३) | झालेला खर्च (रु) | शिल्लक (रु) |
|---|---|---|---|---|---|
| २२०२३८०६ | ५६५८८१५ | ७०२७५००० | ७५९३३८१५ | ७०४८७४२२ | ५४४६३९३ |
| २२०२३८१५ | ४८५७९०४ | २४४७७००० | २९३३४९०४ | २५२४६४४० | ४०८८४६४ |
| **एकूण** | **१०५१६७१९** | **९४७५२०००** | **१०५२६८७१९** | **९५७३३८६२** | **९५३४८५७** |

(१) शालेय पोषण आहार योजनेवरील खर्च भागविण्याकरिता सन २०१३-१४ मध्ये खालीलप्रमाणे केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा मध्ये तरतूद प्राप्त झालेली आहे. (आकडे रुपयात) वरील प्रमाणे सन २०१३-१४ ची अखर्चित तरतूद महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ६ जून २००८ अन्वये योजनेचा निधी लगतचे आर्थिक वर्षात खर्च करता येते. त्यानुसार सन २०१३-१४ या वर्षातील अखर्चित निधी रुपये ९५३४८५७/- सन २०१४-१५ मध्ये प्रथमतः खर्च करण्यात आलेला आहे.

(२) शाळामध्ये शिजविलेल्या अन्नाची चाचणी करण्यात येत नाही. त्याऐवजी विद्यार्थ्यांना अन्न देण्यापुर्वी मुख्याध्यापक/शिक्षक/ग्राम शिक्षण समिती सदस्य/ विद्यार्थी पालक यांच्यापैकी एका व्यक्तीने चव घेणे बंधनकारक असून त्यानुसार चव घेतल्यानंतरच अर्ध्या तासानंतर विद्यार्थ्यांना जेवण देण्यात येते.

(३) प्रत्यक्ष उपस्थिती पत्रक शाळास्तरावर ठेवण्यात येते व संबंधित नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात येते. त्यानुसार देयकासोबत उपस्थित विद्यार्थ्यांना संख्या सदर नोंदवही वरूनच नोंदविलेली असते.

(४) भरारी पथकाची स्थापना करण्याबाबत पंचायत समिती स्तरावर सूचना करण्यात आलेल्या असून वेळोवेळी शाळांना भेटी दिल्या जाते. तसेच जिल्हास्तरावरील व तालुकास्तरावरील अधिकारी हे शाळाभेटीच्या वेळी शालेय पोषण आहार योजनेसंबंधीच्या बाबींची तपासणी करीत असतात.

(५) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत वर्धा जिल्ह्यात केंद्रीय स्वयंपाक गृहामार्फत मध्यान्ह भोजन पूरविण्यात येत नाही.

(६) शालेय पोषण आहार योजनेसंबंधीच्या अहवालावरून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण ८८ ते ९० टक्के असून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीतील वाढ किंवा उपस्थिती टिकवून ठेवण्याचे द्योतक आहे.

(७) शालेय शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र. शापोआ/२००९/प्र.क्र/३८३/प्राशी-४/दिनांक २६ फेब्रुवारी, २०१० नुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(अ) अन्न शिजवून देणाऱ्या व्यक्तिची दरवर्षी सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याकडून वैद्यकीय तपासणी करण्यात येत असून त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र शाळास्तरावर ठेवण्यात येते.

(ब) अन्न शिजवून देणाऱ्या व्यक्तिकडे कायमस्वरुपी ओळखपत्र देण्याबाबत मुख्याध्यापकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(क) शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात लाभार्थी विद्यार्थ्यांना ५ पालकांचा समावेश असलेली ग्राम शिक्षण समितीची स्थापना (शाळा व्यवस्थापन समिती) शाळा स्तरावर सर्व शाळांमध्ये करण्यात आलेली असून त्यांचेमार्फत शालेय पोषण आहार योजनेचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो, व त्यांच्या मान्यतेने स्वयंपाकी/ मदतनीस यांची नेमणुक करून त्यांचेमार्फत मध्यान्ह भोजन देण्यात येते.

(८) दिनांक १/११/२०११ च्या करारनाम्यानुसार १८ वस्तुंचे दर निश्चित केले असले तरी, शा.नि.दिनांक ०२.०२.२०११ मधील सूचनानुसार निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे धान्यादी मालाची पूरवठादाराकडे मागणी करण्यात येते. निश्चित करण्यात आलेल्या पाककृतीमध्ये साखर व गुळ या वस्तुंचा समावेश नसल्याने त्याचा पूरवठा झालेला नाही.

तसेच पाककृतीमध्ये नमूद केलेल्या कडधान्यामध्ये हरभरा/ चवळी /मटकी /वाटाणा/ मुग यापैकी कोणत्याही एक कडधान्याचा समावेश असणे आवश्यक आहे त्याप्रमाणे प्रतिविद्यार्थी विहीत केलेल्या खर्चाची मर्यादा विचारात घेवून पाककृतीमध्ये फक्त मटकी व वाटाणा या वस्तुंचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे हरभरा, चवळी व मुग या वस्तुची मागणी केली नसल्याने त्या वस्तुचा पूरवठा झालेला नाही.

(९) केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आहारातील मानकातील विहित उष्मांकासाठी तांदुळ व धान्यादी मालाचे प्रमाण निश्चित केलेले आहे, ही बाब विचारात घेवूनच पाककृती निश्चित करण्यात येते. व पाककृतीप्रमाणे अन्न शिजवून विद्यार्थ्यांना देण्यात येते त्यामुळे विहित उष्मांक मिळत असणे अपेक्षित आहे.

(१०) गटास प्राप्त झालेला माल योग्य दर्जाचा व वजनाचा असल्याचे प्रमाणपत्र मुख्याध्यापकांकडून प्राप्त झाल्यानंतरच पूरवठादाराची देयक पारीत करण्याची शिफारस शिक्षण अधिकाऱ्यांना करण्यात येते. तसेच जिल्हा परिषद स्तरावरून धान्यादी मालाचे नमुने घेवून सदर नमुने शासकीय लॅब मध्ये पाठविण्यात येते. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पूरवठादाराचे देयक अदा करण्यात येते.

(११) शालेय पोषण आहार योजनेसंबंधीच्या अहवालावरून विद्यार्थ्यांना उपस्थितीचे प्रमाण ८८ ते ९० टक्के असून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीतील वाढ किंवा उपस्थिती टिकवून असल्याचे दिसून येते.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०८ जुलै, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की शालेय पोषण आहार योजनेच्या अनुदान वाटपाबाबत व योजना राबविण्याबाबत भरारी पथकाची स्थापना कधी केली आहे? याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीला विदित केले की, भरारी पथकाची स्थापना केलेली असून त्यांनी वेळोवेळी शाळांना भेटी दिलेल्या आहेत. तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी लेखापरीक्षणाच्या वेळी ही कागदपत्रे उपलब्ध करून दिलेली नाहीत. त्या वेळेला शाळांना भेटी दिलेल्या होत्या तेव्हा संबंधित कर्मचाऱ्यांचे प्रमाणपत्र घेतलेले आहे. यावर शिक्षणाधिकारी यांच्याकडून समितीला मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विदित केले की, लेखापरीक्षणाच्या ऑडिट वेळेस प्रमाणपत्र दाखविले नाही असा आक्षेप आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे अकाऊंड कोड वाचतात. कोणत्याही कामांची देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यांच्याकडे आल्यावर त्यांनी सर्व बाबी तपासल्या पाहिजेत. त्यांनी सर्व बाबी तपासल्या असत्या तर हा आक्षेप आला नसता. तत्कालीन कॅफो कोण होते? शिक्षण विभागाला सहायक लेखा अधिकारी आहेत का? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, श्री.विजय कोल्हे हे तत्कालीन कॅफो होते. लेखा अधिकारी हे पद वर्ग-२ चे असून ते राज्यस्तरावरील अधिकारी आहेत. त्यांचे पेमेंट शासनाकडून होते. पुढे यासंदर्भात उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी खुलासा केला की, शिक्षण विभागात अधीक्षक आहेत. शालेय पोषण आहाराचे पेमेंट जिल्हा परिषदेकडून केले जाते.

यानंतर समितीने विचारणा केली की, शिजविलेल्या अन्नाची चाचणी आणि चव घेण्यात येते का? आपल्याला शिजविलेल्या अन्नाची चाचणी कशी करता येईल? आपण हे बघत नाही असे स्पष्टपणे कबूल करा. शिजविलेल्या अन्नाची चाचणी आपल्याला करता येणारच नाही. तुमची काय प्रणाली आहे ते कृपया आपण समितीला सांगावे आणि शिजविलेले अन्न मुलांनी खाण्यापूर्वी त्याची तपासणी केली आहे का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, डाळ, तांदुळ इत्यादी धान्याचा दर्जा तपासणी करण्याबाबत नियम आहेत. खाण्यापूर्वी चाचणी केलेली नाही. धान्याचा दर्जा व्यवस्थित आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी आपण लेबारटरीमध्ये पाठवितो.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, भरारी पथकाने वेळोवेळी शाळांना भेटी दिलेल्या आहेत असे उत्तरात नमूद केलेले आहे. भरारी पथकात तत्कालीन कोण कोण अधिकारी होते, त्यांनी कुठे कुठे भेटी दिल्या होत्या? जिल्हास्तरावर तसेच तालुका स्तरावरील अधिकारी शाळा भेटीच्या वेळी शाळांची तपासणी करीत असतात. हे जर खरे असते तर एवढे बारीक प्रश्न उपस्थित झाले नसते. भरारी पथकाने जेव्हा तपासणी केली तेव्हा तेव्हा विद्यार्थ्यांची प्रत्यक्षात उपस्थितीची माहिती पथकाने दिलेली नाही व किती विद्यार्थी होते, यामध्ये कोण प्रमुख होते या बाबीही दिलेल्या नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, भरारी पथकाची निर्मिती केली होती त्यावेळेला बालविकास प्रकल्प अधिकारी हे भरारी पथकाचे प्रमुख होते. श्री.के.व्ही. गोखले, बालविकास प्रकल्प अधिकारी, केंद्र प्रमुख या अधिकाऱ्यांचा भरारी पथकात समावेश होता.

यावर समितीने पुढीलप्रमाणे मत व्यक्त करून विदित केली की, करारनामा शर्तीच्या अधीन राहून बनविला आहे. त्यातील ४२,४३ अटी व शर्तीचे पालन केले जाते काय? वास्तविक पाहता हा करारनामा राज्य स्तरावर स्थापन झालेला होता. त्या करारनाम्यातील अटी व शर्ती शालेय पोषण आहाराशी संबंधित तरतूदीत समाविष्ट झाल्या पाहिजेत. असे भरारी पथके जिल्ह्यांमध्ये किती होते, त्यांचा काय अहवाल आला? केंद्र प्रमुख, विस्तार अधिकार, गट शिक्षणाधिकारी, अधीक्षक, महिला बालविकास अधिकारी यांचा भरारी पथकात समावेश होता. भरारी पथके नेमण्यासंदर्भात शासनाची मार्गदर्शक तत्वे तपासणे आवश्यक आहे. यावर समितीने व्यक्त केलेल्या मुद्यांसंदर्भात तपासून पहाण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला आश्वासन दिले.

तद्नंतर समितीने सूचना केल्या की, शालेय पोषण आहाराच्या अनुदान वाटपाबाबतचा हा विषय आहे. यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. भरारी पथकाबाबत शासनाने गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. जिल्ह्यात दोन भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली असून तालुकानिहाय त्यांची विभागणी करण्यात येते. शासनाच्या गाईडलाईन्स प्रमाणे शालेय पोषण आहाराचे वाटप होते किंवा नाही. मुख्याध्यापक गाईडलाईन्स प्रमाणे शालेय पोषण आहारावर नियंत्रण ठेवतात किंवा नाहीत, शालेय पोषण आहाराचा पूरवठा योग्य दर्जाचा होतो किंवा नाही. या सर्व बाबींची तपासणी झाली पाहिजे. यामध्ये काही त्रूटी आढळून आल्या तर त्यासंदर्भातील माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना द्यावयाची असते. यासंदर्भात शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापकांना गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. या जिल्ह्यात गाईडलाईन्स प्रमाणे कामे होत नाहीत असे समितीच्या निदर्शनास आले आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती शिक्षणाधिकारी समितीला देऊ शकले नाहीत. कागदपत्रे व्यवस्थित आहे किंवा नाही याची खातरजमा केली जात नाही. समितीला वेळेत माहिती न दिल्यामुळे समितीचा वेळ वाया घालविण्यात येत आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. शालेय पोषण आहारातील मालाबाबत ५० टक्के गैरप्रकार व बोगसपणा होत असल्यामुळे महिला व बाल कल्याण विभागाचे सचिव व ग्रामविकास विभागांचे सचिव यांची समिती साक्ष घेईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

शालेय पोषण आहारातील मालाबाबत ५०% गैरप्रकार व बोगसपणा होत असल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात सखोल चौकशी व तपासणी केली आहे काय, असल्यास चौकशी व तपासणीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून संबंधितांविरूद्ध पुढे कोणती कारवाई केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. पंचायत राज समितीने निर्देशित केल्यानुसार सदर बाबीची चौकशी करण्याकरिता जिल्हा स्तरावरून या कार्यालयाचे आदेश क्रमांक जिपव/प्राशिवि/शापोआ/वशि-१४७५ दिनांक २७/०९/२०१८ अन्वये भरारी पथक स्थापन करून एकूण ११ शाळांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यानंतर दिनांक ०८/०२/२०१९ अन्वये भरारी माहे फेब्रु-२०१९ या महिन्यात भरारी पथकाने एकूण १० शाळांची तपासणी केली आहे. त्याचप्रमाणे दिनांक २३/०३/२०१९ चे आदेशान्वये ३ भरारी पथकांची निर्मिती करून माहे एप्रिल व मे - २०१९ मध्ये एकूण ५३ शाळांची तपासणी करण्यात आली. अशाप्रकारे जि.प. वर्धा स्तरावरून सन २०१८-१९ मध्ये एकूण ७४ शाळांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

तपासणी दरम्यान गंभीर बाबी, गैरप्रकार किंवा बोगसपणा आढळून आला नाही. किरकोळ स्वरूपाच्या त्रूटी दिसून आल्यात त्या शाळांकडून खुलासा मागविण्यात आलेला आहे तसेच सुधारणा करण्याचे दृष्टीकोनातून अवगत केले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

(१) **शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय.—**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदुळाची वाहतुक व धान्यादी मालाचा पूरवठा करण्यासाठी नियुक्त पूरवठेदारामार्फत करतांना शाळेच्या मागणी पत्रकानुसार आवश्यक तेवढ्याच प्रमाणात आणि विहित वेळेत करण्याबाबत करारनाम्यात बंधन घालण्यात आले आहे. तसेच संबंधीत शाळेने तेवढ्याच प्रमाणात माल स्विकारून अतिरिक्त माल पूरवठेदारास परत करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्हा स्तरावर भरारी पथकाची स्थापना करून पथकामार्फत यादच्छीक शाळांना भेटी देवून शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अमंलबजावणी होत असल्याची खात्री केली जाते. तसेच राज्यस्तरावर सुद्धा भरारी पथकाची स्थापना करून शालेय पोषण आहार योजनेच्या कामकाजाचे सनियत्रंण केले जाते. तसेच शिक्षणाधिकारी, लेखाधिकारी शापोआ, गटशिक्षणाधिकारी, अधीक्षक शापोआ, विस्तार अधिकारी व केन्द्रप्रमुख शाळा भेटीच्या वेळी शालेय पोषण आहार योजनेचा कामकाजाचा आढावा घेत असतात.

(२) **महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय.—**विभागाशी संबंधित नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी शालेय पोषण आहार योजनेच्या अनुदान वाटपाबाबत व योजना राबविण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने तपासणी दरम्यान गंभीर बाबी, गैरप्रकार किंवा बोगसपणा यात काहीच आढळून आले नाही याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यासंदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो), जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) व लेखाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तीन भरारी पथकाची स्थापना केलेली आहे. या तीन पथकांच्या माध्यमातून जवळपास १०० शाळांची तपासणी केलेली आहे. त्यादरम्यान गंभीर स्वरुपाचा कोणताही प्रकार आढळून आलेला नाही. काही शाळांमध्ये छोट्या चुका आढळून आल्या, त्यासंदर्भात संबंधित शाळांना सूचना देखील देण्यात आलेल्या आहेत. एका पथकामध्ये कमीत कमी तीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यांच्या पथकामध्ये कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे? अशी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) यांच्या पथकासोबत विस्तार अधिकारी व समादेशक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यांच्या पथकासोबत विस्तार अधिकारी व सहायक प्रशासन अधिकारी आणि लेखाधिकारी यांच्या पथकासोबत अधीक्षक-२ यांची नेमणूक केलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू पथकाद्वारे कोणत्या बाबींची तपासणी करण्यात आलेली आहे? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पोषण आहाराचा साठा, विद्यार्थ्यांची पट संख्या व शालेय पोषण आहार नोंदी अशा बाबींची तपासणी करण्यात आलेली आहे. तपासणी दरम्यान विद्यार्थ्यांना कशा प्रकारे व केव्हा-केव्हा पोषण आहार दिला जातो, त्याबाबतचे उत्तर उपस्थित विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेले आहे. आहार शिजविणाऱ्या मदतनीसांचे पेमेंट विहित कालावधीत केले जाते का, याबाबतची माहिती घेण्यात आली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, तपासणीच्या वेळी धान्याच्या पोत्यांचे वजन केलेले आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला ते स्वतः रूजू होण्यापूर्वीच सदरहू तपासणी करण्यात आलेली आहे असे उत्तर दिले. मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने विदित केले की, सदरहू प्रश्न हा आपणास वैयक्तिक म्हणून विचारला जात नसून तो मुख्य कार्यकारी अधिकारी या पदास विचारला जातो. तपासणी अधिकाऱ्यांनी धान्याच्या पोत्यांचे वजन केलेले आहे काय? धान्याच्या पोत्यांचे वजन करण्याबाबतच्या सूचना समितीने दिलेल्या आहेत. पुढे समितीने असेही निदर्शनास आणून दिले की, समितीने अनेक जिल्हा परिषदांना भेटी दिलेल्या आहेत. त्या भेटीच्या दरम्यान काही शाळांची तपासणी केली असता तांदळाच्या पोत्यांमध्ये घट आढळून आली आहे. तसेच तांदळास बुरशी लागल्याचे आढळून आले आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, एफसीआय मधून काढलेला तांदूळ गोडाऊनमध्ये ठेवला जातो. त्यानंतर गोडाऊनमधून संबंधित शाळेला पूरवठा केला जातो. गोडाऊन ते संबंधित शाळा यादरम्यान तांदूळ काढला जातो. यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. मागील वेळी देखील यासंदर्भात चर्चा करण्यात आली होती त्यावेळी सदर बाब गांभीर्याने घेण्यात येईल, असे विभागाकडून सांगण्यात आले होते. समितीचे याबाबत असे मत आहे की, राज्यस्तरावर धोरणात्मक निर्णय झाला पाहिजे. एफसीआयमधून निघालेला तांदूळ इतरत्र कोठेही न घेऊन जाता थेट संबंधित शाळेवर घेऊन गेला पाहिजे. तसेच धान्याचा पूरवठा करतेवेळी पोत्याला सील असले पाहिजे. संबंधित कंत्राटदाराने सदर पोत्याचे वजन करून संबंधित शाळेला दिले पाहिजे. अशा प्रकारचा निर्णय व तशा सूचना शासनस्तरावरून देण्यात याव्यात. शहरी व ग्रामीण असे शाळांचे भाग आहेत. शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या आहारासाठी ठरावीक रक्कम संबंधिताना शासनामार्फत दिली जाते. उदा. प्रति विद्यार्थ्यांस दोन रुपये दिले तर त्या पैशांमध्ये संबंधित शाळेने हरभरा, डाळ, तेल मीठ मिरची असे सर्व आणून त्यांना ते शिजवून देत आहेत. थेट पैसे देत असल्यामुळे माल खराब झाला किंवा यामध्ये भ्रष्टाचार झाला, असे कोठेही प्रकरण आढळून आलेले नाही. शहरी भागामध्ये असा निर्णय असताना ग्रामीण भागांसाठी असा वेगळा निर्णय का घेण्यात आलेला आहे? अशा निर्णयामध्ये भ्रष्टाचाराला वाव मिळतो तसेच तुरडाळ, हरभरा व अन्य धान्य खराब होत असल्याचे आढळून आलेले आहे. ग्रामीण व शहरी भागासाठी वेग-वेगळा निर्णय का घेण्यात आलेला आहे? या अनुषंगाने समितीने पुढे अशाही सूचना केल्या की, राज्यस्तरावर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. याबाबतच्या गाईडलाइन्स आहेत परंतु त्या नव्याने निर्गमित करणे आवश्यक आहे. पूर्वीच्या गाईडलाइन्सची पूर्णपणे अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे राज्यस्तरावरील पथकाद्वारे काही जिल्हा परिषदेचे परीक्षण झाले पाहिजे. पूरवठा करण्यात आलेले धान्य तपासून तपासणीचा अहवाल आल्यानंतरच त्या धान्याचा वापर केला पाहिजे. परंतु दुर्दैवाने तसे केले जात नाही. संबंधित शाळेवर चांगल्या दर्जाचा धान्याचा पूरवठा केला जातो की नाही, धान्याची तपासणी केली जाते की नाही, धान्याच्या तपासणीचा सकारात्मक अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरहू धान्यांचा वापर केला जातो काय, पूरवठा करण्यात आलेल्या पोत्यावर

सील आहे की नाही, अशा सर्व बाबी तपासून याबाबतच्या गाईडलाइन्स तयार करून त्या सर्व जिल्हा परिषदांना पाठविण्यात याव्यात, अशी समितीची सूचना आहे. राज्यस्तरावरील पथकाद्वारे काही ठिकाणी भेटी दिल्या पाहिजेत, त्या भेटी दरम्यान काही बाबी आढळून आल्या तर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा. सदरहू भरारी पथकास ज्या ठिकाणी सर्व काही आलबेल असल्याचे आढळून आले त्या ठिकाणी समिती भेट देईल.

अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, विभागाकडे अशी माहिती आहे की, एप्रिल, २०१८ मध्ये सदरहू भरारी पथक स्थापन करण्यात आले होते. यावर्षी सदरहू भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली नाही. आता आम्ही पुन्हा भरारी पथकाची स्थापना करणार आहोत.

यावर समितीने विदित केले की, गेल्या सहा महिन्यांमध्ये राज्यस्तरावरील भरारी पथकाने कोणत्या ठिकाणी भेटी दिलेल्या आहेत, त्या भरारी पथकामध्ये कोणते अधिकारी होते आणि भेटी दरम्यान त्यांना काय आढळून आले हे समितीसमोर आले पाहिजे. सदरहू विषय हा राज्यस्तरावरील आहे. त्यामुळे याबाबतच्या सर्व गाईडलाइन्स या राज्यस्तरावरूनच निर्गमित करणे आवश्यक आहे. एफसीआयमधील शाळेला जाणारा तांदूळ सिलबंद जातो की नाही, ही बाब तपासून घेणे आवश्यक आहे. दुसरा विषय असा आहे की, ग्रामीण भागातील शाळांना धान्य पुरवठा करण्याबाबत व शहरी भागातील शाळांना पैसे देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला जातो. त्याबाबत माहिती समितीला सादर करण्यात यावी. दुसरी बाब अशी की, समितीने ज्या वेळी सदर ठिकाणी भेट दिली त्यावेळी सदर प्रकरणासंदर्भात सखोल चौकशी करून त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्याबाबतची सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांना केली होती. उत्तरामध्ये आपण सांगितले आहे की, तपासणी दरम्यान गंभीर बाबी, गैरप्रकार किंवा बोगसपणा आढळून आलेला नाही. परंतु सर्वच ठिकाणी अशी परिस्थिती आढळून आलेली आहे का? मुख्य कार्यकारी अधिकारी हे अलिकडच्या काळामध्ये रुजू झाले असले तरी त्यांनी रुजू झाल्यानंतर किती शाळांना भेटी दिलेल्या आहेत? समितीच्या मते आपण एकाही ठिकाणी भेट दिलेली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, आताच शाळा सुरू झालेल्या आहेत, आता यानंतर प्रत्यक्ष काही शाळांना भेटी देण्यात येतील.

समितीने असे मत व्यक्त केले की, भरारी पथकाद्वारे केलेली चौकशी ही बोगस चौकशी करण्यात आलेली आहे असा समितीचा आक्षेप आहे. त्यामुळे सदरहू चौकशी ज्या अधिकाऱ्यांनी केली त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. शाळेला पूरवठा करणारे धान्य हे योग्य प्रतीचे आहे की नाही, याबाबतचा अहवाल पुढील आठ दिवसांमध्ये समितीला सादर करण्यात यावा. समितीने भेटी दरम्यान सदर प्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते, त्याचा देखील चौकशीचा अहवाल समितीस सादर करावा. पुढे समितीने सचिवांच्या असे निदर्शनास आणून दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या तपासणीमध्ये गंभीर असे काही आढळून आलेले नाही. एफसीआयमधून निघालेला तांदूळ थेट शाळेमध्ये जाणे आवश्यक आहे. तो शाळेवर न घेऊन जाता संबंधित कंत्राटदार हे गोडाऊला घेऊन जातात. यावर अपर मुख्य सचिव यांनी यासंदर्भात खुलासा केला की, मागील वेळी एका बैठकीमध्ये हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यामुळे या विषयासंदर्भात चर्चा करून यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला होता. निविदाधारकांनी या मुद्यावर आक्षेप घेतलेला आहे. ज्यावेळी शाळेला धान्य पूरवठा करण्यासाठी त्यांचा ट्रक निघतो त्यावेळी त्याच ट्रकमध्ये तांदूळ, डाळ व अन्य आवश्यक मसाले एकत्र लोड करून एकाच ट्रकमध्ये सर्व माल पाठवितात.

याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, समितीने एका गोडाऊनला भेट दिली होती, त्यावेळी काही पोत्याचे वजन कमी असल्याचे आढळून आले होते. संबंधित कंत्राटदार हे एफसीआयमधून तांदूळ गोडाऊनमध्ये घेऊन जातात. तेथे काही तांदूळ काढून मग तो माल शाळांना पाठवितात. शाळांवर धान्य मोजून घेण्याची कोणतीही व्यवस्था नसते. कंत्राटदार यांच्याकडे देखील धान्याचे वजन करून द्यायची कोणतीही व्यवस्था नाही. अटी व शर्तीच्या नियमाप्रमाणे सदर धान्याचे वजन करून देणे आवश्यक आहे. आमचा प्रश्न असा आहे की, शहरी भागातील संबंधित शाळांना अन्न शिजवण्यासाठी प्रती विद्यार्थ्यांस काही ठराविक पैसे दिले जातात. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील संबंधित शाळांना अन्न शिजवण्यासाठी पैसे का दिले जात नाहीत, शहरी भागातील शाळांचा नियम हा ग्रामीण भागातील शाळांना का लावला जात नाही? शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील शाळांना तसाच नियम लागू केला तर डाळ, तेल, मीठ देण्याची आवश्यकता नाही. यासंदर्भात समितीने सचिवांना निदेश दिले की, सदरहू अहवालानुसार जिल्ह्यामध्ये कोठेही धान्यामध्ये अनियमितता आढळून आलेली नाही, यासंदर्भात राज्यस्तरावर गाईडलाइन्स निर्गमित करून भरारी पथकाद्वारे सचिव महोदयांनी काही शाळांना भेटी देण्यात याव्यात. अशा भेटीच्या माध्यमातून शालेय पोषण आहारतील सर्व बाबी खुल्या होतील. वर्धा जिल्ह्यामध्ये कोठेही अनियमितता आढळून आलेली नाही. परंतु वरील प्रमाणे राज्यस्तरावर कार्यवाही करावी, अशी समितीची सूचना आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

वर्धा जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागास वर्धा यांना सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षात शालेय पोषण योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून रु. ७,०२,७५०००/- व राज्य शासनाकडून रु. २,४४,७७०००/- इतके अनुदान प्राप्त झाले, अन्न शिजवणे, इंधन व भाजीपाला व मदतनीस मानधन, मुख्याध्यापक व शिक्षण मानधन, डेटा ऑपरेटर मानधन व कार्यालयीन खर्च या बाबींवर तालुकानिहाय तरतूद वितरीत केली असून वितरीत केलेली तरतूद व प्रत्यक्ष झालेला खर्च याबाबतची तालुकानिहाय खर्चाची पडताळणी करून अखर्चित रक्कम तात्काळ शासन खाती जमा करणे आवश्यक होते. प्रत्यक्ष विद्यार्थी उपस्थितीपत्रक अहवालासोबत जोडलेले नसल्याने एकूण विद्यार्थ्यांसाठीच पोषण आहार रक्कम अदा केल्याची खात्री होत नाही. तसेच भरारी पथकाची निर्मिती विद्यार्थ्यांची प्रत्यक्षात उपस्थिती मागणी व त्याबाबतची पथकाने केलेली तपासणी याबाबत कार्यवाही झाल्याचे निदर्शनास आले नाही. शालेय पोषण संदर्भातील लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पाच पालकांचा समावेश असलेल्या ग्राम शिक्षण समितीबाबत कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही. शालेय पोषण आहार योजनेचा मासिक प्रगती अहवाल व वार्षिक फलनिष्पती अहवाल प्राप्त झाला नसल्याने शालेय पोषण आहार योजनेची प्रगती व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झालेली वाढ याची तपासणी करता आली नाही. अन्न शिजवून देणाऱ्या व्यक्तीने सक्षम अधिकारी यांच्याकडून आरोग्य विषयक तपासणी करून वैद्यकीय प्रमाणपत्र शाळेमध्ये ठेवणे आवश्यक असून या व्यक्तींकडे कायमस्वरूपाचे मुख्याध्यापकाने दिलेले ओळखपत्र असणे आवश्यक असताना याबाबतची कार्यवाही झाल्याचे नस्तीमध्ये आढळून आले नाही. त्याचप्रमाणे करारनाम्यानुसार एकूण १८ वस्तुंचे दर निश्चित केलेले आहे. तथापि, साखर, गुळ, हरभरा, चवळी, मुग या साहित्यांचा पूरवठा केलेला नाही. प्राप्त झालेल्या साहित्यांचा दर्जा व वजनाचे प्रमाणपत्र सादर न केल्याने याबाबतची तपासणी करण्यात आलेली नाही. असे आक्षेप लेखापरीक्षणात नोंदविण्यात आले आहेत.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा व ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागाचे सचिव यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, शालेय पोषण योजनेंवरील खर्च भागवण्याकरिता सन २०१३-२०१४ या वर्षासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानामधील अखर्चित रक्कम सन २०१४-२०१५ या वर्षात प्रथमतः खर्च करण्यात आली आहे. लाथार्थी असलेल्या पाच पालकांचा समावेश असलेल्या ग्राम शिक्षण समित्या शाळा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या आहेत. निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे धान्यादी मालाची पूरवठादाराकडे मागणी करण्यात येते. तसेच जिल्ह्यात भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली असून तालुकानिहाय त्यांची विभागणी करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये गट शिक्षणाधिकारी, अधीक्षक शापोआ, महिला बाल विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, यांचा समावेश असून बालविकास प्रकल्प अधिकारी या भरारी पथकाचे प्रमुख आहेत. सन २०१८-२०१९ या कालावधीत एकूण ७४ शाळांची तपासणी पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यादरम्यान गंभीर स्वरूपाचा कोणताही प्रकार आढळून आलेला नसून काही शाळांमध्ये छोट्या चुका आढळून आल्या त्यासंदर्भात संबंधित शाळांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी राज्यस्तरावर देखील दक्षता पथकांची स्थापना करून शालेय पोषण आहार योजनेच्या कामकाजांचे सनियंत्रण केले जाते.

राज्यस्तरावरील दक्षता पथकामध्ये कोणत्या अधिकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे, मागील सहा महिन्यात या पथकाने कोणत्या ठिकाणी भेटी दिल्या आणि त्यांना काय आढळून आले, जिल्हास्तरावरील भरारी पथकाने कोण कोणत्या ठिकाणी भेटी दिल्या, या पथकाने जेव्हा तपासणी केली तेव्हा विद्यार्थ्यांची प्रत्यक्षात उपस्थिती किती होती, शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शालेय पोषण आहाराचे वाटप होते किंवा नाही, मुख्याध्यापक शालेय पोषण आहारावर नियंत्रण ठेवतात काय, शालेय पोषण आहाराचा पूरवठा योग्य दर्जाचा होतो किंवा कसे, धान्यादी मालाच्या दर्जाची तपासणी करण्यात येते काय. कोणत्याही कामांची देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे आल्यावर सर्व बाबी तपासल्या होत्या काय व काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबतची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येते काय, यासंदर्भातील कोणतीही व्यवस्थित सविस्तर माहिती समितीस देण्यात आली नाही. जिल्ह्यात शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शालेय पोषण आहाराचे काम होत नसल्याने लेखापरीक्षणात लहान लहान स्वरूपाचे आक्षेप आढळून आले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असल्याने याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करत आहे.

**धान्यादी मालाचा दर्जा, साठवणूक, वितरण व शिल्लक यासह शालेय पोषण आहाराच्या नोंदी, विद्यार्थ्यांची पटसंख्या, पोषण आहार केंव्हा व कशा पद्धतीने दिला जातो याबाबत काही तक्रारी आहेत का, या सर्वांची तपासणी करण्यासाठी जिल्हास्तरावर भरारी पथके व राज्यस्तरावर दक्षता पथके नेमण्यात आली असतानाही शालेय पोषण आहाराच्या मार्गदर्शक तत्वानुसार व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी समाधानकारक होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले असल्याने राज्यस्तरावरील दक्षता पथकाद्वारे विभागाच्या सचिवांनी देखील काही शाळांना भेटी देऊन तपासणी करावी व कोणत्याही प्रकारची अनियमितता/त्रुटी आढळून आल्यास तातडीने कारवाई करावी. तसेच या पद्धतीने**

**दक्षता पथकामध्ये समावेश असलेल्या अधिकाऱ्यांची नावे, भेट दिलेला जिल्हा, आढळून आलेल्या त्रुटी व त्यावर केलेली कारवाई याबाबतचा सविस्तर अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारास करीत आहे.**

वास्तविक समितीने अनेक जिल्हा परिषदांना भेटी दिलेल्या आहेत त्यादरम्यान समितीस आढळून आलेल्या त्रुटी समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणल्या, त्यामध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये तालुका स्तरावरील शाळांना तांदळासह धान्यादी माल निकृष्ट दर्जाचा पाठविण्यात येत असल्याचे आढळून आलेले आहे. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त झालेला तांदुळ पूरवठादाराच्या गोदामामध्ये ठेवला जातो. त्यानंतर गोदामामधून तांदुळ संबंधित शाळांना पूरवठा करताना ५० किलोच्या गोणीमधील दोन ते तीन किलो मालाची घट करून काळ्या बाजारात विकला जातो यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसून कोणत्याही मार्गदर्शक तत्वांची अमंलबजावणी केली जात नाही.

शालेय पोषण आहारासाठी असलेला धान्यादी माल व तांदुळ काळ्या बाजारात विकला जाऊ नये यासाठी तालुकास्तरावर निश्चित केलेल्या पाककृतीनुसार व ठरवून दिलेल्या धान्याच्या प्रमाणानुसार परिगणना करून आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या मालाचा शाळानिहाय मागणीपत्रानुसार पूरवठाधारकास पूरवठा आदेश देण्यात यावा व माल शिल्लक असल्यास तेवढा कमी करून पुढील मागणी करावी. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त झालेला तांदुळ पूरवठाधारकाच्या गोदामात प्रदिर्घ कालावधीसाठी न ठेवता सदरहू माल थेट शाळांमध्ये पोहचवण्याची व्यवस्था करण्यात यावी. शाळेचे मुख्याध्यापक/शिक्षक व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/सदस्य यांच्या उपस्थितीत डिजीटल वजन काट्यावर वजन करून तसेच मालाचा दर्जा व्यवस्थित असल्याची खात्री करून पोहोच पावतीवर तसे स्पष्ट नमूद करण्यासह शाळेच्या नोंदवहीवर प्राप्त मालाची नोंद करावी. **या धान्यादी मालाचा सकारात्मक तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदरहू मालाचा वापर करण्यात यावा. या कार्यपद्धतीबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन याबाबतची स्पष्ट मार्गदर्शक तत्वे तयार करून सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या आहारासाठी ठराविक रक्कम शासनामार्फत दिली जाते. या रकमेमधून संबंधित शाळा आवश्यक धान्यादी मालाची खरेदी करून ती शिजवून विद्यार्थ्यांना देण्यात येते. यामध्ये थेट रक्कम मिळत असल्याने माल खराब झाला किंवा यामध्ये गैरव्यवहार झाला अशी प्रकरणे आढळून येत नाही. अशा प्रकारची कार्यपद्धती शहरी भागात **राबविण्यात येत असल्यास याबाबतची माहिती देण्यासह ग्रामीण भागात देखील अशाच पद्धतीने शालेय पोषण आहाराची योजना राबविता येईल किंवा कसे याबाबतची तपासणी करून सविस्तर माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, वर्धा

## मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगांव (गो) रस्ता सर्फेस ड्रेसिंग करणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.३२५/९ (सन २०१३-२०१४)**

प्रमाणक क्रमांक ८८३ दिनांक ३०/०३/२०१४ रुपये ३,६९,३६२/-

तांत्रिक मान्यता :- क्र. ५/३०५४-२२६८/ काअ/२०११-०१२ रु. ११७५०००/-

प्रशासकीय मान्यता :- आदेश क्र. जिपव/ बांध/ ता/७७०/ २०१३ दि. ११/०३/२०१३ रु. ११७५०००/-

निविदा मंजुरी :- दि. ३/७/२०१३ (निविदा परि. ब पेक्षा २२.०५२ टक्के कमी दराने मंजूर)

करारनामा :- बी-१/१२७/काअ/२०१३-१४ दिनांक २२/०८/२०१३

करारनामा मूल्य :- रु. ११३०३०३/-

कंत्राटदाराचे नाव :- श्री. प्रविण शेषराव शेंडे

कामाचा आदेश क्र :- क्रमांक ५८६ दि. २१/०८/२०१३

कामाचा कालावधी :- दिनांक २१/०८/२०१३ ते २१/११/२०१३

मोजमाप पुस्तिका :- क्र. ४३८६ पान क्र ४९ ते ६०

मूल्यांकन :- रु. १४,९९,५७८/-

काम पुर्णत्व प्रमाणपत्र :- दि. २७/०१/२०१४

टेस्ट रिपोर्ट :- क्र. ४०२७ दि. २४/०१/२०१४

मुदतवाढ ठेकेदाराचे पत्र :- क्र. १३१९ दि. १७/१२/२०१३

(ठेकेदाराचे अर्जामध्ये काम काहीच झालेले नाही ठेकेदाराचे पत्रात नमूद आहे) .

उप अभियंता मुदतवाढ प्रस्ताव :- पत्र क्र. ७८९, दि. २४/१२/२०१३

(काम खदानीची रॉयल्टी नसल्यामुळे करता आले नाही.)

मुदतवाढ आदेश :- क्र. ८१ दि. ३/२/२०१४ (दंड प्रती विलंब दिवस रु. २५ प्रमाणे वसुली करून मुदतवाढ दि. ३०/०१/२०१४ पर्यत देण्यात येते) .

**यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.**

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १४८ १,२ (अ) (ब) प्रमाणे व करारनामा क्रमांक १७२ दि. २१/८/२०१३ तथा कामाचा आदेश क्र. ५८६ दि. २१/८/२०१३ अन्वये मक्तेदाराने काम वेळेवर म्हणजे दि. २१/८/२०१३ रोजी सुरू करणे अपेक्षित असतांना ठेकेदाराचे मुदतवाढ बाबत प. क्र. १३१९ दि. १७/१२/२०१३ अन्वये दि. १७/१२/२०१३ पर्यत काहीच काम झालेले नाही. असे स्पष्ट नमूद असून उप अभियंता यांचा मुदतवाढ प्रस्ताव क्रमांक ७८९, दि. २४/१२/१३ अन्वये सदर काम रॉयल्टी नसल्याने काम वेळेवर करता आले नाही. त्या अनुषंगाने मुदतवाढ देणे बाबत पत्र नस्ती सोबत संलग्न आहे. तथा नस्ती मध्ये दि. २३/१/२०१४ रोजी सदर काम ८२ टक्के काम पूर्ण केलेले आहे. यावरून असे दिसून येते की, सदरील काम दि.२१/०८/२१३ ते २४/१२/२०१३ या ४ महिन्याच्या कालावधीत काहीच काम न करता दि. २५/१२/२०१३ ते २३/०१/२०१४ म्हणजे २९ दिवसा मध्ये ८२ टक्के काम पूर्ण केलेले आहे. या वरून सदर काम तांत्रिक दृष्टीने योग्य झले असे म्हणता येत नाही तथा काम प्रगती मध्ये असतांना वेळोवेळी तपासणी केलेली नाही यावरून असे दिसून येते लेखा सहिंता नियम १४८ व करारनामा अटीशर्ती प्रमाणे पुर्तता कार्यवाही केलेली नाही.

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमाक जीआर-३४/सा-४/५९९९, दि. ०८/०१/२००७ अन्वये साहित्य वापरण्यापुर्वीच प्रयोग शाळेला साहित्याचा तपासणी अहवाल प्राप्त करून नंतर कामावर वापर करणे अपेक्षित असतांना प्रत्यक्षात साहित्याचे चाचणी अहवाल दि. २४/०१/२०१४ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. तथा रकमेचे अंतिम प्रदान ३०/०३/२०१४ ला केलेले आहे. तरी साहित्याचा चाचणी अहवाल शासन निर्देशाप्रमाणे योग्य वेळेत प्राप्त करण्यात आलेला नाही.

(३) सदरील कामासाठी वापरलेले डांबराचे ग्रेडेशन ६० ते ७० चा अहवाल प्राप्त केलेला नाही.

(४) अधीक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण यांचे पत्र दवागुणी/ प्रशा/ १/ ३६५८/ १९९२ दि. २८/१०/१९९२ नुसार खडीकरण झाल्यांनतर १ महिना पूर्ण झाल्यानंतर रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक असतांना तशी कालमर्यादा बाबत कार्यवाही केलेली नाही.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ११४ अन्वये सुधारित अंदाजपत्रक क्रमांक व दिनांक नमूद नाही. रु. १४,५९,८५५/- चे बनविलेले आहे. सबब सुधारित अंदाजपत्रकासोबत कोणत्या परिस्थितीत बदल करणे अपरिहार्य आहे. त्याचा विस्तृत अहवाल जोडण्यात यावा. असे स्पष्ट नियम असतांना तसा अहवाल प्राप्त करण्यात आलेला नाही. तथा लेखापरीक्षणास सादर केलेला नाही. त्यामुळे मूळ अंदाजपत्रकापेक्षा जास्तीचे काम रु. ३,२४,५७८/- लेखा आक्षेपित ठेवण्यात येतात.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ११८ व १५३ अन्वये प्रस्तावित बांधकामाचे मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे अपेक्षित असतांना सदर कामाची लांबी १ किमी. १००० मिटर असून सुधारित अंदाजपत्रकात ८९० मीटर कामाची लांबी दर्शविलेली आहे. तथा प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकेत ८१५ मीटरचे काम केलेले आहे. तरी मूळ अंदाजपत्रकाची प्राकलीत किंमत रु.११७५०००/- असून सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे रु. १४५९८५५/- असून प्रत्यक्षात मोजमाप पुस्तीका क्रमांक ४३८६ पान क्र. ४९ ते ६० वर रु. १४९९५७९/- एवढे मूल्याकंन केलेले आहे. सदरील काम कमी व खर्च जादा केल्याचे दिसून येते.

सदरील मुददेनिहाय बाबी संदर्भात अभिलेख सादर करणे व अभिप्राय सादर करण्यास अर्धमास पत्र क्र. ३० दि. ३०/०८/२०१४ अन्वये सुचित केले असता पत्र क्र. जिपव/बांध/स्था-२/ वाशि-५१५/१४ कार्यालय बांधकाम विभाग जिल्हा परिषद वर्धा दि. १६/०९/२०१४ व कार्यालयीन पत्र क्र. २१६ (ब) दि. १९/०९/२०१४ अन्वये या संदर्भात पुर्णतःहा अभिलेख तथा समर्पक अभिप्राय सादर न केल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येतो.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**सदर परिच्छेदाचे अनुपालन खालीलप्रमाणे :—**

(१) मुदतवाढ प्रस्ताव पत्र क्रमांक ७८/२०१३ दि. २४/१२/२०१३ अन्वये मुदतवाढ मागितली आहे. मुदतवाढीचे अर्जात रॉयल्टी उपलब्ध न झाल्यामुळे काम मुदतीच्या आत झाले नाही असे नमूद केलेले होते. व तपासणी अंती ही बाब सत्य होती. सदर कामास दि. २३/०१/२०१४ च्या मुदतवाढीमध्ये हे काम ८२% पूर्ण झाले असे नमूद असून दि. २४/१२/२०१३ ते २३/१/२०१४ या मध्ये ३० दिंवसाचे अंतर असून प्रत्यक्षात ८१५ मीटर चे काम कंत्राटदारने केलेले आहे. जास्तीत जास्त मशिनरी वापरल्याचे इतक्या परिमानाचे काम करणे शक्य झाले. तांत्रिक दृष्ट्या या कामाची कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियता, हिंगणघाट यांनी प्रत्यक्षात कामाची पाहणी करूनच देयक मंजूर केलेले आहे. सदर मुदतवाढ प्रस्ताव विलंबाने सादर केल्यामुळे मा.अति मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दंडात्मक कार्यवाहीसह रुपये २५/- प्रतिदिन दंडाप्रमाणे मुदतवाढ मंजूर केलेली आहे.

(२) साहित्य तपासणीचा अहवाल नस्तीला उपलब्ध आहे व हा अहवाल रस्त्यावरील काम सुरू असतांना केलेल्या साहित्याचा नमुन्या प्रमाणे घेण्यात आलेला असून प्रयोगशाळेमध्ये या नमुन्याची चाचणी घेण्यात आलेली आहे. तपासणी अहवालाची गुणवत्ता बघून संबंधित कामाचे देयक कार्यकारी अभियंता यांनी पारित केलेले आहे सबब आक्षेप वगळण्यात यावा. (कामाचे चाचणी अहवाल संलग्न आहे).

(३) सदर कामावर ६०/७० ग्रेड डांबर वापरूनच सर्फेस ड्रेसींगचे काम करण्यात आलेले आहे. या कामावर ०५४२ kg म्हणजेच ३.४३ नग डांबरी डब्यीची आवश्यकता होती. त्यामुळे कमी परिमाण असल्यामुळे Penitration Test घेण्यात आलेली नव्हती. झालेले काम Specification प्रमाणे झालेले असून सदर काम सुस्थितीत आहे.

(४) सर्फेस ड्रेसींगचे काम हे खडीकरणावर Surface Treatment चे काम करणे हे अभिप्रेत आहे व याला कायमस्वरुपी डांबरी करणाचे काम म्हणणे यथोचित नाही. डांबरीकरणामध्ये Carpet व Seal Coat चे काम अभिप्रेत असते. खडीकरणाची दबाई उत्तमरीत्या केली होती व रस्त्याचा WBM पृष्ठभाग वाहतुकीमुळे मूळ रस्ता खराब होऊ नये म्हणून व Surface Dressing चे काम त्वरित पूर्ण करण्यात आले होते.

(५) सदर कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त वाढ होत असल्यामुळे सदर कामास सुधारित अंदाजपत्रक (Working Estimate) तयार करून कार्यकारी अभियंता यांचे तांत्रिक दृष्टीने (Technical Approved) मान्यता घेण्यात आली आहे. सदर मान्यता मूळ अंदाजपत्रकावरून घेण्यात आल्यामुळे त्यास क्रमांक व दिनांक नमूद केला नाही.

सदर कामास जरी सुधारित अंदाजपत्रकास मान्यता दिलेली असली तरी या कामाचा खर्च प्रशासकीय मान्यता किमतीच्या आत आहेत.

(६) सदर रस्त्याची एकूण लांबी २.५६५ कि. मी असून या कामाचा प्रस्ताव सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत कि.मी. ०/०० ते १/०० लांबी अंतर्भूत करण्यात आली होती. सदर कामास तांत्रिक मान्यता दिनांक ११/०३/२०१३ ला रुपये ११.७५ लक्ष ला घेण्यात आलेली होती व प्रशासकीय मान्यता रुपये ११.७५ लक्षास दिनांक २५/०३/२०१३ ला घेण्यात आली. त्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करून या कामाचा कार्यारंभ आदेशा दिनांक २१/०८/२०१३ ला देण्यात आला होता. व कामास प्रत्यक्षात सुरुवात पावसाळा संपल्यानंतर दिनांक ०३/१०/२०१३ ला करण्यात आली होती. या कालावधीत तांत्रिक मान्यता ते प्रत्यक्ष काम सुरू करावयाचा कालावधी यामध्ये एक पावसाळा लोटलेला होता.

सदर कामाचे अंदाजपत्रक श्री. चाफले, शा. अ. यांनी तयार केले होते. त्यामध्ये खालील बाबी अंतर्भूत होत्या.

| अ. क्र | बाब | परिमाण |
|---|---|---|
| १ | खडी GR १ | ६६.०० घ. मी. |
| २ | खडी GR २ | २२५.०० घ. मी. |
| ३ | मुरुम | ३००.०० घ. मी. |
| ४ | सर फेस ड्रेसिंग | ३०००.०० घ. मी. |

यामध्ये GR १ चे परिमाण लांबीचे २० % म्हणजे ६६ घ. मी. इतके होते व हे काम पॅचेसकरिता मर्यादित होते. परंतु प्रत्यक्षात काम सुरू करतांना शाखा अभियंता (श्री. कुऱ्हेकर, तत्कालीन शा. अ.) यांच्या असे लक्षात आले की, फक्त पॅचेसचे काम करून रस्ता सुस्थितीत करता येणार नाही. त्यामुळे श्री. भागवत तत्कालीन का. अ. व श्री. जगशेट्टीवार, उप अभियंता यांचा दौरा दि. १२/१०/२०१३ ला प्रत्यक्ष मोक्यावर नेऊन साईड कंडिशनबाबत अवगत केले. त्यावेळेस का. अ. यांनी पॅचेस ऐवजी पूर्ण ८१५ मी लांबीमध्ये GR १ खडीचा थर घेण्याचे निर्देश दिले. त्याप्रमाणे काम पूर्ण करण्यात आले त्यामुळे खालीलप्रमाणे परिमाणात वाढ झालेली आहे.

| कामाची बाब | परिमाण | प्रस्तावित खर्च | कामाची बाब | परिमाण | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| खडी GR १ | ६६.०० घ. मी. | १९,०२५ | खडी GR १ | ३३९.९८ घ.मी. | ५,६१,६१३ |
| खडी GR २ | २२५.०० घ. मी. | ३,९३,०५३ | खडी GR २ | २०६.८३ घ.मी. | ३,६१,३११ |
| मुरुम | ३००.०० घ. मी. | १,४३,२६५ | मुरुम | २५० घ.मी | १,१९,३८७ |
| सरफेस ड्रेसिंग | ३०००.०० घ. मी. | ४,२५,७०० | सरफेस ड्रेसिंग | २५८२.४९ घ.मी. | ३,६६,४५५ |
| **एकूण** | | **१०,७१,०४३** | | | **१४,०८,७६८** |

वरीलप्रमाणे रु. ३,३७,७२३/- रु, चे काम अधिक झाले. परंतु कंत्राटदाराचे काम २२.०५% कमी दराने घेतलेले असल्यामुळे सदर कामावरील खर्च पूर्ण झालेल्या ८१५ मीटर लांबीच्या कामावर २२.०५ % कमी दराने रु. ११,६८,८९२/- एवढा झालेला आहे सदर खर्च प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा रुपये ६१०८/- ने कमी आहे.

सदर लांबीमधील काम पूर्ण केल्यामुळे रामनगर ते वायगाव गोंड हा रस्ता पूर्ण लांबी २.७५ कि. मी. मध्ये डांबरीकरण झाले व त्यामुळे सदर काम लोकहिताचे ठरले.

तरी मंजूर १ कि. मी लांबी ऐवजी अस्तित्वातील उर्वरित रस्त्याची शिल्लक लांबी ८१५ मी. पूर्ण करून या रस्त्याचे संपूर्ण लांबीमध्ये डांबरीकरण झाले व झालेला खर्च हा प्रशासकीय मान्यतेच्या आत असल्यामुळे व लोकहितार्थ खर्च केल्यामुळे कृपया अनुपालन मान्यतेस सादर.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०८ जुलै, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, मौजे कांढळी प्रभाग रामनगर ते वायगांव (गो) येथील रस्ता सर्फेस ड्रेसिंग करणेबाबतच्या कामामध्ये स्पष्टीकरणामध्ये नमूद केल्याप्रमाणे कंत्राटदारास कोणती रॉयल्टी उपलब्ध झाली नाही? रॉयल्टी व काम न करण्याचा संबंध कसा काय आहे? सदर कामावर साहित्य केव्हा वापरले व त्या साहित्याचा चाचणी अहवाल केव्हा प्राप्त झालेला आहे. समितीने असेही निदर्शनास आणून दिले की, चार महिन्यात एक काम केल्याची नोंद केली आहे. ज्युनिअर इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर व कार्यकारी अभियंता यांचे या कामावर सुपरव्हीजन असते. वर्क ऑर्डर झाल्यावर किती काम केले याची नोंद मोजमाप पुस्तिकेत केली जाते. डेप्युटी इंजिनिअर यांचे या कामावर १०० टक्के सुपरव्हीजन असते. असे काम तांत्रिकदृष्ट्या होणे बरोबर नाही. येथे उत्तर चुकीचे दिले याबाबत शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या लक्षात ही बाब का आली नाही. यावर कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांनी समितीस विदित केले की, तांत्रिकदृष्ट्या कामाची पाहणी व मोजमाप पुस्तिकेत नोंद डे टू डे घेतलेली आहे. या कामात सुधारणा करण्यात आलेली आहे. काम प्रगतीमध्ये असून वेळोवेळी कामाची तपासणी केलेली आहे. यावर समितीने प्रश्न विचारला की, प्रशासकीय मान्यतेप्रमाणे सदर काम त्याच चॅनेलमध्ये केले आहे काय? यावर कार्यकारी अभियंता यांनी असे उत्तर दिले की, ज्या कामाची प्रशासकीय मान्यता होती त्याच ठिकाणी काम करण्यात आले.

यानंतर समितीने पुढीलप्रमाणे निदेर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ११८ व १५३ अन्वये प्रस्तावित बांधकामाचे मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे अपेक्षित असताना सदर कामाची लांबी १ किलोमीटर म्हणजे १००० मीटर असून सुधारित अंदाजपत्रकात ८९० मीटर कामाची लांबी दर्शविलेली आहे. तथा प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकेत ८१५ मीटरचे काम केलेले आहे. मूळ अंदाजपत्रकची प्राकलीत किंमत रुपये ११,७५,०००/- असून सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे रुपये १४,५९,८५५/- असून प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिका क्रमांक ८३८६ पान क्रमांक ४९ ते ६० वर रुपये १४,९९,५७९/- एवढे मूल्यांकन केलेले आहे. सदरील काम कमी व खर्च जादा केल्याचे दिसून येते. यासंदर्भातील सूचना दिनांक ३०/८/२०१४ अन्वये केले असता पत्र क्रमांक जिपव/बांध/स्था-२/वशि-५१५/१४ कार्यालय बांधकाम विभाग जिल्हा परिषद वर्धा दि.१६/९/२०१४ व कार्यालयीन पत्र क्रमांक २१६ (ब) दिनांक १९/९/२०१४ अन्वये या संदर्भात पूर्णतः हा अभिलेख तथा समर्पक अभिप्राय सादर न केल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येतो. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीला विदित केले की, ०० ते १००० मीटर यामध्ये ८१५ मीटरचे काम केले आहे. यासाठी प्रशासकीय मान्यता व बांधकाम समितीची मंजुरी घेतलेली नाही. प्रत्यक्षात त्याच रस्त्यावर ८१५ मीटरचे काम केले आहे. यावर समितीने विचारणा केली की, १००० मीटर काम करण्याची प्रशासकीय मान्यता घेतली होती. ते काम पूर्ण का करण्यात आले नाही. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीला विदित केले की, या कामासाठी निविदा काढण्यात आली होती. त्यानंतर पावसाळा सुरू झाला होता. काही भागातील खड्डे भरून रस्ता पूर्ववत करण्यात आला होता. सदर रस्त्यांसाठी डीपीसीतून ३०५४ अंतर्गत निधी देण्यात आला होता.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, १००० मीटरचे काम असताना ८१५ मीटरचेच काम का करण्यात आले आहे. कार्यकारी अभियंता यांनी समितीला विदित केले की, ग्रेड वन ची खडी वापरण्यात आली. साईड कंडिशन पाहून पॅचेस ऐवजी ८१५ मीटर लांबीमध्ये ग्रेड वन खडीचा थर टाकून काम पूर्ण करण्यात आले. ॲटम मध्ये बदल करण्यात आलेला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, तांत्रिक मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आहेत. सदर काम १० लाख रुपयांच्या आतील होते. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेतली होती. प्रशासकीय काम बदलण्याची मंजुरी घेण्यात आली होती काय? यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीला विदित केले की, १००० मीटरचे इस्टिमेट तयार केले होते. तरी देखील ८१५ मीटर रस्ता तयार करण्यात आला आहे. ग्रेड वन च्या मालाची लांबी वाढलेली आहे. त्यामुळे ८१५ मीटर काम केले आहे. १०० ते १५० मीटरचा रस्ता सुस्थितीत होता. यावर समितीने विचारणा केली की, इस्टिमेट तयार करताना १००० मीटरचे का करण्यात आले. ८१५ मीटरचे इस्टिमेट का केले नाही. ठेकेदाराला फायदा व्हावा म्हणून १००० मीटरचे इस्टीमेट केले असून फक्त ८१५ मीटरचे काम प्रत्यक्षात करण्यात

आले आहे. उर्वरित रस्ता चांगला असल्यामुळे त्या मीटरचे काम केले नाही. उर्वरित रस्त्याचे काम जाणुनबजून करण्यात आले नसून कंत्राटदाराचा फायदा करण्यात आला आहे. असा समितीचा आरोप आहे, त्यामुळे संबंधितांच्या पेन्शनमधून ही रक्कम वसूल करण्यात यावी. तत्कालीन ज्युनिअर इंजिनिअर व डेप्युटी इंजिनिअर सेवेत आहेत काय? यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीला विदित केले की, दोघेही सेवानिवृत्त झाले आहेत.

यावर समितीने मत व्यक्त करून निदेश दिले की, मौजा कांढळी प्रभाग, रामनगर ते वायगाव (गो) रस्ता सर्फेस ड्रेसींग करणेबाबत किमी ०/०० ते १/०० या कामास तांत्रिक मान्यता क्र. ३०५४-२२६८/काअ/२०११-०१२ रु. ११,७५,०००/- इतक्या रकमेचे काम आहे. १००० मीटर रस्त्याचे काम असताना ८१५ मीटर इतके काम करण्यात आले. तसेच सदरचे काम २२.०५ टक्के कमी निविदा असताना कमी काम करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या रस्त्याच्या कामाची सविस्तर चौकशी करावी. कामामध्ये अनियमितता झाली असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून नियमाप्रमाणे कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहवाल समितीला सादर करण्याबाबत आश्वासन दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगांव (गो.) रस्ता सर्फेस ड्रेसींग करणेबाबत.—**मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगाव (गो) रस्ता सर्फेस ड्रेसिंग या रस्त्याच्या कामामध्ये अनियमितता झाल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रस्त्याच्या कामाची सविस्तर चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून नियमाप्रमाणे पुढे कोणती कारवाई केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगाव रस्ता सरफेस ड्रेसिंग या कामाची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार कार्यकारी अभियंता, बांधकाम, जि.प. वर्धा यांचे मार्फत करण्यात आलेली आहे. (अहवाल जोडण्यात आला आहे.) सदर कामाचा प्रस्ताव सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत लेखाशिर्ष ३०५४२२६८ मधून ०/०० ते १/०० लांबी अंतर्भूत करण्यात आली होती. त्यानुसार तांत्रिक मान्यता ११/०३/२०१३ ला घेण्यात आली सदर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करून दिनांक २१/०८/२०१३ ला करण्यात आली होती. सदर कालावधीत तांत्रिक मान्यता ते प्रत्यक्षात काम सुरू करण्याचा कालावधीत यामध्ये एक पावसाळा लोटलेला होता. सदर कालावधीत रस्ता अत्यंत खराब झालेला असल्यामुळे तांत्रिक दृष्टीने कामाची पाहणी करून तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी साईड कंडीशन नुसार १ कि.मी. च्या पॅचेस ऐवजी ८१५ मीटर लांबी मध्ये जी आर १ खडीचा (GR-I) थर घेण्याचे निर्देश दिले. त्याप्रमाणे काम पूर्ण करण्यात आले त्यामुळे परिमाणात वाढ झालेली आहे. वाढीव परिमाणास तत्कालीन का.अ. यांनी मान्यता दिलेली आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी २.५६५ कि.मी. (रामनगर ते वायगाव गोंड) होती. (बारचार्ट जोडण्यात आला आहे.) त्यापैकी १३ वा वित्त आयोग मधून ०/८१५ ते २/५६५ कि. मी. रस्ता पूर्ण करण्यात आली. परंतु अंदाजपत्रकाप्रमाणे लांबी १ कि. मी. होती. वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन का.अ. यांचे मंजूर टिप्पणी प्रमाणे पॅचेस ऐवजी GR-I, १ थर देणे आवश्यक होते. त्यामुळे शिल्लक लांबी ८१५ मिटर असल्यामुळे तेवढेच काम करण्यात आले. व रस्ता पूर्ण करण्यात आला.

सदर काम कंत्राटदाराने २२.०५ टक्के कमी दराने घेतलेले असल्यामुळे जरी या कामाची एकूण मूल्यांकन १४,९९,५७९/- एवढ्या रकमेने केले आहे. शोधन केलेले देयकाचे मूल्य हे प्रशासकीय मान्यता किमतीचे आत आहे. सदर कामास सुधारित तांत्रिक मान्यता घेवून तसेच सक्षम प्राधिकारी (का.अ.) यांचे लेखी मान्येतेचे वाढीव परिमाणास मान्यता दिलेली आहे. तसेच त्याप्रमाणे रस्त्याची पूर्ण लांबी २.५६५ कि.मी. पूर्ण करण्यात आला व लोकांच्या हितार्थ व दळणवळणास योग्य झाला.

सदर काम पूर्ण होवून ५ वर्षाचा कालावधी झालेला असून सद्यस्थितीत रस्ता काही ठिकाणी उखडण्यात आला तरी दळणवळणास (Trafficable) योग्य आहे. त्यामुळे सदर कामात अनियमितता झालेली नाही.

त्यामुळे जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कार्यवाही केलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

(१) **सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय.—**अप्राप्त

(२) **ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (बांधकाम-४).—**जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

**पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिनांक ८,९ व १० ऑगस्ट, २०१८ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जुलै, २०१९ व दिनांक १७ नोव्हेंबर २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली, साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की,** मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगांव (गो) रस्ता सर्फेस ड्रेसिंग याबाबत अधिक माहिती द्यावी. यावर विभागीय सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीला विदित केले की, कांढळी प्रभाग रामनगर ते वायगाव (गो) या १ किलोमीटर लांबीच्या रस्त्याला प्रशासकीय मान्यता प्राप्त होती. तांत्रिक मान्यता दिल्यानंतर काम सुरू करण्यावेळी पावसाळा होता. पावसानंतर कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी पाहणी केली. आपल्या प्रोव्हीजननुसार ग्रेड-१ साठी फक्त २० टक्के होते. म्हणजे ४० एमएमचा १ किलोमीटर रस्ता अशी प्रोव्हीजन होती. परंतु रस्ता जास्त खराब असल्यामुळे ८० एमएमचा १०० टक्के लेयर केल्याशिवाय वरील लेयर करून काही उपयोग नव्हता. त्यामुळे कार्यकारी अभियंता आणि उप अभियंता यांनी १ किलोमीटरऐवजी ८१५ मीटर काम केले. यावर सचिवांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, कमी काम करून चांगल्या दर्जाचे केले का?

यावर विभागीय सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी होकारात्मक सहमती दर्शवून असे उक्त विदित केले की, चांगल्या दर्जाचे काम केलेले आहे. ८१५ मीटरचे काम करीत असताना १ लेयर जास्त करण्यात आला. जर १ लेयर जास्त केला नसता तर सर्वच रस्ता खराब झाला असता. कारण प्रोव्हीजन फक्त सर्फेस ड्रेसिंगचीच होती. त्यामुळे सदर कार्यवाही ही रस्ता सुस्थितीत ठेवण्यासाठी करण्यात आली होती, ती मान्य व्हावी. यावर समितीने रस्त्याच्या झालेल्या कामासंदर्भात सचिवांनी यामध्ये कुठल्याही प्रकारची अनियमितता आहे का? यावर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले की, यामध्ये अनियमितता म्हणजे १ किलोमीटरऐवजी ८१५ मीटर काम केले आहे. म्हणजे प्रशासकीय मान्यतेपेक्षा १८५ मीटर काम कमी झाले आहे. परंतु रस्त्याची उर्वरित लांबी अन्य योजनेतून पूर्ण करण्यात आली आहे. यामध्ये जास्त खर्च करण्यात आला नाही. केवळ रस्ता सुस्थितीत राहण्यासाठी अशा प्रकारे कार्यवाही केली आहे, ती मान्य व्हावी.

विभागीय सचिवांकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने होकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करून विचारणा केली की, सदर रस्ता सद्यस्थितीत चांगला आहे का? यावर विभागीय सचिव यांनी पुढीलप्रमाणे विदित केले की, या रस्त्याचे काम होऊन चार वर्षे झाली आहेत. रस्ता थोडा उखडला आहे परंतु दुरुस्त करून घेण्यात येईल. यावर समितीने होकारात्मक सहमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :**

मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगांव (गो) रस्ता सर्फेस ड्रेसिंग करणेबाबतच्या कामाचे आदेश क्रमांक ५८६, दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ अन्वये मक्तेदाराने काम वेळेवर सुरू करणे अपेक्षित असताना दिनांक २४ डिसेंबर, २०१३ पर्यंत या चार महिन्याच्या कालावधीत काहीच काम न करता दि. २५/१२/२०१३ ते २३/०१/२०१४ या २९ दिवसांमध्ये ८२ टक्के काम पूर्ण केलेले असून खडीकरण झाल्यानंतर १ महिन्याने डांबरीकरण करणे आवश्यक असताना तशी कालमर्यादा बाबत कार्यवाही झालेली नसल्याने सदर काम तांत्रिकदृष्टीने योग्य झाले असे म्हणता येत नाही. कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्यांचा प्रयोग शाळेतील तपासणीचा अहवाल प्राप्त करून नंतर कामावर वापर करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात साहित्यांचा चाचणी अहवाल ८२ टक्के पूर्ण झाल्यानंतर दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजी प्राप्त झाला असल्याचे निदर्शनास येते. तसेच सदर कामाची लांबी १ किलोमीटर म्हणजे १००० मीटर असून सुधारित अंदाजपत्रकात ८९० मीटर कामाची लांबी दर्शवलेली आहे. तथा प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकेत ८१५ मीटरचे काम केलेले आहे. मूळ अंदाजपत्रकाची प्राकलीत किंमत रुपये ११,७५,०००/- असताना सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे रुपये १४,५९,८५५/-असून प्रत्यक्षात मोजपाप पुस्तिका क्रमांक ८३८६ पान क्रमांक ४९ ते ६० वर रुपये १४,९९,५७९/- एवढे मूल्यांकन केलेले आहे. म्हणजेच या रस्त्याचे काम कमी व खर्च जादा केल्याचे निदर्शनास येते.

कार्यारंभ आदेश झाल्यानंतर किती काम केले त्याची सर्व नोंद मोजमाप पुस्तिकेत केली जाते. हे संपूर्ण काम शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या १०० टक्के देखरेखीखाली करण्यात येते. असे असताना चार महिन्यात काहीही काम न करता १ महिन्यात साहित्यांचे चाचणी अहवाल प्राप्त झालेले नसताना खडीकरण/डांबरीकरणाचे निकष न पाळता काम पूर्ण केले असल्याने तांत्रिकदृष्ट्या या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. तसेच मूळ अंदाजपत्रकात १००० मीटर रस्त्याच्या कामाची लांबी प्रस्तावित असताना सुधारित अंदाजपत्रकात ८९०

मीटर कामाची लांबी दर्शवलेली असून प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकेत फक्त ८१५ मीटर लांबीचे काम करण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. म्हणजेच उर्वरित १८५ मीटर रस्त्याच्या लांबीचे काम जाणूनबूजून करण्यात आले नसल्याने कंत्राटदाराला त्याचा फायदा झाला असल्याचे समितीचे मत असल्याने या रस्त्याच्या कामाची सविस्तर चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व याबाबतचा केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करावा असे समिती निदेश दिले.

समितीने दिलेल्या निदेशानुसार मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगाव रस्ता सरफेस ड्रेसिंग या कामाची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार कार्यकारी अभियंता, बांधकाम, जि. प. वर्धा यांचे मार्फत करण्यात आलेली आहे. चौकशी अहवालानुसार सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १००० मीटर लांबीच्या रस्त्याचे काम प्रस्तावात अंतर्भूत करण्यात आले होते. सदर कामास दिनांक ११/३/२०१३ रोजी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया पूर्ण करून दिनांक २१/८/२०१३ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले. सदर कालावधीत तांत्रिक मान्यता ते प्रत्यक्षात काम यामध्ये एक पावसाळा लोटलेला होता. यामुळे रस्ता अत्यंत खराब झालेला असल्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी स्थळ पाहणी करून १००० मीटर च्या पॅचेस ऐवजी ८१५ मीटर लांबीमध्ये ग्रेड वन ची खडी वापरून काम पूर्ण करण्यात आले. या रस्त्याची एकूण लांबी २.५६५ कि.मी. (रामनगर ते वायगाव गोंड) होती. १३ व्या वित्त आयोगामधून ०/८१५ ते २/५६५ कि.मी. रस्ता पूर्ण करण्यात आले असून शिल्लक ८१५ मीटर रस्त्याचे काम ग्रेड वन ची खडी वापरून काम पूर्ण करण्यात आले. सदर काम कंत्राटदराने २२.०५ टक्के कमी दराने घेतलेले असल्याने देयकाचे मूल्य हे प्रशासकीय मान्यता किमतीचे आत आहे. सदर कामात अनियमितता झालेली नसल्याने संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

या प्रकरणाबाबत घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले की, अंदाजपत्रकानुसार ४० एमएमचा १ कि.मी. रस्ता होता. परंतु रस्ता जास्त प्रमाणात खराब झालेला असल्याने ८० एमएमचा १०० टक्के लेयर करून काम करणे आवश्यक होते. त्यामुळे १००० मीटर ऐवजी ८१५ मीटर लांबीच्या रस्त्याचे कमी काम करून चांगल्या दर्जाचे काम करण्यात आले आहे. केवळ रस्ता सुस्थितीत राहण्यासाठी अशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली आहे. सदर रस्त्याचे काम होऊन चार वर्षे झालेली असून रस्ता थोडा उखडला आहे. परंतु दुरूस्त करून घेण्यात येईल.

मौजा कांढळी प्रभाग रामनगर ते वायगाव (गो.) रस्ता सरफेस ड्रेसिंग या १००० मीटर रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करून सदर कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतलेली असताना त्यानुसार काम न करता फक्त ८१५ मीटर लांबीचे काम करून १८५ मीटर लांबीचे काम कमी झाले आहे. यासंदर्भात चौकशी करून जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून सादर करण्यात आलेली माहिती व त्या अनुषंगाने सचिवांच्या झालेल्या साक्षीदरम्यान "केवळ रस्ता सुस्थितीत राहण्यासाठी अशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली असून या प्रकरणात कोणतीही अनियमितता झालेली नाही. असे समितीस सचिवांनी विदित केले असले तरी जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियमातील कार्यपद्धतीनुसार काम न करणे हे चुकीचेच असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे.

तसेच कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्यांचा प्रयोगशाळेतील तपासणीचा अहवाल प्राप्त करून घेतल्यानंतर साहित्याचा कामावर वापर करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात साहित्यांचा चाचणी अहवाल ८२ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजी प्राप्त झाला असल्याचे लेखापरीक्षणात नमूद केलेले असतानाही जिल्हा परिषदेकडून समितीस सादर करण्यात आलेल्या माहितीत व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीमध्ये **समितीकडून विचारणा करण्यात आलेली असतानाही याबाबत कोणतेही योग्य ते स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून लोकांच्या हितार्थ व दळणवळणास योग्य होईल यादृष्टीने उखडलेल्या नमूद रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

तसेच ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे उत्कृष्ट दर्जाची होण्यासाठी कामांचा दर्जा व गुणवत्ता ही शासनाने निर्गमित केलेल्या मानकांप्रमाणेच असावित यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम ८७ अन्वये कामाची सुरूवात होण्यापूर्वी त्या कामावर वापरण्यात येणाऱ्या सर्व साहित्यांचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच काम सुरू करण्यात यावे. तसेच उक्त लेखा संहितेतील नियम ११४ अन्वये सुधारित अंदाजांना मूळ अंदाज सुधारण्याची आवश्यकता ज्या परिस्थितीत निर्माण झाली त्या परिस्थितीची संपूर्ण माहिती निवेदनाच्या पुष्टीदाखल जोडण्यात येऊन सुधारित अंदाज मंजूर होईपर्यंत बांधकामाचे अंतिम देयक देण्यात येणार नाहीत. **त्याचप्रमाणे नियम १५३ (१) अन्वये मान्यताप्राप्त अंदाजात दिलेल्या विनिर्देशानुसार बांधकाम काटेकोरपणे पार पाडण्यात येईल आणि प्रत्येक करारनाम्यातील अटी अंमलात येत आहेत याची खात्री करून घेण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता आणि त्यांच्या अधिनस्त अभियंते व संबंधित अधिकारी यांची राहील. या कार्यपद्धतीने यापुढे कामकाज करण्याबाबतच्या सक्त सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, वर्धा

## १३ वा वित्त आयोग जिल्हा परिषद स्तराचे कामाबाबत

**(१) परिच्छेद क्रमांक ३.३२८ (सन २०१३-२०१४)**

| प्र. क्र./दि. रक्कम | (१) १२१/३०.३.१४ रु. ९९९९४०/- प्रथम व अंतिम देयक | १२४/३०.३.१४ रु. ३,३३,३३२/- प्रथम व अंतिम देयक | २९/४.७.१३ रु. ५०,०००/- प्रथम व अंतिम देयक | ५१/५.१०.१३ रु. ३२९६५६/- प्रथम व अंतिम देयक |
|---|---|---|---|---|
| कामाचे नाव | भिवापूर-हेटी प्रा. शाळा दुरूस्ती. | नांचनगाव सि. रस्ता | कोळोणा चोरे प्रा. शाळा कंपाऊड वॉल | बाभूळगांव सि. रस्ता |
| तांत्रिक मंजुरी | १७२/१२-१३ | ९/१३-१४ | ४५/११-१२ | २०/१२-१३ |
| प्रशासकीय मंजुरी | १८/ दि. ३०.०८.१२ | ४९५१/ दि. १७/१०/१३ | १८ दि. ३०.०८.११ | ४ दि. ०८/१०/१२ |
| प्राकलन किंमत | १,००,०००/- | ३,३४,८६१/- | ५०,०००/- | ३,३०,०००/- |
| कंत्राटदार | ग्रां पं कन्नमवार ग्राम | ग्रां पं नांचनगाव | पी. एन. हांडे | ग्रां पं बाभुळगांव |
| कार्यादेश क्र. दि. | दि. ०५/१२/१२ मुदत ६ महिने | ८३/ दि. ६.१.१४ मुदत ३ महीने | २४/१२/१२ मुदत ३ महीने | दि. ६.६.१३ मुदत ३ महीने |
| करार नामा | २१०/५.१२.१२ | ३३२/६.०१.१४ | २३१/२६/१२/१२ | ३५/०६.०६.१३ |
| मोजमाप पुस्तीका | ३०९९/ पा.क्र. ६३,६७ | ४१३९/ पा. क्र. ४३ ते ४५ | ३११४/ पा. क्र. ९१ ते ९७ | ४४२७/ पा. क्र. ११ ते १९ |
| सी. सी. | दि. ३०.०५.१३ | २७.०३.१४ | १८.०३.१३ | ३०.०८.१३ |

बांधकाम विभाग जि. प. वर्धा चे सन २०१३-१४ चे लेखापरीक्षणात १३ व्या वित्त आयोगाच्या उपरोक्त प्रमाणकान्वये केलेल्या बांधकामाच्या रक्कमेचे शोधन केले आहे. त्यावर खालील अभिप्राय आहे.

(१) संदर्भित प्र. क्र. १,२,३,४, मध्ये नस्तीसोबत कामगारांचा विमा उपलब्ध नाही.

(२) संदर्भित प्र. क्र. १,२,३, व ४ मध्ये विम्याची १% रक्कम कपात केली नाही.

(३) संदर्भित प्र. क्र. १,२, व ४ मध्ये ग्राविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्र. झेडपिए प्र.क्र. १८६४/१३ दि. १४/११/९६ नुसार ग्राम पंचायत आर्थिक द्रष्ट्या सक्षम असल्याबाबत सदर प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

(४) संदर्भित प्र. क्र. ४ मध्ये प्रशासकीय मंजुरी ३ लक्षची असतांना तांत्रिक मंजुरी रु. ३.३० लक्ष ची देण्यात आली.

(५) संदर्भित प्र. क्र. ३ मध्ये करारनाम्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नाहीत.

(६) संदर्भित प्र. क्र. ४ मध्ये प्रशासकीय मंजुरी क्र ८१ दि. १४.०२.१३ मध्ये संदर्भ जि. प. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४, दि. ०८/१०/२०१३ चा असतांना पत्रावरील जावक क्र. दि. १४.०२.१३ चा आहे.

सदरील मुद्देनिहाय बाबी संदर्भात अभिलेख सादर करणे व अभिप्राय सादर करण्यास अर्धसमास पत्र २९२, दि. २६, २९/०८/२०१४ अन्वये सुचित केले असता पत्र क्र. जिपव/बांध./स्था-२/वशि-५१५/१४ कार्या. बांधकाम विभाग जि.प. वर्धा, दि. १६/०९/२०१४ व कार्यालयीन पत्र क्र. २१६ (ब) दि. १६/०९/१४ अन्वये या संदर्भात पुर्ण:त अभिलेख तथा समर्पक अभिप्राय सादर न केल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येतो.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा, यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) संदर्भित प्र.क्र. १ व प्र.क्र. २ चे काम अनुक्रमे भिवापूर हेटी ता. कारंजा प्रा. शाळा दुरूस्ती करणे येथील काम ग्रां. प. कन्नमवारग्राम यांनी स्वतः केलेले आहे व ग्राम. प. नाचंनगाव, ता. देवळी यांनी स्वतः केलेले आहे. गावातील कामगारांमार्फत काम केलेले आहे. त्यामुळे ग्राम पंचायत ने कामगारांचा विमा काढलेला नाही.

प्र.क्र. ३ चे काम-कोळोना चौरे प्रा. शाळा कंपाऊंड वॉल बांधणे हे काम श्री. पी. एन. हांडे या कंत्राटदाराने केलेले असून, त्यांनी सदर काम निविदेने केलेले आहे. त्यामुळे कामगारांचा विमा काढलेला नाही.

प्र.क्र. ४ चे काम बाबुळगांव सिमेंट रस्ता बांधकाम करणे हे काम ग्राम पंचायत बाबुळगांव यांनी स्वतः केलेले असल्यामुळे या कामासाठी कामागारांचा विमा काढलेला नाही.

मजूर सहकारी संस्था मार्फत काम केलेले असल्यास कामागारांचा विमा म. स. संस्थेमार्फत काढण्यात येते. सदर प्रकरणी ग्रा. पं. यांनी स्वतः अस्थायी मजुर लावून कामे केलेले असल्यामुळे कामगाराच्या विम्याची आवश्यकता नाही. परंतु प्रकरण क्र.३ चे काम कंत्राटदाराने केलेले असल्यामुळे देयकातून १ टक्का विमा रुपये ५००/- कपात केलेली आहे.

(२) संदर्भित प्र. क्र. १,२,४, मधील कामे ग्रा प. ने स्वतः केलेले होते. लोकलेखा समितीचा मुददा क्र. ३.९.६.१ नुसार ग्राम पं. च्या कामांच्या देयकातून प्राप्तीकर, विक्रिकर, विमा आकार प्रतिभुती ठेव इत्यादी वजावटीची आवश्यकता नाही असे नमूद केलेले आहे. तसेच जि.प. वर्धा बांधकाम विभाग परिपत्रक क्र. जिपव/बांध/लेखा/निलि/वशि-१५५/२०१३ दि. ०१/०४/२०१३ अन्वये वैधानिक कपाती ग्राम. पंचायत यांची राहील असे नमूद केलेले आहे. त्यानुसार विभागाने ग्राम पंचायतच्या देयकातून विमा रक्कम कपात केलेली नाही.

तसेच प्रकरण क्र. ३ चे काम कंत्राटदाराने केलेले असल्यामुळे देयकातून १ टक्का विमा रुपये ५००/- कपात केलेली आहे. करिता खुलासा मान्यतेस सादर.

(३) ग्रा.वि.व ज सं. विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/वित्त-९ (३३) मंत्रालय, मुंबई दि. ०९ फेब्रुवारी २००९ चे शासन निर्णयानुसार रु. १०.०० लक्ष चे आतील कामे ग्रा. प. ने करण्यासाठी ग्रा. प. च्या उत्पन्नाची मर्यादा रु. ५०,०००/- चे आत दिलेली आहे. यानुसार संबंधित ग्राम पंचायतच्या अंदाजपत्रकाची तपासणी करून, ग्राम पंचायत काम करण्यास सक्षम असल्यामुळे ग्रा. पं. चे ठरावानुसार ग्रा. पं. यांना कामे दिलेली आहेत त्यामुळे गट विकास अधिकारी यांची प्रमाणपत्रे घेण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रशासकीय मान्यता रुपये ३.०० लक्ष व रुपये ३००००/- ते लोकवर्गणीचे माध्यमातून ग्रा. पं. बाभूळगाव यांनी धनादेश क्र. ४६०६४० दि. १७.०५.२०१३ अन्वये जमा केलेले होते. त्यामुळे का. अ. यांनी रुपये ३.३० लक्षास तांत्रिक मान्यता प्रदान केली व त्यानुसार काम करण्यात आले.

(५) कामे करण्यास नियमानुसार दोन पक्षात करारनामा करण्यात येतो. एक सरकारी/ निम सरकारी पक्ष असून, करारनामा कंत्राटदार व कार्यालय प्रमुखांचे स्वाक्षरीने झालेले आहे. करारनाम्यात कामाची किंमत/ मुदत/ अंदाजपत्रकीय किंमत व करारनाम्याच्या अटी व शर्ती नुसार काम करून देण्याबाबत STAMP PAPER वर लेखी वचन दिलेले असते. त्यामुळे खरेदी विक्रिच्या व्यवहाराप्रमाणे दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीची आवश्यकता वाटत नाही. सदर करारनामा विशिष्ट वेळेपर्यंत मर्यादित असते. काम पूर्ण झाल्याबरोबर व कामांची देयके अदा होऊन करारनाम्याचे दायित्व संपल्यानंतर करारनामा आपोआप संपुष्टात येते. प्रत्येक कामाचा करारनामा वेगवेगळा करण्यात येतो.

(६) सदर कामाची प्रशासकीय मान्यता क्र. ८१, दिनांक १४/०२/२०१३ मध्ये झालेली आहे. जि. प. सर्वसाधारण सभा दि. ०८/१०/१२ रोजी झालेली असून, विषय क्र. ४ व ठराव क्र. ४ अन्वये जि. प. सर्वसाधारण सेभेने मान्यता दिलेली आहे. नजर चुकीने दि. ०८/१०/२०१३ अशी तारीख नमूद केलेली आहे. करीता खुलासा मान्यतेस सादर (ठरावाची प्रत संलग्न)

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०८ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांना विचारणा केली की, १३ व्या वित्त आयोगांतर्गत जिल्हा परिषद स्तरावरील कामांच्या संदर्भात कामगारांचा विमा न काढण्याचे कारणे काय आहेत. अशा किती प्रकरणांमध्ये कामगारांचा विमा काढण्यात आलेला नाही, सद्य:स्थितीत कामाच्या संदर्भात कामगारांचा विमा काढला जातो काय, कामगारांचा विमा देयकाच्या वेळी काढण्यात येतो की वर्क ऑर्डरच्यावेळी काढण्यात येतो? यावर कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी विदित केले की, कामगारांचा विमा बिलाच्यावेळी काढण्यात येतो. समितीने काम करताना अपघात झाला आणि त्यामध्ये कामगाराचा मृत्यू झाला त्याचा विमा काढला नसेल तर त्याला विम्याचे पैसे मिळतील काय? काम सुरू करण्यापूर्वी कामगारांचा विमा काढला पाहिजे, ग्रामविकास विभागाचे अधिकारी प्रत्येक दौऱ्यावर उपस्थित असतात तेव्हा या संदर्भात ग्रामविकास विभागाने परिपत्रक किंवा शासन निर्णय निर्गमित केला आहे काय? कामगारांचा विमा देयकाच्या वेळी काढण्यात येतो यासंदर्भात संचालक, स्थानिक निधी लेखा यांचे काय मत आहे? यावर संचालक स्थानिक निधी लेखा यांनी स्पष्ट केले की, हा आक्षेप सन २०१२-२०१३ मधील आहे. वर्क ऑर्डर देण्यापूर्वी विमा काढण्याबाबतचे आदेश घेण्यात येतील असे सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले होते. समितीने संचालक, स्थानिक निधी लेखा यांना सूचना केली की, लेखापरीक्षणाचे काम करताना अशा काही बाबी आपल्या निदर्शनास आल्यास आपण त्यामध्ये सुधारणा सूचविली पाहिजे. तद्नंतर समितीने कार्यकारी अभियंता यांना विचारणा केली की, अंदाजपत्रकामध्ये विम्याची तरतूद केली जाते काय? अंदाजपत्रकामध्ये विम्याची तरतूद केली जात नाही असे कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी स्पष्ट केले.

समितीने निदेश दिले की, विम्याचे पैसे काम सुरू करण्यापूर्वी वेळेत भरण्यात यावे. या संदर्भात समितीने अेटीएसवर साक्ष घेताना नाराजी दर्शविली होती. याबाबत विभागाकडून कार्यवाही करण्यात यावी. कामगारांचा मृत्यू झाल्यानंतर विमा काढणार काय? वास्तविक मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी देयक अदा करण्यापूर्वी आक्षेप घ्यावयास पाहिजे होता. गाडीचा विमा संपल्यावर गाडीला अपघात झाल्यास त्याचे पैसे मिळतील काय? या संदर्भात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. १३ व्या वित्त आयोग जिल्हा परिषद स्तरावरील कामाच्या संदर्भात काम सुरू होण्यापूर्वी कामगारांचा विमा काढण्याची गरज असताना काम झाल्यावर विम्याचे पैसे देणे ही गोष्ट योग्य नाही. वर्धा आणि इतर सर्वच जिल्हा परिषदांमध्ये अशा पद्धतीनेकाम सुरू आहे. राज्यातील सर्वच जिल्हा परिषदांनी काम झाल्यानंतर विम्याचे पैसे भरले असतील तर विमा कंपनीकडून ते पैसे परत घ्यावेत आणि राज्याचा महसूल वाढवावा. अशा चुकीच्या पद्धतीने विमा कंपनीकडे करोडो रुपये जमा होऊन विमा कंपन्या सक्षम होत आहेत. अशाप्रकारे किती कामांचे पैसे दिलेले आहेत त्याची सविस्तर माहिती घ्यावी. या संदर्भात वित्त विभाग, ग्रामविकास विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेण्यात येईल.

समितीने कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांना विचारणा केली की, करारनाम्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या का घेण्यात आल्या नाहीत? या विषयासंदर्भात काही न्यायालयीन प्रकरण (कोर्ट मॅटर) झाले तर आपली बाजू कोण मांडणार आहे? आपण यामध्ये सुधारणा केली पाहिजे. यावर कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, यापुढे साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येतील.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**१३ व्या वित्त आयोग जिल्हा परिषद स्तराचे कामाबाबत.—**संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषद स्तरावर १३ व्या वित्त आयोगांतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे विम्याचे पैसे कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित विमा कंपनीला देण्यात आल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच कामे पूर्ण झाल्यानंतर विमा कंपन्यांचा विम्याचा दिलेला हप्ता वसूल करण्यात आला आहे काय, असल्यास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर प्रकरणी चौकशी केलेली असून जिल्हा परिषद स्तरावर १३ व्या वित्त आयोग व इतर निधीमधून घेण्यात आलेल्या कामांचे देयकातून शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दिनांक ०८ सप्टेंबर, २०१० नुसार तसेच कंत्राटी कामाचा व ते काम पूर्ण करण्याकरिता नियुक्त केलेल्या कामागारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्याची कार्यपद्धती बाबतचे परिपत्रानुसार जिल्हा परिषद, वर्धा या कार्यालयाकडून कार्यवाही केलेली आहे. कंत्राटी कामांचे देयकातून १ टक्का दराने कपात करून शासकीय विमा संचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून धनादेशाव्दारे रकमेचा भरणा केलेला आहे. त्यामुळे राज्य शासनाचे महसुलात वाढ झालेली आहे. (कंत्राटी कामांच्या विम्याच्या धनादेशाव्दारे भरणा केल्याबाबतचे पत्र सोबत जोडलेले आहेत. तसेच विमा उपसंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र व परिपत्रक सोबत जोडलेले आहेत.)

इतर कोणत्याही खाजगी विमा कंपनीला विम्याची रक्कम दिलेली नाही. शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही केल्याने जबाबदारी निश्चित करून कार्यवाही केलेली नाही. खाजगी विमा कंपन्यांना विमा रक्कम भरलेली नाही. त्यामुळे विम्याचा हप्ता वसूल करण्यात आलेला नाही.

कंत्राटी कामाचा विमा काढणेबाबत जि.प.वर्धा यांनी विमा परिपत्रक क्र./बांधकाम विभाग/लेखा/जा.क्र.२२३०/२०१९, दिनांक ६/५/२०१९ अन्वये काढलेले असून यापुढे कंत्राटी कामाचा व ते काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामागाराचा विमा शासकीय विमानिधीकडे काढल्याशिवाय कामास सुरूवात करण्यात येणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**वित्त (३) जिल्हा परिषद, वर्धा यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक सुस्पष्ट माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, १३ व्या वित्त आयोगांतर्गत संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषद स्तरावरील कामांच्या विम्याचे पैसे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित विमा कंपनीला देण्यात आले आहे. यामध्ये अगोदर काम केले जाते व नंतर विम्याचे पैसे दिले जातात, अशा प्रकारची विसंगती आहे. सदरहू विसंगती दूर करण्याची समितीने सूचना केली होती. या संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली आहे? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पंचायती राज समितीने दौऱ्याच्या वेळी निदर्शनास आणून दिल्यानंतर आम्ही कार्यकारी अभियंता यांनी वर्क ऑर्डर दिल्यानंतर विम्याची रक्कम जमा करून घेण्याचे बंधनकारक केले आहे. जोपर्यंत कंत्राटदार विमा भरल्याची पावती सादर करीत नाही तो पर्यंत त्याला ले-आऊट देता कामा नये, अशा प्रकारची सुधारणा केली आहे. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या सुधारणेवर समितीने होकारार्थी सहमती दर्शविली.

तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस अधिकची माहिती विदित केली की, जी कामे केली जातात ती जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत स्तराच्या माध्यमातून केली जातात. या बरोबरच सहकारी सोसायटी, सुशिक्षित बेरोजगार अभियंता आणि कंत्राटदार यांच्यामार्फत कामे केली जातात. तसेच ग्रामपंचायत सुद्धा स्वतः काही कामे करते. ज्या ठिकाणी कामगाराचा प्रश्न येतो त्या ठिकाणी कामगाराचा आणि कामाचा विमा काढावा लागतो. विमा काढला नसेल आणि एखादी नैसर्गिक आपत्ती आली तर तेथे करण्यात आलेले काम पूर्णतः वाया जाते. या बाबतीत कायद्यामध्ये तरतुदी आहेत. तसेच २०१० मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या शासकीय विमा निधीबाबतचे संदर्भ आहेत. त्यानुसार २५ लाख रुपयापर्यंतचे काम असेल तर विम्याची १ टक्का रक्कम कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून वसूल करता येईल. परंतु या रकमेपेक्षा जास्त रकमेचे काम असेल तर सर्वसाधारणपणे अग्रीम स्वरुपात विम्याची रक्कम जमा केल्यानंतरच कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देण्यात यावा. जेणेकरून भविष्यात येणाऱ्या अडचणी उद्भवणार नाही. बहुतांश मोठ्या रकमेच्या कामांच्या बाबतीत अडचणी येतात. या दृष्टिकोनातून विम्याची रक्कम अगोदर जमा करून घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही केली पाहिजे. तसेच दुसरी बाब अशी की, काम पूर्ण झाल्यानंतर विम्याची रक्कम जमा केली जाते. वास्तविक ऑडीट मुद्दा आल्यानंतर विम्याची रक्कम जमा करून घेतली जाते. परंतु त्याचा काहीच रिलीव्हन्स राहत नाही. उदाहरणार्थ २०१५-१६ वर्षाचा अहवाल आहे आणि २०१७-१८ या वर्षात पंचायती राज समिती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्यामुळे २०१९ मध्ये विम्याची रक्कम भरून घेतली तर त्या वेळी कामाचा दोषदायित्व कालावधी सुद्धा संपून गेलेला असतो. केवळ ऑडीटला मुद्दा आल्यामुळे विम्याच्या रकमेचा भरणा केला जातो. ही परिस्थिती उद्भवू नये म्हणून अग्रीम स्वरुपात विम्याची रक्कम जमा करणे आवश्यक वाटते.

**अभिप्राय व शिफारशी :**

**बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत १३ व्या वित्त आयोगामधून (१) भिवापूर-हेटी प्राथमिक शाळा दुरूस्ती, (२) नांचनगाव सि. रस्ता, (३) कोळोणा चोरे प्राथमिक शाळा कंपाऊड वॉल व (४) बाभूळगांव सि. रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. या कामांच्या नस्तीसोबत कामगारांचा विमा उपलब्ध नाही, विम्याची १ % रक्कम कपात केली नाही, प्र.क्र. १, २ व ४ मध्ये या कामांच्या संदर्भात ग्रामपंचायत आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र नस्तीमध्ये नाही, बाभूळगाव सि. रस्त्यास प्रशासकीय मंजुरी ३ लक्ष असताना तांत्रिक मंजुरी रु. ३.३० लक्षाची देण्यात आली. तसेच कोळोणा चोरे प्राथमिक शाळा कंपाऊड वॉल या कामाच्या करारनाम्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नाहीत.**

**या आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून समितीस सादर करण्यात आलेल्या खुलाशात व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, उपरोक्त नमूद केलेले प्र.क्र. १, २ व ४ मधील नमूद करण्यात आलेले काम ग्रामपंचायतींनी स्वतः गावातील कामगारामार्फत केलेले असल्याने कामगारांचा विमा काढलेला नाही. तसेच प्र.क्र. ३ मध्ये नमूद केलेले काम कंत्राटदारामार्फत निविदेने केलेले असल्याने देयकातून १ टक्का विमा रुपये ५००/- कपात केलेली आहे. ग्रामपंचायत काम करण्यास सक्षम असल्याचे ठरावानुसार ग्रामपंचायतींना काम दिलेली असल्याने गट विकास अधिकारी यांची प्रमाणपत्रे देण्यात आलेली नाही. प्र.क्र. ३ मधील कामाच्या करारनाम्यात अटी व शर्तीनुसार काम करून देण्याबाबत स्टॅम्प पेपर वर लेखी वचन दिलेले असल्याने साक्षीदारांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाहीत. प्र.क्र. ४ मधील रुपये ३ लक्षाची प्रशासकीय मान्यता असलेल्या कामासाठी रुपये ३०,०००/- लोकवर्गणीच्या माध्यमातून जमा केलेली असून त्यानुसार तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या विभागातर्फे देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामाचा व ते काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामागारांची विमा रक्कम कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून कपात करण्यात येते.**

**वास्तविक, विहित वेळेत विमा न उतरवता विमा रक्कम कपात केल्याने यामध्ये विमा कंपनीचा फायदा होतो. कामाचे कार्यारंभ आदेश देऊन काम सुरू झाल्यानंतर कंत्राटदाराच्या प्रथम देयकामधून विमा रक्कम कपात केल्यास व त्या दरम्यान एखादी दुर्देवी घटना घडल्यास संबंधितांना विम्याचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे विमा उतरवण्याचा उद्देश सफल होणार नाही. तसेच कामाच्या करारनाम्यावर साक्षीदाराच्या स्वाक्षरी न घेतल्यास व सदर प्रकरण काही कारणास्तव न्यायालयात गेल्यास शासनाची बाजु मांडण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने करारनाम्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. यासाठी या दोन्ही विषयांसंदर्भात सुधारणा करण्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्याचे निदेश समितीने दिले. त्यानुसार कोणत्याही कामाच्या करारनाम्यावर यापुढे साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येतील असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासित केले. तसेच कंत्राटी कामाचा व ते काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगाराचा विमा शासकीय विमानिधीकडे काढल्याशिवाय कामास सुरूवात करण्यात येणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिनांक ०६/५/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून कळविण्यात आले.**

या प्रकरणाबाबत घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीने निदर्शनास आणले की, "राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत विविध बांधकामे, इमारती, रस्ते, पाणीपूरवठा योजना व जलसंधारणाची कामे त्याचप्रमाणे पंचायत समित्या व ग्रामपंचायती अंतर्गत करण्यात येणारी कामे कंत्राटदाराकडून करण्यात येतात. कंत्राटी कामाचा व ते काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांच्या विम्याची रक्कम प्रथम देयकातून कपात करण्यात येते अथवा लेखापरीक्षणात लेखापरीक्षकाने विमा संदर्भात मुद्दा काढल्यानंतर काम पूर्ण झालेले असताना विम्याची रक्कम अदा करण्यात येते. या कार्यपद्धतीनुसार अनेक जिल्ह्यांमध्ये काम करण्यात येत आहे. यामध्ये कामाचा दोषदायित्व कालावधी समाप्त झालेला असल्याने या उतरविण्यात आलेल्या विम्याचा काहीही उपयोग न होता विमा कंपनीचा फक्त फायदा होतो".

कंत्राटदारास २५ लाखापर्यंतचे काम देण्यात आलेले असेल तर कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून विमा रक्कम कपात करण्यात येते. २५ लाखापेक्षा अधिक रकमेचे काम कंत्राटदारास देण्यात आले असेल तर कंत्राटदाराने विमा उतरविल्याचा पूरावा म्हणून स्विकारपत्र/विमापत्र सादर करणे आवश्यक आहे अन्यथा त्याच्या प्रथम देयकातून विमा रक्कम कपात करण्यात येते. सदर रक्कम ३० दिवसाच्या आत विमा संचालनालयास हस्तांतरीत करण्यात येते. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तराच्या माध्यमातून तसेच सहकारी सोसायटी सुशिक्षित बेरोजगार अभियंता आणि कंत्राटदार यांच्यामार्फत बांधकामाची कामे करताना कामाचा व तेथील कामागारांचा विमा उतरविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते परंतु काही कामे स्वतः ग्रामपंचायत करत असताना विमा उतरविण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत नाही.

**वास्तविक, कोणतेही काम २५ लाखांपर्यंत असेल किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचे असेल, तसेच सदरहू काम कंत्राटी पद्धतीने कंत्राटदारामार्फत करण्यात येत असेल, अथवा ग्रामपंचायतीकडून स्वतः करण्यात येत असेल यामध्ये प्रत्येक ठिकाणी कामगारांचा प्रश्न येत असल्याने या कामगारांचा व उक्त कामाचा विहित वेळेत विमा उतरवून विम्याची रक्कम जमा न केल्यास एखादी नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास जिवीतहानीसह संपूर्ण काम पूर्णतः वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी शासनाकडून करण्यात येत असलेले प्रत्येक काम कितीही रक्कमेचे असो, कोणत्याही यंत्रणेमार्फत करो, या प्रत्येक कामाचा विमा सदरहू कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर काम सुरू होण्यापूर्वी उतरविण्यात यावा व विमा रक्कम त्याच कालावधीत विमा संचालनालयाकडे जमा करण्याची कार्यपद्धती राबविण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करत आहे.**

तसेच शासकीय/निमशासकीय विभाग महामंडळे व सार्वजनिक उपक्रम संस्था मधील विमा विषयक व्यवहार शासनाच्या नियंत्रणाखाली व मार्गदर्शनानुसार सुरळीतपणे पार पाडावेत यासाठी शासकीय विमा निधीची स्थापना करण्यात आली असून सर्व कामागारांचा व कामांचा विमा उतरविण्या संदर्भातील व्यवहार विमा संचालनालयाकडेच करण्याबाबतचे शासनाने बंधनकारक केले असल्याने याव्यतिरिक्त अन्य विमा कंपन्यांकडून घेतेलेली विमापत्रे स्वीकारण्यात येऊ नयेत व शासकीय विमा निधीकडे विमा काढल्याशिवाय काम सुरू करू नये याबाबतचे काटेकोरपणे पालन करण्याच्या स्पष्ट सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात याव्यात. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करत आहे.

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, वर्धा

## साठवण तलाव सोरटा तसेच साठवण बंधारा बेलगांव येथील बांधकामात आढळून आलेली अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.५६६ व ३.५६७ (सन २०१३-२०१४)**

शेड्यूल बी मध्ये नमूद दरात खोडतोड करण्यांत येऊन कंत्राटदारास जादा रक्कम प्रदान करण्यांत आली आहेत. जिल्हाधिकारी/उपजिल्हाधिकारी यांचे मार्फत भुमी अधिग्रहण केल्याचे आदेश सादर करण्यांत आले नाही. सिमेंट खरेदी करण्याकरिता पुलगांव जवळ असतांना वर्धा येथून खरेदी करण्यांत आली आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक ३१ डिसेंबर २००९ अन्वये जाहिराती करिता देण्याकरिता नमूद असलेल्या वुत्तपत्र वर्गाचे पालन करण्यांत आले नाही. शासन निर्णय कं.लपायो १०९९/प्र.क.३४७/जल/मंत्रालय मुंबई ४०००१२ दिनांक ३१ जुलै २००० नुसार पाणी वापर संस्थेची नोंदणी करण्यांत आलेली नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास परिपत्रक दिनांक ३०.०६.२००६ नुसार साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक असतांना कार्यवाही केलेली नाही.

जि.प वर्धा लघुसिंचन विभागाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील प्रमाणकान्वये रोख पुस्तकात खर्च नोंदविण्यासाठी सदर कामाची पुढील प्रमाणे प्रक्रिया करण्यांत आली.

प्रशासकीय मंजुरी - अति.मु.का.अ.जि.प.वर्धा यांचे आदेश क्र. २१ दि.१६.१२.२०१० अन्वये

तांत्रिक मंजुरी - कार्यकारी अभियंता जि. प. लघुसिंचन विभाग, वर्धा यांचे आदेश क्र. ४३ दि.२२.११.२०१० अन्वये रु.१८,०१,७२०/-

तांत्रिक मंजुरी - कार्यकारी अभियंता जि. प. लघुसिंचन विभाग, वर्धा यांचे आदेश क्र. ११४(सुधारित) दि.२९.०३.२०१३ अन्वये रु.१३,१०,९७२/

कंत्राटदाराचे नांव - मे. जय बालाजी कंस्ट्रक्शन वर्धा

करारनरामा क्रमांक - बी-१/जिवायो सा.न/१८ दि.२२.०२.११ अन्वये १७,५३,६८५/-

कार्यारंभ कं. दिनांक - क्र. १२४ दिनांक २२.०२.११ अन्वये कालावधी ११ महिने

मोजमाप पुस्तिका कं - २७५४ वर पान कं. ७८ ते ८९

अंतिम मूल्यांकन - १३१०९७२/-अे२.८० टक्के जादा रु. ३६७०७/- रु. १३.४७.६७९/-

काम पूर्ण दिनांक - दिनांक २०.०१.१२

अंतिम देयक - प्रमाणक कं. ८७८/दि.३१/०३/१२ रुपये ७,८२,८०६/- (कपाती वगळता) प्रमाणक कं. ४५ दि.८.०५.१३ रुपये ४६,६४३/- (कपाती वगळता)

त्यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

(१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा यांनी वृत्तपत्रात निविदा प्रसिद्ध करण्याबाबत सूचना दि. १०.०१.११ रोजी देण्यांत आल्या आहेत. त्या अनुषंगाने एकूण ५ निविदा प्राप्त करण्यांत आलेल्या आहेत. त्यात तुलनात्मक तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मे. जय बालाजी कंस्ट्रक्शन वर्धा २.८० टक्के जादा दर कमी असून त्यांस मंजुरी देण्यांत आल्याचे दिसून येते. तथापि प्राप्त ५ निविदा धारकाच्या बी-१ शेड्यूलची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, त्यात मे शिवशक्ती कंस्ट्रक्शन, वर्धा यांचे बी-१ फॉर्म शेड्यूलमध्ये नमूद दर प्रत्यक्षात १.८० टक्के जादा असून त्यात खोडतोड करूनप ५.२० टक्के करण्यात आले आहेत त्यावर कंत्राटदाराची स्वाक्षरी सुद्धा घेण्यात आली नाही व हस्ताक्षरात सुद्धा फरक आढळून येतो. त्याप्रमाणे तुलनात्मक तक्त्यावर सुद्धा कंत्राटदाराची स्वाक्षरी आली नाही. तसेच सदर बाबत अर्धसमास पत्रान्वये विचारणा केली असता समाधानकारक उत्तर देण्यांत आले नाही. त्यामुळे सदर बाबीवरून निदर्शनास येते की, में जय बालाजी कन्स्ट्रक्शन वर्धा यांना १.०० टक्के (२.८०-१.८०) जादाची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहेत. तरी संबधिताकडून रक्कम रुपये १३११०/- (रु. १३४७६७९, रु. १३३४५६९) वसूल होणे आवश्यक आहे.

(२) सदर साठवण तलावासाठी जमीन अधिग्रहण केल्याचे दस्तऐवजाची नस्तीत तपासणी केली असता. त्यात फक्त भुमापन कं. ४०३ व ४ चा चा सात बारा आढळून आला असून तो महाराष्ट्र सरकारच्या नांवे आहेत. परंतु महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद कं. २५१ नुसार कोणत्याही प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीचे जिल्हाधिकारी उप जिल्हाधिकारी यांचेमार्फत अधिग्रहण केल्याचे आदेश सादर करण्यांत आले नाही त्यामुळे सदर जमीन अधिग्रहण करण्यांत आल्याचे निष्पन्न होत नाही.

(३) सदर कामाकरिता वापरण्यांत आलेल्या मटेरियल करीता प्राकलन नमूद लीडची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की. लीड विवरणात सिमेंट बॅग ही ३५ कि.मी. वरून वर्धा येथे खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते. परंतू स्टील खरेदी ही १५ कि. मी. येथे पुलगांव वरून करण्यात आली आहेत. त्याबाबत असे की, पुलगांव येथे सिमेंट उपलब्ध होत असतांना वर्धा येथून सिमेंट खरेदी केल्याने वहनावळाची २० कि.मी. ची रक्कम जादा प्रदान केली आहे. त्यात सदर सिमेंट चा वापर एम-१० व एम-१५ या बाब मध्ये करण्यांत आला आहे. त्यानुसार मोजमाप पुस्तिकेत बाब कं. ५ मध्ये एम-१० मध्ये रुपये १२१/-(७.०३ क्यु.मी.गु.रु.१७.२२) व बाब कं. ६ मध्ये एम-१५ मध्ये रुपये १८९९/-(८५.९८ क्यु.मी.गु.रु.२२.०९) असे एकूण रुपये २०२०/- जादा प्रदान करण्यात आले आहे. सदर जादा प्रदानाकरिता अर्धसमास पत्र क्रमांक ७ दि. ५.९.२०१४ ला देण्यात आले. परंतू त्याचे समाधानकारक उत्तर देण्यांत आले नाही.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णयक झेडपी २००६/ प्र.क.३६६/ बिलू-९ मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक ३१ डिसेंबर २००९ अन्वये कामाचे मूल्य रु. ५ लाखाच्यावर तं ५० लाखापर्यंत आहे. अशा खर्चाची कामे ही जिल्हा स्तरावरील असल्यास ब वर्ग दैनिक व क वर्ग साप्ताहिक मध्ये जाहीरात देण्यात यावी असे असताना क वर्ग दैनिक मध्ये जाहिरात देण्यात आली आहेत.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय कं. लपायो १०९९/प्र.कं.३४७/ जल.१ मंत्रालय मुंबई-४०००१२ दिनांक ३१ जुलै २००० नुसार मुद्दा कं. १ नुसार पूर्ण झालेल्या साठवण तलाव योजनेच्या लाभक्षेत्रातील एकत्र येऊन योजनेच्या सिंचन व्यवस्थापन. देखभाल व दुरुस्तीसाठी लाभधारकाच्या सहकारी पाणी वापर संस्थेची स्थापना करावी असे नमूद आहेत. परंतू त्या प्रमाणे कार्यवाही करण्यांत आल्याचे निदर्शनास आले नाही.

(६) मोजमाप पुस्तिकेत बाब कं. २ व ३ नुसार एकूण २०३६.५७ क्यु. मी. खोदकाम नोदविण्यात आले आहेत. त्याने एकूण उपयोगात आणलेले खोदकामाचे मटेरियल ९४६.६० क्यु.मी. असल्याचे मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आले आहेत. त्यामुळे एकूण शिल्लक मटेरियल १०८९.९७ क्यु.मी. असून त्यात मोजमाप पुस्तिका पान क्र. ७६ वर नॉट युजफुल मटेरियल म्हणून ४५५.८८ क्यु.मी. असे नमूद आहे. तरी उर्वरित मटेरियल ६३४.०९ क्यु.मी. चा वापर करण्यांत आलेला नाही. त्यामुळे सदर मटेरियलची रक्कम कंत्राटदाराच्या रक्कमेतून वजा करणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(७) प्रथम धावत्या देयकातून चाचणी अहवालाची रक्कम रु. ३००००/- कपात करण्यात आली असली तरी सदर रक्कमेवर राऊंड करण्यांत येऊन रक्कम रिलीज करण्यांत आली आहेत. सदर कामासाठी सिमेंट, गिट्टी, रेती, रबर व इतर यांचा वापर करण्यांत आलेला आहे. तरी महाराष्ट्र शासन ग्रामविकास परिपत्रक क्र. साहीत्य/१०९९/प्र. कं./६५/३५ मंत्रालय मुंबई दिनांक ३०.०६.२००६ नुसार बांधकामासाठी वापरलेल्या साहीत्याची शासकीय प्रयोग शाळेतून तपासणी असतांना कार्यवाही केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मे.शिवशक्ती कंस्ट्रक्शन वर्धा यांचे निविदेच्या पान कं.१३ वर ५.२० टक्के दर नमूद असून त्यावर कार्यकारी अभियंता यांनी दर बघून स्वअक्षरात लिहून तसेच त्यावर कंत्राटदाराची सुद्धा स्वाक्षरी आहे जी काही खोडतोड आहे ती निविदा भरायचे वेळेसची आहे व त्यावर कंत्राटदारांचे N.S.Sharma म्हणून सही केली आहे. त्यांनी कुठेही १.८०% जास्त असे दर नमूद केलेले नाही त्यामुळे जयबालाजी कंस्ट्रक्शन वर्धाची २.८०% जास्तची निविदा स्वीकारण्यात आली आहे.

१% जास्त दराची निविदा स्वीकृत केली असे नाही. त्यामुळे १% जास्त रक्कम रु.१३,११०/- वसुलीचा प्रश्न उदभवत नाही. तुलनात्मक तक्ता हा कार्यालयीन दस्ताऐवज आहे त्यावर कंत्राटदाराची सही घेतल्या जात नाही व तशी पद्धत पण नाही.

(२) सदरील सर्व्हे क्रमांक महाराष्ट्र सरकारच्या नावे असल्याने व खाजगी जागा नसल्याने अधिग्रहणाचा प्रश्न उद्‌भवला नाही.

(३) सिमेंट जिल्हास्तरावरून वापरण्याचे मा. अधीक्षक अभियंता यांचे आदेश असून या बाबत पत्र सोबत जोडण्यांत आलेले आहे. त्यामुळे कोणतेही जादा प्रदान झालेले नाही.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय झेडपी २००६/प्र.क्र.३६६/९ मंत्रालय मुंबई दि. ३१ डिसेंबर २००९ अन्वये कामाचे मूल्य रु.५ लाखाचे वर व रु. ५० लाखा पर्यंत आहे. अशा खर्चाची कामे जाहीरातीव्दारे वर्तमान पत्रात निविदा प्रसिद्ध करून देण्यांत येतात. जिल्हा परिषद मध्ये जाहीरात देण्याबाबत वर्तमान पत्राचे रोस्टर सामान्य प्रशासन विभागात ठेवल्या जाते. त्यांचे कडून अ वर्ग ब वर्ग रोस्टर नुसार प्राप्त वर्तमान पत्रात जाहीरात देण्यांत येते या विभागाकडे वर्तमान पत्राचे रोस्टर ठेवण्याचे अधिकार नाहीत.

(५) साठवण तलाव जलसंधारण उपचार असून यापासून प्रत्यक्ष सिंचन होत नसल्यामुळे व लाभार्थींची संख्या दोन असल्याने पाणी वापर संस्था तयार करण्यांत आलेली नाही. व काम ग्रामपंचायतीला हस्तांतरीत आहे.

(६) एकूण खोदकाम परिणाम बाब कं. २ व ३ प्रमाणे २०३६.५७ घ.मी. व ८०% वापरा करीता उपलब्ध परिणाम १६२९.२५ घ.मी. प्रत्यक्ष वापर बाब कं. ७,९ व १२(१) प्रमाणे १६०६.५९ घ.मी. वापर करण्यांत आलेला आहे. इतर साहीत्य तलावाचे मुख्य भिंती करीता न वापरता सदर साहीत्य गाईड बंड करीता वाण्रण्यांत आलेले आहे.

(७) चाचणी अहवाल प्राप्त आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५६७ (सन २०१३-२०१४)**

**साठवण बंधारा बेलगांव येथील बांधकामात आढळून आलेली अनियमितता.—**कंत्राटदारांकडून विलबांने मुदतवाढीचा अर्ज सादर करण्यात आलेला आहे. तसेच फक्त २५ दिवसांत उर्वरित काम कसे काय करण्यात आले आहे व बाब क्र ५ मध्ये जास्त माप नोंदविण्यात आले आहे. शासन निर्णय क्र लपायो- १०९९/ प्र.क्र. ३४७/ जल-१ दिनांक ३१ जुलै २००० नुसार पाणी वापर संस्थेची नोदंणी करण्यात आलेली नाही शासन निर्णय क्र ग्रासयो- २००७/ प्र.क्र. १/ यो- ९ दिनांक ८ मे २००७ नुसार सहकारी मंजूर संस्थेतील मंजूर सभासदांचा अपघाती विमा काढला नाही.

जि. प. वर्धा मध्ये लघुसिंचन विभागचे सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतानां खालील प्रमाणकान्वये रोख पुस्तकात खर्च नोदंविण्यासाठी सदर कामाची पुढील प्रमाणे प्रक्रिया करण्यात आली.

प्रशासकीस मंजुरी - अति मुकाअ जिप वर्धा यांचे आदेश क्र. ६ दि. ४.१०.२०११ अन्वये

तांत्रिक मंजुरी - कार्यकारी अभियंता जिप लघुसिंचन विभाग वर्धा आदेश क्र २ दि. २५.८.२०११ अन्वये

काम वाटप समिती - काम वाटप समिती सभा दि. २७/१२/२०११ व सचिव तथा कार्यकारी अभियंता जि.प.बांधकाम विभाग वर्धा यांचे प. क्र. २५३८ दि. २७/१२/२०११ अन्वये मंजूर

कंत्राटदाराचे नांव - अध्यक्ष आदर्श मजुर सह संस्था मर्या.आष्टी

करारनामा-क्रमाक-बी-१/जिवायो/बि.आ/सा.बं/३/ दि. ०६/०६/२०१२ अन्वये १०,६९,९६१/- कार्यारंभ क्र/ दिनांक क्र.६०७ दिनांक १३/०६/२०१२ अन्वये कालावधी ११ महीने

मोजमाप पुस्तीका क्र. २९७९ वर पान क्र. ५२ ते ९३ अंतिम मूल्याकंन - १०४५०२६/- (शेड्यूल बी प्रमाणे)

काम पूर्ण दिनांक - दिनांक ३०/०३/३०१४

अंतिम देयक - प्रमाणक क्र. ४६/ दि. ०८/०५/२०१३ रु. ६१४५०९/-, (कपाती वगळता)

प्रमाणक क्र. १/दि. ०२/१२/२०१३ रु. १४०९००/- (कपाती वगळता)

प्रमाणक क्र.९१२/दि.३०/०३/२०१४ रु. ११३४९५/- (कपाती वगळता)

त्यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

(१) कामाचा आदेश देण्यात आल्यापासून सदर काम दि. १२/०५/२०१३ पर्यत पूर्ण होणे आवश्यक होते परंतु काम पुर्णत्वाच्या प्रमाण पत्रात नमूद तारखे नुसार दि. ३०/०३/२०१४ ला काम पूर्ण करण्यात आल्याचे दिसून येते. सदर नस्तीत कंत्राटदाराकडून सादर करण्यात आलेल्या मुदतवाढीच्या अर्जाचा दिनांक २५/०७/२०१३ असून त्यांनी दि. १५/०४/२०१४ पर्यंत मुदतवाढ मागविली असून सध्या पावसामुळे नाल्याला पाण्याचा प्रवाह चालू असल्यामुळे काम करणे शक्य नाही असे कळविण्यात आले आहे त्याबाबत बी १ फार्म करारनाम्यामध्ये नमूद क्लॉज ६ नुसार जेव्हा कामाचा कालावधी वाढवावयाचा असेल तेव्हा कंत्राटदाराकडून ३० दिवसापूर्वी (काम संपण्यापूर्वी) कार्यकारी अभियंता यांना लेखी कळवावे लागेल असे नमूद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(२) उप विभागीय अभियंता, वर्धा यांचे पत्र क्र. ७८ दि. ०५/०३/२०१४ अन्वये सदर कंत्राटदारास मुदतवाढ मागविण्यात आल्यानंतर उर्वरित काम सुरू न करण्याबाबत व दि. ३१/०३/२०१४ नंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही असे कळविण्यात आलेले आहे. तसेच कंत्राटदाराचा दि. २५/०७/२०१३ चे अर्जात सदर कामाकरिता दि. १५/०४/२०१४ पर्यंत मुदतवाढ मागविण्यात आली असतांना दि. ३०/०३/२०१४ पर्यंत फक्त ५ दिवसात काम कसे काय करण्यात आले आहे त्याचप्रमाणे मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता पा.क्र. ८४ ते ८६ वर मापे नोंदविल्याप्रमाणे दि. ३०/०३/२०१४ लाच एकाच दिवशी बाब क्र. १ बाब क्र. २, बाब क्र. ११, बाब क्र. १६ व बाब क्र. १४ अशा एकूण ५ प्रकारच्या बाबीचा खर्च रुपयं १५६८८९/- कसा काय करण्यात आला आहेत. त्यामुळेसबब करण्यात आलेल्या खर्चाबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

(३) मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता पा क्र. ५३ वर बाब क्र. २ मध्ये Excavation in aii types of soft strata नोंदवितांना त्यात Left side key wall and right side key चे मापे 1x1.00x1.50 आहे त्यानुसार बाब क्रमांक ५ मध्ये providing and laying in situ cement concret in m-15 etc compiete मध्ये key wall d/s return wing wall व इतर मापे जवळजवळ ०.१० मी ने लांबीमध्ये कमी घेण्यात आले आहेत त्यामुळे सदर मापे घेताना बाब क्र. ५ मध्ये 2*0.90*1.20*015=0.324 cum याप्रमाणे मापे घेणे आवश्यक होते. पंरतु त्याप्रमाणे मापे न घेण्यात आल्याने संबंधितास रुपये १५३/- (०.३८ - ०.३२४ उ ०.०५६) जादा प्रदान करण्यात आले आहेत.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासननिर्णय क्र. लपायो१०९९/ प्रक्र.३४७/ जल-मंत्रालय, मुंबई ४०० ०१२ दि. ३१ जुलै, २००० नमूद क्र. ५.४ नुसार जि.प. अंतर्गत ०-१०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन योजनेसाठी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे बांधकाम सुरू करण्यासाठी कार्यारंभ आदेश देऊ नयेत असे असतांना पाणी वापर संस्थेची नोंदणी त्या क्षेत्राच्या सहायक निबंधक सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी करण्यात आलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. ग्रामयो २००७ प्रक्र. १/यो-९ दि. ८ मे, २००७ नुसार सहकारी मजूर संस्थेतील सभासदांचे अपघाती विमा काढणे आवश्यक आहे. परंतु नस्तीत सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजात उपलब्ध असलेली अपघात विमा पॉलीसी दि. ०४/०७/२०११ ते ०३/०७/२०१२ पर्यंत असल्याचे निदर्शनास येते. सदर काम दि.३०/०३/२०१४ ला पूर्ण करण्यात आले आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) कामानां मुदतवाढ देणे व त्याकरिता दंडाची आकारणी करण्याकरिता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम प्राधिकारी आहे. कामाचा आदेश दि. १३/०६/२०१२ ला देण्यात आला होता व काम पूर्ण करण्याची मुदत ११ महिने म्हणजेच १२/०५/२०१३ पर्यंत होती. या कालावधी मध्ये कंत्राटदाराने मार्च २०१३ पर्यत होती. या कालावधी मध्ये कंत्राटदाराने मार्च २०१३ पर्यंत रु. ७,४८,६३७/- इतक्या किमंतीचे काम केले आहे करारनामा रु. १०,६९,९६१/- इतकी आहे. म्हणजेच संबंधीतांने मार्च २०१३ पर्यत जवळ जवळ ७०% काम पूर्ण केले आहे त्यानंतर सुद्धा त्यांचे काम पावसाळ्यापर्यंत सुरू होते तो पर्यंत त्यांनी ८५% काम पूर्ण केले आहे. त्यानंतर कंत्राटदाराने काम पूर्ण करण्याकरिता दि. २५/०७/२०१३ ला कामाला दि. १५/०४/२०१४ पर्यंत मुदतवाढ मिळावी म्हणून अर्ज सादर केला आहे. म्हणजेच जेव्हा मुदतवाढ मागितली तेव्हा ८५% काम पूर्ण झाले होते व ते उप अभियंता यांचे प्रस्तावात नमूद आहे त्यांनीच वेळेत काम पूर्ण झाले नाही म्हणून रु. १०/- दंडाचे मुदतवाढ प्रस्तावित केली आहे व का.अ. यांनी त्यास शिफारस केली असून मुदतवाढ प्रदान करण्यास सक्षम अधिकारी मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी ह्यांनी रु. १०/-प्रति दिन दंडाने ३१/०३/२०१४ पर्यत मुदतवाढ मंजूर केली आहे. यामध्ये कोणतीही अनियमितता नाही.

(२) कंत्राटदाराने दि. १५/०४/२०१४ पर्यंत मुदतवाढ मागितलेली होती ती दि. ३०/०३/२०१४ पर्यंत दिलेली आहे. मोजमाप पुस्तीका क्र. २९७९ पान ८४ ते ८६ वर नमूद तारखा ह्या मापे नोंदविण्याच्या आहे. ह्या तारखेच्या अगोदर काम सुरू होते. ते पूर्ण झाले त्या तारखेत नोंदी घेतल्या आहे. त्यामध्ये २८/०३/२०१४ ला साफसफाई दि. ३०/०३/२०१४ ला खोदकाम व मटेरियल पसरविणे. ही मापे नोंदविली आहे. सगळी कामे एकमेकांशी सबंधित असून मशीनद्वारे करण्यात येतात. त्यामुळे पूर्ण करणे शक्य झाले आहे.

(३) बंधाऱ्यांची लांबी १६ मीटर इतकी आहे व त्यामध्ये साईउ वॉल पकडून १८.५० इतकी खोदकाम केले आहे. त्यामुळे त्या लांबीमध्ये ०.२५ मीटर Key Wall लांबी आली आहे. म्हणून खोदकाम करतेवेळी १.०० मीटर नोंदविले आहे व ही बाब पूर्णतः तांत्रिक आहे. त्यामुळे नोंदविलेली मापे तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे.

(४) साठवण बंधारा बेलगाव :- सदरहू बंधारा फक्त ६ हेक्टर सिंचन क्षमतेचा आहे व लाभार्थी फक्त ४ आहे. त्यामुळे पाणी वापर संस्था स्थापन करता येत नाही. त्यामुळे सदरहू बंधारा ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आला आहे.

(५) संस्थेने काढलेल्या मजुरांचे अपघाती विम्याची पॉलीसी करारनामा नस्तीमध्ये आहे. ते ३१/०७/२०१२ पर्यत आहे. त्यापुढील विमा संबंधित मजुर संस्थेने काढलेला आहे व ती पॉलीसी संलग्न करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०८ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने कार्यकारी अभियंता लघुसिंचन विभाग यांना विचारणा केली की, साठवण तलाव सोरटा येथील बांधकाम प्रकरणेच्या निविदा प्रक्रियेच्यावेळी कोण हजर होते, त्यावेळी मे.शिवशक्ती कन्स्ट्रक्शनचे प्रतिनिधी हजर होते का? सदर प्रकरणी चाचणी अहवाल केव्हा प्राप्त झाला, तो लेखापरीक्षणावेळी का सादर केला नाही? यावर कार्यकारी अभियंता लघुसिचंन विभाग यांनी खुलासा केला की, निविदा उघडण्याच्या वेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, तत्कालीन कार्यकारी अभियंता आणि ठेकेदार हजर होते. सदरहू प्रकल्पावर १३.१० लक्ष रुपये खर्च करण्यात आला असून काम पूर्ण झाले आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले की, कामाची सीसी झाल्यानंतरही शासकीय चाचणी अहवाल सादर केला नाही. चाचणी अहवाल प्राप्त नसताना कंत्राटदारास कामाचे देयक अदा करण्यात आले. लेखापरीक्षणावेळी चाचणी अहवाल सादर केला नाही. या प्रकरणात चाचणी अहवाल माहीत नसताना साहित्याचा पूरवठा झाला आहे आणि साहित्य निकृष्ट दर्जाचे पूरविण्यात आले आहे या प्रकरणाची चौकशी करून समितीला अहवाल सादर करण्यात यावे.

समितीने तत्कालीन कार्यकारी अभियंता यांना विचारणा केली की, साठवण तलाव सोरटा येथील बांधकामप्रकरणी प्राप्त पाच निविदाधारकाच्या बी-१ शेड्यूलची तपासणी केली असता त्यात मे शिवशक्ती कंस्ट्रक्शन, वर्धा यांचे बी-१ फॉर्म शेड्युलमध्ये नमूद दर प्रत्यक्षात १.८० टक्के जादा असून त्यात खोडतोड करून ५.२० टक्के करण्यात आले आहे. त्यावर कंत्राटदाराची स्वाक्षरी सुद्धा घेण्यात आली नाही. निविदा उघडण्याच्या वेळी तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि तत्कालीन कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी आहे. निविदा प्रक्रियेच्या पेपरमध्ये खाडाखोड केलेली आहे. मे. जय बालाजी कंस्ट्रक्शन, वर्धाचे टेंडर २.८० बिलो होते ते नंतर ५.२० टक्के अबॉव्ह करण्यात आले आहे. तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी व तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्या संगनमताने टेंडर बिलो असताना ते अबॉव्ह करण्यात आलेले आहे. यावर तत्कालिन कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, यामध्ये पाच टेंडर अबॉव्ह होते. २.८० टक्के हे लोअेस्ट टेंडर होते. जय बालाजी यांचे टेंडर लोअेस्ट होते. तद्नंतर याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विशद केले की, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना आजच्या बैठकीस उपस्थित राहण्यास सूचना केली होती तरी ते बैठकीस उपस्थित राहिले नाहीत. समितीने तत्कालीन कार्यकारी अभियंता यांना विचारणा केली की, शिवशक्ती कन्स्ट्रक्शनच्या निविदेमध्ये खाडाखोड करण्यात आली आहे. खाडाखोड केलेल्या ठिकाणी सही केलेली नाही निविदेच्या नियमानुसार निविदेमध्ये ज्याला काही दुरुस्ती करायची असेल तर ती दुरुस्ती करून स्वतः स्वाक्षरी करून त्या पानावर शिक्का मारायला पाहिजे. पंरतू त्या पानावर खाडाखोड केलेली असून त्यावर ठेकेदाराची स्वाक्षरी नाही. यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी विशद केले की, जेथे खाडाखोड केली आहे तेथे श्री.एन.एच. शर्मा यांची सही आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले की, मे.शिवशक्ती कन्स्ट्रक्शनच्या निविदेमध्ये खाडाखोड केलेल्या ठिकाणी ठेकेदाराची स्वाक्षरी नाही जेथे खाडाखोड केली आहे त्या ठिकाणी ठेकेदारानी स्वाक्षरी केली नाही असा आक्षेप आहे. वास्तविक खाडाखोड केलेल्या ठिकाणी ठेकेदाराची स्वाक्षरी असली पाहिजे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारात्मक सहमती दर्शविली.

तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले की, साठवण बंधारा बेलगाव येथील बांधकामाच्या करारनाम्यामध्ये कामास विलंब झाल्यास दंड आकारणीच्या पद्धतीनुसार दंड आकारण्यात आला आहे काय, काम पूर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा विलंब झाला असून नाममात्र रुपये १० प्रती दिन दंड आकारणे योग्य नाही. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून कारवाईसह अहवाल समितीला सादर करण्यात यावा. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

साठवण तलाव सोरटा तसेच साठवण बंधारा बेलगांव येथील बांधकामात आढळून आलेली अनियमितता :- साठवण तलाव सोरटा तसेच साठवण बंधारा बेलगांव येथील बांधकामात आढळून आलेल्या अनियमिततेप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) साठवण तलाव सोरटा ता. आर्वी परिच्छेद क्र. ३.५६६ येथील बांधकामात सखोल चौकशी करण्यात आलेली आहे. सदर कामामध्ये सिमेंट काँक्रीट (१:२:४) चे काम करण्यात आले आहे. काम सुरू असतांना संधानक नमुना घेऊन प्रयोगशाळेमध्ये चाचणी घेण्यात आलेली आहे. त्या चाचण्यायोग्य आढळून आलेल्या आहेत. कामावर वापरण्यात आलेल्या सिमेंटची चाचणी प्रयोगशाळेमध्ये घेण्यात आलेली आहे व वापरण्यात आलेले सर्व साहित्य हे तांत्रिक दृष्ट्या योग्य होते. मे. शिवशक्ती कंस्ट्रक्शन वर्धा यांचे निवेदन पान क्र. १३ वर दर नमूद असून त्यावर कार्यकारी अभियंता यांनी दर बघून स्वअक्षरात लिहून स्वाक्षरी केलेली आहे. तसेच त्यावर कंत्राटदाराची सुद्धा स्वाक्षरी आहे. जी काही खोडतोड आहे ती निविदा भरावयाच्या वेळेची आहे व त्यावर कंत्राट दाराची स्वाक्षरी आहे. व पूर्ण निविदा प्रकियेमध्ये कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही चौकशीत अनियमितता आढळून आलेली नाही, म्हणून संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्याची आवश्यकता भासली नाही.

(२) साठवण बंधारा बेलगांव ता. वर्धा परिच्छेद क्र. ३.५६७ येथील बांधकामात सखोल चौकशी करण्यात आलेली आहे. सदर कामाचा आदेश दि.१३/०६/२०१२ ला देण्यात आला होता. व काम पूर्ण करण्याची मुदत ११ महिने दि. १२/०५/२०१३ पर्यत होती. या कालावधी मध्ये कंत्राटदाराने मार्च २०१३ पर्यंत रु. ७,४८,६३७/- इतक्या किमतीचे काम केलेले आहे. करारनामामध्ये किंमत रु. १०,६९,९६१/- इतकी आहे. म्हणजेच संबंधिताने मार्च २०१३ पर्यंत जवळ जवळ ७०% काम पूर्ण केले आहे. त्यानंतर सुद्धा त्याचे काम पावसाळ्यापर्यंत सुरू होते तोपर्यंत त्यांनी ८५% काम पूर्ण केले आहे. त्यानंतर कंत्राटदाराने काम पूर्ण करण्याकरिता दिनांक २५/०७/२०१३ ला कामाला दिनांक १५/०४/२०१४ पर्यंत मुदतवाढ मिळावी म्हणून अर्ज सादर केला आहे. जेव्हा मुदतवाढ मागीतली तेव्हा ८५% काम पूर्ण झाले होते. व ते उप अभियंता यांचे प्रस्तावात नमूद आहे. त्यांनीच वेळेत काम पूर्ण झाले नाही म्हणून रू १०/- दंडाचे मुदतवाढ प्रस्तावित केली आहे व कार्यकारी अभियंता यांनी त्यास शिफारस केली असून मुदतवाढ प्रदान करण्यास म.जि.प.व.पं.स. लेखा सहिता १९६८ चे नियम १४८ (२) ब नुसार मा. अति.मु.का.अ. हे सक्षम प्राधिकारी असल्याने त्यांनी मुदतवाढ मंजूर करून रु. १० /- प्रती दिन प्रमाणे दिनांक ३१/०३/२०१४ पर्यंत दंड आकारणी करून मुदतवाढ मंजूर केली आहे. पूर्ण चौकशी केली असता चौकशीमध्ये कसलीही अनियमितता आढळलेली नाही. म्हणून सबंधितांची जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्याची आवश्यकता भासली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय.—**जिल्हा परिषद वर्धा यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अशी विचारणा केली की, साठवण तलाव सोरटा येथील बांधकामात आढळून आलेल्या अनियमितते प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे? याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर कामाची चौकशी पूर्ण झालेली आहे. या कामाच्या रेट कोटेशनवर खाडाखोड केलेली होती. खाडाखोड केलेल्या लगतच कंत्राटदाराने

सही करणे अपेक्षित होते. परंतु कंत्राटदाराने खाडाखोड केलेल्या ठिकाणी नव्हे तर बाजूला सही केली होती. कंत्राटदाराने जी रक्कम कोट केली होती, ती कार्यकारी अभियंता यांनी हाताने लिहिली होती. परंतु त्या बाबतीत कोणी हरकत घेतली नव्हती. तद्नंतर समितीने पुढे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, या प्रकरणी जी कारवाई करण्यात आली आहे त्यावर आपण समाधानी आहात काय? या प्रकरणात जी कारवाई करण्यात आलेली आहे त्यावर समाधानी आहे असे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस दिले.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, साठवण बंधारा बेलगाव येथील बांधकाम कंत्राटदाराने मार्च २०१३ पर्यंत रु,७,४८,६३७/- इतक्या किंमतीचे काम केले आहे व करारनाम्यामध्ये कामाची किंमत रु.१०,६९,९६१/- नमूद केली आहे. यामध्ये निविदा रु.१०,६९,९६१/- ची होती आणि ते बिलोने सादर केल्यामुळे रु,७,४८,६३७/- इतक्या किंमतीचे काम झाले आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या कामाची प्रशासकीय मान्यता जास्त होती. परंतु कंत्राटदाराने मार्च, २०१३ पर्यंत रु,७,४८,६३७/- इतक्या किंमतीचे काम केले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खुलाशावर समितीने समाधान व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

सोरटा येथील साठवण तलावाच्या बांधकामासाठी वृत्तपत्रात दिनांक ०१/१०/२०११ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या होत्या. तुलनात्मक तक्त्यानुसार मे. जय बालाजी कंस्ट्रक्शन वर्धा यांची २.८० टक्के जादा दर कमी असून त्यांची निविदा मान्य करण्यात आली तथापि, प्राप्त ५ निविदा धारकांच्या बी - १ फॉर्म शेडयुलपैकी मे. शिवशक्ती कंस्ट्रक्शन, वर्धा यांचे बी- १ फॉर्म शेड्यूलमध्ये नमूद दर प्रत्यक्षात १.८० टक्के जादा असून त्यात खाडाखोड करून ५.२० टक्के करण्यात आला आहे व त्यावर कंत्राटदाराची स्वाक्षरी नसून हस्ताक्षरात सुद्धा फरक आढळून येत आहे. त्यामुळे मे जय बालाजी कंन्स्ट्रक्शन वर्धा यांना १.०० टक्के (२.८०-१.८०) जादाची रक्कम प्रदान करण्यात आली असल्याने रुपये १३,११०/- इतकी रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

तसेच बेलगांव येथील साठवण बंधारा बांधकामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आल्यापासून दिनांक १२/०५/२०१३ पर्यंत काम पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रानुसार सदर काम दिनांक ३०/०३/२०१४ रोजी पूर्ण झाले आहे. कामाचा कालावधी वाढवायचा असेल तर कंत्राटदाराकडून काम संपण्यापूर्वी ३० दिवस अगोदर लेखी अर्ज करणे आवश्यक असताना मुदतवाढीच्या अर्जाचा दिनांक २५/०७/२०१३ असून त्यानुसार दिनांक १५/०४/२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली असताना दिनांक ३०/०३/२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मोजमाप पुस्तिकेतील दिनांक ३०/०३/२०१४ रोजीच्या नोंदीनुसार एकूण ५ प्रकारच्या बाबींवर रु. १,५६,८८९/- इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सोरटा व बेलगांव येथील पूर्ण झालेल्या साठवण तलाव योजनेच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांची सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्तीसाठी आवश्यक असलेली पाणी वापर संस्थेची स्थापना करून सहायक निबंधक यांच्याकडे नोंदणी करण्यात आलेली नाही.

सोरटा येथील साठवण तलावाच्या बांधकाम प्रकरणातील मे. शिवशक्ती कन्स्ट्रक्शनच्या निविदेमध्ये खाडाखोड केलेली आहे. कंत्राटदाराची स्वाक्षरी खाडाखोड केलेल्या लगतच आवश्यक असताना अन्य ठिकाणी स्वाक्षरी केलेली आहे. बेलगांव येथील साठवण बंधारा बांधकामाच्या कामास १ वर्षाचा विलंब झालेला असून नाममात्र रु.१०/- प्रति दिन दंड आकारून मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच या दोन्ही प्रकरणात पाणी वापर संस्था स्थापन करून त्याची नोंदणी करण्यात आलेली नाही यासाठी या प्रकरणांची चौकशी करून जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करून अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

या विषयासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा व ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागाचे सचिव यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, सोरटा येथील साठवण तलावाच्या बांधकामाच्या संदर्भातील मे शिवशक्ती कंस्ट्रक्शन वर्धा यांचे निविदेच्या पान क्र. १३ वर ५.२० टक्के दर नमूद असून त्यावर कार्यकारी अभियंता यांनी दर बघून स्वअक्षरात लिहून तसेच त्यावर कंत्राटदाराची सुद्धा स्वाक्षरी आहे. त्यावर असलेली खाडाखोड निविदा भरायच्या वेळेसची असून याबाबतीत कोणीही हरकत घेतलेली नाही. यामध्ये कुठेही १.८०% असे दर नमूद केलेले नसल्याने जयबालाजी कंस्ट्रक्शन वर्धा यांची २.८०% जास्तची निविदा स्वीकारण्यात आली आहे. यामध्ये १% जास्त दराची निविदा स्वीकृत केली नसल्याने जास्तीची रु.१३,११०/- वसूल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तसेच बेलगांव येथील साठवण बंधारा बांधकामासाठी कार्यारंभ आदेश दिनांक १३/०६/२०१२ रोजी देण्यात आला असून सदर काम पूर्ण करण्याची मुदत ११ महिने म्हणजेच १२/०५/२०१३ रोजीपर्यंत होती. या कालावधीमध्ये कंत्राटदाराने करारनाम्यातील रु. १०,६९,९६१/- इतक्या किंमतीच्या कामापैकी रु. ७,४८,६३७/- इतक्या किंमतीचे काम पूर्ण केले आहे. त्यानंतरही पावसाळ्यापर्यंत काम सुरू ठेऊन ८५ % काम

पूर्ण केले होते. त्यानंतर कंत्राटदाराने दिनांक २५/७/२०१३ रोजीच्या अर्जान्वये दिनांक १५/४/२०१४ पर्यंत मुदतवाढ मिळण्याची मागणी केली. सक्षम अधिकारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रु.१०/- प्रति दिन दंडाने ३१/०३/२०१४ पर्यंत मुदतवाढ मंजूर केली. दिनांक २८/३/२०१४ रोजी साफसफाई व दिनांक ३०/०३/२०१४ ला खोदकाम व मटेरिअल पसरविणे इ. सर्व कामे एकमेकांशी संबंधित असून मशिनद्वारे केल्याने पूर्ण करणे शक्य झाले व त्यानुसार सर्व नोंदी एका दिवशी म्हणजे दिनांक ३०/३/२०१४ रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे सोरटा येथील साठवण तलावापासून प्रत्यक्ष सिंचन होत नसून लाभार्थी संख्या दोन आहे. बेलगांव येथील साठवण बंधारा यापासून ६ हेक्टर सिंचन होत असून लाभार्थी संख्या चार आहे. यामुळे या दोन्ही प्रकरणात पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आली नसून सदरहू तलाव व बंधारा ग्रामपंचायतीस हस्तांतरित करण्यात आला आहे. या दोन्ही प्रकरणात कोणतीही अनियमितता झालेली नसल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.

**सोरटा येथील साठवण तलावाच्या बांधकामासंबंधीत शिवशक्ती कंस्ट्रक्शन, वर्धा यांच्या निविदेच्या पान नं १३ वर खाडाखोड केलेल्या लगत निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का घेणे आवश्यक असताना त्या पानावरील वरच्या बाजूस स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. तसेच बेलगांव येथील साठवण बंधारा बांधकामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदाराने काम पूर्ण होण्याच्या दिनांकानंतर २ महिन्याने मुदतवाढ संदर्भातील अर्ज केला असताना व काम पूर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा विलंब झालेला असताना प्रतिदिन फक्त नाममात्र रुपये १०/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे एकाच दिवशी ५ प्रकारच्या कामांवर मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च करण्यात आलेली असून या कामांसाठी मशिनचा वापर करण्यात आलेला असला तरी तांत्रिकदृष्ट्या या कामांचा दर्जा निकृष्ट असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणांबाबत करण्यात आलेल्या चौकशीच्या अनुषंगाने समितीस सादर करण्यात आलेली माहिती व साक्षीमध्ये सचिवांकडून या प्रकरणांमध्ये अनियमितता झालेली नसल्याचे नमूद केले असले तरी उपरोक्त सर्व कामकाजाच्या कार्यपद्धतीवर समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ मधील नियम १४८ अन्वये बांधकामाच्या प्रारंभाचा आणि पूर्ण करण्याच्या वेळेचा उल्लेख करारनाम्यात करणे आवश्यक असून त्यानुसार कंत्राटदाराने वेळोवेळी काम सुरू करण्याबाबत व ते योग्य पद्धतीने चालू ठेऊन विहित कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच कामास मुदतवाढ घेणे आवश्यक असल्यास सुरूवातीची कालमर्यादा किंवा वाढवून दिलेली कालमर्यादा संपण्यापूर्वी मंजूर करून घेणे आवश्यक आहे. यामध्ये कंत्राटदाराने कसूर केल्यास नाममात्र दंडात्मक रक्कम वसूल न करता झालेल्या नुकसान भरपाईचा दर निश्चित करून दंडात्मक रक्कम वसूल करण्याबाबतची कार्यवाही करण्याची दक्षता यापुढे घेण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**शेतकऱ्यांना सुलभतेने व आवश्यकतेनुसार पाणी मिळण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या अडचणींवर मात करून लाभार्थ्यांना मागणीप्रमाणे सुलभतेने पाणी उपलब्ध व्हावे या दृष्टीकोनातून सिंचन व्यवस्थापनेत लाभधारकांचा सक्रीय सहभाग असणे गरजेचे आहे. यासाठी पूर्ण झालेल्या लघु पाटबंधारे, साठवण तलाव, कोल्हापूरी पद्धतीचे बंधारे इत्यादी लघुपाटबंधारे योजनांच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांनी एकत्र येऊन योजनेच्या सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्तीसाठी लाभधारकांची सहकारी पाणी वापर संस्थेची स्थापना करून या संस्थेची त्या क्षेत्राच्या सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. यामुळे लाभक्षेत्रातील सर्व लाभधारकांना सिंचन वेळापत्रकानुसार पाण्याचे वाटप होऊ शकेल. यासाठी असलेल्या नियम व निकषांचे काटेकोर पालन करून आवश्यक त्या ठिकाणी पाणी वापर संस्थांची स्थापना करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**शासनाच्या बांधकामासंदर्भातील कामांसाठी ई-निविदा प्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक असून सर्व निविदा ई निविदा पद्धतीने मागवून स्विकृत करण्याबाबत शासनाने आदेशित केले आहे. डिजीटल इंडिया या मोहिमेअंतर्गत शासनाचे जास्तीत जास्त कामकाज ई-गर्व्हनन्स पद्धतीने व्हावे व निविदा प्रक्रिया ही ई निविदा प्रक्रियेने असावी असे धोरण निश्चित करण्यात आले आहे. ई निविदा प्रणालीमध्ये आवश्यक बाबी संगणकीय आज्ञावलीमध्ये बंदीस्त होत असल्याने सर्वदूर स्पर्धा होण्याची निश्चित शाश्वती होऊन निविदा कामकाजात पारदर्शकता येईल. यासाठी निविदा प्रक्रियेसाठी ई-निविदा प्रक्रियेची कार्यपद्धती राबविण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, वर्धा

## १०० टक्के अनुदान तत्वावर पिको फॉल शिलाई मशीन पूरविण्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१००३ (सन २०१३-२०१४)**

(१) तांत्रिक मंजुरी - अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वर्धा, आदेश क्र. २१७० दि. ११/१०/२०१३

(२) प्रशासकीय मंजुरी - अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र. २१७१ दिनांक ११/१०/२०१३

(३) पूरवठा आदेश क्र. ४२९/२०१३-१४, दि. २८/२/२०१४

उपरोक्तप्रमाणे प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देवून no. spc/rct/household industries Mumbai २९ जानेवारी २०१४ अन्वये प्रपत्र अ m/s Shrikrishna sales corporation 3648/2 ahamadnagar यांचेशी दरकरार झालेला असून दर रु. ५४०२/- प्रती नग प्रमाणे देवून एकूण २७७ नग खरेदी करण्यात आले.

समाजकल्याण, जि.प. वर्धा यांचे साठा बुक मध्ये पंचायत समितीनिहाय पूरवठा केल्याचे चलान व दिनांक :

| अ.क्र. | पं.स. | पिको फॉल शिलाई मशीन | दिलेले चलान | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | ६१ | ००१ | २४.३.२०१४ |
| २ | सेलू | ३० | ००२ | २४.३.२०१४ |
| ३ | देवळी | ३० | ००३ | २४.३.२०१४ |
| ४ | हिंगणघाट | ३३ | ००४ | २४.३.२०१४ |
| ५ | समुद्रपूर | ३० | ००५ | २४.३.२०१४ |
| ६ | आर्वी | ३७ | ००६ | २४.३.२०१४ |
| ७ | आष्टी | २६ | ००७ | २४.३.२०१४ |
| ८ | कारंजा | ३० | ००८ | २४.३.२०१४ |
| | | २७७ | | |

पं.स.साठी नोंदवही विवरणपत्र २ तपासणी केली असता.

| अ.क्र. | पं.स. | साठा पान क्र. | प्राप्त नग | दिनांक | लाभार्थी वाटप | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | ६० | ६१ | २८.३.१४ | ५.३.१४ ते २८.८.१४ | |
| २ | सेलू | - | - | - | - | - |
| ३ | देवळी | १८३ | ३० | २४.३.१४ | २८.७.१४ ते १२.९.१४ | |
| ४ | हिंगण घाट | - | - | - | - | - |
| ५ | समुद्र पूर | - | - | - | - | - |
| ६ | आर्वी | - | ३७ | ५.६.१४ | ५.२.१४ ते ७.७.१४ | |
| ७ | आष्टी | ४५ | २६ | २५.३.१४ | २१.७.१३ ते १३.८.१४ | |
| ८ | करंजा | ५८ | ३० | २८.३.१४ | ९.७.१४ ते २०.९.१४ | |

**यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय आहेत :**

(१) उपलब्ध अभिलेख्याची तपासणी केली असता सर्व पंचायत समितीला पिकोफॉल शिलाई मशिन दिनांक २४/०३/२०१४ सबंधित पूरवठादाराने पंचायत समितीला पूरवठा केलेला आहे असे समजते. परंतु समाज कल्याण समिती जि.प.वर्धाची टिपणीमध्ये शासन दर करारानुसार श्री. कृष्णा सेल्स कार्पोरेशन, अहमदनगर यांना आदेश क्र. ४२९ दिनांक २८/०२/२०१४ पूरवठा आदेश दिला. परंतु साहित्य पूरविले नाही. त्यामुळे सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात खर्च करण्यास योजना राबविण्यास जि.प.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्रदान केली आहे. असे असतांना नमूद विवरणपत्रात सर्व पंचायत समिती पिकोफॉल शिलाई मशिन पूरवठा केल्याचा दिनांक २४/०३/२०१४ आहे. व उपरोक्त निवडक पंचायत समितीचे साठा नोंदवही तपासले असता दिनांक २८/०२/२०१४ ते २०/०९/२०१४ पर्यत सबंधित लाभार्थ्याला पूरवठा केलेला आहे व लेखापरीक्षण दिनांकापर्यंत पाच पंचायत समिती चे ५४ शिलाई मशिन शिल्लक असल्याचे आढळले.

(२) लेखापरीक्षण वित्तीय वर्षात सदर योजनेवर खर्च झालेला नाही. तेव्हा उपरोक्त पिको फॉल शिलाई मशिन कसा पूरवठा झाला.

(३) समाजकल्याण जि.प. वर्धा नमूद विवरणपत्र क्र.१ मध्ये २७७ नग शिलाई मशिन दिनांक २४/०३/२०१४ पूरवठा सबंधित पूरवठादाराकडून झाल्याचे समजते पंचायत समितीचे साठा नोंदवही साहित्य पूरवठा केल्याचा दिनांक व लाभार्थ्याला साहित्य वाटप केल्याचा विवरणपत्र क्र.२ नुसार आहे. व समाजकल्याण जि.प. वर्धा यांच्या टिपणीत आदेश क्र.४२९ दिनांक २८/०२/२०१४ अन्वये पूरवठा आदेश दिला परंतु साहित्य पूरवठा केलेले नाही. तेव्हा लेखापरीक्षण वित्तीय वर्ष सन २०१३-१४ मध्ये साहित्य पूरवठा होऊन लाभार्थीला वाटप कसे दर्शविले याबाबत समप्रमाण खुलासा करावा.

(४) पिको फॉल शिलाई मशिन तपासणी अहवाल अपंगाची शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वर्धा यांचे पत्र क्रमांक ५३/२०१४-१५ दिनांक ६/०८/२०१४ च्या पत्रान्वये पूरवठा आदेशातील नमूद असलेल्या स्पेशिफिकेशन प्रमाणे तांत्रिकदृष्ट्या बरोबर आहे असे प्रमाणपत्र दिलेले आहे.

(५) २०% जि.प.समाजकल्याण सेसफंड मधून १५,००,०००/- एवढी तरतूद करून वित्तीय वर्ष २०१३-१४ मध्ये पिको फॉल शिलाई मशिन पूरवठा झालाच नाही व खर्च झालेला नाही असे दर्शविण्यात आले आहे. हि बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची व नियमबाहय आहे.

**उपरोक्त बाबीचे खुलासा होणे आवश्यक आहे.**

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

अनुपालन खालीलप्रमाणे सविनय सादर

(१) श्री. कृष्णा सेल्स कार्पोरेशन अहमदनगर यांना आदेश क्र.४२९, दिनांक २८/०२/२०१४ चे पूरवठा आदेशानुसार सहा पंचायत समित्यांना दि.२४.३.२०१४ रोजी पूरवठा करण्यात आला आहे व दोन पंचायत समित्यांना माहे जून, २०१४ मध्ये पूरवठा करण्यात आला त्यानुसार आठही पंचायत समितीने साहित्याचे संपूर्ण वाटप केलेले आहेत. करीत साठा पुस्तकांची झेरॉक्स व उपयोगिता प्रमाणपत्र जोडण्यात येत आहे.

(२) श्री. कृष्णा सेल्स कार्पोरेशन अहमदनगर यांना आदेश क्र.४२९ दिनांक २८/०२/२०१४ चे पूरवठा आदेशानुसार पिको फॉल शिलाई मशिनचा पूरवठा ६ पंचायत समितीला मार्च, २०१४ चे पुर्वी तर उर्वरित २ पंचायत समितीला मार्च, २०१४ नंतर पूरवठा केलेला आहे. तसेच पूरवठाधारक यांनी पूरवठा आदेशातील अटी व शर्ती मधील अट क्र. ७ नुसार आय.टी.आय. औद्योगिक प्राशिक्षण संस्थेचे तांत्रिक प्रमाणपत्र स्वखर्चाने प्राप्त करून सादर करावे. त्याशिवाय देयक पारीत केल्या जाणार नाही. असे नमूद असतांना सुद्धा तपासणी अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे देयक रु. १४९६३५४/- चे सदर योजनेवरील खर्च सन २०१३-१४ मध्ये खर्च करता आलेला नाही. सदर खर्च करण्याकरिता सन २०१४-१५ मध्ये समाजकल्याण समिती सभा दिनांक २३/०५/२०१४ ला विषय क्र. ३ नुसार योजनेअंतर्गत अखर्चित निधी सन २०१४-१५ मध्ये खर्च करण्यास मंजुरी प्रदान केली. तसेच जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ३०.५.२०१४ चे सभेमध्ये सन २०१३-१४ चे अखर्चित निधी सन २०१४-१५ मध्ये खर्च करण्यास विषय क्रमांक १०(६) नुसार विषय ठेवण्यात आला. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेनी सदर विषयाचे अनुषंगाने सन २०१४-१५ मध्ये खर्च करण्यास मंजुरी प्रदान केली.

(३) श्री. कृष्णा सेल्स कार्पोरेशन अहमदनगर यांना आदेश क्र. ४२९ दिनांक २८/०२/२०१४ चे पूरवठा आदेशानुसार समाजकल्याण जि.प.वर्धा नमूद विवरणपत्र क्र. १ मध्ये २७७ नग शिलाई मशिन दिनांक २४.३.२०१४ चे डिलीव्हरी चलान वरून दिसून येते. परंतु प्रत्यक्षात सहा पंचायत समित्यांना माहे मार्च, २०१४ पुर्वी पूरवठा करण्यात आला आहे. तर दोन पंचायत समित्यांना माहे जून, २०१४ मध्ये पूरवठा करण्यात आला त्यानुसार आठही पंचायत समितीने साहित्याचे संपूर्ण वाटप केलेले आहे. करीता साठा पुस्तक व डिलीव्हरी चलान सोबत जोडण्यात येत आहे.

(४) पिको फॉल शिलाई मशिनचे गुणवत्ता बाबत दिनांक ६/०८/२०१४ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा यांनी पिको फॉल मशिनची प्रत्यक्षात तपासणी केली असता आदेशातील नमूद असलेल्या स्पेशिफिकेशन प्रमाणे तांत्रिक दृष्ट्या बरोबर असल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदर प्रमाणपत्र सोबत जोडण्यात येत आहे.

(५) २०% जि.प.समाजकल्याण सेस फंडमधून १५,००,०००/- एवढी तरतूद करून वित्तीय वर्ष २०१३-१४ मध्ये पिको फॉल शिलाई मशिन पूरवठा ६ पंचायत समितीला मार्च, २०१४ पुर्वी तर २ पंचायत समितीला माहे जून, २०१४ मध्ये पूरवठा करण्यात आलेला आहे. तसेच I.T.I. चे तपासणी प्रमाणपत्र सबंधितानी मार्च २०१४ नंतर सादर केल्याने तो खर्च जि.प. सर्वसाधारण सभेची मंजुरी घेवून सन २०१४-१५ मध्ये करण्यात आला आहे. तरी उपयोगिता प्रमाणपत्र व साठा पुस्तक प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०८ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना विचारणा केली की, १०० टक्के अनुदान तत्त्वावर पिको फॉल शिलाई मशीन पंचायत समितीना विलंबाने पूरवठा झाल्याने विलंब आकार लावण्यात आला आहे काय? यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ रोजी १०० टक्के अनुदान तत्वावर पिको फॉल शिलाई मशीनांचे वाटप पूर्ण करण्यात आले आहे. दोन पंचायत समितीमध्ये (पंचायत समिती, सेलू व पंचायत समिती, आर्वी) शिलाई मशिनचे वाटप उशिराने करण्यात आले आहे. सन २०१३-१४ चे अनुदान सन २०१४-१५ मध्ये वाटप करण्यात आले आहे.

समितीने निदेश दिले की, गुणवत्ता प्रमाणपत्र न मिळताच शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले आहे. शिलाई मशीनचे वाटप करण्याअगोदर गुणवत्ता प्रमाणपत्र मिळविण्यात आले नाही. या कामाकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. यामध्ये अफरातफर झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे पत्र देऊनही कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामध्ये वेळकाढूपणा करण्यात आलेला आहे. त्यामुळे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यासह वित्त विभागाचे सचिव व ग्रामविकास विभागांचे सचिव यांची साक्ष घेण्यात येईल. तसेच तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची चौकशी करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**१०० टक्के अनुदान तत्वावर पिको फॉल शिलाई मशीन पूरविण्याबाबत.—**१०० टक्के अनुदान तत्वावर पिको फॉल शिलाई मशिन, पंचायत समितीला विलंबाने पूरवठा करणे, मशिन वाटप करण्याअगोदर गुणवत्ता प्रमाणपत्र न मिळविणे इत्यादीबाबत जाणूनबजून दुर्लक्ष केल्याप्रकरणी संबंधितांची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

या कार्यालयाचे पूरवठा आदेश क्रमांक -जिपव/सकवि/सेफयो/वशि/४२९/२०१३-१४, दिनांक २८/०२/२०१४ अन्वये पंचायत समितीला साहित्य पूरविण्याबाबत पूरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार पूरवठाधारकाने सहा पंचायत समितीला माहे मार्च, २०१४ ला पिको फॉल साहित्याचा पूरवठा केला (वर्धा, देवळी, हिंगणघाट यांना दिनांक २५.३.२०१४, कारंजा, आष्टी यांना दिनांक २५.३.२०१४, समुद्रपूर यांना दिनांक २९.३.२०१४) तर ऊर्वरीत दोन पंचायत समिती, सेलू यांना दिनांक १३.६.२०१४ व आर्वी यांना माहे दिनांक ५.६.२०१४ ला पिको फॉल शिलाई मशिनचा पूरवठा विलंबाने केलेला आहे. त्यामुळे पूरवठाधारक यांचेकडून शासन निर्णय दिनांक २१.२.१९७८ नुसार ०.५ टक्के प्रती आठवडा या प्रमाणे दंड आकारण्यात आला. पंचायत समिती, सेलू येथील वसुली रु. ८१००/- व पंचायत समिती सेलू येथील वसुली रु.८९९१/- अशी दंडात्मक रक्कम रुपये १७,०९१/- सेस फंड खाते क्रमांक ३२७७०४८२७७ चालन द्वारे दिनांक ३०.०१.२०१९ ला जमा करण्यात आली.

सदर खरेदी महाराष्ट्र उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई यांनी पिको फॉल शिलाई मशिनबाबत श्रीकृष्ण सेल्स कॉर्पोरेशन, ३६४८/२, सार्थक बिल्डींग, ग्राऊंड प्लोअर, माणिक चौक, अहमदगर यांचेशी करण्यात आलेल्या दर करारानुसार केली असून सदर साहित्य आय.एस.आय. मानांकित होते. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दिनांक २ जानेवारी १९९२ मधील ८.४ मध्ये नमूद करण्यात आले आहे कि जेथे भारतीय मानक संस्था चिन्हांकित वस्तू खरेदी केलेली असेल तेथे त्रयस्थ संस्थाकडून तपासणी करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे गुणवत्ता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

सदर प्रकरणाबाबत श्रीमती जया राऊत तत्कालीन जिल्हा समाज अधिकारी सध्या (उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात पडताळणी समिती, यवतमाळ) यांना पत्र देवून खुलासा मागविण्यात आला. त्यांच्या खुलासावर चौकशी केली असता जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे कारवाई करण्यात आली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

(१) **महिला व बालविकास विभागाचा अभिप्राय.—**विभागाशी संबंधित नाही.

(२) **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय.—**संबंधीत मुद्या ग्रामविकास विभागाशी सबंधीत असल्याने शासन पत्र दि. १९ मार्च, २०१९ नुसार हस्तांतरीत करण्यात आले.

(३) **ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**(पंरा-१) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अशी विचारणा केली की, १०० टक्के अनुदान तत्त्वावर पिको फॉल शिलाई मशीन पंचायत समितीला विलंबाने पूरवठा करणे, मशिन वाटप करण्याअगोदर गुणवत्ता प्रमाणपत्र न मिळविणे इत्यादी बाबत जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याप्रकरणी संबंधितांची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, जे जबाबदार होते त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे? याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे. यामध्ये मुख्य आक्षेप असा होता की, पिको फॉल व शिलाई मशिनची तपासणी करण्यात आलेली नाही. परंतु तपासणी अहवाल हा त्या कालावधीतीलच आहे. तो तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर वर्धा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे पाठविण्यात आला होता. तो अहवाल नस्तीमध्ये सुद्धा उपलब्ध आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा यांचेकडून गुणवत्ता अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पूरवठाधारकास देयक अदा केले आहे. दुसरा मुद्दा हा शिलाई मशिनचा विलंबाने पूरवठा झाल्याबाबतचा होता. पूरवठादाराने वर्क ऑर्डर दिल्यानंतर पाच-सहा महिने विलंबाने पूरवठा केल्याप्रकरणी शासन निर्णयाप्रमाणे पूरवठादाराकडून १७,०९१/- इतक्या रकमेची दंडात्मक वसुली केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खुलाशावर समितीने होकारार्थी सहमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :**

समाज कल्याण समिती, जिल्हा परिषद, वर्धा यांनी शासन दर करारानुसार श्री. कृष्णा सेल्स कार्पोरेशन, अहमदनगर यांना रु. ५४०२/- प्रती नगप्रमाणे एकूण २७७ नग पिको फॉल शिलाई मशीन आठ पंचायत समितींना पूरवठा करण्याबाबत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी दिलेल्या पूरवठा आदेशानुसार संबंधित पूरवठादाराने दिनांक २४ मार्च, २०१४ रोजी आठ पंचायत समित्यांना पिको फॉल शिलाई मशीनचा पूरवठा केलेला असल्याचे जिल्हा परिषद, वर्धा यांच्या साठा नोंदवहीनुसार तपासणीत लेखापरीक्षकांना निदर्शनास आले. परंतु पंचायत समितींच्या साठा नोंदवहीतील नोंदीनुसार सहा पंचायत समित्यांना एकूण २१० पिको फॉल शिलाई मशीनचा दिनांक २४/०३/२०१४ रोजी तर सेलू व आर्वी या दोन पंचायत समित्यांना एकूण ६७ पिको फॉल मशीनचा पूरवठा अनुक्रमे दिनांक १३/०६/२०१४ व ५/०६/२०१४ रोजी उशीराने करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक ०५/०२/२०१४ ते २०/०९/२०१४ या कालावधीत संबंधित लाभार्थ्यांना पिको फॉल मशीन उपलब्ध करून देण्यात आलेले असून लेखापरीक्षा दिनांकापर्यंत पाच पंचायत समितीचे ५४ शिलाई मशीन शिल्लक असल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या सेसफंडामधून सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षासाठी २०% प्रमाणे मागासवर्गीयांच्या वयैक्तिक लाभांच्या या योजनेसाठी १५,००,०००/- एवढी तरतूद केलेली असतानाही सदरहू रक्कम या वित्तीय वर्षात खर्च करण्यात आलेला नाही. तसेच सदर पिको फॉल शिलाई मशीन तांत्रिकदृष्ट्या बरोबर असल्याचे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा यांचे प्रमाणपत्र दिनांक ६/०८/२०१४ रोजी प्राप्त झालेले असताना त्यापुर्वीच प्राप्त शिलाई मशीनचे वाटप संबंधित लाभार्थ्यांना करण्यात आलेले आहे.

**जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या २०% सेसफंड निधीतून अनुसूचित जाती/जमाती आणि विजाभज जमातीच्या स्त्री/पुरूषांना १००% अनुदानावर पिको फॉल मशिन पूरविणे या योजनेस शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार समाज कल्याण समितीच्या दिनांक ३०/०४/२०१३ रोजीच्या सभेमध्ये सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात सदरहू योजना राबविण्यासाठी रुपये १५,००,०००/- इतकी रक्कम खर्च करण्यास तांत्रिक मंजुरी देण्यात आलेली असताना एकूण २७७ पिको फॉल मशीन पूरविण्याचे पूरवठा आदेश उशीराने म्हणजेच दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी काढण्यात येऊन सदरहू रक्कम त्याच वित्तीय वर्षात खर्च करण्यात आलेली नाही. तसेच पूरवठ्याबाबतच्या अटी व शर्तीमध्ये पूरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत शिवणयंत्राचा पूरवठा करणे बंधनकारक करण्यात आले होते अन्यथा साहित्य पूरवठा करण्यास विलंब झाल्याच्या कारणास्तव दंड आकारला जाईल असे स्पष्ट नमूद केले असतानाही सेलू व आर्वी पंचायत समितींना एकूण ६७ शिवणयंत्रांचा पूरवठा उशीराने म्हणजे माहे जून, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात करण्यात आलेला असून याबाबत पूरवठादाराकडून कोणत्याही प्रकारचा दंड वसूल करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे पूरवठादाराने पूरवठा केलेल्या पिको फॉल शिलाई मशीनबाबत पूरवठा आदेशात नमूद असलेल्या तपशिलानुसार तांत्रिकदृष्ट्या बरोबर असल्याचे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा यांचे गुणवत्ता प्रमाणपत्र मिळण्यापूर्वीच लाभार्थ्यांना साहित्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता या प्रकरणात गैरप्रकार झाल्याची शक्यता नाकारता येत नसल्याने याबाबतची सविस्तर चौकशी करण्यासह दोषी असलेल्या सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई केल्याचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश समितीने दिले.**

त्यानुसार वर्धा, जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती तसेच विभागीय सचिवांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील या योजनेसाठीची अखर्चित रक्कम जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात आलेली आहे. तसेच सेलू व आर्वी पंचायत समित्यांना पिको फॉल शिलाई मशीनचा विलंबाने पूरवठा केल्याच्या कारणास्तव ०.५ टक्के प्रति आठवडा याप्रमाणे दंडात्मक रुपये १७,०९१/- इतकी रक्कम श्री. कृष्णा सेल्स कार्पोरेशन, अहमदनगर यांच्याकडून वसूल करून दिनांक ३०/०१/२०१९ रोजी सेसफंडात जमा करण्यात आलेली आहे. या प्रकरणाबाबत श्रीमती जया राऊत तत्कालीन जिल्हा समाज अधिकारी यांना पत्र देवून खुलासा मागविण्यात आला. त्यांच्या खुलाशावर चौकशी केली असता जाणुनबुजून दुर्लक्ष केल्याचे दिसून आले नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे दर करारानुसार पिको फॉल शिलाई मशीन खरेदी करण्यात आली असून सदर साहित्य भारतीय मानक संस्थेव्दारे चिन्हांकित असल्याने त्रयस्त संस्थांकडून तपासणी करण्याची आवश्यकता नसताना औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा यांचेकडून गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पूरवठादारास देयक अदा करण्यात आलेले आहे.

विशेष घटक योजनेखाली (SCP) मागासवर्गीयांच्या विविध विकास योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदांनी त्यांच्या सेसफंडातून २०% निधी प्रामुख्याने मागासवर्गीयांच्या वयैक्तिक लाभाच्या योजनांवर खर्च करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. तथापि, राज्यातील विविध जिल्हा परिषदांना भेटी देत असताना मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात आलेल्या योजनांसाठीचा राखीव असलेला २०% निधीचा विनियोग विहित वेळेत व योग्य प्रकारे होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. परिणामी वैयक्तिक लाभाच्या योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचत नाहीत व लाभार्थ्यांना लाभ विहित वेळेत मिळत नाही. त्यामुळे सामान्य जनतेमध्ये शासनाप्रती नाराजी निर्माण होऊन शासनाची प्रतिमा मलीन होत असल्याने या योजना राबविताना अधिकाऱ्यांकडून निष्काळजीपणा अथवा कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास येत असल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

यास्तव, पिको फॉल शिलाई मशीन पूरविण्यासंदर्भातील जिल्हा परिषद, वर्धा यांच्या लेखापरीक्षणाच्या आक्षेपातील अभिलेख्यांची तपासणी समितीने केली. यामध्ये समितीच्या असे निदर्शनास आले की, पूरवठादार असलेल्या श्री. कृष्णा सेल्स कार्पोरेशन, अहमदनगर यांनी सेलू पंचायत समितीस पूरवठा केलेल्या ३० नग शिलाई मशीनच्या दिनांक २४/०३/२०१४ रोजीच्या डिलीव्हरी चलन क्र. २ वर "दिनांक २४/०३/२०१४ ला सायंकाळी ६.०० वाजता प्राप्त झालेले पिको शिवणयंत्र ३० नग प्राप्त झाले असून गोडावून मध्ये ठेवण्यात आले आहे." असे नमूद करून पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली आहे. या चलनावर पंचायत समिती साठा नोंद वहीमध्ये पान क्र. ५३ वर नोंद करण्यात आली असल्याचेही नमूद केले आहे. तसेच आर्वी पंचायत समितीस पूरवठा केलेल्या ३७ नग शिलाई मशीनच्या दिनांक २५/०३/२०१४ रोजीच्या डिलीव्हरी चलन क्र. ६ वर "सुस्थितीत माल प्राप्त झाला असून पंचायत समिती साठा नोंदवहीमध्ये पान क्र. ७४ वर नोंद करण्यात आली" असल्याचे नमूद करून पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी स्वाक्षरी केली आहे.

**तथापि, जिल्हा परिषद, वर्धा यांनी समितीस सादर केलेल्या माहितीत व विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांनी नमूद केल्यानुसार सेलु पंचायत समितीस दिनांक १३/६/२०१४ व आर्वी पंचायत समितीस दिनांक ५/६/२०१४ रोजी पिको फॉल शिलाई मशीनचा पूरवठा विलंबाने केला असल्याने पूरवठादाराकडून दंडात्मक रक्कम वसूल केली आहे. यावरून ६७ पिको फॉल शिलाई मशीनचा पूरवठा या दोन पंचायत समितीस माहे मार्च, २०१४ मध्ये झाला की माहे जून, २०१४ मध्ये झाला हे स्पष्ट होत नाही. यामुळे या प्रकरणामध्ये गैरप्रकार झाला आहे, असे समितीचे मत असल्याने संबंधीतांची चौकशी करून त्यात संबंधित अधिकारी दोषी असल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, वर्धा

## थकित आगाऊ रक्कम (थकित अग्रिम)

**परिच्छेद क्रमांक ३.११९२/१८ (सन २०१३-२०१४)**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ मधील नियम २१२ नुसार नमूना ७९ मधील आगाऊ रकमांची नोंदवाही ठेवणे आवश्यक असून नोंदवही दरवर्षी अद्ययावत ठेऊन लेखापरीक्षणास सादर करणे आवश्यक आहे. तसेच वर्ष अखेर गोषवारा काढलेला नाही.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रुपये | अग्रीमाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | ५७ | १३/५/२ | १००० /- | एम एच. ३२. G-१ दुरुस्तीसाठी |
| २. | १६१ | १३/७/१४ | १०५००/- | एम एच. ३२. G-२० दुरुस्तीसाठी |
| ३. | ३४ | १३/९/६ | १२०००/- | एम एच. ३२. G-१ दुरुस्तीसाठी |
| ४. | १३४ | १४/२/२० | १४०००/- | एम एच. ३२. J-४४४४ दुरुस्तीसाठी |
| ५. | ८३ | १४/३/२१ | ८०००/- | एम एच. ३२. J-११ दुरुस्तीसाठी |
| ६. | १२८ | १४/२/२५ | १२०००००/- | नवीन वाहन खरेदीसाठी |
| ७. | १३ | १३/६/४ | ३०००००/- | सरळसेवा भरती प्रक्रीयासाठी अग्रीम (२०१३) |
| ८. | १९ | १३/४/१८ | १००००/- | श्री. ज्ञानेश्वर ढगे, अध्यक्ष, जि. प. वर्धा यांचे २४.४.१३ रोजी नवी दिल्ली येथे प्रशिक्षणासाठी अग्रीम |
| ९. | २४ | १३/१०/५ | २३००००/- | लालबहादुरशास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी मसुरी येथील मुकाअ. यांचे प्रशिक्षणावरील खर्च भागविणेसाठी. |
| | | **एकूण** | **१७८५५००/-** | |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रमाणक क्रमांक ५७ दिनांक २/५/२०१३, रुपये १०००/- घेतलेल्या अग्रीमातील अखर्चीत रक्कम चलान दिनांक २६/५/२०१५ अन्वये समायोजन करण्यात आली आहे.

(२) प्रमाणक क्रमांक १६१ दिनांक १४/७/२०१५, रक्कम रुपये १०,५००/- च्या अनुषंगाने रुपये ८१४४/- व्हाऊचर क्र. ८५ दिनांक १९/१२/२०१४ नुसार समायोजन करण्यात आले आहे. व उर्वरित रुपये १८०१/- चलान दिनांक २८/१०/२०१३ व रुपये ५५५/- चलान दिनांक २९/१/२०१४ नुसार भरण्यात आली आहे.

(३) प्रमाणक क्रमांक ३४ दिनांक ६/९/२०१३, रक्कम रुपये १२,०००/- च्या अनुषगांचे रुपये ८८४६/- व्हाऊचर क्र. ४०१, दि. २६/३/२०१५ नुसार समायोजन करण्यात आले आहे. व उर्वरित रुपये ३१५४/- चलान दि. ५/२/२०१५ नुसार भरण्यात आली आहे.

(४) प्रमाणक क्रमांक १३४ दिनांक २०/२/२०१४ नुसार घेतलेला अग्रीम रुपये १४,०००/- चे समायोजन व्हाऊचर क्रमांक १९८ दिनांक २०/९/२०१४ नुसार करण्यात आले आहे.

(५) प्रमाणक क्रमांक ८३ दिनांक २१/३/२०१४ रुपये ८०००/- च्या अनुषंगाने रुपये ३८२१/- व्हाऊचर क्र. ४०५ दि. ३०/३/२०१५ नुसार समायोजन करण्यात आले आहे. व उर्वरित रक्कम रुपये ४१७९/- चलान दिनांक ७/२/१५ नुसार भरण्यात आली आहे.

(६) प्रमाणक क्रमांक १२८ दिनांक २५/२/२०१४ रुपये १२,००,०००/- च्या अनुषंगाने रुपये १०,३४,०६०/- व्हाऊचर क्र. १४४ दि. ३१/३/२०१५ नुसार समायोजन करण्यात आले आहे. व उर्वरित रुपये १,६५,९४०/- चलान दिनांक ११/०२/२०१५ नुसार भरण्यात आली आहे.

(७) प्रमाणक क्रमांक १३ दिनांक ४/६/१३ रुपये ३,००,०००/- च्या अनुषंगाने रुपये ५४,१२०/- व्हाऊचर क्र.३२ दि. ३१/३/१५ नूसार भरण्यात आले आहे. तसेच रुपये १,५८,०७५/- व्हाऊचर क्र. ३३ दिनांक ३१/३/२०१५ नुसार भरण्यात आले.

उर्वरित रक्कम रुपये ८७,८०५/- चे समायोजन होणे बाकी आहे. यास जबाबदार असणारे कर्मचारी श्री. विशाल सुधाकरराव मेहत्रे, रोखपाल (कनिष्ठ सहायक) यांनी कर्तव्यात कसुर केल्याने विभागीय चौकशी अंती महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चे उल्लघंन केल्यामुळे कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ अन्वये त्यांना मा. मुख्य कार्यकरी अधिकारी, जि.प. वर्धा यांचे आदेश क्र.जिपव/साप्रवि/विचौ/वशि-७९६/२०१६ दिनांक २८/०६/२०१६ अन्वये त्यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.

वरील अखर्चित रक्कम शासन खाती जमा न करता उपरोक्तप्रमाणे रक्कम रुपये ८७,८०५/- अपहार केले यास जबाबदार असणारे कर्मचारी श्री. विशाल सुधाकरराव मेहत्रे यांचे कडून सदर रक्कम जमा करण्याकरिता या कार्यालयाचे

१. पत्र क्र.जिपव/साप्रवि/रोख/वशि/क्यु/१६, दि. २३/५/१६

२. पत्र क्र.जिपव/साप्रवि/रोख/वशि/क्यु/१६, दि. २८/६/१६

३. पत्र क्र.जिपव/साप्रवि/रोख/वशि/४७०/१६, दि. ३१/८/०१६

४. पत्र क्र.जिपव/साप्रवि/राख/वशि/८७०/१६, दि. १४/१०/१६

५. पत्र क्र.जिपव/साप्रवि/रोख/वशि/३८५/१७, दि. १०/०२/१७

६. पत्र क्र.जिपव/साप्रवि/रोख/वशि/०५/१७, दि. १७/०७/१७

वरीलप्रमाणे श्री. विशाल सुधाकरराव मेहत्रे यांना रक्कम शासनखाती जमा करण्याबाबत पत्रान्वये कळविण्यात आले आहे. श्री. विशाल सुधाकरराव मेहत्रे यांनी शासनाकडे अपील दाखल केली होती. परंतु त्यांची अपील फेटाळण्यात आलेली आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वर्धा यांनी दिनांक २८/०६/२०१६ रोजी पारित केलेला शिक्षेचा आदेश कायम करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने प्रस्तावित रक्कम रुपये ८७,८०५ वसुलीबाबत R.R.C प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. (पत्र क्र. ४८२ दि. ०६/०३/२०१८ व पत्र क्र. १०९६ दिनांक २१/०५/२०१८)

(८) संचालक राज्य ग्रामीण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे ह्यांनी त्यांचे पत्र क्रमांक एसआयआरडी / पंरादि. / प्रतिपूर्ती / २०१३-१४ /०२ दिनांक ११/०४/२०१४ अन्वये श्री. ज्ञानेश्वर ढगे, मा. अध्यक्ष जि.प. वर्धा यांनी रुपये १४,६००/- इतकी रक्कम खर्च केली असल्याने, सदरील खर्चाच्या प्रतिपुर्तीचा निधी रुपये १४,६००/- RTGS व्दारे जिल्हा परिषद, वर्धा यांचे नावे बॅंक खाते क्र. ३२७७००४९३७२ भारतीय स्टेट बॅंक, शाखा वर्धा IFSC code No. SBIN0005764 मध्ये जमा करण्यात आल्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वर्धा यांना कळविले आहे.

(९) लालबहादुरशास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी मसुरी येथील मुकाअ. यांचे प्रशिक्षणावरील खर्च भागविणेसाठी मा.मु.का.अ.यांचे आदेश क्र.जिपव/साप्रवि/ आस्था-३/वशि-१०६१/२०१३, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१३ अन्वये प्रमाणक क्रमांक २४ दिनांक ५/१०/२०१३ रुपये २,३०,०००/- मसुरी येथे प्रशिक्षणास जाण्याकरिता प्रवास अग्रीम मंजूर करण्यात आले.

त्या अनुषंगाने रुपये ३०,०००/- चलान दिनांक १७/४/२०१५ नुसार भरण्यात आले आहे. उर्वरित रक्कम रुपये २,०००,००/- अग्रीमाकरिता अनुदान उपलब्ध करून देणेबाबत शासनस्तरावर पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु अद्याप पावेतो रुपये २,००,०००/- प्राप्त झाले नाही. त्याअनुषंगाने ग्रामविकास विभागास या कार्यालयाचे पत्र क्र. १००५ दिनांक १०/१०/१३, पत्र क्र. १७५ दिनांक ५/२/१४, पत्र क्र. ९२२४ दिनांक ३/१२/१५, पत्र क्र. २९१ दि. २०/०२/१५, पत्र क्र. ८१५ दि. १५/१०/१५, पत्र क्र. १८९२ दि. २८/१२/१५, पत्र क्र. २९८ दिनांक ११/३/१५, पत्र क्र. २२६ दिनांक २२/२/१७, पत्र क्र. ३१० दिनांक २०/३/१७, पत्र क्र. ८३९ दिनांक २०/७/१७, पत्र क्र. ३८८ दिनांक ०४/०४/१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

शासनाकडून अनुदान प्राप्त होताच समायोजन करण्यात येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०८ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी मसुरी येथील प्रशिक्षणासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रुपये २ लाख ३० हजार प्रवास अग्रीम मंजूर करण्यात आलेला निधी कुठून देण्यात आला आहे यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मसुरी येथे प्रशिक्षण होते. प्रशिक्षणाला हजर राहण्यासाठी रुपये २ लाख ३० हजार इतके प्रवास अग्रीम मंजूर करण्यात आले होते. सदरहू रक्कम जिल्हा परिषदेच्या निधीतून देण्यात आला आहे. दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी रुपये ३०,०००/- चलनाव्दारे भरण्यात आले व उर्वरित रक्कम रुपये २,००,०००/- अग्रीम करीता अनुदान उपलब्ध होण्यासाठी शासनस्तरावर पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु, अद्यापपर्यंत रुपये २,००,०००/- शासनाकडून प्राप्त झाले नाही. उक्त रक्कम मिळण्यासाठी ग्रामविकास विभागाकडे सातत्याने पाठपूरावा करण्यात आला आहे. आम्ही त्यासाठी ग्रामविकास विभागाला सात-आठ पत्रे पाठविली आहेत. शासनाकडून अनुदानीत रक्कम प्राप्त होताच समायोजन करण्यात येईल. तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेचा निधी खर्च करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेचा निधी खर्च करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नाहीत हा खर्च वेतन व भत्ते यातून करावयास पाहिजे होता. सदरची रक्कम समायोजित करण्यासाठी वारंवार मागणी केली आहे.

यावर समितीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे सूचना केली की, आपणास जिल्हा परिषदेच्या निधीतून पैसे काढावयाचे असल्यास त्यासाठी जिल्हा परिषदेची मंजुरी घ्यावी लागेल, आपणास अशी रक्कम घ्यावयाची असेल तर त्यासाठी बजेटमध्ये तरतूद करून त्यास जिल्हा परिषदेची मंजुरी घ्यावी लागेल त्यानंतरच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पैसे काढता येईल. यापुढे जिल्हा परिषदेच्या निधीतून पैसे काढावयाचे असेल तर काळजी घेण्यात यावी. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, सरळसेवा भरती प्रक्रियेसाठी दिनांक ०४ जून, २०१३ रोजी रुपये ३,००,०००/- अग्रीम मंजूर करण्यात आले होते. दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी रुपये ५४,१२०/- व १,५८,०७५/- चे व्हॉउचर भरण्यात आले उर्वरित रक्कम रुपये ८७,८०५/- चे समायोजन होणे बाकी आहे यास जबाबदार असणारे कर्मचारी श्री.विशाल मेहत्रे, रोखपाल (कनिष्ठ सहायक) यांनी रुपये ८७ हजार ८०५ इतकी अखर्चित रक्कम शासन खाती जमा केलेली नाही. त्यामुळे त्यांना कर्तव्यात कसूर केल्याने विभागीय चौकशी अंती महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील नियम ३ चे उल्लंघन केल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ अन्वये त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सेवेतून कमी केले आहे.समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा परिषदेच्या खात्यातून पैसे काढत असताना त्याबाबत आक्षेप का घेण्यात आला नाही. याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता, १९६८ चे नियम २१० (ब) नुसार इतर स्वरुपाच्या आगाऊ रकमा क्वचित प्रकरणातच देण्यात येतील. या आगाऊ रकमा विभाग अध्यक्षांच्या मंजुरीने देता येतील. मात्र उक्त रक्कम १,००० रुपयांपेक्षा अधिक नसावी व पूर्वीच्या कोणत्याही आगाऊ रकमाचे समायोजन व्हावयाचे राहिलेले नसावे, इतर सर्व प्रकरणात उक्त आगाऊ रकमा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून मंजूर करण्यात येतील. गट अनुदानांचा संबंध येत असेल तर, गट विकास अधिकाऱ्यास ५०० रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी आगाऊ रक्कम मंजूर करता येईल. जर आगाऊ रक्कम या रकमेपेक्षा अधिक असेल तर समितीच्या मंजुरीची आवश्यकता असेल.

समितीने निदेश दिले की, थकीत आगाऊ रक्कमे संदर्भात गाईड लाईन्स असताना, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मार्गदर्शक तत्वानुसार अधिकार नसताना त्यांनी निधीची उचल केल्यामुळे नियमांचे उल्लंघन झाले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी या गोष्टी तपासल्या पाहिजे होत्या. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमांचे उल्लंघन केलेले आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेचे अधिकार डावलण्याचे काम झालेले आहे. यासंदर्भात चौकशी करण्यात येऊन विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**थकित आगाऊ रक्कम (थकित अग्रिम).—**थकीत आगाऊ रक्कमाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मार्गदर्शक तत्वानुसार अधिकार नसतांनाही निधीची उचल केल्यामुळे नियमांचे उल्लघंन झालेले असून जिल्हा परिषदेच्या सभेचे अधिकार डावल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. पंचायती राज समितीने निर्देशित केल्यानुसार सदर प्रकरणी चौकशी केली असता असे निदर्शनास येते की, सदर अग्रीम महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ नियम २१० (ब) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वर्धा यांनी मंजूर केलेला असून उक्त तरतुदीनुसार रु. १०००/- पेक्षा जास्त रकमेचा अग्रीम मंजुरीस मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम आहेत. यात जि.प. सर्वसाधारण सभेचे कोणतेही अधिकार डावलेले नाहीत. त्यामुळे कोणावरही कारवाई करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

(१) **ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**(वित्त-७) जिल्हा परिषद, वर्धा यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक सुस्पष्ट माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, आपल्याकडे आता काही थकीत आगाऊ रकमा आहेत काय, असल्यास त्या सर्व थकीत रकमा वसूल केल्या आहेत काय मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सद्यस्थितीत रुपये ५४,१४,३६१/- इतके अग्रिम थकीत आहे. अग्रिम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे. याबाबत संबंधित विभागास वारंवार पत्र देण्यात आले आहे. समितीचे असे म्हणणे आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रिम मंजुरी देण्याचे अधिकार नाहीत. त्याकरिता त्यांना जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची परवानगी घ्यावी लागते. परंतु, ॲक्टनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाच अग्रीम मंजुरी देण्याचे अधिकार आहेत अग्रिमाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अमर्याद अधिकार आहेत. याबाबत समितीने अशी विचारणा केली की, मग ऑडिट ऑब्जेक्शन चुकीचे होते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, लेखापरीक्षकांचे असे म्हणणे होते की, ॲक्टनुसार ते पंचायत समिती व जिल्हा परिषदेला लागू होते. तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, अग्रिम दिल्यानंतर किती दिवसांत वसुली (रिकव्हरी) केली पाहिजे, याबाबत संचालक स्थानिक निधी व लेखा यांनी अधिकची माहिती विदित केली की, अग्रिम दिल्यांनतर त्या वर्षाच्या शेवटपर्यंत वसुली केली पाहिजे.

समितीने अपर मुख्य सचिव (ग्रामविकास विभाग) यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना किती रुपयांपर्यंतच्या अग्रिम मंजुरीबाबतचा अधिकार आहे, अग्रिमाबाबत त्यांना अमर्याद अधिकार आहेत काय, याबाबत अपर मुख्य सचिव ग्रामविकास विभाग यांनी विशद केले की, अग्रिम मंजुरीबाबत मर्यादा नमूद केलेली नाही. त्यासंदर्भात संचालक स्थानिक निधी व लेखा यांनी अधिकची माहिती विदित केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नियम २१० (ब) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रुपये १०००/- पेक्षा जास्त रक्कमेचे अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, अग्रिम मर्यादा कमी असल्यामुळे अव्वाच्या सव्वा अग्रिमास मंजुरी दिली जाते. सद्यःस्थितीत अग्रिम मर्यादा किती आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम २१० (ब) मध्ये अग्रिम मर्यादा दर्शविण्यात आलेली नाही. तद्नंतर संचालक स्थानिक निधी लेखा यांनी अधिकची माहिती विशद केली की, यामध्ये दोन गोष्टी आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता, १९६८ चे नियम २१० (ब) व २१२ प्रमाणे एक हजार रुपयांपेक्षा जास्त अग्रिम (ॲडव्हान्स) दिला जातो. एखाद्या अधिकारी, कर्मचाऱ्याला वैद्यकीय कारणास्तव गरज पडली तर, अशा वेळेस विशेष अग्रिम (ॲडव्हान्स) दिला जातो किंवा एखाद्या अधिकारी किंवा पदाधिकाऱ्यांना कुठल्या प्रशिक्षणासाठी किंवा कुठे जायचे असेल तर अशा वेळेस अग्रिम (ॲडव्हान्स) दिला जातो अन्यथा इतर बाबींसाठी उत्सव अग्रिम (फेस्टीवल ॲडव्हान्स) दिला जातो, तो लगेच वेतनातून वसूल केला जातो. फक्त एकच ऑब्झर्व्हेशन असे निदर्शनास आलेले आहे की, अग्रिम (ॲडव्हान्स) दिल्यानंतर साधारणपणे तो ३ महिन्यांमध्ये वसूल झाला पाहिजे आणि जर तो वसूल झाला नाही तर, तो व्याजासह वसूल केला पाहिजे, एवढे बंधन त्यामध्ये आहे. परंतु, बऱ्याच वेळेस तो हप्त्यामध्ये वसूल केला जातो. तसे न करता तो एक रकमी दिला असेल तर एक रकमी वसूल केला पाहिजे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सर्वसाधारण सभेसमोर जायची आवश्यकता नाही गट विकास अधिकारी यांना ५०० रुपयांच्यावर अग्रिम (ॲडव्हान्स) द्यायचा असेल तर समितीची मान्यता घ्यावी लागते जिल्हा परिषदेच्या बाबतीत १ हजार रुपयांच्या पुढे मर्यादा नाही. ते पूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले की, थकित आगाऊ रकमा दिलेल्या मर्यादेपर्यंत त्या वसूल झाल्या पाहिजेत. भविष्यात असे प्रकार होऊ नयेत यादृष्टीने आपण संबंधिताना योग्य त्या सूचना द्याव्यात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, थकित

अग्रीम दिलेल्या मर्यादेपर्यंत वसूल न झाल्यास, व्याजासह वसूल करण्याबाबत सर्व खातेप्रमुखांना सूचना तसेच पत्र व परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. आम्ही आमच्या स्तरावर वैद्यकीय (मेडिकल) कारणासाठी वगैरे अग्रिम देतो. हॉस्पिटलचे बिल आले की, त्यानंतर तो देतो. याबाबत अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अधिकची माहिती विदित केली की, असाही नियम आहे की, पुढचा अग्रिम (ॲडव्हॉन्स) पाहिजे असेल तर अगोदर घेतलेला अग्रिम वसूल (ॲडव्हॉन्स क्लिअर) केला पाहिजे. तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी स्पष्ट केले की, नियमानुसार अगोदर दिलेला अग्रिम वसुली (ॲडव्हॉन्स क्लिअर) पूर्ण झाल्याशिवाय पुढचा अग्रिम (ॲडव्हॉन्स) देऊ नये.

समितीने अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांना निदेश दिले की, काही ठिकाणी संबंधित कर्मचाऱ्यास २ ते ५ लाख रुपये अग्रिम म्हणून दिलेले आहेत. संबंधितांनी ते परत केले नाहीत. ते सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या देय रकमेतून वसुली केली पाहिजे होती ती देखील केलेली नाही. अशा प्रकारे दिलेला अग्रिम आतापर्यंत वसूल झालेला नाही. भविष्यात असे होऊ नये याकरिता आपण सर्वांना त्या संदर्भात सूचना द्यावेत. तसेच यासंदर्भात कायद्यामध्ये काही सुधारणा किंवा कडक स्वरुपाचे परिपत्रक निर्गमित करण्यासंदर्भात- आपण याकडे लक्ष द्यावे. याबाबत अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सहमती दर्शविली. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत अधिकची माहिती विशद केली, सेवानिवृत्त होऊन गेलेल्या कर्मचाऱ्यांचा देय रकमेतून अग्रीम वसुली करण्यात आलेली नाही अशा प्रकारच्या चुका भविष्यात होऊ नये याकरिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ना हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून अग्रिम वसूल करण्यात यावे असे प्रकारचे परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना केली की, अग्रिम सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीत प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अग्रिम प्रलंबित राहिल्यास तो व्याजासह वसूल करण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने अग्रिम दिलेल्या मर्यादेपर्यंत वसूल न झाल्यास तो व्याजासह वसूल केला जाईल याबाबत परिपत्रक सर्व जिल्हा परिषद स्तरावर निर्गमित करण्यात आले आहे. तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अधिकची माहिती विदित केली की, अग्रिम (ॲडव्हॉन्स) सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीत प्रलंबित राहणार नाही. प्रलंबित राहिल्यास संबंधित जबाबदार राहतील व तो व्याजासह वसूल केला जाईल असे परिपत्रक निर्गमित झाले तर त्यावर थोडासा अंकुश येऊ शकेल. यावर समितीने मत व्यक्त केले की, परिपत्रक निर्गमित करण्यापेक्षा कायद्यामध्येच एखादे परंतुक दाखल (ॲड) करावे अशी तरतूद झाली तर उचित होईल. याबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी सहमती दर्शवून स्पष्ट केले की, पूर्वी डिपार्टमेंटल वर्क होते तेव्हा सिमेंटसाठी वगैरे अग्रिम दिले जायचे. आता तो प्रकार राहिलेला नाही फार अपवादात्मक तसे होताना दिसते. फक्त जूने प्रलंबित असल्याने आपल्याला संख्या मोठी दिसते.

**अभिप्राय व शिफारशी :**

जिल्हा परिषद, वर्धा यांच्या आगाऊ रकमांची नोंदवहीनुसार वाहन दुरूस्तीसाठी रु. ४५,५००/-, नवीन वाहन खरेदीसाठी रु. १२,००,०००/ जिल्हा परिषदेचे, अध्यक्ष यांचे प्रशिक्षण यासाठी रु. १०,०००/-, सरळ सेवा भरती प्रक्रियेसाठी रु. ३,००,०००/- व लालबहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी मसुरी येथील मुकाअ यांचे प्रशिक्षणासाठी रु. २,३०,०००/- असे एकूण रु. १७,८५,५००/- इतक्या आगाऊ रकमेचे समायोजन करण्यात आले नसल्याचे लेखापरीक्षणात नमूद करण्यात आले आहे.

या विषयासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, वाहन दुरूस्ती, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांचे प्रशिक्षण व नवीन वाहन खरेदी यासाठीच्या आगाऊ रकमेचा भरणा करण्यात आलेला आहे. सरळ सेवा भरती प्रक्रियेसाठी अग्रिम मंजूर करण्यात आलेल्या रु. ३,००,०००/- या रकमेपैकी रु. ५४,१२०/- व १,५८,०७५/- चे चलन भरण्यात आले उर्वरित रक्कम रु.८७,८०५/- चे समायोजन करणे बाकी आहे. यास जबाबदार असणारे श्री. विशाल मेहत्रे, रोखपाल (कनिष्ठ सहायक) यांना कर्तव्यात कसूर केल्याने विभागीय चौकशी अंती सेवेतून कमी केले आहे. तसेच लालबहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी मसुरी येथील मुकाअ. यांच्या प्रशिक्षणाच्या अग्रिम रकमेपैकी रु. ३०,०००/- चलनाद्वारे भरण्यात आले असून उर्वरित रु. २,००,०००/- अग्रिमाकरिता अनुदान उपलब्ध करून देणेबाबत शासनस्तरावर पाठपूरावा करण्यात येते. शासनाकडून अनुदानीत रक्कम प्राप्त होताच या रकमेचे समायोजन करण्यात येईल.

सरळ सेवा भरती प्रक्रियेसाठी देण्यात आलेल्या अग्रीमाच्या वसुलीच्या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यावर करण्यात आलेल्या कारवाईबाबत समिती समाधान व्यक्त करत आहे. तथापि, महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता, १९६८ चे नियम २१० (ब) मध्ये आगाऊ रकमेसंदर्भात मार्गदर्शक तत्व स्पष्ट केली असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमांचे उल्लंघन करून जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेचे अधिकार डावलून निधीची उचल केलेली आहे. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आगाऊ रकमा देताना कोणत्याही बाबींची तपासणी केलेली नाही असे समितीचे मत असल्याने याबाबतची तपासणी करण्यासह आगाऊ रक्कमांच्या प्रकरणात गुंतलेल्या एकूण रकमेच्या तपशीलासह यासंदर्भातील अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश समितीने दिले.

जिल्हा परिषदेच्या थकित आगाऊ रकमांसंदर्भात घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, नियमानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी हे अग्रिम मंजुरीस सक्षम प्राधिकारी असून त्यांच्या अग्रिम मंजुरीबाबत कोणतीही मर्यादा नमूद केलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेचे कोणतेही अधिकार डावललेले नसल्याने यामध्ये कोणावरही कारवाई करावयाची आवश्यकता नाही. तसेच सद्यःस्थितीस रुपये ५४,१४,३६१/- इतके अग्रिम थकित असून अग्रिम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधीत ठेकेदार, विभागप्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशाप्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशोब समायोजन/वसुली करणे आवश्यक असताना योग्य प्रकारे कार्यवाही होत नसल्याने थकित आगाऊ रक्कमांची रक्कम वाढत असून जिल्हा परिषद, वर्धा यांचीही अग्रीमाची थकित रक्कम मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास येत आहे. या रकमेच्या वसुलीसाठी या प्रकरणातील अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होत असताना त्यांना "ना-देय" प्रमाणपत्र देताना त्यांच्याकडून वसुलीपात्र रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. अथवा रक्कम वसूल करणे शिल्लक असताना सेवानिवृत्तीधारकास "ना-देय" प्रमाणपत्र देण्यात आले असल्यास **याबाबतची तपासणी करून प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधितांवर कारवाई करून रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच थकित आगाऊ रक्कमेची वसुली रक्कम तातडीने व्याजासह अग्रीमाची रक्कम एक रक्कमी वसूल करण्यात यावी. जे अधिकारी/कर्मचारी बदलीने अन्य ठिकाणी स्थलांतरीत झाले आहेत अशा अधिकाऱ्यांच्या त्याच्या प्रलंबित अग्रीमाची नोंद त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रामध्ये घेण्यात यावी. काही प्रकरणामध्ये आवश्यक असल्यास संबंधितांच्या मालमत्तेतून अग्रीमाच्या रकमेची वसुली करण्याची कार्यवाही देखील करण्यात यावी. या कार्यपद्धतीनुसार थकित रकमेची वसुली करण्याची कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

राज्यातील अनेक जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीच्या निदर्शनास येत आहे की, सर्व जिल्हा परिषदांमध्ये थकित अग्रीमाची रक्कम मोठ्या प्रमाणात आहे. अग्रीम प्रदान करणे, सदरची रक्कम त्याच कारणास्तव खर्च करण्यात येत असल्याचे निश्चित करणे व विहित वेळेत अग्रीम वसूल करणे या कामकाजाच्या कार्यपद्धतीमध्ये सुसूत्रता आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे. **यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियमात अग्रीम मंजूर करणे/वसुल करणे व यासंदर्भातील सक्षम प्राधिकारी याबाबत संदिग्धता निर्माण होत असल्याने या नियमांमध्ये आवश्यक ती सुधारणा तातडीने करून स्वतंत्र सुःस्पष्ट नियमावली तयार करण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे मत आहे. याकरिता योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करत आहे.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, वर्धा

## मागासवर्गीय विद्यार्थांना सायकल पूरवठा न केल्याबाबत....

**परिच्छेद क्रमांक ४.६५२/२३ (सन २०१३-२०१४)**

**प.स.उपकर योजना**

सायकल पुरवठा न करताच पुरवठादारास शोधन करणे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकलीच्या लाभापासून वंचित ठेवणे. सायकली प्रत्यक्षात प्राप्त झाल्या नसतांना त्या प्राप्त झाल्याचे गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र देणे, अवाजवी दराने सायकली खरेदी करणे, दरकरार लेखापरीक्षणास सादर न करणे, अर्जापेक्षा जास्त नग सायकल खरेदी करणे योजनेस तांत्रिक मंजुरी न घेणे, शासनाने ठरविलेल्या वेळापत्रकाचे पालन न केल्याने योजना पुर्णपणे असफल होणे. प्रमाणक क्र. १७ दि. २९.३.२०१४ रक्कम रुपये ४३७४९३/- अंदाजपत्रकिय किंमत रु. ५,००,०००/-

प्रशासकीय मंजुरी पं.स. सर्वसाधारण सभा ठराव क्र.६/८ दिनांक १८/०५/२०१३ तांत्रिक मंजुरी नाही,

पूरवठा आदेश क्रमांक-३६१ दि.४/३/२०१४ पूरवठा मुदत २१ दिवसाच्या आत पूरवठादार-मे. जोंधळे पाटील अँड कं. नाशिक उपप्रमाणक क्र. ४५ दि.२९/३/२०१४

उपरोक्त प्रमाणकान्वये सन-२०१३-१४ ला पं.स.सेसफंड योजनेतून १००% अनुदानावर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जेन्ट्स व लेडिज १४९ नग सायकली पूरवठा करण्याकरिता मे.जोंधळे पाटील अँड कं. नाशिक पं.स. आर्वी ने धनादेश २३३७६४ दिनांक २९/३/२०१४ ने शोधन केलेले आहे. परंतु प्रत्यक्षात सायकली पूरवठा झालेलाच नाही. याबाबत लेखापरीक्षण अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

(१) महाराष्ट्र जि.प.व पं.स. लेखा संहिता, १९६८ चे कलम ७९ अन्वये पूरवठादारास पैसे देण्यापूर्वी सामान, वस्तू वगैरे चागल्या स्थितीत मिळण्याचे आणि त्यांची योग्य त्या संग्रह नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र बिलावर नोंदविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे बिलाची तपासणी केली असता बिलावर मालसंग्रह नोंदवही पान क्र.४० वर वरीलप्रमाणे सायकली मिळाल्याची नोंद घेतल्याची आढळली परंतु त्या प्रमाणे मालसंग्रह नोंदवहीची तपासणी केली असता प्रत्यक्षात सायकली प्राप्त झाल्याची नोंद मालसंग्रह नोंदवहीमध्ये घेतल्याची आढळली नाही, माल न मिळाल्याबाबत अर्धसमास पत्राने विचारणा केली असता त्याचे उत्तर देण्यात आले नाही. मालसंग्रह नोंदवही बाळगणारे कर्मचारी यांनी प्रत्यक्षात माल मिळाला नसल्याचे सांगितले व तशी मालसंग्रह नोंदवहीत लेखापरीक्षणासोबत स्वाक्षरी केलेली आहे. अशाप्रकारे प्रत्यक्षात सायकली प्राप्त झाल्या नसतांना गटविकास अधिकारी पं.स.आर्वी यांनी बिलातील माल योग्य व चांगल्या स्थितीत मिळाल्याबाबत प्रमाणपत्र बिलावर नोंदवून देयकाचे शोधन केलेले आहे. ही अतिशय गंभिर बाब असून वरीलप्रमाणे कलम ७९ चे भंग करणारी आहे. व वित्तीय औचित्याचे नियमाला धरून नाही.

(२) उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय दि.२/०१/१९९२ मधील तरतुदी नुसार सायकल ही बाब मध्यवर्ती भांडार खरेदी संघटने मार्फत वार्षिक दर करार दरवर्षी केले जातात व त्या आधारे सर्व शासकीय/निमशासकीय विभाग/जिल्हा परिषदा/नगरपरिषदा ई.ना आवश्यकतेनुसार खरेदी करणे, शासनाने दि.४/२/२००३ च्या शासन निर्णयानुसार बंधनकारक केले आहे. त्यानुसार मे.जोंधळे पाटील अँड कं. नाशिक यांचे सोबत झालेला सन २०१३-१४ चा सायकल दर करार अर्धसमास पत्राने मागणी करून सुद्धा लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही.

(३) उद्योग सहसंचालक (भांडार खरेदी) विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय नवीन प्रशासकीय भवन मुंबई-३२ च्या दि.१४/३/२०१३ च्या आदेशानुसार सन २०१२-१३ करीता सायकलचे न्युनतम दर जेन्टस सायकल रुपये २८३५/- व लेडीज सायकल रुपये २८०८/- ठरविण्यात आले होते. परंतु पं.स.आर्वी ने ३३४८/- रु. प्रती सायकल या अवाजवी दराने सरसकट जेन्टस व लेडीज सायकल असा फरक न करता चालु वर्षात सायकल खरेदी केलेली आहे.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधिल कलम ९९ (क) मधील तरतुदीनुसार योजनेस सक्षम प्राधिकृत अधिकऱ्याची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे. उलट महा. शासन निर्णय क्र.परास/१०९८/प्र.क्र.१७८/०५ दिनांक ९ ऑक्टोबर-१९९७ चे परिच्छेद ४ नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांना प्रथम तांत्रिक मंजुरी घेवून मगच प्रशासकीय मान्यता देणेबाबत नमूद आहे. परंतु सदर योजनेस तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.परास १०२०/प्र.क्र.१४/३८, दिनांक ९ फेब्रुवारी २००१ नुसार लाभार्थिची निवड कागदपत्राची योग्य छाननीनंतरच अंतिम होणे आवश्यक असतांना सदर योजनेकरिता फक्त ५१ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाल्याचे आढळले वरील प्रमाणे १४९ नग सायकल खरेदी केलेली आहे. परंतु उर्वरित ९८ लाभार्थ्यांचे अर्जच प्राप्त झाले नसताना व त्याची निवडच झालेली नसताना ९८ सायकलीची खरेदी करून (९८x३३४८) ३२८१०४/- रु. चा अपव्यय झालेली आहे.

(६) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. झेडपीए/-प्र.क्र४४६/वित्त -९ मंत्रालय मुंबई दिनांक २० जून २००८ च्या परिशिष्ट ई मध्ये जिल्हा परिषदांकडील वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्याबाबत वेळापत्रक दिलेली आहे. त्यानुसार पं.स.आर्वी ने सदर योजनेची निवड अर्थसंकल्पीय तरतूद व प्रशासकीय मंजुरी ही कार्यवाही वेळापत्रकानुसार केली परंतु त्यानंतर तांत्रिक मंजुरी प्रस्तावाची छाननी लाभार्थी निवड खरेदीस मान्यता या बाबीची कार्यवाहीच केली नाही. वेळापत्रकानुसार दिनांक ३० सप्टेबर २०१३ ला साहित्य पूरवठा आदेश दयावयाचा असंताना तो फार उशीर म्हणजेच ४/३/२०१४ ला देण्यात आला दिनांक ३०/११/२०१३ ला लाभार्थ्यांना साहित्य वाटप होणे आवश्यक असतांना आजतागायत पं.स.आर्वी ला पूरवठादाराकडून साहित्याचा पूरवठाच झालेला नाही, मात्र पूरवठादारास शोधन करण्यात आले. उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय जिल्हा परिषदांनी उच्च कार्यक्षमतेनुसार नियोजन करून आर्थिक वर्षाच्या नोव्हेंबर, डिसेंबर अखेर योजनाची अंमलबजावणी करावी यासाठी आहे. परंतु पं.स. आर्वी ने त्यांचे पालन केले नाही व त्यामुळे पं.स.आर्वी अंतर्गत येणारे मागासवर्गीय विद्यार्थी सन २०१३-१४ मध्ये सायकल रुपाने मिळाणाऱ्या वैयक्तिक लाभापासून वंचित राहीले व सदर योजना ही पुर्णपणे असफल झाली.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपाचे अनुपालन खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखा संहिता चे नियम-७९ पूरवठा धारकास पैसे देण्यापूर्वी सामान वस्तू वगैरे चांगल्या स्थितीत मिळाल्याचे आणि त्याचा योग्यत्या संग्रह नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र बिलावर नोंदने आवश्यक असल्यामुळे नोंद होणे अशी तरतूद असल्यामुळे मालसंग्रह नोंदवही पा.क्र.४० वर साहित्य प्राप्त होणार असल्याचे गृहित धरून फक्त नमुना-३३ मालपुस्तकाच्या वरील बाजून नोंद केली होती. परंतु नमुना-३३ मालपुस्तक विहीत नमुन्यात प्राप्तीची नोंद केलेली नाही, व तसे गटविकास अधिकारी ह्यांनी प्रमाणित सुद्धा केले नाही, मालसाठा नोंदवही नमुना-३३ लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात येत आहे. (सहपत्र-१ मालसाठा नोंदवही पा.क्र.४०) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मे.जोधंळे पाटील ॲन्ड कं. नाशिक यांनी दिनांक २९/०३/२०१४ ला प्रोफार्मा इन्व्हॉईस सादर केलेला होता. आर्थिक वर्षाच्या शेवटी साहित्याचा पूरवठा होणार असल्याने व देयक पारित करण्याच्या दृष्टीने देयकात आवश्यक ते प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असल्यामुळे प्रोफार्मा इंव्हॉईस वर तशी नोंद घेण्यात आली, जरी संबधित पूरवठा धारकाचे नावे धनादेश तयार करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात पूरवठा धारकाला रक्कम अदा करण्यात आली नाही, सदर पूरवठा धारकाने सायकलचा पूरवठा न केल्यामुळे प्रोफार्मा इंन्व्हॉईस ४५ नुसार तयार करण्यात आलेला रु. ४३७४९३/- चा धनादेश रद्द करून दिनांक ०५/११/२०१४ ला जमेला नोंद घेण्यात आलेली आहे. (सहपत्र-२)

(२) शासन निर्णयानुसार दरकरानुसार खरेदी करण्याकरिता दि.०४/०२/२००३ च्या शासन निर्णयानुसार मे. जोंधळे पाटील कं. नाशिक यांचे सोबत झालेल्या सन २०१३-१४ चा सायकल दरकरार लेखापरीक्षणास सादर करण्यात येत आहे. (सहपत्र-३)

(३) उद्योग सहसंचालक (भांडार खरेदी) विकास आयुक्त (उद्योग) संचालनालय नवीन प्रशासकीय भवन मुंबई-३२ च्या दि.१३/१/२०१४ च्या आदेशानुसार सन २०१३-१४ करिता लेडिज सायकल चे दरकरार प्रमाणे सर्व करासहित प्रति नग व ईच्छीक साहित्य फुलस्टॅड रु. १०८ फुल चेन कव्हर रु.६३ व साडी ड्रेसेस-११७ असे एकूण ३३४८/- रुपये दराने लेडीज सायकलचा पूरवठा आदेश देण्यात आला होता. (सहपत्र-४ पूरवठा आदेश)

(४) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.परास/१०९८/प्र.क्र.१७८/०५/दिनांक ९ ऑक्टोबर-१९९७ चे परिच्छेद ४ नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांना प्रथम तांत्रिक मंजुरी घेवूनच मान्यता घेण्यात आलेली आहे. (सहपत्र-५) तांत्रिक मंजुरी आदेश

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.परास १०२०/प्र.क्र.१४/३८ दिनांक ९ फेब्रुवारी २००१ नुसार लाभार्थीची निवड कागदपत्राची योग्य छाननीनंतर अंतिम करण्यात आले, सदर योजने करीता मंजूर यादी नुसारच १४९ नग सायकल खरेदी आदेश दिलेले होते. (सहपत्र-६ यादी)

(६) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. झेडपिए/- प्र.क्र.४४६/वित्त -९ मंत्रालय मुंबई दिनांक २० जून २००८ च्या परिशिष्ट ई मध्ये जिल्हा परिषदाकडील वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यास वेळापत्रक दिलेले असले तरी ही प्रत्यक्ष योजना राबवितांना अनेक अडचणी येतात. त्याच अनुषंगाने शासनाचे परिपत्रक क्र झेडपिए/२०१६/प्र.क.वित्त-९ बांधकाम भवन २५, मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४००००१. तारीख १९ मे २०१६ नुसार दिनांक २० जून २००८ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आलेली आहे. (सहपत्र-७)

सन २०१३-१४ मध्ये पूरवठा धारकाने सायकलचा पूरवठा न केल्यामुळे सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करून सन २०१३-१४ च्या लाभार्थ्यांना सायकल या योजनेचा लाभ दिलेला आहे.

कृपया आक्षेपाचे अनुपालन मान्य करून परीच्छेद वगळण्यात यावा ही विनंती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०८ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आर्वी यांना विचारणा केली की, मागासवर्गीय लाभार्थ्यांना माहे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत सायकल साहित्यांचा पूरवठा झाला नाही. सायकल साहित्य प्राप्त झाले नसताना सुद्धा धनादेश रद्द केलेला नाही. धनादेश वेळीच रद्द न करण्याची कारणे काय आहेत, साहित्याचा पूरवठा आदेश देऊनही ते पूरविण्यात आले नसल्याने पूरवठादारावर कोणती कारवाई करण्यात आली, यावर गट विकास अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मे.जोंधळे पाटील अँन्ड कंपनी, नाशिक यांनी दिनांक २९ मार्च, २०१४ रोजी प्रोफार्मा इन्व्हॉईस सादर केलेला होता. संबंधित पूरवठा धारकाच्या नावे धनादेश तयार करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात पूरवठा धारकाला रक्कम अदा करण्यात आलेली नाही. ३१ मार्चपर्यंत पूरवठा करायला पाहिजे होता. साहित्याचा पूरवठा करण्यात आलेला नसल्यामुळे सदर धनादेश रद्द करण्यात आलेला आहे. समितीने पुढे गट विकास अधिकारी यांना अशी विचारणा केली की, आर.सी. केली नाही ही बाब शासनाच्या निदशर्नास आणली होती काय, आर.सी. नसताना शासनाच्या परवानगीशिवाय साहित्य खरेदी करता येते काय, यावर गट विकास अधिकारी यांनी स्पष्ट केले की, पूरवठादाराकडून प्रोफार्मा इन्व्हॉईस प्राप्त झाले होते. ३१ मार्च पर्यंत मालाचा पूरवठा होईल असे वाटले होते. परंतु तसे न झाल्यामुळे दोन्ही वर्षातील निधी एकत्रित करून पुढील आर्थिक वर्षात सायकलचे वाटप करण्यात आले आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, पूरवठादारावर का कारवाई केली नाही तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी यासंदर्भात कारवाई केली नसल्यामुळे मागासवर्गीय लाभार्थ्यांना लाभापासून वंचित रहावे लागले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पुढील वर्षात सर्व मागासवर्गीय लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

यावर समितीने निदेश दिले की, तत्कालीन गट विकास अधिकारी समितीसमोर उपस्थित झाले नाहीत. हा विषय अतिशय गंभीर आहे. अशा विषयांमध्ये वारंवार सूचना देऊनही सुधारणा होत नाही. मागासवर्गीय लाभार्थ्यांना सायकलचा पूरवठा वेळेत होत नाही. मागासवर्गीय मुलांवर अन्याय करणारी ही बाब आहे. जिल्हा परिषदेच्या सेसफंडातून ही योजना राबवायची आहे. सेस फंडाचा पैसा दोन वर्षे तसाच पडून होता. तत्कालीन गटविकास अधिकारी यांच्याकडे योजना राबविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना (गाईडलाईन्स) असताना नियमानुसार कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे तत्कालीन गटविकास अधिकारी या प्रकरणात कारवाईसाठी पात्र आहेत, या प्रकरणाची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी करून जे दोषी असतील त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. हा विषय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल पूरवठा न करण्याबाबतः- आर्वी पंचायत समिती अंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून सायकल पूरवठा करण्याची योजना राबवावयाची असताना सेस फंडाचा निधी दोन वर्षे पडून राहिल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल पूरवठा प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चिती करून कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, आर्वीने सन २०१३-१४ मध्ये पंचायत समिती सेसफंड अंतर्गत मे.जोंधळे पाटील अॅन्ड कंपनी, नाशिक यांना उद्योग सहसंचालक (CSPO) मुंबई यांचे दरकरार क्र.SPC/RTC/bicycle/ ०६/२०१३-१४/१३-३२७ मुंबई-३२, दि.१३ जाने.२०१४ नुसार केलेल्या दरकराराप्रमाणे पूरवठा आदेश क्र./पंसआ/वाशि/३६१, दि.०४/०३/२०१४ नुसार देयके सादर केले होते. आर्थिक वर्षाच्या शेवटी पूरवठा होणार

असल्याने अनुदान व्यपगत होवू नये म्हणून महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक एमसीई १०८३/सीआर७४४/ सर्वसाधारण-५, मंत्रालय, मुंबई ३२ दि.१९ जून, १९८६ नुसार पूरवठा धारकाच्या नांवे धनादेश तयार करून ठेवण्यात आला होता. पंरतु पूरवठाधारकाकडून सायकलचा पूरवठा केला नसल्याने व पूरवठादाराशी वारंवार संपर्क करून सुद्धा पूरवठा केला नसल्याने पूरवठाधारकाच्या नावे तयार करून ठेवलेला धनादेश महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ३१ नुसार दि. ०५/११/२०१४ ला धनादेश रद्द करून जमेला नोंद घेण्यात आली होती. सन २०१३-१४ ची अखर्चीत तरतूद सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करून सन २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षातील योजनेचा सन २०१४-१५ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल लाभ देण्यात आला आहे. याबाबत तत्कालिन गटविकास अधिकारी यांचेकडून खुलासा घेण्यात आलेला आहे.

श्री. जोंधळे (पाटील) अँड कंपनी, नाशिक यांनी दर करारानुसार सायकल साहित्याचा पूरवठा न केल्यामुळे श्री.जोंधळे (पाटील) अँड कंपनी यांना काळ्या यादीत टाकण्यात जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे पत्र क्रमांक ८४४/२०१९-२० दिनांक ४.५.२०१९ अन्वये मा. सचिव (ऊर्जा विभाग) मंत्रालय, मुंबई तसेच उद्योग सह संचालक, विकास आयुक्त (उद्योग) संचालनालय, मंबई यांना कळविण्यात आले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**(वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल पूरवठा करणे या योजनेचा निधी २ वर्षे उपलब्ध असूनही मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकलचा पूरवठा केला नाही. सायकलची खरेदी केली नाही. यासंदर्भात अधिकाऱ्यांकडून योजना राबविण्यामध्ये अक्षम्य विलंब झाला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१३-२०१४ मध्ये दरकरारानुसार नाशिकच्या श्री. जोंधळे (पाटील) अँड कंपनी यांना सायकल पूरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आला होता. परंतु त्यांनी सदर वर्षात सायकलचा प्रत्यक्ष पूरवठा न केल्याने त्यांचे नांव काळ्या यादीत टाकण्याबाबत उद्योग व ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविण्यात आले होते व त्यानुसार मा. आयुक्त, ऊर्जा विभाग यांनी मा. सचिव, ऊर्जा विभाग यांना कळविलेले आहे. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, सन २०१४ मधील हा विषय आहे, त्याला आता इतकी वर्षे झालेली आहेत. आपण याबाबत जरी संबंधित विभागाला कळविले असले तरी, त्यांनी संबंधितावर कारवाई केली आहे काय यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, विभागाकडे जो शेवटचा पत्रव्यवहार आहे त्यानुसार आयुक्त ऊर्जा विभाग यांनी सचिव, ऊर्जा विभाग यांना पत्र पाठविले आहे. सचिव, उद्योग विभाग यांच्या स्तरावरील हा विषय आहे. यावर समितीकडून या विषयावर शिफारस करण्यात येईल असे आश्वासन दिले.

**अभिप्राय व शिफारशी :**

सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात पंचायत समिती सेस फंडातून १००% अनुदानावर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जेन्टस व लेडिज १४९ नग सायकली पूरवठा करण्याकरिता मे. जोंधळे (पाटील) अँड कं. नाशिक यांना प्रति नग रु. ३३४८/- या प्रमाणे एकूण रु. ४,९८,८५२ /- इतक्या रकमेचे पूरवठा आदेश दिनांक ४/३/२०१४ रोजी पंचायत समिती, आर्वी यांच्याकडून देण्यात आले होते. पूरवठादार मे.जोंधळे (पाटील) अँन्ड कं. नाशिक यांनी आर्वी पंचायत समितीस पूरवठा केलेल्या १४९ नग सायकलींच्या दिनांक २९/३/२०१४ रोजीच्या डिलीव्हरी चलन क्र. ०४५ वर मालसंग्रह नोंदवहीत पान क्र.४० वर सायकली प्राप्त झाल्याबाबत नोंद घेतल्याचे नमूद करून सायकली प्राप्त झाल्याबाबत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी स्वाक्षरी केली आहे. परंतु मालसंग्रह नोंदवहीची तपासणी केली असता प्रत्यक्षात सायकली प्राप्त झाल्याची नोंद घेतल्याचे आढळून आले नाही. तेथील मालसंग्रह नोंदवही बाळगणारे कर्मचारी यांनी सदरहू सायकली प्राप्त झाल्या नसल्याचे मान्य केले. तसेच लाभार्थ्यांची निवड कागदपत्रांची योग्य छाननीनंतरच अंतिम होणे आवश्यक असताना सदर योजनेकरिता फक्त ५१ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाल्याचे आढळले, परंतु ९८ लाभार्थ्यांचे अर्जच प्राप्त झाले नसताना व त्यांची निवड झालेली नसताना जास्तीच्या ९८ सायकली खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सायकलीसाठी तरतूद करण्यात आलेली रक्कम त्याच वर्षी खर्च करण्यात आली नाही यामुळे पंचायत समिती आर्वी अंतर्गत येणारे मागासवर्गीय विद्यार्थी सायकल रूपाने मिळणाऱ्या वैयक्तिक लाभापासून वंचित राहिले सदर योजना पूर्णपणे असफल झाली.

या विषयासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, मालसंग्रह नोंदवही पा.क्र. ४० वर साहित्य प्राप्त होणार असल्याचे गृहीत धरून फक्त नमुना-३३ मालपुस्तकाच्या वरील बाजूस नोंद केली होती. परंतु नमुना-३३ मालपुस्तक विहित नमुन्यात प्राप्तीची नोंद केलेली नाही. व तसे गट विकास अधिकारी हयांनी प्रमाणित सुद्धा केले नाही. आर्थिक वर्षाच्या शेवटी साहित्याचा पूरवठा होणार असल्याने व देयक पारित करण्याच्या दृष्टीने देयकात आवश्यक ते प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असल्यामुळे प्रोफार्मा इंन्व्हॉईस क्र. ४५ वर तशी नोंद घेण्यात आली. या चलनानुसार तयार करण्यात आलेला धनादेश रद्द करून दिनांक ०५/११/२०१४ ला जमेला नोंद घेण्यात आलेली आहे. मालसाठा नोंदवही नमुना-३३ व मे.जोंधळे (पाटील) कं. नाशिक यांचे सोबत झालेल्या सन २०१३-२०१४ चा सायकल दरकरार लेखापरीक्षणास सादर करण्यात येत आहे. शासन निर्णयातील निकषानुसार लाभार्थ्यांची निवड कागदपत्राच्या योग्य छाननीनंतरच अंतिम करण्यात आली व त्यानुसार १४९ नग सायकल खरेदी आदेश काढण्यात आलेले आहे. सन २०१३-२०१४ मध्ये पूरवठा धारकाने सायकचा पूरवठा न केल्यामुळे सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करून सन २०१३-२०१४ च्या लाभार्थ्यांना सायकल या योजनेचा लाभ दिलेला आहे.

जिल्हा परिषदेकडील वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्याबाबत शासनाने वेळापत्रक निर्गमित केलेले आहे. त्यानुसार पंचायत समिती आर्वी यांनी सदरहू योजनेची निवड, अर्थसंकल्पीय तरतूद व प्रशासकीय मंजुरी ही कार्यवाही वेळापत्रकानुसार केली परंतु तांत्रिक मंजुरी, प्रस्तावाची छाननी, लाभार्थी निवड व खरेदीस मान्यता या बाबींची कार्यवाही विहित वेळेत केलीच नाही. त्यामुळे पंचायत समिती, आर्वी अंतर्गत येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत मिळणारा लाभ मिळालेला नाही. एखाद्या लाभार्थ्याला त्याच्या हक्कापासून व त्याला शासनाअंतर्गत मिळणाऱ्या लाभापासून वंचित ठेवणे देखील एक प्रकारे अनियमितता व अकार्यक्षमता असून अधिकाऱ्यांमधील योजनेच्या अंमलबजावणी संबंधात उदासिनतेचे लक्षण आहे. या प्रकरणात पूरवठादाराकडून सायकली प्राप्त झालेल्या नसताना डिलीव्हरी चलनावर प्राप्त झालेबाबतची नोंद करून गट विकास अधिकारी यांनी स्वाक्षरी करणे, पूरवठादाराने सायकलचा पूरवठा केलेला नसताना त्याच्यावर कोणतीही कारवाई न करणे, मागासवर्गीयांसाठी राखीव असलेला सेस फंडातील निधी दोन वर्षे खर्च न करणे व मालसाठा नोंदवही नमुना-३३ यासह सायकल दरकरार लेखापरीक्षणास सादर न करणे. या सर्व बाबी अत्यंत गंभीर स्वरूपाच्या असल्याने या सर्व प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी व याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा असे समितीने निदेश दिले.

जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून समितीने दिलेल्या निदेशानुसार सादर करण्यात आलेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, पंचायत समिती, आर्वीने सन २०१३-२०१४ मध्ये पंचायत समिती सेसफंड अंतर्गत मे.जोंधळे (पाटील) अँड कंपनी, नाशिक यांना दर कराराप्रमाणे पूरवठा आदेश दिल्यानुसार त्यांनी देयके सादर केले होते. आर्थिक वर्षाच्या शेवटी पूरवठा होणार असल्याने अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून पूरवठा धारकाच्या नावे धनादेश तयार करून ठेवण्यात आला होता. परंतू पूरवठाधारकाकडून वारंवार संपर्क करूनही सायकलचा पूरवठा न केल्याने धनादेश रद्द करून जमेला नोंद घेण्यात आली आहे. याप्रकरणाबाबत तत्कालिन गट विकास अधिकारी यांच्याकडून खुलासा घेण्यात आला आहे. तसेच श्री. जोंधळे (पाटील) अँड कंपनी यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून दिनांक ४/५/२०१९ रोजी सचिव, उद्योग व ऊर्जा विभाग, उद्योग सह संचालक व विकास आयुक्त (उद्योग) संचालनालय, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षात विहित कालावधीत या योजनेंतर्गत सायकलचे वाटप केल्यास विद्यार्थ्यांना शाळेत जाणे सोईचे होईल व त्यामुळे ग्रामीण भागातील शालेय गळतीचे प्रमाण कमी होईल. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १००% अनुदानावर सायकलचे वाटप करणे या योजनेचे मूळ उद्दीष्ट शालेय गळतीचे प्रमाण कमी करणे हे आहे. सदरहू योजना सफल होण्याच्या दृष्टीने अधिकारी अथवा पूरवठादार योग्य प्रकारे कार्यवाही करत नसेल तर त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. या प्रकरणात सायकलींचा पूरवठा झालेला नसताना डिलेव्हरी चलनावर प्राप्त झाल्याबाबतच्या नोंदी घेऊन पोच पावती देण्यासह पूरवठादाराच्या नावे संपूर्ण रकमेचा धनादेश काढणे व सदरचा धनादेश जवळपास नऊ महिन्यानंतर रद्द करणे या बाबींचा विचार करता यास जबाबदार असणाऱ्या संबंधितावर कारवाई होणे आवश्यक आहे.

**यास्तव मे. जोंधळे (पाटील) अँड कंपनी, नाशिक यांनी दरकरारानुसार सायकल साहित्यांचा पूरवठा न केल्यामुळे या कंपनीला काळ्या यादीत टाकण्याबाबतची कारवाई तात्काळ शासनाने पूर्ण करावी. तसेच आर्वी पंचायत समितीचे तत्कालीन गट विकास अधिकारी यांच्याकडून घेण्यात आलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने त्यांच्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीस सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण दहा

## **जिल्हा परिषद, वर्धा**

### **लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध केल्या नसलेबाबत...**

**परिच्छेद क्रमांक ३.३२६ (सन २०१३-२०१४)**

**(१) परिच्छेद क्रमांक ३.३२६**

**सोनोरा शेंद्री विजयगोपाल ते पुलगांव नाचणगांव रस्ता बांधकाम बाबत क्रमांक इजिमा ७१.२२**

१३ वा वित्त आयोग

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५३ (१) १२४, १९७ अन्वये प्रत्यक्षात पूर्तता कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच तांत्रिक मान्यता अटीशर्ती प्रमाणे अमलंबजावणीचा अभाव दिसून येतो व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्र क्र. झेडेपीए २०००/प्र.क्र./४४/३३, दिनांक २२/१२/२००० तथा सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जिआर-३४/सा-४/५९९९ दिनांक ०८/०१/२००७ चे पालन केले नसल्याचे दिसून येते.

प्रमाणक क्र.८२० दिनांक ३०/०३/२०१४ रु. १११०४९

तांत्रिक मान्यताः- क्रमांक १२/का.२(५) ता.मा-२०१२/अ.अ./दि.०४/०१/२०१२

प्राकलित मूल्य :- रु.५९०९०६०

प्रशासकीय मान्यता :- रु. सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय मुंबई आदेश क्रमांक तेःविआ/२०११/प्र.क्र.३७४, रस्ते-१, दिनांक १९/११/२०११ रु.६००००००

निविदा प्रसिद्धी :- २८/०६/२०१२

वर्तमानपत्र :- दैनिक पुण्यनगरी

निविदा मंजूर :- जि.प. सर्वसाधारण सभा विषय क्र.९(७) दिनांक ०८/१०/२०१२

(निविदा परिशिष्ट ब पेक्षा ७.९१ टक्के कमी दराने मंजूर)

करारनामा :- ए१/१७८/का.अ./२०१२-२०१३ दिनांक २९/१०/२०१२

करारनामा मूल्य :- रु. ५४४१६५३

कंत्राटदाराचे नाव :- मे.आर.आय.सराफा, वर्धा

कामाचा आदेश क्रमांक :- दिनांक २९/१०/२०१२

कामाचा कालावधी :- दिनांक २९/१०/२०१२ ते २८/१०/२०१३

मोजमाप पुस्तीका :- क्र. ४४२४ पान क्र. १ ते३ १५

मूल्यांकन :- रु. ५८२९०८८

कामपुर्णत्व प्रमाणपत्र :- दिनांक ०४/०९/२०१३

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) मा. सहायक अभियंता श्रेणी-१ व कार्यासन अधिकारी (रस्ते) यांचे पत्र क्रमांक तेविआ/२०११/प्र.क्र.३७४/रस्ते-१ दिनांक १९/१२/२०११ अट क्र.१ अन्वये प्रथमता प्राप्त अनुदानाचे ८५ ते ९० टक्के ५४०००००/- रक्कमेस तांत्रिक मान्यता देण्यात यावे असे अभिप्रेत असतांना प्रत्यक्षात ९८.५० टक्के म्हणजे रु. ५९०९०६०/- रक्कमेस तांत्रिक मान्यता देण्यात आली यावरून सक्षम प्रधिकरणाचे निर्देशाप्रमाणे काम करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

(२) सदरील कामाचे मूळ अंदाजपत्रक लेखापरीक्षणास सादर न केल्याने सदर काम प्रत्यक्षात मुळे अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात आल्याबाबत तपासणी करता आली नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५३(१) अन्वये बांधकाम यंत्रणाने सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेल्या अंदाजातील तपशिलानुसार कामाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी असे अपेक्षीत असतांना प्रत्यक्षात शेड्यूल बी नुसार बाब क्र. ३ supplying murum having - ४५०,०० cum वापर करणे असतांना प्रत्यक्षात ३११,०० cum चा वापर केलेला आह. तरी कमी वापर १३९.०० cum प्रमाणे प्रती cum ५०३.५० म्हणजे रु. ६९९८७/- चे कामात कमी वापर केल्याने कामाचा दर्जा उत्कृष्ट आहे असे तांत्रिक दृष्टीया म्हणता येत नाहीत.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १५३(१) अन्वये बांधकाम यंत्राणाने सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेल्या अंदाजातील तपशिलानुसार कामाची काटेकोरपणे अमलंबजावणी व्हावी असे अपेक्षीत असतांना प्रत्यक्षात शेड्यूल बी नुसार बाब क्र. १२ providing & and fixing Rcc 1:2:3 200mm ston of (15x10x65) - 12 Each x265=3180 चा वापर केलेली नाही. शेड्यूल बी प्रमाणे वापर न केल्याचे याचाच अर्थ करारनाम्याप्रमाणे काम पुर्णतः झालेले आहे असे म्हणता येत नाही.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पचांयत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १५३(१) अन्वये बांधकाम यंत्राणाने सक्षम प्रधिकरणाने मंजूर केलेल्या अंदाजातील तपशिलानुसार कामाची काटेकोरपणे अमलंबजावणी व्हावी असे अपेक्षीत असतांना प्रत्यक्षात शेड्यूल बी नुसार बाब क्र. १३ Providing Rcc 1:2:4 3.00 no Each x1220=3660 चा वापर केलेला नाही. शेड्यूल बी प्रमाणे वापर न केल्याने याचाच अर्थ करारनाम्याप्रमाणे काम पुर्णताः झालेले आहे असे म्हणता येत नाही.

(६) शासन निणर्य पीव्हीएस/१०९९/प्र.क्र.५४/०८ दिनांक २०/०५/१९९९ नुसार कामाचा फलक बसविल्याशिवाय कामाचे अंतिम प्रदान करु नये असे निर्देश असतांना कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावण्यांत आलेला नाही.

(७) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस-१०९४/२६७९ उद्योग-६ दिनांक ३०/०३/१९९४ परिक्र-१-९ नुसार तीन ग्राहय निविदा प्राप्त न झाल्यास फेर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाची नस्ती अन्वये दोनच निविदा प्राप्त असून त्यापैकी कमी दराचे निविदा कराची निविदा मंजूर करून त्यांना कामाचा आदेश दिलेला आहे. सबब शासन निर्णयाप्रमाणे स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

(८) महाराष्ट्र शासन बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.झेडपीए-१०९४/प्र.क्र.३४/जिव्या ३ दिनांक ३१/१०/१९९८ अन्वये सदर कामाची तपासणी सक्षम प्राधिकारी यांचेकडून करण्यात आलेली नाही.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना क्र.३९ व ६९ मध्ये घेणे आवश्यक असतांना नोंद घेण्यात आलेल्या नाही.

(१०) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जि.आर-३४/सा-४/५९९९ दिनांक ०८/०१/२००७ अन्वये साहित्य वापरण्यापुर्वीच प्रयोग शाळेचा साहित्याचा तपासणी अहवाल प्राप्त करून नंतर कामावर वापर करणे अपेक्षीत असतांना प्रत्यक्षात साहित्याचे चाचणी अहवाल काम पूर्ण झाल्यानंतर प्राप्त करण्यात आलेले आहे.

(११) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पचांयत समिती लेखासंहिता १९६८ नियम १२४ अन्वये वरीष्ठ व कनिष्ठ अभियंत्याने मक्तेदाराकडे सोपविण्यास आलेले प्रत्येक कामाचे कार्यदेश पुस्तक ठेवावे व त्यामध्ये कार्यकारी अभियंता चे आदेश कामातील बदल सूचना दुरुस्ती यांच्या नोंदी कार्यकारी अभियंता यांनी तपासाव्यात सदर बुक ठेवण्यात आलेले नाही तथा लेखापरीक्षणास सादर नाही.

(१२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपीए/२०००/प्र.क्र/४४/३३ दिनांक २२/१२/२००० अन्वये काम पूर्ण झाल्या नंतर मोजमाप पुस्तीकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविलेला नाही.

सदरील मुददेनिहाय बाबी सदंर्भात अभिलेख सादर करणे व अभिप्राय सादर करण्यात अर्धसमास पत्र क्र. ३५, दिनांक २८/०८/२०१४ अन्वये सूचित केले असता, पत्र क्र.जिपव/बांध/स्था-२/वशि-५१५/१४ कार्यालय बांधकाम विभाग जि.प.वर्धा दिनांक १६/०९/२०१४ व कार्यालयीन पत्र क्रमांक २१६ (ब) दिनांक १९/०९/२०१४ अन्वये या संदर्भात पूर्णता अधिलेख तथा समर्पक अभिप्राय सादर न केल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येतो.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर परिच्छेदाचे अनुपालन खालीलप्रमाणे

(१) सदर कामास तांत्रिक मान्यता अधीक्षक अभियंता मंडळ कार्यालय, चद्रंपूर यांचेकडून देण्यात आलेली असून अधीक्षक अभियंता हे तांत्रिक मान्यता प्रदान करण्यास सक्षम प्रधिकारी आहेत. शासनाकडून प्राप्त झालेला संपूर्ण निधी खर्च करणे जिल्हा परिषदेला बंधनकारक असते. त्यामुळे निधीच्या अधिन राहून अधीक्षक अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. देण्यात आलेल्या तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून काम केलेले असून कामावरील खर्च तांत्रिक मान्यता किंमतीचे आत आहे. पूर्ण झालेल्या कामाची किंमत रु.५३.६८ लक्ष एवढी आहे. त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याचे निर्देशाप्रमाणे काम करण्यात येत नसल्याचे म्हणने संयुक्तिक वाटत नाही.

(२) मुळ अंदाजपत्रकावरून कामाचे परिशिष्ट ब तयार केलेले आहे. त्यानुसार सदर काम झालेले आहेत. उप अभियंता व कार्यकारी अभियंता हे तांत्रिक दृष्टीने कामाची पाहणी करूनच अंदाजपत्रकाप्रमाणे काम करून घेतलेले आहेत. मूळ अंदाजपत्रक, अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, चंद्रपूर या कार्यालयाकडे असल्यामुळे मूळ अंदाजपत्रकाची सत्यप्रत अवलोकनार्थ सादर.

(३) लेखासंहिता नियम, १९६८ चे नियम १५३(१) नुसार अंदाजपत्रकात दिलेल्या निर्देशाप्रमाणे बांधकाम काटेकोरपणे पार पाडण्यासाठी कार्यकारी अभियंता व त्याचे निर्देशाप्रमाणे काम करणारे उप अभियंता व शाखा अभियंता यांनी स्वतः कामाची खात्री करून काम पूर्ण केलेले आहे. जरी अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.३ नुसार परिणाम ४५०.०० cum मुरुम वापरणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्षात ३११.०० cum मुरुम आवश्यकतेनुसार वापरून काम चांगल्या दर्जाचे केलेले आहे. सदर काम सुस्थितीत असून कामाचा दर्जा उत्तम आहे.

(४) बाब क्र.१२ अन्वये रस्त्यालगत २०० m दगड न लावल्यामुळे रस्त्याच्या दर्जावर काही परिणाम झालेला नाही. अंदाजपत्रकात सदर बाबीची तरतूद होती परंतु प्रत्यक्षात काम करतांना असे निदर्शनास आले की, जूने २०० m दगड पडलेले होते. त्यामुळे तेच दगड कंत्राटदाराकडून व्यवस्थीतरित्या लावून (Fix) करून घेण्यात आले त्यामुळे सदर बाबीवर बचत झालेली आहे.

(५) बाब क्र.१३ अन्वये रस्त्यालगत १ Km दगड लावावयाचा होता सदर दगड न लावल्यामुळे रस्त्याच्या दर्जावर काही परिणाम झालेला नाही. अंदाजपत्रकात सदर बाबीची तरतूद होती परंतु प्रत्यक्षात काम करतांना असे निदर्शनास आले की, जूने १ Km दगड पडलेले होते. त्यामुळे तेच दगड कंत्राटदाराकडून व्यवस्थीतरित्या लावून (Fix) करून घेण्यात आले त्यामुळे सदर बाबीवर बचत झालेली आहे.

(६) काम पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदारचे स्वःखर्चाने कामाचा फलक बसविण्यात आला. त्यानंतरच कामाचे अंतिम प्रदान करण्यात आले. म्हणून देयकातून कामाच्या फलकावरील तरतुदीमध्ये बचत झालेली आहे.

(७) शासन निर्णय क्र. भाखस-१०९४/२६७९ उद्योग-६ दिनांक ३०/०३/१९९४ परिक्र.१.९ नुसार तीन ग्राहय निविद प्राप्त न झाल्यास फेर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतु सदर शासन निर्णय उद्योग, उर्जा कामगार विभागाचा असून वस्तु व सेवा पुरवठ्या संबंधित आहे. सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्र शासन ग्रा.वि. व.ज.सं. विभाग परिपत्रक क्र. झेडपीए/२००८/ प्र.क्र.३५८/ वित्त-९ मंत्रालय, मुंबई, दिनांक २४ जून २००८ अन्वये निविदेची कार्यवाही करण्यात येत होती. सदर शासन निर्णयान्वये एकच निविद प्राप्त झाल्यास त्या संदर्भात करावयाची कार्यवाही नमूद केलेली आहे. त्यात कामाच्या निविदा सुचनेस यथायोग्य प्रसिद्धी दिल्यानंतर एकच निविदा प्राप्त झाली तर निविदा स्वीकृती साठी दोन आठवड्याची अतिरिक्त मुदत देण्यात यावी त्यानंतरही जास्तीत जास्त दोन वेळा मुदतवाढ देण्यात यावी. असे नमूद केलेले आहे. परंतु सदर प्रकरणी पहिल्याच वेळी दोन निविदा प्राप्त झाल्याने सदर निविदेस मुदतवाढ देण्यात आलेली नाही.

सदर कामाची ई-निविदा वृत्तपत्रात व ऑनलाईन पद्धतीने यथायोग्य प्रसिद्धी दिलेली होती. सदर कामास ई-निविदेच्या माध्यामातून दोन निविद प्राप्त झालेल्या होत्या. दोन्हीही निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र होत्या त्यापैकी श्री. आर. आय. सराफ यांची निविदा (-) ७.९१% कमी दराची होती. तसेच मे. डी. के. कंस्ट्रक्शन, आर्वी यांची निविदा (-) ४.७८/- कमी दराची होती. यावरून दोन निविदाकारांमध्ये स्पर्धा झाली असून स्पर्धात्मक दराचा फायदा शासनास झालेला आहे. किंवा शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. त्यामुळे श्री. आय. आर. सराफ यांची निविदा (-) ७.९१/- सर्वात कमी दराची असल्याने सदर निविदा स्वीकृत करण्यात आली. सद्यस्थितीत ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय क्र. निविदा २०१२/प्र.क्र.९७/पंरा-७, मंत्रालय मुंबई, दिनांक २३/०९/२०१३ अन्वये प्रथम व व्दितीय मागणीत किमान तीन निविदा प्राप्त झाल्याशिवाय निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात येत नाही. तरी कृपया खुलासा मान्यतेस सादर.

(८) सदर कामाची तांत्रिकदृष्ट्या तपासणी (१) शाखा अभियंता (२) उप अभियंता (३) कार्यकारी अभियंता यांनी केलेली आहे. मोजमाप पुस्तिकेवर सर्व तांत्रिक अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. सर्व बाबी बाबनिहाय तपासूनच नोंदविण्यात आलेल्या आहेत. वरील अधिकारी सक्षम प्राधिकारी असल्यामुळे त्यांच्या तपासणीच्या अधिन राहूनच देयकास मान्यता दिलेली आहे.

(९) नमुना ३९ मध्ये इमारतीची नोंद घेण्यात येते त्यामुळे सदर रस्त्याची नोंद नमूना ३९ मध्ये घेण्यात आली नाही. तथापि, पूर्ण कामाची नोंद नमूना ६९ मध्ये घेण्यात आली आहे.

करिता आक्षेप वगळण्यात यावा ही विनंती.

(१०) सदर कामाच्या साहित्याचे नमुने दिनांक २६/०३/२०१३ अन्वये पाठविलेले असून दिनांक ३०/०३/२०१३ रोजी चाचणी अहवाल प्राप्त झालेले आहेत. सदर काम दिनांक ०४/०९/२०१३ रोजी पूर्ण झाल्यानंतर अंतिम देयकाचे शोधन करण्यात आले. चाचणी अहवाल निकषाप्रमाणे योग्य असल्यामुळे कामाचा दर्जा तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे.

(११) कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे शाखा अभियंता यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे शाखा अभियंता व उप अभियंता उपविभाग देवळी यांनी कामे केलेली आहेत. सुचनेचे लेखी पुस्तक ठेवण्यात आलेले नाही त्यामुळे सदर पुस्तक लेखीपरीक्षणांस सादर करण्यात आलेले नाही, यापुढे लेखासंहिता नियम १९६८ चे नियम १२४ नुसार शाखा अभियंता यांना कार्यादेश पुस्तक ठेवण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

(१२) काम पूर्णत्वाचा दाखला नमुना ६५ मध्ये त्याच वेळेस तयार करताना केलेला होता. सदर दाखला देयकासह जोडण्यात आलेला आहे. त्याशिवाय अंतिम देयकाचे शोधन करण्यात आले नाही.

कृपया अनुपालन मान्यतेस सादर.

**(२) परिच्छेद क्रमांक. ३.५६३ - (सन २०१३-२०१४)**

**कोल्हापूरी बंधारा स्टोअर शेड बांधकाम कान्होली च्या कामात आढळून आलेली अनियमितता**

कंत्राटदाराकडून विलंबाने मुदतवाढीचा अर्ज सादर करण्यात आलेला आहे तसेच बाब क्र.४ मध्ये प्रत्यक्षात कामानुसार जास्त माप नोंदविण्यात आले आहे रॉयल्टी कमी कपात करण्यात आलेली आहे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे, परिपत्रक क्र. संकिर्ण २००४/प्र.क्र.८५/रस्ते-१, दि. ११.०६.२००४ अन्वये कामाचे अंदाजपत्रक बनवितांना सर्व बाबीचा विचार करूनच अचूक/सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले नाही महाराष्ट्र शासन ग्रामविकास परिपत्रक दि. ३०.०६.२००६ नुसार बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक असताना कार्यवाही केलेली नाही.

जि. प.. वर्धा मध्ये लघुसिंचन विभागाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील प्रमाणका अन्वये जि.प. सेस निधीच्या रोखपुस्तकात खर्च नोंदविण्यासाठी सदर कामाची पुढील प्रक्रिया करण्यात आली. प्रशासकीय मंजुरी :- कार्यकारी अभियंता जि.प.वर्धा यांचे आदेश क्र.२०/दिनांक २१/११/२०१२ अन्वये ३७५९८३/- कंत्राटदाराचे नांव :- ग्रामपंचायत कान्होली

करारनामा क्रमांक बी-१/जिपसेस/देवटू/१९ दि.५/३/२०१३ अन्वये कार्यारंभ :- क्र.९३ दि.५/३/२०१३ अन्वये कालावधी ३ महिने

मोजमाप पुस्तीका क्रमांक :- २८१७ वर पान क्र. ४९ ते ७१

अंतिम मूल्यांकन :- ३२५७३८/-

काम पूर्ण दिनांक :- २०/१२/२०१३

अंतिम देयक :- प्रमाणक क्र. ३२ दि.३०/४/२०१३ रुपये १७३८८२/- (कपाती वगळता)

त्यावर लेखापरीक्षणाचे आभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

(१) कामाचा आदेश देण्यात आल्यापासून सदर काम दिनांक ०४/०६/२०१३ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते, परंतु काम पूर्ण तत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद तारखेनुसार दि. २०/१२/२०१३ ला काम पूर्ण करण्यात आल्याचे दिसून येते. सदर नस्तीत कंत्राटदाराकडून सादर करण्यात आलेल्या मुदतवाढीच्या अर्जाचा दिनांक २५/१०/२०१३ असून सध्या पावसामुळे काम करणे शक्य नाही असे कळविण्यात

आले आहे. त्याबाबत बी-१ फॉर्म करारनाम्यामध्ये नमूद क्लॉज ६ नुसार जेव्हा कामाचा कालावधी वाढवावयाचा असेल तेव्हा कंत्राटदाराने ३० दिवसापुर्वी (काम संपण्यापुर्वी) कार्यकारी अभियंता यांना लेखी कळवावे लागेल असे नमूद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(२) मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता पान क्र.४८ वर बाब क्र.४ मध्ये Providing & laying in situ cement concrete in 1:4:8etc. चे मापे 10x1.20x1.20x0.15=2.16 क्युमी आहे. त्याबाबत प्रत्यक्षात कामानुसार बाब क्र.३ व बाब क्र.५ चे मापे ध्यानात घेता व सदर बाब क्र. ४ चे माप प्राकलनात नमूद असल्याने त्याची depth 0.10 म्हणजेच 10x1.20x1.20*x0.10=1.44 या प्रमाणे घेणे आवश्यक होते. परंतु तसे न करता depth 0.15 घेण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधितास रुपये २०८७/- (२.१६-१.४४=०.७२ क्युमी गु.रु. २८९८) जादा प्रदान करण्यात आल्याने ते वसूल होणे आवश्यक आहे.

(३) मोजमाप पुस्तिकेत पान क्र.५८ वर रॉयल्टी चार्जेस विवरणपत्रात नमूद मटेरियलचा वापर नमूद करताना खोडतोड करण्यात आलेली आहे. व सदर नोंदविलेल्या मटेरियलची बेरीज केली असता ४७.५३ क्युमी असून त्या प्रमाणे रु. ३३५९/- कपात करणे आवश्यक असतांना प्रथम धावते देयकातून रु.३००३/- कपात करण्यात आली आहे. तरी कामी कपात करण्यात आलेली रक्कम रुपये ३५६/- वसूल होणे आवश्यक आहे.

(४) शेड्यूल बी मध्ये नमूद क्लॉज ३८ प्रमाणे एखादी बाब २५% पेक्षा जास्त वाढ किंवा रुपये ५०००/- पेक्षा जास्त वाढ होता कामा नये. त्याप्रमाणे सदर कामात प्राकलनात बाब क्र. १३ नुसार Providing structural steel work in trusses-etc एकूण ०.३० क्विंटल असून प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकेत वापर ०.४० क्विंटल नोंदविण्यात आली आहे. त्यामुळे सदर माप ३३.३३% जादा नोंदविण्यात आली आहे व रकमेनुसार रुपये ११८०/- (रुपये ६१८०-५०००) जादाचा खर्च करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण २००४-प्र.क्र.८५ रस्ते-१, दिनांक ११/०६/२००४ अन्वये कामाचे अंदाजपत्रक बनविताना सर्व बाबीचा विचार करूनच अचूक सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. तसेच महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ चे नियम ११४ व ११८ नुसार सुधारित अंदाजपत्रक व सुधारित मंजुरी घेणे आवश्यक असतांना तसे न करता नियमबाह्य प्रदान करण्यात आले आहे.

(५) सदर कामासाठी मेटल/रेती, विटा, मुरूम, सिमेंट स्टिल व टाईल्सचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर साहित्यांची महाराष्ट्र शासन ग्रामविकास परिपत्रक क्र. साहित्य/१०९९/प्र.क्र.६५/३५, मंत्रालय, मुंबई, दिनांक ३०/६/२००६ नुसार बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) कंत्राटदाराने मुदत संपायच्या ३० दिवस पुर्वी अर्ज द्यावयाचे पाहिजे होते परंतु कंत्राटदाराने अर्ज उशिरा सादर केल्याने संबंधीतास दंडासह मुदत वाढ देऊन उर्वरित किरकोळ कामे पूर्ण करून घेण्यात आली.

(२) बाब क्र.४ Providing & laying in situ cement concrete in 1:4etc ही बाब leveling Coarse म्हणून वापरण्यात येते यात प्राकलनीय तरतुदीपेक्षा ०.७२ क्युमी काम प्रत्यक्ष साईड वर उपलब्ध असलेल्या परिस्थितीनुसार आवश्यकता असल्याने करण्यात आले व वाढीव परिणाम/रक्कम ही मंजूर मर्यादेच्या आत असल्याने रुपये ५०००/- पेक्षा कमी असल्यामुळे महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखासंहिता, १९६८ चे नियम ११८ अन्वये त्यास वेगळी मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही.

(३) मोजमाप पुस्तिका पान क्र. ५८ वर नोंदविलेली ४२.४९ घ.मी. मटेरियलचा वापर योग्य असून कपात केलेली रॉयल्टी सुद्धा योग्य आहे.

(४) बाब क्र. १३ मधील वाढीव परिणाम ची रक्कम ११८०/- यास मंजुरी घेण्यात आलेली आहे.

(५) संबंधित कामावरील कॉंक्रीटचे परिणाम फक्त २.१६ क्युमी इतके आहे हे फारच अल्प आहे. त्यामुळे चाचणी अहवाल घेण्याची आवश्यकता नाही.

**(३) परिच्छेद क्रमांक - ३.८६२ (सन २०१३-२०१४)**

कृत्रिम रेतनाचे सेवाशुल्क रोखीने प्रदान करणे सेवाशुल्क प्रदान केल्याचे पूरावे नसणे.

पशुसंवर्धन विभाग जि.प. वर्धा ने खालीलप्रमाणे सन २०१३-१४ मध्ये कृत्रिम रेतनाचे सेवाशुल्क जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त वर्धा यांचेकडे रोख स्वरूपात भरल्याचे आढळून आले.

| **माहे** | **रक्कम** |
|---|---|
| एप्रिल | १८६९८/- |
| मे | २७२००/- |
| जून | २५१८०/- |
| जुलै | २५८२०/- |
| ऑगस्ट | २६७२०/- |
| सप्टेंबर | २०२६०/- |
| ऑक्टोबर | १६६६०/- |
| नोव्हेंबर | २५२४०/- |
| डिसेंबर | ४४६२०/- |
| जानेवारी | ४१५००/- |
| फेब्रुवारी | ४०१००/- |
| मार्च | ४८२२०/- |
| **एकूण** | **३६०२००/-** |

त्याचप्रमाणे सन २०११-२०१२ मध्ये १३९९८०/- २०१३-१४ मध्ये २८२८६०/- रुपये कृत्रिम रेतनाचे सेवाशुल्क जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त, वर्धा यांचे कडे रोख स्वरूपात भरल्याचे आढळून आले अशाप्रकारे सन २०११-१२ ते सन २०१३-१४ या कालावधीतील पशुसंवर्धन विभाग जि.प.वर्धा ने जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त वर्धा यांचेकडे भरण्यासाठी रोखीने दिलेले असल्याचे रोकडवही वरून आढळले.

याबाबत लेखापरीक्षण अभिप्राय खालीलप्रमाणे

(१) म.जि.प.व प.स. अधिनियम १९६१ चे कलम १३४(२) नुसार १०००/- रुपयाहून अधिक असणाऱ्या कोणत्याही रकमेची प्रदान धनादेशाने करावयाचे आहे. तसेच म. जि. व प. समिती लेखा संहिता १९६८ चे कलम २९ (४) नुसार १०००/- रु. पेक्षा अधिक रक्कम रेखांकित धनादेशाने देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मुकाअ महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांना धनाकर्षाद्वारे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत द्यावयाचे आहे. असे असताना सुद्धा नियमबाह्यपणे वरील प्रमाणे ७८३०४०/- रुपये रोखीने देण्यात आले व त्याबद्दल महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १७९ नुसार रक्कम स्वीकारणाऱ्या जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचेकडून रितसर पावती दिनांकीत, क्रमांकीत व प्रमाणित घेण्यात आली नाही.

(२) म.जि. व पं.स. लेखासंहिता १९६८ चे कलम ५० (४) नुसार घेण्यात आलेल्या सर्व पैशाची त्या तारखेस नमुना १० ची पावती देणे आवश्यक आहे. परंतु पशुसंवर्धन विभाग जि.प. ने २०१३-१४ मध्ये त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व ८ पविअ यांचे कडून कृत्रिम रेतन सेवाशुल्क रु. ३६०२००/- स्वीकारले परंतु, त्याबाबत त्यांना पावती दिलेली नाही. याबाबत अर्धसमासपत्र देण्यात आले होते.

कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्सव्यवसाय विभाग शासन निर्णय के.आय.ए.एस. १००५/प्र.क्र./५५३/पदुम-४/मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १७/०४/२००६ नुसार पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत कृत्रिम रेतनाच्या सुविधाव्दारे जे सेवाशुल्क जमा होते ते महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ यांचेकडे जमा करावयाचे आहे. त्यानुसार वरील प्रमाणे एकूण ७८३०४०/- रुपये प्राप्त झाल्याबाबतच्या पावत्या अर्धसमास पत्राव्दारे मागणी करून सुद्धा लेखापरीक्षणास सादर केल्या नाही अशाप्रकारे नियमबाह्य रोखीने पैसे प्रदान कल्याचे निश्चित पुरावे (दिनांक, क्रमांकित व प्रमाणित पावत्या) लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे ७८३०४०/- रुपये वसुलपात्र आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली. स्पष्टीकरण आणि केलेली कार्यवाही :-**

(१) खाते स्तरावरून प्राप्त सूचना जिल्ह्याचे कृत्रिम रेतनाचे एकत्रित सेवाशुल्क महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांना जिल्हा पशुसंवर्धन, उप आयुक्त यांनी जमा करावयाचे आहे. या कार्यालयास पंचायत समिती स्तरावरून पशुवैद्यकीय संस्थाचे प्राप्त होणारे कृत्रिम रेतनाचे मासिक सेवाशुल्क जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त वर्धा यांचे पत्र क्र. जिपउआ/से.शु/३०४३-५०/११, दिनांक १२/०८/२०११ अन्वये रोखीने जमा करण्यात आलेले आहे.

सदरील रक्कम वरिष्ठ शासकीय कार्यालयास जमा करण्यात येत असल्याने रोख नोंदवही वर रक्कम प्राप्त झालेबाबत संबंधीतांचे स्वाक्षरी घेण्यात येत असून जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त यांचे कडून जमा केलेल्या रकमेची पावती घेण्यात आलेली आहे.

(२) पंचायत समिती स्तरावरून प्राप्त होणाऱ्या मासिक सेवाशुल्क महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ यांनी पुरविलेल्या रोख नोंदवही मध्ये जमा घेऊन संबधित पंचायत समिती समितीची रक्कम प्राप्त झाल्याबाबत पोच देण्यात आलेली आहे. या कार्यालकडून कृत्रिम रेतन सेवाशुल्क जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त वर्धा या कार्यालयास नियमित जमा करण्यात आलेले आहे. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयाने सदरील सेवाशुल्काची रक्कम महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला या कार्यालयास जमा करण्यात आलेली असून त्याबाबतची पोच व विवरण उपलब्ध आहे. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांनी जिल्हा पशुसंवर्धन, उपायुक्त वर्धा जिल्ह्यातून प्राप्त सेवाशुल्काची पावती दिलेली आहे.

सबब, अनुपालन मान्य करून लेखा आक्षेप वगळण्यात यावा ही विनंती.

**(४) परिच्छेद क्रमांक ४.४२ (सन २०१३-२०१४)**

**पंचायत समिती फंडातून क्रिडा व सांस्कृतिक व स्पर्धावर केलेल्या खर्चाबाबत (सेस फंड)**

प्रमाणापत्रासाठी कोटेशन मागविले नाही. शिल्ड वाटपा व्यतिरिक्त इतर साहित्याची विल्हेवाट दर्शविली नाही. शिबीरांचे दिवशी दिनांक ११/१२/२०१३ शिक्षकांची प्रति शिबीर अ.क्र.१५८ व ७२ याप्रमाणे असताना दोन्ही दिवशी १७० दर्शविली

सदर स्पर्धावर केलेल्या खर्चासंबंधीत दस्ताऐवजाची तपासणी केली असता, खाली दर्शविल्याप्रमाणे बाबी निदर्शनास आल्या :—

(१) प्रमाणपत्रासाठी वेगळे कोटेशन मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे वेगळे कोटेशन मागविण्यात आले नाही.

(२) साठा रजिस्टरची तपासणी केली असता क्रिडा स्पर्धेच्या साहित्याची साठा रजिस्टरला नोंद घेतली परंतु, शिल्ड वाटपा व्यतिरिक्त इतर साहित्याची विल्हेवाट दर्शविण्यात आली नाही.

(३) दि.१०/१२/२०१३ व दि.११/१२/२०१३ ला झालेल्या क्रिडा स्पर्धेत शिक्षकांची उपस्थिती दोन्ही दिवशी १७० दर्शविली, प्रत्यक्षात दि.१०/१२/२०१३ ची उपस्थिती १५८ व दि.११/१२/२०१३ ला फक्त ७२ शिक्षक उपस्थित असल्याचे आढळले.

(४) विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत गोषवारा काढला नसल्याने विद्यार्थ्यांची उपस्थिती संख्या निश्चित करण्यात येत नाही.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली. स्पष्टीकरण आणि केलेली कार्यवाही:-**

(१) प्रमाणपत्रासाठी विदर्भ क्रिएशन, अक्षता प्रिंटर्स व अक्षर कॉम्प्युटर हिंगणघाट यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यातील अक्षर कॉम्प्युटर अँन्ड प्रिंटर्स, हिंगणघाट यांचे दर कमी असल्यामुळे त्यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात आले असून ते नस्तीला उपलब्ध आहे. अनुपालन लेखापरीक्षणास उपलब्ध आहे. अनुपालन लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(२) साठा रजिस्टरमध्ये शिल्ड व इतर साहित्याची विल्हेवाट दर्शविण्यात आली आहे. व ती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(३) दिनांक १०/१२/२०१३ व दि.११/१२/२०१३ ला झालेल्या क्रिडा स्पर्धेत शिक्षकांची उपस्थिती बाबत गोषवारा काढण्यात आला असून त्याची प्रत नस्तीला उपलब्ध आहे.

सदर क्रिडा स्पर्धेला दोन्ही दिवस १७० शिक्षक उपस्थित होते. जास्त कर्मचारी असल्याने दोन नोंदवह्या केल्या होत्या. जास्त कर्मचारी असल्याने दोन नोंदवह्या केल्या. इतर कर्मचाऱ्यांच्या सह्या दुसऱ्या पंजीत घेतल्या आहेत. त्या नस्तीला उपलब्ध असून लेखापरीक्षणात तपासणी करिता सादर करण्यात येत आहे.

(४) विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा गोषवारा काढला असून तो नस्तीला उपलब्ध आहे.

वरील प्रमाणे दस्ताऐवज नस्तीला उपलब्ध असून लेखापरीक्षणाचे अनुपालनात तपासणी करिता सादर करण्यात येत आहे.

कृपया आक्षेपात अनुपालन झाले असल्याने आक्षेप वगळण्यात यावे ही विनंती.

**(५) परिच्छेद क्रमांक ४.१४१ (सन २०१३-२०१४)**

**अन्न शिजविण्याचे मानधन व रोखीने व्यवहार करणेबाबत व प्रमाणके सादर न करणे (शालेय पोषण आहार जिल्हा निधी)**

अन्न शिजविण्याचे मानधन नियमाबाह्यपणे रु.२००००/- जास्तीचे देण्याबाबत.

इंदिरा कन्या विद्यालय कारंजा (घा) चे अन्न शिजविण्याचे काम करणारे श्रीमती बेबी द.फरकाडे यांचे बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र.६०१२९३८०६४७ मध्ये रु.४०००/-प्रमाणे १० महिन्याचे मानधन ४००००/- जमा केले. तसेच श्रीमती बेबी फरकाडे यांना भाजीपाला व इंधनाकरिता ४१४०७/- रोखीने प्रदान करण्यात आले. याबाबत लेखापरीक्षण अभिप्राय खालीलप्रमाणे :—

(१) शासन निर्णय शिक्षण व क्रिडा विभाग क्र./शापोआ/२०१०/प्र.क्र.१८ दिनांक २ फेब्रुवारी, २०११ नुसार २५ ते ९९ विद्यार्थ्यांकरिता १० महिन्याचे रु. २०००/-प्रती महिन्याप्रमाणे मानधन द्यावयाचे आहे. परंतु, श्रीमती फरकाडे यांना रु. ४०००/- प्रमाणे मानधन देण्यात आले रु. २००००/- वसुलपात्र आहे.

(२) महाराष्ट्र जि.प.व पं.स.लेखा संहिता १९६८ चे कलम २९ (४) नुसार रु. १०००/- चे वरील देयक धनादेशाने प्रदान करावयाचे असतानां वरील प्रमाणे रु. ४१४०७/- श्रीमती बेबी फरकाडे यांना रोखीने देण्यात आले. तसेच रु. ४१४०७/- चे प्रमाणके लेखापरीक्षणास सादर केले नाही.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली. स्पष्टीकरण आणि केलेली कार्यवाही :–**

लेखा आक्षेपात नमूद असलेला बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र. ६०१२९३८०६४७ हा श्रीमती कमलाबाई राजघरे, प्राथ. शाळा खैरी धरण यांचा आहे व श्रीमती बेबी फरकाडे इंदिरा कन्या विद्यालय कारंजा घाडगे यांचा बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र. ६०१०४९२१८५७ हा आहे.

श्रीमती बेबी फरकाडे यांना रु.२०००/- प्रमाणे १० महिन्याचे मानधन रु.२००००/- देण्यात आलेले आहे. लेखा आक्षेपात नमूद मानधनाची रक्कम ४००००/- श्रीमती इंदिरा टिपले कस्तुरबा विद्यालय कारंजा यांचे मानधन प्रति महिना रक्कम रुपये ४००००/- प्रमाणे देण्यात आलेले आहे.

श्रीमती बेबी फरकाडे यांना रु.४०००/- प्रमाणे मानधन देण्यात आलेले नाही. म्हणून रु.२००००/- रक्कम वसुलपात्र नाही.

(२) अनुपालन सादर करण्यात येते की, अन्न शिजविण्याचे मानधन स्वयंपाकी व मदतनीस यांना प्रत्येकी १०००/- रुपये महिना शासन निर्णयाचे अधीन राहून देण्यात येते. त्यानुसार सदर शाळेचे पटसंख्येनुसार प्रत्येकी २०००/- प्रति महिना देण्यात आला. त्याप्रमाणे श्रीमती बेबी फरकाडे स्वयंपाकी व मदतनीस यांना १० महिन्याचे मानधन रुपये २००००/- देण्यात आले. याबाबत संबंधित कागदपत्र सोबत जोडले आहे.

शाळेच्या मुख्याध्यापिका इंदिरा कन्या विद्यालय, कारंजा (घा) यांचे अहवालानुसार इंधन भाजीपाला याबाबत रक्कम रुपये ४१४०७/- श्रीमती बेबी फरकाडे यांना रोखीने देण्यात आली. यापुढे रक्कम धनादेशाव्दारे अदा करण्यात येईल अशी लेखी स्वरूपात ग्वाही शाळेच्या मुख्याध्यापक यांनी दिलेली आहे.

तरी कृपया अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**(६) परिच्छेद क्रमांक. ४.७९३ (७४) (सन २०१३-२०१४)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे.**

**विहित माहिती तथा माहिती विवरण पत्रातील माहिती लेखापरीक्षणास सादर न करण्याची अनियमितता.—**पंचायत समिती, सेलूचे सन २०१३-१४ लेखापरीक्षणा करीता आवश्यक असलेली माहिती तथा विवरण पत्रातील माहिती सादर करण्याबाबत अर्धसमास पत्रानुसार

कळविले असता खालील माहिती तथा विवरण पत्र आणि अर्धसमास पत्राची उत्तरे लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही. यावरून पंचायत समिती, सेलू अंतर्गत संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उचित सहकार्य न केल्यामुळे सखोल लेखापरीक्षण करून शासनाच्या लेखापरीक्षणाचा उद्देश सफल करता आला नाही.

सादर न झालेली माहिती विवरणपत्रे :—

(१) लेखापरीक्षण अहवालातील थकित परिच्छेद

(२) लेखापरीक्षण अहवालातील जोडावयाची विवरणपत्रे

(३) अफरातफर प्रकरणे

(४) अ.क्र.१ ते २३ अर्धसमासपत्राची उत्तरे व मूळ अर्धसमास पत्रे

(५) लेखा आक्षेपाव्दारे वसूल करण्यात आलेली रक्कम

(६) दिनांक ३१/०३/२०१४ अखेर अरोखीकृत धनादेशाची यादी

(७) दिनांक ३१/०३/२०१४ अखेरची शिल्लक निधी

(८) लेखा शीर्षनिहाय प्राप्त आवटंन, तरतूद व झालेला खर्च (२०१३-१४)

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली. स्पष्टीकरण आणि केलेली कार्यवाही :—**

पंचयायत समिती, सेलू सन २०१३-१४ ची आवश्यक असलेली माहिती उपलब्ध असून संपूर्ण विवरणपत्रे

प्रथम अनुपालनामध्ये उपलब्ध करून देण्यात आले होते.

(१) लेखापरीक्षण अहवालातील थकित परिच्छेदासंबंधीची अद्ययावत माहिती सोबत जोडण्यात येत आहे.

(२) लेखापरीक्षण अहवालातील सन २०१३-१४ ची संपूर्ण विवरणपत्रे उपलब्ध आहेत.

(३) अफरातफर प्रकरणे निरंक आहेत.

(४) अनुक्रमांक १ ते २३ लेखापरीक्षण अहवालातील अनुपालने लेखापरीक्षण कालावधीमध्ये लेखापरीक्षण पथकास सादर करण्यात आले होते. तसेच सन २०१३-१४ च्या लेखापरीक्षण अहवालात एकूण १ ते ३५ परिच्छेद घेण्यात आलेले आहे.

(५) लेखा आक्षेपाची वसुलपात्र रक्कम निरंक आहे.

(६) दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेरची अरोखीकृत धनादेशाची यादी सोबत जोडलेली आहे.

(७) दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेरची शिल्लक निधीबाबतचे पत्र सोबत जोडण्यात येत आहे.

(८) लेखाशीर्षनिहाय प्राप्त अनुदान खर्च या बाबतचे विवरणपत्र सोबत जोडण्यात येत आहे.

**(७) परिच्छेद क्रमांक. ४.७९३ (७५) (सन २०१३-२०१४)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे.**

**विहित माहिती तथा माहिती विवरण पत्रातील माहिती लेखापरीक्षणास सादर न करण्याची अनियमितता**

पंचायत समिती, कारंजाचे सन २०१३-१४ लेखापरीक्षणा करीता आवश्यक असलेली विवरणपत्रातील माहिती सादर करणेबाबतचे पत्र क्र.१४, दिनांक २१.०७.२०१४ नुसार कळविले असता खालील माहिती तथा विवरणपत्रे आणि अर्धसमास पत्राची उत्तरे लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही. पंचायत समिती कारंजा अंतर्गत संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उचित सहकार्य न केल्यामुळे सखोल लेखापरीक्षण करून शासनाचा लेखापरीक्षणाचा उद्देश सफल करता आला नाही.

(१) लेखापरिक्षण अहवालातील थकित परिच्छेद

(२) लेखापरीक्षण अहवालासोबत जोडावयाचे विवरण पत्रे

(३) अफरातफर प्रकरणे

(४) अंक क्रमांक १ ते २३ पत्रे अर्धसमास मूळ व उत्तरे अर्धसमास पत्राची.

(५) लेखा आक्षेपाव्दारे वसूल करण्यात आलेल्या रक्कमा

(६) दिनांक २१/०३/२०१४ अखेर अरोखीकृत धनादेश

(७) दिनांक ३१/०३/२०१४ अखेरचा शिल्लक निधी

(८) लेखाशीर्षनिहाय प्राप्त आवंटन सन २०१३-१४ मध्ये झालेला खर्च व तरतूद.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

सन २०१३-१४ चे लेखापरीक्षणाच्या वेळी अर्ध समास पत्र क्रमांक १४ नुसार पंचायत समितीचे सबंधित विभागांना पत्र देण्यात आले असून त्याअनुषंगाने लेखा शाखेतील पत्र क्रमांक पवं.स.का./लेखा/वशि-क्यु/२०१४ पंचायत समिती, कारंजा दिनांक १२.०७.२०१४ अन्वये अर्ध समास पत्रांचे उत्तर देण्यात आलेले आहे.

त्याअनुषांने लेखापरीक्षाणाचे वेळी स्थानिक निधी लेखा वर्धा यांनी सन २०१३-१४ चे एकूण ६१ परिच्छेद घेतलेले आहे.

(१) क्र.१ ची माहिती लेखापरिक्षण करतेवेळी दि.२१.०७.२०१४ ला लेखापरीक्षक अधिकारी यांचे स्वाक्षरीने थकित परिच्छेदाची नोंदवही प्रमाणित केलेली आहे. व प्रत सोबत संलग्न केलेली आहे.

(२) सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे रोख पुस्तकानुसार व बँक पासबुकनुसार ताळमेळ करून सदर चे वार्षिक लेखे मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जि.प.वर्धा यांना सादर करण्यात आलेले आहे.

(३) अफरातफर प्रकरणाची माहिती या सोबत जोडण्यात आलेली आहे.

(४) अ.क्र.१ ते २३ अर्धसमास पत्राची उत्तरे लेखापरीक्षणाचे वेळी देण्यात आलेली आहे.

(५) लेखा आक्षेपाव्दारे वसूल करण्यात आलेल्या रक्कमाची माहिती निरंक आहे.

(६) दिनांक ३१.०३.२०१४ अखेर अरोखीकृत धनादेशाचे प्रपत्र सोबत जोडण्यात अलेले आहे.

(७) दिनांक ३१.०३.२०१४ चा अखेर या शिल्लक निधीचे प्रपत्र सोबत जोडलेले आहे.

(८) लेखाशिर्षनिहाय प्राप्त आवंटन सन २०१३-१४ मध्ये झालेला खर्च व वर्षअखेरची शिल्लक तरतूद याबाबतचे प्रपत्र सोबत जोडलेले आहे. करीता परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**(८) परिच्छेद क्रमांक ५.७२ (६) (सन २०१३-२०१४)**

**निनावी नोंदविलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत.**

ग्रामपंचायतीचे सन २०१०-११ ते २०११-१२ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे वेळी सादर केलेल्या रोखपुस्तक व प्रमाणकाची तपासणी केली असता ग्रामपंचायतीने खालीलप्रमाणे नियमबाह्यपणे निनावी नोंदविलेला खर्च केल्याचे निदर्शनास आले.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | पूरवठादाराचे नांव | रोख पुस्तक पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| (१) | १५८ | १९/२/११ | ८००००/- | निनावी खर्च | १९६ पा पु पूरवठा |
| (२) | ११३ | ३०/१०/१० | १०००००/- | ....,,..... | १७३-....,,..... |
| (३) | ६१ | १७/७/१० | १७०००/- | ....,,..... | ....,,..... |
| (४) | २६५ | २०/९/११ | ६००००/- | ....,,..... | पर्यावरण ग्राम समृद्धी |
| (५) | २६६ | ....,,..... | १५००००/- | ....,,..... | ....,,..... |
| (६) | ११२ | ३०/६/११ | ३२००/- | ....,,..... | ....,,..... |
| (७) | २०२ | ३०/८/१० | २८५०/- | ....,,..... | ग्राम निधी |

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | पूरवठादाराचे नांव | रोख पुस्तक पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| (८) | २३७ | ३०/९/१० | ७९४८१/- | ....,,..... | ....,,..... |
| (९) | २६८ | ६/११/१० | १९२०/- | ....,,..... | ....,,..... |
| (१०) | २७६ | ६/११/१० | २९१७७३/- | ....,,..... | ....,,..... |
| (११) | ३०३ | ११/१२/१० | ४३२६९/- | ....,,..... | ....,,..... |
| (१२) | १५० | १६/७/११ | १२४५००/- | ....,,..... | ....,,..... |
| (१३) | ४५४ | ३१/३/१२ | २४३००/- | ....,,..... | ....,,..... |
| (१४) | ... | १०/९/११ | १३६०२/- | ....,,..... | ....,,..... |
| (१५) | २१७ | २०/८/११ | २२५००/- | ....,,..... | ....,,..... |
| (१६) | २३१ | २७/८/११ | १५३४६/- | ....,,..... | ....,,..... |
| (१७) | २५७ | २२/९/११ | ६००००/- | ....,,..... | ....,,..... |
| (१८) | २५८ | २२/९/११ | १५०००/- | ....,,..... | ....,,..... |
| | | एकूण | ९६९७४१/- | ....,,..... | ....,,..... |

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली. स्पष्टीकरण आणि केलेली कार्यवाही:-**

सदर आक्षेपाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत आष्टीच्या ग्रामपंचायत पाणीपुरवठा निधी, पर्यावरण संतुलित समृद्धी ग्राम योजना निधी व ग्रामपंचायत सामान्य निधी चे रोख पुस्तक प्रमाणके दर पत्रक नस्ती, ग्रा.पं. मोजमाप पुस्तिका, साठा नोंद वही व कामकाज नोंदवहीची सखोल चौकशी करून त्यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधी व ग्रामपंचायत सामान्य निधी चे रोख पुस्तकात स्तंभ क्रमांक ११ व १२ मध्ये रक्कम कोणाला व कशाबद्दल दिली याबाबत नोंद केलेली नाही त्यामुळे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी अनियमितता केल्याचे दिसून येते. परंतु स्तंभ क्र. १३ मध्ये हिशोबाचा विभाग (बाब) यात खर्चाची नोंद केलेली असून या अनुषंगाने प्रमाणकाची तपासली असता आक्षेपात नमूद सर्व प्रमाणके दप्तरी आढळून आली. ती पुढीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | प्रमाणकावरून रक्कम कोणाला अदा केली त्यांचे नाव | रोख पुस्तक पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| (१) | १५८ | १९/२/११ | ८००००/- | सचिन रमेशराव होले | १९६ पा.पु. पुरवठा |
| (२) | ११३ | ३०/१०/१० | १०००००/- | सचिन रमेशराव होले | १७३ ——,,—— |
| (३) | ६१ | १७/७/१० | १७०००/- | सचिन रमेशराव होले | ——,,—— |
| (४) | २६५ | २६/९/११ | १४५०/- | सहारा कन्स्ट्रक्शन, आष्टी | १२२ ग्राम निधी |
| (५) | २६६ | ——,,—— | ७४५/- | श्रीकृष्ण प्रिटींग, आष्टी | १२२ |
| (६) | १२२ | ३०/६/११ | ३२००/- | सरोदे मंडप डेकोरेशन, आष्टी | ९५ |
| (७) | २०२ | ३०/८/१० | २८५०/- | कार्तिक सिमेंट टेड्रर्स, आष्टी | ३२ |
| (८) | २३७ | ३०/९/१० | ७९४८/- | एम/एस अपुर्वा कन्स्ट्रक्शन, आष्टी | ३८ |
| (९) | २६८ | २३/१०/१० | १९२०/- | श्रीकृष्ण प्रिटींग, आष्टी | ४३ |

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | प्रमाणकावरून रक्कम कोणाला अदा केली त्यांचे नाव | रोख पुस्तक पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| (१०) | २७६ | ६/११/१० | २९१७७३ | एम/एस अपुर्वा कन्स्ट्रक्शन, आष्टी | ४६ |
| (११) | ३०३ | ११/१२/१० | ४३२६९/- | एम/एस अपुर्वा कन्स्ट्रक्शन, आष्टी | ५३ |
| (१२) | १५० | १६/७/११ | १२४५००/- | सहारा कन्स्ट्रक्शन, आष्टी | ९९ |
| (१३) | ४५४ | ३१/३/१२ | २४३००/- | सागर बिल्डींग मटेरियल, आष्टी | |
| (१४) | | सदर दिनांकीत गोषवारा तपासला असता आक्षेपीत रक्कम रु. १३६०२/- ही खर्चाची नाही. | | | |
| (१५) | २१७ | २०/८/११ | २२५००/- | सागर बिल्डींग मटेरीयल, आष्टी | १०९ |
| (१६) | २३१ | २७/८/११ | १५३४६/- | मे. श्री. इंटरप्रायजेस, आष्टी | ११० |
| (१७) | २५७ | २२/९/११ | ६००००/- | समर्थ इंजिनिरींग फेब्रिक्रेटर, आष्टी | १२० |
| (१८) | २५८ | २२/९/११ | १५०००/- | समर्थ इंजिनिरींग फेब्रिक्रेटर, आष्टी | १२० |
| | | **एकूण** | **८८३३३४/-** | ....... | ..... |

ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधी अंतर्गत अनुक्रमांक १,२, व ३ नुसार प्रमाणक क्र. १५८,११३ व ६१ ची रक्कम अनुक्रमे ८००००/- १०००००/- व १७०००/- याप्रमाणे करण्यात आलेला खर्च रु. १९७०००/- हा नळ योजना दुरूस्तीवर प्राकलन प्राप्त करून करण्यात आलेला असून ग्रामपंचायत मासिक सभेने मंजुरी प्रदान केलेली आहे. सदर कामाचे मूल्यांकन रु. २९४७३७/- आहे. मूल्यांकनापेक्षा जादा खर्च करण्यात आलेली रक्कम रु. २०२४/- तत्का. ग्रामविकास अधिकारी श्री. एस.जे. आसुटकर यांचेकडून वसूल करून नगरपंचायत, आष्टी येथे पावती बुक क्रमांक ६१ अन्वये भरणा करण्यात आलेली आहे.

अ.क्र. ४ व ५ वर दर्शविण्यात आलेले प्रमाणक क्रमांक २६५ व २६६ ची रक्कम ६००००/- व १५०००/- नसून १४५०/- व ७४५/- रुपये आहे. व याबाबत निधी रोख पुस्तकात नोंद केलेली आहे. तसेच आक्षेपात नमूद २६५ व २६६ हि प्रमाणके दिनांक २०/९/२०११ या तारखेतील खर्चाची नसून २६/०९/२०११ या तारखेतील आहे. आक्षेपाचे अवलोकन केले असता प्रमाणक क्रमांक २६५ व २६६ हे प्रमाणक क्रमांक २५७ व २५८ दिनांक २२/९/२०११ ला दुबार घेतल्याचे दिसून येते.

ग्रामपंचायत सामान्य निधी अंतर्गत अनुक्रमांक ८ वरील , प्रमाणक क्र. २३७, अनुक्रमांक १० वरील, प्रमाणक क्र. २७६ अनुक्रमांक ११ वरील, प्रमाणक क्र. ३०३, अनुक्रमांक १२ वरील, प्रमाणक क्र. १५० ची रक्कम रु. ७९४८१/- + २९१७७३/- + ४३२६९/- + १२४५००/- अ एकूण रक्कम रु. ५३९०२३/- हा रस्ता खडीकरणावर करण्यात आलेला आहे. विवरण पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. (१) | प्राकलन किंमत (२) | कामावर झालेला खर्च (३) | मूल्यांकन (४) |
|---|---|---|---|
| १ | ५५६२८३/- | ५३९०२३/- | ५४२३२५/- |

यानुसार कामाचे मूल्यांकन हे कामावर झालेल्या खर्चापेक्षा जादा असल्यामुळे व खर्चास ग्रामपंचायत मासिक सभेने मंजुरी प्रदान केलेली आहे. त्यामुळे वसुलपात्र ठरत नाही.

अनुक्रमांक ४ व ५ नुसार दर्शविण्यात आलेले प्रमाणक क्रमांक २६५ व २६६ हे पर्यावरण संतुलित समृद्धी ग्राम योजना निधीचे नसून ग्राम निधीतील आहे व सदर प्रमाणके उपलब्ध असून त्याची रक्कम रु. १४५०/- व ७४५/- आहे.

त्याचप्रमाणे अनुक्रमांक ७,९,१३,१५ व १६ वरील प्रमाणक क्रमांक २०२,१६८,४५४,२१७ व २३१ उपलब्ध असून सदर खर्च दर पत्रके मंजूर करून करण्यात आलेला आहे. तसेच सदर प्रमाणकाद्वारे खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची नोंद साठा नोंद वहीत आहे व केलेल्या खर्चास ग्रामपंचायत मासिक सभेने मंजुरी प्रदान केलेली आहे, त्यामुळे यात ग्रामपंचायत निधीचा अपहार झाल्याचे दिसून येत नाही.

त्याचप्रमाणे अनुक्रमांक १७ व १८ वरील प्रमाणक क्रमांक २५७ व २५८ ची रक्कम रु. ६००००/- + १५०००/- एकूण रक्कम रु. ७५०००/- खर्च हा ट्रीगार्ड करीता करण्यात आलेला असून मंजूर दर पत्रकानुसार करण्यात आलेला आहे व त्यास ग्रामपंचायत मासिक सभेची मंजुरी आहे त्यामुळे यात ग्रामपंचायत निधीचा अपहार झाल्याचे दिसून येत नाही. तसेच अनुक्रमांक ६ वरील प्रमाणक क्रमांक ११२ रक्कम रुपये ३२००/- हा खर्च पर्यावरण ग्राम समुद्ध योजना बाबत मार्गदर्शन शिबीरावर खर्च आलेला आहे. याप्रमाणे यात निधीचा अपहार झाल्याचे दिसून येत नाही.

आक्षेपातील अनुक्रमांक १४ वर प्रमाणक क्रमांक नमूद नसून दिनांक १०/०९/२०११ चे निधी रोख पुस्तीकातील हिशोबाची तपासणी केली असता सदर दिनांकास केलेला खर्च व अखेरची शिल्लक जुळत असून रुपये १३६०२/- हे खर्चाची रक्कम नसल्यामुळे सदर रक्कम वसुलपात्र नाही.

निनावी खर्चाची आक्षेपीत रक्कम रुपये ९६९७४१/- पैकी रु.७५०००/- दुबार झालेली असल्याने तसेच रुपये १३,६०२/- खर्चाची नसल्यामुळे व रुपये १४५०/- व रु.७४५/- प्रमा.क्र. २६५ व २६६ अन्वये रुपये ७५००००/-ऐवजी असल्याने सदर रक्कम रुपये ८८३३३४/- रुपये येते व सदर रक्कम रुपये ८८३३३४/- चे प्रमाणके उपलब्ध असून नियमाप्रमाणे ग्राम पंचायतीनी कार्यवाही करून खर्च केलेला असून त्यास ग्राम पंचायत मासिक सभेने पुढीलप्रमाणे मंजुरी प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | रक्कम | मासिक दिनांक | ठराव क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | २८५०/- | १३/०९/२०१० | ३ |
| २. | ७९४८१/- | २०/१०/२०१० | ३ |
| ३. | १९२०/- | १४/१२/२०१० | ३ |
| ४. | १७०००/- | १४/१२/२०१० | ३ |
| ५. | २९१७७३/- | १४/१२/२०१० | ३ |
| ६. | ४३२६९/- | ५/१/२०११ | ३ |
| ७. | ३२००/- | २३/७/२०११ | ३ |
| ८. | १२४५००/- | ३०/८/२०११ | ३ |
| ९. | १५३४६/- | १४/९/२०११ | ३ |
| १०. | २४३००/- | १४/९/२०११ | ३ |
| ११. | २२५००/- | १४/९/२०११ | ३ |
| १२. | ६००००/- | १/१०/२०११ | ३ |
| १३. | १५०००/- | १/१०/२०११ | ३ |
| १४. | ८००००/- | २१/३/२०११ | ३ |
| १५. | १०००००/- | १५/११/२०१० | ३ |

चौकशी अंती असे दिसून येते की, तत्कालीन सचिव यांनी निधी रोख पुस्तकात आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे रक्कम कोणाला व कशाबद्दल अदा केली याबाबत नोंद न करण्याची अनिमियता केल्याचे दिसून येते, परंतु प्रमाणके उपलब्ध आहे. संबंधित तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री. एस. जे. आसुटकर यांचेवर या अनुषंगाने विभागीय चौकशी सुरू आहे. त्याप्रमाणे प्रमाणके, दरप्रत्रके, साठा नोंदवही, मोजमाप पुस्तिका व ग्राम पंचायत मासिक सभा प्रोसेडींग इत्यादीचे तपासणी केली असता यात आर्थिक अपहार झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे आक्षेपित रक्कम रु. ९६९७४१/- वसूल पात्र ठरत नाही.

याप्रमाणे आक्षेप वगळण्यास शिफारस करण्यात येवून आक्षेप वगळण्यात यावा ही विनंती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ जुलै, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, सोनोरा शेंद्री विजयगोपाल ते पुलगाव नाचणगाव रस्ता बांधकामचे मूळ अंदाजपत्रक लेखापरीक्षणास का सादर केले नाही. कागदपत्रे न दाखविण्याची कारणे काय आहेत? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शेंद्री विजयगोपाल ते पुलगाव नाचणगाव रस्ता बांधकामाचे मूळ अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, चंद्रपूर येथे असल्यामुळे सदर दस्तऐवज दाखविता आले नाही. त्याची सत्यप्रत सोबत आहे. तद्नंतर कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी विदित केले की, सदरची कागदपत्रे अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे होती. समितीने कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांना विचारणा केली की, काम झाल्यावर त्या कामाचे लेखापरीक्षण होऊन देयक सादर करताना त्यासोबत अंदाजपत्रक, करारनाम्याची प्रत जोडलेली असते आणि या सर्व बाबी पाहूनच मुख्य लेखा व वित्त अधिकारी देयक अदा करीत असतात. त्यांनी या सर्व गोष्टी पाहिल्या नाहीत काय? आपण कामाच्या अंदाजपत्रकाशिवाय निविदा काढल्या आहेत काय. यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, लेखापरीक्षणाच्यावेळी कागदपत्रे दाखवावयास पाहिजे होते, परंतु ती दाखविली नाहीत.

समितीने निदेश दिले की, सोनोरा शेंद्री विजयगोपाल ते पुलगाव नाचणगाव रस्ता क्रमांक ७१ या कामाच्या संदर्भात लेखापरीक्षणाच्यावेळी मूळ अंदाजपत्रक सादर करण्यात आले नाही. या कामामध्ये मोठी अनियमितता दिसून येते आहे. मूळ अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे होते. तांत्रिक मान्यता दिल्यानंतर सर्व प्रक्रिया पार पडते. समितीला चुकीचे उत्तर दिले जात आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी देयक अदा करण्यापूर्वी सर्व कागदपत्रे पाहणे आवश्यक होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर चौकशी करून लेखापरीक्षणास कागदपत्रे न दाखविल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० नियम-७ प्रमाणे एक वेतनवाढ रोखावी व त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये तशी नोंद घ्यावी. तसेच केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारात्मक सहमती दर्शवली.

समितीने कार्यकारी अभियंता लघुसिंचन विभाग यांना विचारणा केली की, कोल्हापूरी बंधारा (कान्होली) स्टोअर शेड बांधकामाच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये खाडाखोड करण्याची कारणे काय आहेत, वाढीव परिमाणाला मंजुरी केव्हा दिली, सदर मंजुरी लेखापरीक्षणावेळी का दाखविण्यात आली नाही? यावर कार्यकारी विभाग लघुसिंचन विभाग यांनी खुलासा केला की, कोल्हापूरी बंधारा (कान्होली) स्टोअर शेड बांधकामाच्या मोजमाप पुस्तिकेत खाडाखोड करण्यात आली नाही. सदरहू बाब चुकीची नमूद करण्यात आलेली नाही. समितीने पुढे कार्यकारी अभियंता लघुसिंचन विभाग यांना विचारणा केली की, बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या मालाचा नमुना घेतल्यानंतर त्याचा चाचणी अहवाल घेण्यात येतो. चाचणी अहवाल घेण्यात आला नसेल तर कंत्राटदाराच्या कामाची १० टक्के रक्कम अदा करण्यात येत नाही. सदर चाचणी अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच बांधकाम करण्यात आले आहे. उक्त प्रकरणी संबंधित कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित केली आहे काय. सदरहू काम किती रकमेचे होते? यावर कार्यकारी अभियंता लघुसिंचन विभाग यांनी विदित केले की, सदरहू काम ३.७५ लाख रुपयांचे होते व ते काम पूर्ण झाले आहे.

समितीने निदेश दिले की, कोल्हापूरी बंधारा (कान्होली) स्टोअर शेड बांधकाम प्रकरणी चाचणी अहवाल प्राप्त न करताच बांधकाम करण्यात आले आहे त्यामुळे या कामामध्ये अनियमितता झालेली आहे. सदर कामासंदर्भात लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. उक्त प्रकरणी चौकशी करून दोषींवर जबाबदारी निश्चित करून, कारवाई करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

समितीने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना विचारणा केली की, कृत्रिम रेतनाच्या सेवा शुल्काबाबत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचेकडे रुपये ७,८३,०४०/- रोखीने रक्कम जमा झाल्याबाबतच्या पावत्या लेखापरीक्षणावेळी सादर न करण्याची कारणे काय आहेत. तसेच ऑडिटच्या वेळी पावत्या सादर करण्यात आल्या आहेत काय यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्याकडे कॅश रक्कम जमा करण्यात येत होती. कृत्रिम रेतनाचे सेवाशुल्क दरमहा रोखीने भरावे असे उपायुक्त जिल्हा पशुसंवर्धन यांनी पत्र दिले होते. सेवा शुल्काची रक्कम मासिक भरण्यात आलेली आहे. ऑडिटच्या वेळी पावत्या सादर केलेल्या नाहीत स्पेशल कॅम्पच्या वेळी पावत्या सादर करण्यात आलेल्या आहेत. समितीने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १३४ (२) नुसार १००० रुपयांहून अधिक रकमेचे प्रदान धनादेशाद्वारे करण्यात येते. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे कलम २९ (४) नुसार १०००/- रुपये पेक्षा अधिक रक्कम रेखांकित धनादेशाने देण्यात येते. सदर शासन निर्णयानुसार १००० रूपयांच्यावरील रक्कम रोखीने देता येत नाही. तरी रुपये ७,८३,०४४०/- रोखीने जमा करण्यात आले आहेत. त्यावेळी तत्कालिन संबंधित अधिकारी कोण होते? जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यावेळी उपायुक्त जिल्हा पशुसंवर्धन श्री. सतिश राजीव हे होते त्यांनी दिनांक १२/८/२०११ रोजी पत्र काढून सदर रक्कम रोखीने जमा करावी असे सूचित केले होते.

समितीने निदेश दिले की, कृत्रिम रेतनाचे सेवाशुल्क रोखीने घेण्यात आले आहे. शासन परिपत्रकानुसार रोखीने रक्कम घेता येत नाही. रोखीने रक्कम का देण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून या प्रकरणात जे दोषी असतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. शासन निर्णयाविरूद्ध जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी पत्र काढले आहे हे योग्य नाही त्यांना तसा अधिकार नाही उपायुक्त यांनी चुकीच्या मार्गाने पत्र काढले आहे. यासंदर्भात चौकशी करून एक महिन्यात समितीला अहवाल सादर करण्यात यावा.

समितीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट यांना विचारणा केली की, पंचायत समिती सेस फंडातून क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांवर केलेल्या खर्चाचे अभिलेखे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत. सदरहू कागदपत्रे लेखापरीक्षणानंतर उपलब्ध करून देण्यात आली आहेत काय? यावर गट विकास अधिकारी पंचायत समिती, हिंगणघाट यांनी विशद केले की, क्रिडा प्रमाणपत्रासाठी विदर्भ क्रियेशन, अक्षता प्रिंटर्स व अक्षर कॉम्पुटर हिंगणघाट यांच्याकडून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यातील अक्षर कॉम्पुटर ॲन्ड प्रिंटर हिंगणघाट यांचे दर कमी असल्यामुळे त्यांच्याकडून प्रमाणपत्र घेण्यात आले असून ते नस्तीत उपलब्ध आहे. तसेच सदरहू कागदपत्रे लेखापरीक्षणानंतर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

समितीने गट विकास अधिकारी पंचायत समिती, कारंजा यांना विचारणा केली की, इंदिरा कन्या विद्यालय कारंजाचे अन्न शिजविण्याचे काम करणारे स्वयंपाकी श्रीमती बेबी फरकाडे यांना भाजीपाला व इंधनाकरिता रु. ४१,४०७/- रोखीने प्रधान करण्यात आले आहे. सदरहू प्रकरणी रक्कम रुपये ४१,४०७/- चे प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देण्याची कारणे काय आहेत, यावर गट विकास अधिकारी पंचायत समिती कारंजा यांनी विशद केले की, श्रीमती बेबी फरकाडे यांना दरमहा रुपये २००० याप्रमाणे दहा महिन्याचे रुपये २०,००० रक्कम आगाऊ प्रदान करण्यात आली आहे. यांचे खाते क्रमांक नसल्याने भाजीपाला खर्च व मानधनाची रक्कम रोखीने देण्यात आली होती. सदरहू प्रकरणी संबंधितांचा खुलासा घेतला असून त्याची कागदपत्रे सादर केली आहेत. समितीने विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती लेखा सहिंता १९६८ चे कलम २९ (४) नुसार रु. १०००/- वरिल देयक धनादेशाद्वारे प्रदान करावयाचे असताना एक हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम रोखीने अदा करण्याची कारणे काय आहेत यावर गट विकास अधिकारी पंचायत समिती कारंजा यांनी विशद केले की, इंदिरा कन्या विद्यालय कारंजाचे मुख्याध्यापिका यांच्या अहवालानुसार भाजीपाला व इंधनाकरिता रु. ४१,४०७/- श्रीमती बेबी फरकाडे यांना रोखीने देण्यात आले. यापुढे रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल अशी लेखी स्वरूपात ग्वाही शोळेच्या मुख्याध्यापक यांनी दिलेली आहे.

समितीने गट विकास अधिकारी पंचायत समिती, सेलू व पंचायत समिती, कारंजा यांना निदेश दिले की, लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे सादर न केल्यामुळे सदर प्रकरणामध्ये संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र स्थानिक लेखा अधिनियम, १९३० नियम ७ अन्वये रुपये २५,०००/- दंड आकारण्यात यावा तसेच त्यांच्या सेवा पुस्तकात तशी नोंद घेण्यात यावी

समितीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना विचारणा केली की, आष्टी- ग्रामपंचायतीतील रु. ९,६९,७४१/- प्रमाणके लेखापरीक्षणावेळी उपलब्ध नसल्याची कारणे काय आहेत. लेखापरीक्षणास प्रमाणके उपलब्ध न करण्याबाबत संबंधितांवर कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे त्यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनिमय १९३० च्या नियम ७ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे काय यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी विदित केले की, संबंधित तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम, १९३० च्या नियम ७ प्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत :-**

(१) सन २०१३ -१४ या अहवाल वर्षात लेखापरीक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखून तशी नोंद संबंधीतांचे सेवापुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर करण्यात यावी.

(२) भविष्यात लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होवू नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे?

(३) संबंधित अधिनियमात दुरूस्ती करून रुपये ५०,०००/- दंड अथवा परिच्छेदातील एकूण रक्कमेच्या १०% इतकी रक्कम दंड म्हणून आकारण्याची तरतूद करण्याची वित्त विभाग कारवाई करेल काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्रस्तावित मुद्यात नमूद एकूण आठ लेखा परिच्छेदापैकी ३.३२६, ३.५२६/०२, ३.८६२, ४.४२, ४.१४१ या पाच प्रकरणात लेखापरीक्षणावेळी कार्यालयात उपस्थित सर्व अभिलेखे सादर करण्यात आलेली होती. त्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांविरूद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली नाही. तर ४.७९३(७४) , ४.७९३(७५) , ५.७२ या तीन परिच्छेदाबाबत मुंबई स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम १९३०नियत ७ नुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचा प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांना या कार्यालयाचे पत्र क्र.जिपव/विवि/ऑडिट डीस्पेजल/वशि-७१/२०१९, दिनांक २९/०१/२०१९ नुसार सादर करण्यात आलेला आहे. तद्नंतर पत्र क्र. जिपव/विवि/ऑडिट डीस्पेजल/वशि-३९५/२०१९, दि.२६/०४/२०१९ नुसार स्मरणपत्र देण्यात आलेले आहे.

**परिच्छेद क्र. ३.३२६/ बांधकाम विभाग :-**

(१) सोनेरा शेंद्री विजयगोपाल ते पुलगाव नाचणगाव रस्ता बांधकाम क्र. ७१ बाबत सदर कामाचे मूळ अंदाजपत्रक रुपये ५९,०९,०६०/- एवढ्या किमंतीचे होते. रुपये २५.०० लक्ष चे वरील तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार महा. शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२ प्र.क्र. ६८०/वित्त-९ मंत्रालय, मुंबई दिनांक १९ मार्च २०१२ च्या नियमानुसार अधीक्षक अभियंता या कार्यालायाकडून अंदाजपत्रक प्राप्त करून घेण्यात आले होते. अधीक्षक अभियंता यांचे कार्यालयाकडून मूळ अंदाजपत्रकाची प्रत देण्यात येत नसून छायांकीत प्रत देण्यात येते. लेखापरीक्षणांस मोजमाप पुस्तिका, करारनामा, तसेच इतर सर्व रेकॉर्ड दाखविण्यात आला होती. अधीक्षक अभियंता, सार्वजनीक बांधकाम मंडळ कार्यालय, चंद्रपूर यांना अंदाजपत्रकाची मूळ प्रत देणेबाबत जिपव/बांध/ऑडीट डिस्पो/वशि-६३३/१९ दिनांक ३०/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

यापुढे अंदाजपत्रकाची मूळ प्रत/सत्यप्रत लेखापरीक्षणास दाखविण्याची कार्यवाही केली जाईल.

अधीक्षक अभियंता कार्यालयात मंजूर मूळ अंदाजपत्रके त्यांच्या कार्यालयातील अभिलखात जतन करून ठेवण्यात येतात. तथापि, या बाबत संबंधित शाखा अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांच्याकडून खुलासे घेण्यात आलेले आहेत. तसेच भविष्यात अशी बाब होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षण पथकास सत्यप्रत दाखविण्यात आली होती.

**परिच्छेद क्र. ३.५६३/०२ लघूसिंचन विभाग, जिल्हा परिषद वर्धा :-**

सन २०१३-१४ या अहवाल वर्षात झालेल्या लेखापरीक्षणात कोल्हापूरी बंधारा स्टोअर शेड बांधकाम कान्होली मध्ये घेण्यात आलेला मूळ परिच्छेद क्र. ३.५६३/०२ मध्ये आवश्यक सर्व कागदपत्रे उपलब्ध करून दिले नसल्याबाबत कुठेही नमूद करण्यात आलेले नाही.

विभागाने लेखापरीक्षणासाठी सर्व कागदपत्रे उपलब्ध करून दिलेली असल्याने दंडात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**परिच्छेद क्र. ३.८६२ पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद वर्धा :-**

सदर मुद्दा हा कृत्रीम रेतनाचे सेवाशुल्काचे रोखीने प्रदान केल्याचे निश्चित पूरावे (दिनांक, क्रमांकीत व प्रमाणित पावत्या) लेखापरीक्षणास सादर न केल्याबाबत आहे. यासंबधाने सादर करण्यात येते कि, लेखापरीक्षणाचे वेळेस कार्यालयामध्ये उपलब्ध असलेला संपूर्ण दस्तऐवज लेखापरीक्षकांस दाखविण्यात आलेला आहे.

यासंबधाने रक्कम रोखीने जमा करणेबाबत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त वर्धा यांचे पत्र क्र. जिपउआ/से.शु./२०४३-५०/११ दिनांक १२/८/२०११ नुसार सूचना असल्याने रोखीने रक्कम जिल्हा पशुसंर्धन उपायुक्त वर्धा यांचेकडे जमा करण्यात आल्या. जमा करण्यात येत असलेल्या रक्कमेच्या पावत्या त्यांचेकडून दिल्या जात नसल्याने व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ अकोला यांचेकडून संपूर्ण रक्कमेची पावती जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त वर्धा कार्यालयाकडून दिली जात असल्याने लेखापरीक्षणाच्या वेळेस जमा केलेल्या रक्कमेच्या पावत्या दाखविता आल्या नाही. मात्र महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ अकोला यांनी पूरविलेल्या रोख नोंदवहीमध्ये रक्कम प्राप्त झाल्याची पोच जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त वर्धा कार्यालयाने दिलेली आहे व ती लेखापरीक्षणाचे वेळेस दाखविण्यात आलेली आहे. तसेच रक्कम भरल्याबाबतच्या पोच पावत्या जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त वर्धा यांच्याकडून प्राप्त करून घेण्यात आल्या आहेत.

अशाप्रकारे कार्यालयामध्ये उपलब्ध असलेला संपूर्ण दस्तऐवज लेखापरीक्षणास दाखविण्यात आला असल्याने प्रस्तावित कारवाई करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(२) सेवाशुल्काची रक्कम रोखीने जमा करण्याबाबत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त वर्धा यांनी दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने याबाबतची चौकशी करण्याकारीता पत्रक्र. जिपव/पशु.सं.वि./कप्रअ/कावि/११८/ १९, दिनांक ८/५/२०१९ नुसार मा. आयुक्त पशुसंवर्धन . म.रा. औंध, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र. ४.४२ पंचायत समिती हिंगणघाट :-**

सदर लेखा आक्षेपाबाबत सखोल तपासणी केली असता असे निर्देशनास येते कि, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने घेतलेल्या मूळ आक्षेपात लेखापरीक्षणास कागदपत्रे सादर न दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**परिच्छेद क्र. ४.१४१ पंचायत समिती कारंजा :-**

(१) सदरहू प्रकरणी रक्कम रुपये ४१४०७/- प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली होती. व सध्या ती प्रमाणके गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांचेकडे उपलब्ध आहे.

कार्यालयात उपलब्ध असलेला संपूर्ण दस्तऐवज लेखापरीक्षणाचे वेळी लेखापरीक्षकांना दाखविण्यात आलेला असल्याने दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**परिच्छेद क्र. ४.७९३(७४), ४.७९३(७५), ५.७२ पंचायत समिती सेलू, पंचायत समिती, कारंजा,पंचायत समिती आष्टी :-**

मा. पंचायत राज समितीने निर्देशित केल्यानुसार सन २०१३-१४ या अहवाल वर्षात उपरोक्त परिच्छेदासंबधी लेखापरीक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी

(१) परिच्छेद क्र. ४.७९३(७४) करिता डॉ. शबाना मोकाशी (मुल्ला) तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू सध्या कार्यरत पंचायत समिती, कागल जि. प. कोल्हापूर

(२) परिच्छेद क्र. ४.७९३(७५) करिता श्री. पी.डी.कडवे तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा सध्या सेवानिवृत्त (दि.३१.०७.२०१५)

(३) परिच्छेद क्र. ५.७२(६) करिता श्री. एस. जे. आसुटकर तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी सध्या कार्यरत ग्रामपंचायत बरबडी ता. वर्धा

यांचेवर महाराष्ट्र स्थानकि लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडात्मक कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना पत्र क्र. जिपव/विवि/ऑडीट डीस्पेजल/वशि-७१/२०१९ दिनांक २९/१/२०१९ अन्वये सादर करण्यात आलेले आहे.

तसेच पुनश्चः पत्र क्र. जिपव/विवि/ऑडीट/डीस्पोजल/वशि३९५/२०१९ दिनांक २६/०४/२०१९ अन्वये स्मरणपत्र देण्यात आलेले आहे.

विभागीय आयुक्त नागपूर यांचेकडे सादर केलेले एकूण ३ प्रस्ताव.

जि.प. वर्धा कार्यवाही सुरू आहे.

**(२) सदरील बाब शासनस्तरावरील आहे.**

**(३) सदरील बाब शासनस्तरावरील आहे.**

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-७).**—१) महाराष्ट्र स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ नुसार कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येते. २) महालेखापाल व स्थानिक निधी लेखापरीक्षण सुरू असतांना त्यांना लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी नोडल ऑफीसरची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना या विभागाच्या परिपत्रक क्र. २०१३ (७/ ९३) वित्त ८ दिनांक ११/२/२०१३ व परिपत्रक क्र. पंरास-२०१५/प्र.क्र. २८/ वित्त-७ दि. ३०/३/१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहे.

**वित्त विभागाचे अभिप्राय.——**लेखापरीक्षणासाठी विहित मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३७/ कोषा - प्रशा -४, दि. १५ सप्टेंबर, २०१७ व शासन शुद्धीपत्रक दि. ३ ऑक्टोबर, २०१७ निर्गमित करून वित्त विभागाकडून यापूर्वीच कार्यवाही करण्यात आली आहे. (शासन परिपत्रकाची प्रत संलग्न)

सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ५ मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० यात आणखी सुधारणा करिता अध्यादेशानुसार कलम ८ मध्ये मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील पोटकलम (१) मध्ये पंचवीस हजार रूपयांपर्यंत अशी सुधारणा करण्यात आली आहे. तथापि संबंधीत अधिनियमात दुरूस्ती करून रुपये ५०, ०००/- दंड अथवा एकूण रक्कमेच्या १०% इतकी रक्कम दंड म्हणून आकारण्याची तरतूद करण्याबाबत प्रश्नास अनुसरून, संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा नवी मुंबई यांचेकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात येतील. त्यानुसार उक्त अधिनियमातील दुरूस्ती करण्याची कार्यवाही वित्त विभागाकडून करण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जुलै,२०१९ व दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने प्रधान सचिव, वित्त विभाग यांना विचारणा केली की, लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे. यावर प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी खुलासा केला की, या प्रकरणी संचालक, स्थानिक निधी लेखा यांच्याशी चर्चा केली, असून याबाबतची कारवाई विभागीय स्तरावरून होत असते. २५ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये एवढा दंड करणे. त्याबाबत आम्ही विधी व न्याय विभागास प्रस्ताव पाठविला होता. सदर प्रस्तावास विधी व न्याय विभागाने मान्यता दिली असून त्यांनी आम्हाला अधिसुचनेचा मसुदा (नोटिफिकेशनचा ड्राफ्ट) तयार करून पाठविण्यास सांगितले आहे. त्यानुसार आम्ही मसुदा तयार करून पाठविला असून तो देखील आठ दिवसांमध्ये मंजूर होईल. त्यानंतर आम्ही निर्गमित करु. समितीने प्रधान सचिव, वित्त विभाग यांना निदेश दिले की, याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर तसा अहवाल समितीस सादर करण्यात यावा. यावर प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी सहमती दर्शवली. समितीने सूचना केली की, लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणेबाबत संबंधितांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ प्रमाणे दंड आकारून त्याची नोंद सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात यावी.

समितीने प्रधान सचिव, वित्त विभाग यांना निदेश दिले की, लेखापरीक्षणासाठी कागदपत्रे उपलब्ध करून न देणे ही कस्टोडियनची जबाबदारी आहे. पण त्याला सोडून कनिष्ठ पातळीवरील कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येत आहे. समितीने आपणास सूचना केल्यानुसार आपण दंडाची रक्कम २५ हजारांवरून वाढवून ५० हजार रुपये करण्याबाबतची कार्यवाही सुरू केली आहे. परंतु या सर्व बाबी कालमर्यादेत पार पडल्या पाहिजेत. तशी तरतूद कायद्यामध्ये नमूद केली पाहिजे. नाहीतर गेल्या दहा ते वीस वर्षापासूनची प्रकरणे प्रलंबित असून त्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. विभागीय स्तरावर वीस हजार प्रकरणे प्रलंबित असून त्यावर कालबद्ध पद्धतीने कार्यवाही झाली पाहिजे, तशी तरतूद शासन निर्णयामध्ये करण्यात यावी. यावर प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी सहमती दर्शवली. तद्नंतर संचालक स्थानिक निधी यांनी अधिकची माहिती विशद केली की, पंचायती राज समितीने शिफारस केली होती की, दंडाची रक्कम वाढवावी व दंडाचे सध्याचे संपूर्ण अधिकार विभागीय स्तरावर द्यावेत. कारण पूर्वी दुय्यम दर्जाच्या दंडाधिकाऱ्यांपर्यंत जावे अशी तरतूद होती. त्या अनुषंगाने नॉन प्रॉडक्शन झालेल्या रकमेच्या ५ टक्के किंवा ५० हजार रुपये असा दंड प्रस्तावित केला असून तो अंतिम स्टेजमध्ये आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणे हा खूपच गंभीर विषय आहे. समितीने वर्धा, जिल्हा परिषदेस भेट दिली असता, लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून दिले नसल्या प्रकरणी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंड व एक वेतनवाढ रोखून तशी नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकामध्ये करण्याबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एकूण ८ परिच्छेद होते. चौकशी केल्यानंतर असे लक्षात आले की, ४ परिच्छेदामध्ये असा उल्लेख नव्हता की, त्यांनी कागदपत्रे दाखविली नाहीत. ३ लेखा परिच्छेदामध्ये डॉ.शबाना मोकाशी, तत्कालीन गट विकास अधिकारी पंचायत समिती सेलू, श्री.पी.जी.कडवे, तत्कालीन गट विकास अधिकारी कारंजा व श्री.आसुटकर, ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत बरबडी, यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २८/१०/२०२१ ला विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात आले होते. सद्यःस्थितीत श्री. पी.जी. कडवे, तत्कालीन गट विकास अधिकारी, कारंजा हे दिनांक १३ मार्च, २०२१ ला मृत्यु पावलेले आहे तरी सदर प्रकरणात मा. विभागीय आयुक्त यांच्याकडून कोणतीही सूचना प्राप्त नसल्याने पुनःश्च स्मरण पत्र दिनांक २३ मार्च, २०२२ ला देण्यात आले आहे. परंतु, अद्याप त्यावर काही कारवाई झालेली नाही. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, आपल्याकडून विभागीय आयुक्तांना स्मरणपत्र देऊनही

संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यांना किती दंड आकारला होता, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्यांना २५ हजार इतका दंड आकारला होता.

समितीने अप्पर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांना निदेश दिले की, एखाद्या प्रकरणात कोटयवधी रुपयेचा अपहार सिद्ध झाला तर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार २५ हजार रुपयांच्या दंडाची तरतूद आहे. तरी अपहार केलेल्या रक्कमेच्या २५ टक्के रक्कम भरून घेणे किंवा दंडाची रक्कम २५ हजारांऐवजी ५० हजार करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा. याबाबत अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, असा निर्णय घेता येईल. परंतु, प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये लेखापरीक्षणाच्या वेळेस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत. हा विषय असतोच, काही लोकांनी खरोखर कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत. त्यांची कागदपत्रे मिसचिव्हस असतील. परंतु, काही ठिकाणी कुठलाही खर्च झाला नव्हता. माध्यमिक शाळांच्या तुकडीला मान्यता वगैरे त्या स्तरावरून होतच नाही. त्या उप संचालक किंवा वरिष्ठ स्तरावरून होतात. लेखापरीक्षणाच्या वेळेस कागदपत्रे मागितली त्यांनी ती उपलब्ध करून दिली नाहीत म्हणून हा विषय उपस्थित झाला आहे. काही ठिकाणी खर्च निरंक होता. तो नमूद केला नाही व त्याबाबतची माहिती देण्यात आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमात अशी तरतूद आहे की, लेखापरीक्षणासाठी कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाही तर, २५ हजार रुपयांचा दंड आहे. आपला जो सर्व खर्च आहे त्याची माहिती ऑनलाईन उपलब्ध व्हावी. आणि त्याचे ऑनलाईन ऑडिट व्हावे. संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी या संदर्भातील तयारी केलीच असेल. तसेच, रेकॉर्डचा आणखी एक सेट नेहमी तयार ठेवण्यात येईल. आता विषय असा आहे की, माहितीची झेरॉक्स प्रत दिली. परंतु, सत्य प्रत दिली नाही. त्यामुळे समजा ओरिजनल रेकॉर्ड अन्य ठिकाणी दिले गेले असेल तर, अशा ठिकाणी रेकॉर्डचा दुसरा अटेस्टेड सेट मिळाला तर अशा प्रकारचे विषय येणार नाहीत.

तद्नंतर, समितीने अपर मुख्य सचिव ग्रामविकास विभाग यांना विचारणा केली की, लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत? याबाबत अपर मुख्य सचिव यांनी समितीस विदित केले की, लेखापरीक्षणाच्यावेळी कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत हा मुद्दा संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांनी असाच न सोडता यासंदर्भात संबंधितांना. २-३ वेळा संधी दिल्यानंतर कधी ना कधी संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांच्यासमोर ती कागदपत्रे सादर केली पाहिजेत तरच तो मुद्दा क्लिअर होऊ शकेल. यावर संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांनी अधिकची माहिती विदित केली की, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. या विषया भोवती पंचायती राज समितीचे पूर्ण कामकाज चालते. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियम, १९३० मधील नियम ३१ च्या अनुषंगाने नियम ६ व ७ नुसार १५ दिवस अगोदर इंटिमेशन दिली जाते. त्यानंतर ऑडिटरचे रेकॉर्ड ठरविले जातात व ते त्या ठिकाणी येतात. त्यांना रेकॉर्ड दाखविणे अपेक्षित आहे.जिल्हा परिषदेच्या रचनेनुसार जिल्हा परिषदेच्या कृषी, पशुसंवर्धन, बांधकाम, लघु पाटबंधारे व समाजकल्याण या ५ विभागांचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. या ५ विभागांचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी काम पाहतात. शिक्षण, वित्त, पाणी पुरवठा, आरोग्य व अन्य विभागाचे पूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. महालेखापरीक्षकाच्या ऑडिटमध्ये एंट्री व एक्झीट कॉन्फरन्स असते व महालेखापरीक्षकाच्या गाईडलाईन्सनुसार संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांनी देखील ऑडिट करावे अशा आम्हाला आदेश आहेत. आमचे ट्रेनिंग देखील ते घेतात. जेव्हा लेखापरीक्षण करून लेखापरीक्षण अहवाल तयार होतो, तेव्हा शेवटचा दिवस हा अहवाल वाचनाचा असतो. त्यानुषंगाने संबंधित गट विकास अधिकारी किंवा संबंधित खाते प्रमुख यांनी संबंधित विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे जे विषय असतात त्यांना त्याबाबत अवगत केले तर मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे देखील त्यांच्या खाते प्रमुख किंवा गट विकास अधिकारी यांनी कोणते रेकॉर्ड लेखापरीक्षणाला दाखविले नाहीत हे लक्षात येते. अहवाल तयार केल्यानंतर आमच्या जिल्ह्याचा किंवा विभागाचा ऑडिटर लिहून घेतो की, चर्चा केली मान्य. जे परिच्छेद येतात त्याबाबत सबमिशन हेच आहे की, अहवाल अंतिम करीत असताना थोडी सजगता बाळगली तर, परिच्छेदांची संख्या कमी होईल व नंतर जे ॲलिगेशन्स होतात की, आम्ही हे रेकॉर्ड दाखवले होते तेव्हा ते पाहिले नाही, तसे होणार नाही. ऑडिटरला त्या ठिकाणी जी काही थोडी फार संधी मिळते ती देखील कमी होऊ शकेल. लेखापरीक्षणाचा कालावधी ३ महिन्यांचा असतो. त्यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समितीचे ठराविक दिवस असतात. त्यांना ती तारीख कळविलेली असते. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित विभागाचे लेखापरीक्षण अहवाल अंतिम करताना ५-१० मिनिटांचा वेळ दिला तर, ऑडिटर चुकीचे परिच्छेद घेणार नाही किंवा अनावधानाने जुन्या ऑथॉरिटी तेथे कोट करणार नाही. असे झाले तर परिच्छेद कमी होतील व ऑडिटचा सिरियनेस राहील. आम्ही आमच्या स्तरावर परिपत्रके काढतो. परंतु, त्यालाही थोड्या मर्यादा येतात. मी जिल्हा परिषदेमध्ये ८ वर्षे काम केले आहे. प्रत्येक प्रकरणामध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांची भुमिका महत्वाची असते. त्यामुळे कुठलाही अहवाल अंतिम करताना मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना घेऊनच खाते प्रमुखांनी (एचओडींनी) अहवाल अंतिम करावा. याबाबत अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, १० पंचायत समित्यापैकी ८ पंचायत समित्यांनी अभिलेखे उपलब्ध करून दिले म्हणून ते सर्व अडचणीत आले, म्हणजे त्यांचे काही विषय संचालक स्थानिक निधी लेखा यांनी काढले मग त्यावर दंड आकारला जातो. मात्र ज्या पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणाला अभिलेखे उपलब्ध करून दिले नाही ती निवांत राहिली. त्यामुळे ही

प्रवृत्ती वाढत चालली आहे. संचालकांनी लेखापरीक्षणाकरिता जिल्ह्यामध्ये वर्षातून एकदा नाही तर दोनदा यावे. पहिल्या वेळेस जर त्यांनी रेकॉर्ड दिले नाही, तर पुढच्या वेळेस फक्त तेवढ्याच लोकांकडून रेकॉर्ड घ्यावे. यावर संचालक स्थानिक निधी लेखा यांनी खुलासा केला की, यामध्ये एक तरतूद आहे. रेग्युलर ऑडिटमध्ये एखादे रेकॉर्ड दाखवले नसेल तर आम्ही याबाबत परिपत्रक काढलेले आहे की, जेव्हा आपण पुढच्या वर्षी ऑडिट करण्याकरिता जातो तेव्हा तो रेकॉर्ड घेतो. याबाबत अपर मुख्य सचिव यांनी विशद केले की, तुम्ही पुढच्या वर्षी जाण्याऐवजी ज्यांनी पहिल्या वेळेस रेकॉर्ड उपलब्ध करून दिलेले नाही त्या लोकांकरिता त्याच वर्षी दुसऱ्या वेळेस जावे.

समितीने संचालक स्थानिक निधी लेखा यांना सूचना केली की, आपण तेथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र पाठवा की, एवढे रेकॉर्ड दिलेले नाही. मग ते बैठक घेतील. कारण रेकॉर्ड न दाखविण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे.यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी स्पष्ट केले की, यामध्ये अजून एक तरतूद आहे. ऑडिट केल्यानंतर आपण अहवाल अंतिम करतो. प्रथम अनुपालनासाठी ४ महिन्यांच्या कालावधीबाबत कायद्यामध्ये १० (१) प्रमाणे तरतूद आहे. त्या ४ महिन्यांमध्ये जरी त्यांनी ते रेकॉर्ड दाखवले तर आम्ही ते पाहू शकतो. परंतु, ती संधी कोणी घेत नाही. आता समितीने सूचना केल्याप्रमाणे दहावी, बारावीला सप्लीमेंटरी असते त्याप्रमाणे आमच्याकडे असलेल्या काही अपवादात्मक प्रकरणामध्ये आम्ही तेथे जाण्याबाबत विचार करु. परंतु, तसे लेखी रेफरन्स मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून आमच्या डिव्हीजनच्या जॉईंट डायरेक्टरकडे आले पाहिजे त्यामुळे, अभिलेखे न दाखवण्याची प्रवृत्ती कमी होईल. तसेच, फक्त २५ हजार रुपये दंड करून चालणार नाही. कारण अभिलेखे न दाखवणे हा एक क्रिमिनल ऑफेन्स आहे. हे शासकीय रेकॉर्ड आहे. शेवटी लोकांच्या निधीचा वापर कसा होतो हे पाहण्याचा रोल लोकल फंडचा आहे पंचायती राज समिती सुद्धा त्या माध्यमातून पाहते. त्यामुळे रेकॉर्ड हे १०० टक्के दाखवले गेलेच पाहिजे. अगदी अपवादात्मक प्रकरणामध्ये एखादे ग्राम सेवक मयत होतात किंवा काही अडचण आली तर ते रेकॉर्ड हँडओव्हर होत नाही किंवा एखादे रेकॉर्ड नैसर्गिक आपत्तीमुळे जळते किंवा पाण्यामध्ये भिजते. यावर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अधिकची माहिती विदित केले की, ऑडिटला रेकॉर्ड दाखवले नाही तर त्याकरिता मुख्य लेखा व वित्त अधिकारी जबाबदार धरले तर संचालकांना रेकॉर्ड आपोआप मिळेल. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी स्पष्ट केले की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अखत्यारीतीत काम करतात. त्यामुळे आमचे काही संरक्षण त्यांना नाही.

समितीने पुढे संचालक स्थानिक निधी लेखा यांना सूचना केली की, आपले अकाऊंट ऑफिसर केवळ १० ते १५ हजार रुपयांच्या गैरव्यवहारावर आक्षेप घेतात व त्यावर समिती चर्चा करते. परंतु, १० लाख, २० कोटी एवढ्या मोठ्या रक्कमेच्या गैरव्यवहाराबाबत आपले अधिकारी काहीच आक्षेप घेत नाहीत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी ज्या परिच्छेदांवर आक्षेप घेतात त्याबाबत तुमच्या फायनान्स डायरेक्टरांनी त्यांच्यावर आक्षेप घेतले पाहिजे, करोडोंच्या गैरव्यवहाराबाबतचे परिच्छेद तसेच आहेत. छोट्या छोट्या आक्षेपांवर समितीत चर्चा चालू आहे. स्थानिक इशु तिथल्या तिथे मिटवले गेले पाहिजेत. मोठ्या विषयावर समिती समोर चर्चा झाली पाहिजे. संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी याबाबत खुलासा केला की, समितीने जो मुद्दा सांगितला त्याची आम्ही दखल घेऊ. ऑडिट करताना ऑडिटचे काही प्रिन्सिपल आहेत. आम्ही मार्च महिना कम्पलसरी घेतो. आमच्याकडे असलेले मनुष्यबळ विचारात घेता १०० टक्के ऑडिट होऊ शकत नाही. त्यामुळे मार्च महिना कम्पलसरी असतो. उर्वरित ११ महिन्यांतील ज्या महिन्यामध्ये जास्तीचा खर्च झालेला आहे असे दोन महिने व फायनल बिले असे ३ निकष लावून लेखापरीक्षण केले जाते. कारण वेळेचे बंधन असते. तरी देखील आम्ही याबाबत दक्षता घेऊ. याबाबत अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी स्पष्ट केले की, मोठ्या विषयांवर काहीच घडत नाही. त्यामध्ये अनियमितता होतच नाही की काय असे वाटते. परंतु, १२,१५ हजार रूपयांची अनियमितता होते की काय असे वाटावे अशी परिस्थिती दिसते.

समितीने अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांना विचारणा केली की, कुठल्याही जिल्हा परिषदेमध्ये लेखापरीक्षणाकरिता गेल्यानंतर कागदपत्रे उपलब्ध करून दिली जात नाहीत, याकरिता त्यांच्या वरिष्ठांना कळविले पाहिजे. एवढे मुद्दे यायला नको ते तिथल्या तिथेच निकाली काढले गेले पाहिजेत. यावर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, आम्ही या संबंधात संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांच्या समवेत चर्चा करु. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, आम्ही या विषयावर ग्रामविकास विभागाशी चर्चा करु. तद्नंतर, समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, वर्धा जिल्हा परिषदेची एकूण अपहारित वसुलीपात्र रक्कम किती आहे? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, या संदर्भातील माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही.

समितीने मत व्यक्त केले की, समिती ज्यावेळी जिल्हा दौऱ्यावर जाते त्यावेळी पंचायत समिती स्तरावर वसुलपात्र रकमेबाबत चौकशी झालेली नसते. काही प्रकरणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निकाली काढलेली नसतात. पंचायती राज समितीच्या दौऱ्याच्या दोन-चार दिवस अगोदर मोठ्या प्रमाणात वसुलपात्र रकमेची वसुली झालेली असते. जर पंचायती राज समिती जिल्हा दौऱ्यावर गेली नसती तर वर्षानुवर्षे तेथील वसुलीच झाली नसती. समितीला प्रत्येक दौऱ्यामध्ये असाच अनुभव येत आहे. यावर, अपर मुख्य सचिव यांनी विदित केले की, लेखापरीक्षणात जी रक्कम गुंतलेली आहे ती वसूल करून कमी कशी करता येईल या बाबत विभागाकडून मोहीम हाती घेण्यात आली आहे. यावर, संचालक स्थानिक निधी लेखा यांनी अधिकची माहिती विदित केली की, ज्या अहवाल वर्षाच्या अनुषंगाने पंचायती राज समितीचा दौरा असतो त्या अहवाल वर्षातील ऑडीट परिच्छेदांची उत्तरे सादर करून रेकॉर्ड अपडेट केले जाते. परंतु ज्या वर्षात पंचायती राज समिती काही कारणामुळे जिल्हा

दौऱ्यावर जाऊ शकत नाही त्या चार-पाच वर्षांचे परिच्छेद स्कीप झालेले असतात. समिती त्या वर्षात जिल्हा दौऱ्यावर गेली नसल्यामुळे त्या वर्षातील एकाही ऑडीट पॅराचे उत्तर दिले जात नाही. परिणामी, त्यामध्ये गुंतलेल्या रकमा प्रलंबित राहतात. काही रकमा आक्षेपाधीन असतात आणि काही वसुलपात्र असतात. ज्या रकमा वसुलपात्र असतात त्या वसूल झाल्या तरच शासनाला महसूल प्राप्त होईल आणि पंचायती राज समितीचा अंकुश राहतो. पंचायती राज समिती त्या वर्षात दौऱ्यावर आली नाही तरी विधिमंडळाला सादर करण्यात आलेल्या पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांची उत्तरे प्रकर्षाने सादर करावयास पाहिजेत. जेणेकरून परिच्छेदांची संख्या कमी होईल आणि वसुली सुद्धा मोठ्या प्रमाणात होऊ शकेल. या बाबतीत विभागाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

समितीने अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांना निदेश दिले की, ज्या वर्षात पंचायती राज समिती जिल्हा दौऱ्यावर जाऊ शकत नाही त्या वर्षातील वसुली करण्याची जबाबदारी कोणाची आहे, सदरहू वसुली किती वर्षात करावयास पाहिजे या संदर्भातील धोरण ठरविले पाहिजे. पंचायती राज समिती त्या वर्षात जिल्हा दौऱ्यावर गेली तरच वसुली करणार नाही तर ती वसुली सोडून देणार काय. या रक्कमा वसूल करण्याची जबाबदारी कोणाला तरी दिली पाहिजे. पंचायती राज समिती जिल्हा दौऱ्यावर जावो अथवा न जावो, विधिमंडळाला अनुपालन अहवाल सादर केल्यानंतर त्या परिच्छेदांच्या अनुषंगाने कार्यवाही करून वसुली झाली पाहिजे. या बाबत शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. यावर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी स्पष्ट केले की, पंचायती राज समिती जिल्हा दौऱ्यावर जावो अथवा न जावो परंतु लेखापरीक्षण हे दरवर्षी केले जाते. लेखापरीक्षण अहवालात जे आक्षेपार्ह मुद्दे काढण्यात आले आहेत त्यावर कार्यवाही करून ते निकाली काढावयास पाहिजेत. उदाहरणार्थ काही ठिकाणी रेकॉर्ड सादर केले तर तेथे बॅलन्स होतो किंवा काही ठिकाणी वसुली निघते. या सर्व अनुभवातून आम्ही नवीन कार्यपद्धती निश्चित करणार आहोत. जेणेकरून दरवर्षी सर्व लेखापरीक्षणाचा निपटारा होऊ शकेल. याबाबत, संचालक स्थानिक निधी लेखा यांनी विदित केले की, माझ्या माहितीप्रमाणे या अनुषंगाने ग्रामविकास विभागाने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती सुद्धा स्थापन केलेली आहे. आमच्या विभागाचे सह संचालक हे त्या समितीचे सदस्य आहेत. या संदर्भात कार्यपद्धती केलेली आहे. परंतु त्यास अजून थोडी दिशा दिली तर आपल्याला चांगले आऊटपुट मिळू शकतील.

**अभिप्राय व शिफारशी :**

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील कलम (३) व कलम ६ (१) नुसार लेखापरीक्षणास विहित वेळेत सर्व कागदपत्रांसह अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच लेखापरीक्षणाचे आक्षेप असल्यास त्याच वर्षात अभिलेखे सादर करून आक्षेप दूर करावेत. यानुसार कार्यवाही न केल्याने जिल्हा परिषद, वर्धा यांच्या लेखापरीक्षणात कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याचे आठ विषयांचे परिच्छेद नमूद करण्यात आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या नियम ७ नुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह या प्रकरणांची तपासणी करून अनियमितता आढळून आल्यास जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी असे निदेश समितीने दिले.

त्यानुसार आठ लेखा परिच्छेदांपैकी ३.३२६,३.५६३, ३.८६२, ४.४२, ४.१४१ या पाच प्रकरणात लेखापरीक्षणावेळी कार्यालयास उपस्थित सर्व अभिलेखे सादर करण्यात आलेली होती. त्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांविरूद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली नाही. तर ४.७९३ (७४), ४.७९३ (७५) व ५.७२ या तीन परिच्छेदाबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील नियम ७ नुसार संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

तसेच सोनेरा शेंद्री विजयगोपाल ते पुलगाव नाचणगाव रस्ता बांधकाम क्र. ७१ बाबत सदर कामाचे मूळ अंदाजपत्रक रुपये ५९,०९,०६०/- एवढ्या किंमतीचे होते. या कामाचे मूळ अंदाजपत्रक लेखापरीक्षणास सादर न केल्याने संबंधित शाखा अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांच्याकडून खुलासे घेण्यात आलेले आहेत. पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत कृत्रिम रेतनाच्या सुविधाद्वारे जमा होणारे सेवाशुल्क महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ यांचेकडे जमा करावायाचे असते. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे कलम २९ (४) नुसार १०००/- रूपयापेक्षा अधिक रक्कम रेखांकित धनादेशाने देणे आवश्यक असताना जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, वर्धा यांनी दिलेल्या निर्देशानुसार नियमबाह्यपणे रुपये ७८,३,०४०/- इतकी रक्कम रोखीने जमा करण्यात आलेली आहे. याबाबतची चौकशी करण्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध पुणे यांना कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत आष्टीमधील पाणी पुरवठा निधी व सामान्य निधीचे रोख पुस्तकात रुपये ९,६९,७४१/- इतकी रक्कम कोणाला व कशाला दिली याबाबत नोंदी केलेल्या नाहीत. या प्रकरणाची अनियमिततेची जबाबदारी निश्चित करून तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

लेखापरीक्षणास कागदपत्र उपलब्ध करून न दिल्याबाबतच्या प्रकरणांबाबत घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीने निदर्शनास आणले की, लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याच्या वेळी त्या तारखेसंबंधी आवश्यक कालावधीची नोटीस जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना पाठविण्यात येते. लेखापरीक्षण सुरू झाल्यानंतर आवश्यक ते अभिलेखे विहित मुदतीत सादर करण्याबाबत कालावधी दिला जात असतानाही

लेखापरीक्षणास कागदपत्रांसह महत्वाची अभिलेखे उपलब्ध करून दिली जात नाहीत. नियम ७ अन्वये असलेली दंडात्मक रुपये २५,०००/- इतकी रक्कम भरण्यास अधिकारी/कर्मचारी तयार असतात परंतु लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्यास तयार नसतात. यासाठी दंडत्मक रक्कम ५०,०००/- अथवा संबंधित प्रकरणातील तरतुदीच्या एक दशांश रक्कम यापैकी जास्त असलेली रक्कम दंड म्हणून आकारण्यात यावा अशाप्रकारची सुधारणा नियमात करण्याबाबत समितीने वारंवार शिफारस केली आहे. सदरहू शिफारशीच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करण्याबाबत सांगितले असता वित्त विभागाचे प्रधान सचिव यांनी स्पष्ट केले की, दंडात्मक रु. २५,०००/- रूपयांवरून रु. ५०,०००/- करण्यासह सदरहू रक्कम अथवा एकूण रकमेच्या ५ टक्के यापैकी जास्त असलेली रक्कम दंड म्हणून आकारण्याबाबतच्या प्रस्तावास विधी व न्याय विभागाने मान्यता दिल्यानुसार अधिसुचनेचा मसुदा (नोटीफिकेशनचा ड्राफ्ट) तयार करून पाठविण्यात आला आहे.

जिल्हा परिषद व त्यांच्या अखत्यारितील पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांवर जनतेचा पैसा खर्च होत असल्याने तो योग्य प्रकारे खर्च झाला आहे किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी त्यासंदर्भातील अभिलेखे लेखापरीक्षणास १०० टक्के उपलब्ध करून दिलीच पाहिजे. अन्यथा लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याच्या कारणास्तव कारवाई होणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील नियम ७ नुसार आकारण्यात येत असलेल्या दंडात्मक रक्कमेमध्ये वाढ करण्यासंदर्भातील नियमात सुधारणा करण्याबाबतची कार्यवाही तातडीने पूर्ण करून याबाबतचे आदेश सर्व संबंधितांना निर्गमित करावेत. तसेच सोनेरा शेंद्री विजयगोपाल ते पुलगाव नाचणगाव रस्ता बांधकाम प्रकरणातील शाखा अभियंता यांच्याकडून घेण्यात आलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यात यावी. आष्टी ग्रामपंचायत मधील लाखो रूपयांच्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांची विभागीय चौकशी तातडीने पूर्ण करून त्यानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे कृत्रिम रेतनाचे सेवा शुल्क रोखीने प्रदान करण्याच्या प्रकरणाची चौकशी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, यांनी तातडीने पूर्ण करून अधिकारी दोषी आढळून आल्यास त्याच्यावर कारवाई करावी. उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जिल्ह्यातील ज्या पंचायत समित्यांनी व ग्रामपंचायतीनी लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून दिली तेथील अधिकारी/ कर्मचारी तपासणीमध्ये दोषी आढळून आल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात येते परंतु जेथे अभिलेखेच उपलब्ध करून दिली जात नाहीत तेथील अधिकारी/कर्मचारी अडचणीत येत नाहीत. त्यामुळे अभिलेखे उपलब्ध करून न देण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे, यासाठी ज्या पंचायत समिती व ग्रामपंचायतींनी पहिल्या वेळेस अभिलेखे उपलब्ध करून दिली नाहीत त्यांच्यासाठी त्याच वर्षी दुसऱ्यांदा लेखापरीक्षण घेणे आवश्यक आहे. त्यावेळेसही अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करून न दिल्यास संबंधितांवर कडक कारवाई केली पाहिजे. तसेच लेखापरीक्षणात लाखो व कोट्यवधी रूपयांच्या गैरव्यवहाराच्या प्रकरणाबाबत लेखापरीक्षकाकडून काहीच आक्षेप न घेता हजारो रूपयांच्या गैरव्यवहाराच्या प्रकरणांबाबत आक्षेप नोंदविले जातात. त्यामुळे शुल्लक गैरव्यवहारांच्या आक्षेपांबाबतचे परिच्छेद समिती समोर चर्चेस येतात त्यामुळे यामध्येही सुधारणा होण्याची आवश्यक आहे. त्याचप्रमाणे समिती ज्या जिल्ह्यांना भेटी देते त्याचवेळेस लेखा परिच्छेदांची उत्तरे सादर करून अभिलेखे अद्ययावत करण्यात येतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वसुलपात्र रक्कमेची वसुली होऊन शासनखाती जमा करण्यात येते. यासाठी विभागाकडून वसुलपात्रमध्ये गुंतलेली रक्कम कमी करण्याच्या दृष्टीने विशेष मोहिम राबविली जाते. परंतु ज्या वर्षी समिती दौऱ्यास येत नाही त्या वर्षी लेखा परिच्छेदांची उत्तरे सादर करण्यात येत नाही परिणामी त्यामध्ये गुंतलेली रक्कम प्रलंबित राहते. यासाठी समिती जिल्हा दौऱ्यावर जावो अथवा न जावो विधीमंडळास पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सादर केल्यानंतर दरवर्षी लेखापरीक्षण करण्यात येते. या लेखापरीक्षण अहवालात जे आक्षेपार्ह मुद्दे आलेले आहेत त्यावर कार्यवाही होऊन आक्षेप निकाली काढलेच पाहिजे. तसेच लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याने दंडात्मक रक्कम वसूल करावयाची कारवाई विहित कालमर्यादेत पार पडत नसल्याने मागील १० ते २० वर्षापासूनची प्रकरणे प्रलंबित आहेत. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयांबाबत गट विकास अधिकारी व सबंधित विभाग प्रमुख यांनी लेखापरीक्षणास कोणती अभिलेखे उपलब्ध करून दिली नाहीत. याबाबतची माहिती घेऊन लेखापरीक्षकांचा अंतिम अहवाल करीत असताना थोडी सजगता बाळगणे आवश्यक आहे. त्यामुळे आक्षेपासंदर्भातील परिच्छेदांची संख्या कमी होऊन लेखापरीक्षणांचे काम अधिक योग्य प्रकारे होऊ शकेल. उपरोक्त समितीकडून उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, वित्त विभाग व ग्रामविकास विभाग यांनी समन्वयाने चर्चा करून याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, वर्धा

**सर्वसाधारण शिफारशी :**

**(१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रक्कमा जमा करण्याबाबत :-**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः वर्धा जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या रक्कमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची / अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जूनी आहेत. जिल्हा परिषदांनी ती वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रक्कमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रक्कमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या, शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीक्ष परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोप पत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यांत निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी व विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रक्कमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रूपयांचा निधी तरतूद करून मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रक्कमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारे होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत शासनाविषयी नाराजी व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रक्कमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार / अपहार / अखर्चित रक्कमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून वर्धा जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रक्कमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :—**

समितीने वर्धा जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखापरीक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखापरीक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती ती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखापरीक्षणास न दाखविणे ही अधिनियमानुसार गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखापरीक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असून देखील संबंधित अधिकारी लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १००/- रूपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रक्कमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखापरीक्षणाचे वेळी लेखापरीक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तरतूदीनुसार रुपये २५०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार वर्धा जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची प्रकरणनिहाय संपूर्ण माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरून समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरूद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण अंगिकारल्याने कारवाई करताना देखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःपक्षपातीपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषींविरूद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपरायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल. परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून "दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती" या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट – “अ”
# शासनाचे आदेश व परिपत्रके

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**पंचायती राज समिती**

**पंचायती राज समितीने दिनांक 8 ते 10 ऑगष्ट, 2018 या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीसाठीची प्रश्नावली बाबत अनुपालन**

| अ.क्र. | कार्यवृत्ताचादिनांक, परिच्छेद क्रमांक व पृष्ठ क्रमांक | मंत्रालयीन विभागाचे नांव | प्रश्न | त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही (अनुपालन) | मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | |
| 1) | दि. 08/08/2018 परिच्छेद क्रमांक 3.44 (सन 2013-14) पृष्ठ क्र. डी-11 ते ई-15 | **ग्रामविकास विभाग** | **जिल्हा वार्षीक योजनेंतर्गत जनसुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वितरणामधील अनियमितता :-** जनसुविधेच्या कामाच्या संदर्भात मा. न्यायालयाने दोन वेगवेगळया प्रकरणांमध्ये स्वतंत्र निर्णय देवूनही जिल्हा वार्षीक योजनेंतर्गत जनसुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वितरणासंदर्भातील शासन निर्णयामध्ये अद्याप सुधारणा न करण्याची कारणे काय आहेत? | सदर बाब शासन स्तरावरील आहे. | 1) **ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (योजना-6)** :- ग्रामविकास विभागाने शासननिर्णय क्र.ददभु-2010/प्र.क्र.62/पंरा-6, दि.16/9/2010 मधील मुद्या क्र. 4 नुसार कामांना मंजूरी देताना प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत देईल, असे नमुद केले आहे. तसेच, मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचीका क्र.1698/2011 (श्री. चरणसिंह वाघमारे वि. महाराष्ट्र शासन व इतर) तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.4831/2013 (श्री. सुधीर सुर्यवंशी वि.महाराष्ट्र शासन व इतर) या 2 न्यायालयीन प्रकरणी शासनास निदर्शनास आणलेल्या बाबी लक्षात घेऊन नियोजन विभागाने जिल्हा नियोजन समितीच्या कामकाजाबाबत शासननिर्णय क्र.डिएपी 1014/प्र.क्र.295/का1481, दि. 17/12/2014 नुसार मुद्या क्र.5 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाकडील (जि.प., नगरपालीका, महानगरपालीका, नगरपंचायत) योजना/कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | राहतील, असे स्पष्ट केले आहे.ग्रामविकास विभागाचा उपरोक्त नमुद दि.16/9/2010 रोजीचा शासननिर्णय कामांना मंजूरी देताना प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत देईल, असे नमुद केले आहे. यामुळे ग्रामविकास विभागाच्या शासननिर्णयात नियोजन विभागाच्या शासन निर्णयामधील बाब अधोरेखित केलेली आहे. त्यामुळे नियोजन विभागाच्या 17/12/2014 रोजीच्या शासननिर्णयात 2 न्यायालयीन प्रकरणानुसार बाबी समाविष्ट असून त्यानुसार ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय स्पष्ट आहे. तरी सदर अभिप्राय समितीने कृपया मान्य करावे, ही विनंती |

| अ.क्र. | कार्यवृत्ताचादिनांक, परिच्छेद क्रमांक व पृष्ठ क्रमांक | मंत्रालयीन विभागाचे नांव | प्रश्न | त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही (अनुपालन) | मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| 5) | दि. 08/08/2018 परिच्छेद क्र. 3.328 (सन 2013-14) पृष्ठ क्र. एच-25 ते एच-27 | ग्रामविकास विभाग | **13 वा वित्त आयोग जिल्हा परिषद स्तराचे कामाबाबत :-** संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषद स्तरावर 13 व्या वित्त आयोगांतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे विम्याचे पैसे कामे पूर्ण झाल्यानंतर संबधित विमा कंपनीला देण्यात आल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच कामे पूर्ण झाल्यानंतर विमा कंपन्यांचा विम्याचा दिलेला हप्ता वसूल करण्यात आला आहे काय, असल्यास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत? | सदर प्रकरणी चौकशी केलेली असून जिल्हा परिषद स्तरावर 13 वा वित्त आयोग व इतर निधीमधून घेण्यात आलेल्या कामांचे देयकातून शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दिनांक 08 सप्टेंबर 2010 नुसार तसेच कंत्राटी कामाचा व ते काम पूर्ण करण्याकरीता नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधी कडे उतरविण्याची कार्यपध्दती बाबतचे परिपत्रकानुसार जिल्हा परिषद, वर्धा या कार्यालयाकडून कार्यवाही केलेली आहे. कंत्राटी कामांचे देयकातून 1 टक्का दराने कपात करुन शासकीय विमा संचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडू धनादेशाव्दारे रक्कमेचा भरणा केलेला आहे. त्यामुळे राज्य शासनाचे महसुलात वाढ झालेली आहे. (कंत्राटी कामांच्या विम्याच्या धनादेशाव्दारे भरणा केल्याबाबतचे पत्र सोबत जोडलेले आहेत. तसेच विमा उपसंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र व परिपत्रक सोबत जोडलेले आहेत.)<br>ईतर कोणत्याही खाजगी विमा कंपनीला विम्याची रक्कम दिलेली नाही. शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही केल्याने जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही केलेली नाही. खाजगी विमा कंम्पन्यांना विमा रक्कम भरलेली | 1) **ग्रामविकास विभागाचे अभिप्राय**:- वित्त(3) जिल्हा परिषद, वर्धा यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | नाही. त्यामुळे विम्याचा हप्ता वसुल करण्यात आलेला नाही.<br>कंत्राटी कामाचा विमा काढणेबाबत जि.प. वर्धा यांनी विमा परिपत्रक क्र/बांधकाम विभाग/ लेखा/ जा. क्र. 2230/2019 दिनांक 6/5/2019 अन्वये काढलेले असून यापुढे कंत्राटी कामाचा व ते काम पुर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामागाराचा विमा शासकीय विमानिधीकडे काढल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिका-यांना कळविण्यात आले आहे. | |

| अ. क्र. | कार्यवृत्ताचा दिनांक, परिच्छेद क्रमांक व पृष्ठ क्रमांक | मंत्रालयीन विभागाचे नांव | प्रश्न | त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही (अनुपालन) | मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| 6) | दि.08/08/2018 परिच्छेद क्र. 3.566, 3.567 (सन 2013-14) पृष्ठ क्र. आय-31 ते जे-33 | 1) मृद व जलसंधारण विभाग 2) ग्रामविकास विभाग | **साठवण तलाव सोरटा तसेच साठवण बंधारा बेलगांव येथील बांधकामात आढळून आलेली अनियमितता :-** साठवण तलाव सोरटा तसेच साठवण बंधारा बेलगांव येथील बांधकामात आढळून आलेल्या अनियमिततेप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत? | **1) साठवण तलाव सोरटा ता. आर्वी परिच्छेद क्र. 3.566 येथील बांधकामात सखोल चौकशी करण्यात आलेली आहे. सदर कामामध्ये सिमेंट काँक्रीट (1:2:4) चे काम करण्यात आले आहे. काम सुरू असतांना संधानक नमुना घेउुन प्रयोगशाळेमध्ये चाचणी घेण्यात आलेली आहे. त्या चाचण्यायोग्य आढळुन आलेल्या आहेत.कामावर वापरण्यात आलेल्या सिमेंटची चाचणी प्रयोगशाळेमध्ये घेण्यात आलेली आहे व वापरण्यात आलेले सर्व साहित्य हे तांत्रिक दृष्या योग्य होते.**<br>**मे.शिवशक्ती कंस्ट्रक्शन वर्धा यांचे निवेदच्या पान क्र. 13 वर दर नमुद असुन त्यावर कार्यकारी अभियंता यांनी दर बघुन स्वअक्षरात लिहुन स्वाक्षरी केलेली आहे. तसेच त्यावर कंत्राटदाराची सुध्दा स्वाक्षरी आहे. जी काही खोडतोड आहे ती निविदा भरावयाच्या वेळेची आहे व त्यावर कंत्राट दाराची स्वाक्षरी आहे. व पुर्ण निविदा प्रकियेमध्ये कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही चौकशीत अनियमियता आढळुन आलेली नाही, म्हणुन सबंधितांची जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता भासली नाही.**<br>**2) साठवण बंधारा बेलगांव ता. वर्धा परिच्छेद क्र. 3.567येथील बांधकामात सखोल चौकशी करण्यात आलेली आहे.सदर कामाचा आदेश दि.** 13/06/2012 | **1) मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय:- जिल्हा परिषद वर्धा यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
